21) नगरपरिषदेकडे असणा-या सर्व रक्कमांचा/निधीचा आढावा घेतला असता नपचा व्यवहार हा बँकेमार्फत होत असला तरी गुंतवणूका या आयडीबीआय बँकेत केल्या जातात. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक शासाउ-10.15/प्र.क्र.42/सा.उ.मुंबई दि.27.10.2015 मधील निर्देशानुसार गुंतवणूका या खाजगी बँकेत न करता त्या राष्ट्रीयकृत बँकेत करणे अत्यावश्यक आहे.

22) वरीलप्रमाणे वार्षिक लेखा तयार करताना लेखा विभागाने आपल्याकडे असणाऱ्या लेख्यांचे किर्द शिल्लक व बँक शिल्लक याचा ताळमेळ घेवून वरील उणिवांच्या पुर्ततेसह वार्षिक लेखा वस्तुनिष्ठ बनविणे आवश्यक आहे. अंदाजपत्रक तयार करताना वरील सर्व नियमांचे पालन केले नसल्याचे स्पष्ट होते.

DATSBKM7201 (Ref No : 191, Hmm No : 216)

7 मत्ता व दायित्त्व सादर करण्यात आले नसलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी चे सन 2020-21-22 चे लेखापरीक्षणामध्ये मत्zwj;ता व दायित्zwj;व सादर करण्यात आले नाही.
1) महाराष्zwj;ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 155 नुसार नमुना क्र.128 व 129 जंगम व स्zwj;थावर मालमत्zwj;ता नोंदवही व नियम 144 नुसार नमुना क्र.114 मध्zwj;ये जडसंग्रह साठा नोंदवही ठेवणे आवश्zwj;यक आहे. परंतु अशा नोंदवहया ठेवलेल्zwj;या नसल्zwj;यामुळे मत्zwj;तेमध्zwj;ये, नगर परिषदेची मालमत्zwj;ता जसे इमारत, जमिनी, गाळे, रस्zwj;ते व इतर सर्व चल संपत्zwj;ती, फर्नीचर चल व अचल संपत्zwj;ती किती आहे. ठेकेदाराचे / पुरवठादाराचे किती देयके व ठेवी प्रलंबीत / देय आहेत, महाराष्zwj;ट्र जीवन प्राधिकरणाची / पाटबंधारे विभागाची पाणीपट्टी थकबाकी व महाराष्zwj;ट्र राज्zwj;य विद्युत वितरण कंपनीची विज बिलाची थकबाकी किती आहे. याबाबत पडताळणी करता आली नाही. दि. 31/03/2022 अखेरची सर्व देय रक्zwj;कम दायित्zwj;वामध्zwj;ये व सर्व शिल्zwj;लक व येणे रक्zwj;कमा मत्zwj;तेमध्zwj;ये दशर्वुन अचुक असे मत्zwj;ता व दायित्zwj;वाचे विवरणपत्र करणे आवश्यक आहे.
2) नगरपरिषदेने मत्zwj;ता व दायित्zwj;व सादर केले नाही , त्यामुळे नगरपरिषदेची आर्थिक स्थिती बाबत तपासणी करता आली नाही थकबाकीची वसुली 100 टक्के होणे आवश्यक आहे.

3) दिनांक 31/03/2022 अखेर 5 टक्के अनुशेष, 3 टक्के अनुशेष तसेच 10 टक्के मबाक खर्च अनुशेषाची रक्कम खर्च करणे आवश्यक आहे अन्यथा त्यामुळे दायित्व रक्कमेत वाढ होईल.

4) सदर नपाकडे असलेल्या ठेवीच्या परतफेडीबाबत सदर रक्कमेची योग्य प्रकारे गुंतवणुक करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे दायित्व सदरी दर्शविलेली अनामत / सुरक्षा ठेवीची रक्कम व मत्ते सदरी दर्शविलेल्या अनामत / सुरक्षा ठेवीची रक्कम यामध्ये तफावत दिसुन येते. तरी सदर रक्कमेबाबत ताळमेळ घेउन योग्य ती रक्क्म दर्शविणे आवश्यक आहे.

5)12 व्zwj;या व 13 व्zwj;या वित्zwj;त आयोगाच्zwj;या शिफारशीनुसार नगरपरिषदेने दुहेरी लेखा नोंद

पदधतीचा अवलंब करण्यासाठी प्रथमतः नगरपरिषदेच्या स्वतःच्या मत्तेची परिगणना करणे आवश्यक केले आहे. परंतु तशा संबंधीची कार्यवाही केल्याचे अभिलेख्यांची पडताळणी केली असता आढळुन आले नाही.

6) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 60 नुसार वार्षिक लेख्यांचा सारांश नमुना 28 मध्ये तयार करून प्रत्येक वर्षी 31 जुलै पुर्वी संचालक, नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी व संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा मुंबई यांना पाठवणे आवश्यक आहे, तसेच नगर परिषदेच्या मत्ता व दायित्व यांचे विवरणपत्र नमुना क्र.29 मध्ये तयार करुन तो प्रशासनिक अहवालाला संलग्न केले पाहिजे तसेच सदरच्या प्रशासनिक अहवाल वरिलप्रमाणे संचालक, नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी व संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांना पाठविणे आवश्यक आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) कर्मचा-याच्या खर्चासाठी अनामत रक्कम प्रदान करण्यात आल्यावर नगरपरिषदेकडुन त्याचे समायोजन वेळीच करण्यात येत नाही व त्यातुन नेमका खर्च कोणत्या कामावर केला याबाबत समायोजन देयक तयार न केल्यामुळे अनामत रक्कम संबंधीत कर्मचा-याकडे शिल्लक राहते व पर्यायाने नगरपरिषदेचा निधी नाहक गुंतुन राहतो. अग्रीमाचे समायोजन वेळीच करण्याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. प्रलंबीत अग्रीमाची रक्कमेच्या समायोजनाकरीता संबंधित कर्मचाऱ्याकडुन विलंब झाला असेल तर सदरील रक्कम्म संबंधीत कर्मचा-याकडुन दंडनीय व्याजासह वसुल होणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

8) नगरपरिषदेची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत स्थायी निदेश क्र.14 नगर परिषद संचलनालय, मुंबई यांचे आदेश क्र.2001/प्रक्र-6/2001/2 दि.26 नोव्हें.2001 मध्ये दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी करणे आवश्यक असता त्याप्रमाणे नगरपरिषदेने कार्यवाही केलेली नाही. सदरील स्थायी निदेशातील सुचनांनुसार व खालीलप्रमाणे आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने योग्य ती उपाययोजना करण्यात यावी.
(1) नगरपरीषदेने भांडवली मुल्यावर कराची आकारणी करणे.
(2) नपाने कराची थकबाकी वसुली 100 टक्के कशी होईल यासाठी प्रथम पासुन वसुलीबाबतचे योग्य नियोजन करावे.
(3) नपाने आपल्या मालकीचे भाडयाने दिलेले दुकान गाळे यांचे विहीत मुदतीप्रमाणे मुदत संपलेनंतर भाडेपटटयाचे फेर मुल्यांकन करावे व त्यापासुन मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ करावी तसेच गाळे रिकामे राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
(4) आठवडा व दैनंदिन बाजार यापासुनच्या उत्पन्नात वाढ करणेच्या दृष्टीने लिलावाव्दारे ठेका पध्दतीने वसुली करुन उत्पन्न वाढविणेसाठी प्रयत्न करणे अथवा दर्शनी मुल्यात वाढ करावी.
(5) जाहीरात कराच्या उत्पन्नात वाढ करावी.
(6) नपाकडे मत्ता दायित्व सदरी असलेले निधी, शासनाकडुन प्राप्त झालेल्या निधीपैकी अखर्चित निधी, अनामती/सुरक्षा ठेवी, सदर रक्कमांबाबत व्याज रक्कम निश्चित करुन नियमाप्रमाणे दिर्घ व अल्प मुदतीतील गुंतवणुक करणे आवश्यक आहे.
(7) तसेच वित्तीय स्थिती सुधारणेस विशेष परिपत्रक क्रमांक 6 नपा प्रशासन संचालनालय परिपत्रक क्रं. संकीर्ण/10/2000/प्र.क्रं.88/00/8, दिनांक 19/10/2000 अन्वये पुढील उपाय योजनांचीही अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अ) अनावश्यक खर्च कमी करणे, ब) आस्थापनेवरील खर्च कमी करणे, क) शुभेच्छा जाहीराती न देणे, ड) समारंभावरील खर्च टाळणे, इ) बांधकामाची मापे निविदाकारासोबत वाटाघाटीने अंदाजपत्रकीय दराने काम करुन घेण्याचे प्रयत्न करणे.

9) नगरपरिषदेने एप्रिल-2022 ते दि.28/06/2022 अखेरचे नगरपरिषद फंड व योजना निधीचे जमा खर्च विवरणपत्र लेखापरिक्षणास सादर केले नाही.
उपरोक्त प्रमाणे सुचविलेल्या बाबींची कार्यवाही करुन नगरपरिषदेने उत्पन्नात वाढ होऊ शकेल याकडे जास्तीत जास्त लक्ष देण्यात यावे. तसेच वस्तुनिष्ठ मत्ता दायित्व विवरणपत्र तयार करुन नपाची आर्थिक स्थिती विषद करावी.

DATABPM8101 (Ref No : 160, Hmm No : 2)

8 स्वेच्छा सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे शेवटचे वेतन चुकीच्या पध्दतीने अदा केलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	2093.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषदेकडील आस्थापना विभागाकडील सन 2020-2021 ते 2021-2022 कालावधीतील लेखापरीक्षणावेळी खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत. इचलकरंजी नगरपालिकेकडील स्वेच्छा सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची नस्तीची तपासणी केली असता खालील कर्मचाऱ्यांना शेवटच्या महिन्याचे जादा वेतन आदा करण्यात आलेले आहे.

1)श्रीम.शोभा तुकाराम पोळ, सफाई कामगार, आरोग्य विभाग, स्वेच्छा सेवानिवृत्ती दिनांक 12/02/2020

शेवटचे मूळ वेतन रक्कम रुपये 26400/- सदर कर्मचाऱ्यांना 11 दिवसांचे शेवटचे वेतन आदा करणे आवश्यक आहे. श्रीम. पोळ यांना शेवटचे वेतन 10924/- रुपये अदा करण्यात आलेले असून त्यांना 10371/- रुपये अदा करणे आवश्यक आहे. श्रीम. पोळ यांना 553/- रुपये शेवटचे वेतन जादा करण्यात आले आहे.

2) श्री. दशरथ बंडू वसगडे, लिपिक, जकात विभाग, स्वेच्छा सेवानिवृत्ती दिनांक 29/02/2020

शेवटचे मूळ वेतन रक्कम रुपये 44800/- सदर कर्मचाऱ्यांना 28 दिवसांचे शेवटचे वेतन आदा करणे आवश्यक आहे. श्रीम. पोळ यांना शेवटचे वेतन 44800/- रुपये अदा करण्यात आलेले असून त्यांना 43260/- रुपये अदा करणे आवश्यक आहे. श्रीम. पोळ यांना 1540/- रुपये शेवटचे वेतन जादा करण्यात आले आहे. तरी याप्रमाणे उर्वरीत कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांची पडताळणी करुन वसुली करुन शासन खाती भरणा करणेत यावी.

DATJZMM9301 (Ref No : 56, Hmm No : 14)

9 नगरपालिकेचे सन 2021-2022 चे व्दिनोंद वार्षिक लेख्यांमधील अनियमितते बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगररिषद इचलकरंजी यांचे सन 2021-2022 चे व्दिनोंद पध्दतीने तयार करण्यात आलेले वार्षिक लेखे तपासणी करण्यात आले. उपलब्ध करण्यात आलेला वार्षिक लेखा व प्रत्यक्ष जमा खर्च यामधील नोंदी तपासल्या असता करण्यात आलेल्या लेख्यामध्ये मोठ्या प्रमाणावर चुका दिसून येत आहे तपासणीच्या अनुषंगाने

काही निवडक बाबीची तपासणी केली असता त्यातील अनियमितते बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-13 दि.23 जानेवारी 2013 नुसार महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार लेखे ठेवणे आवश्यक असतांना नगरपरिषदेने त्यानुसार लेखे ठेवलेले नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 102 नुसार नगरपरिषदेचे जमा व खर्चाचे लेखे राज्यशासनाने विहित केलेल्या लेखासंहितेत अंतर्भूत असलेल्या नियमांस अनुसरुन आणि विहित केलेल्या रितीने नगरपालिकेसमोर ठेवले पाहिजेत. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. सदर अधिनियमातील कलम 104 नुसार नगरपरिषदेच्या लेखापरीक्षकांकडून सदर लेखे तपासून घेतले पाहिजेत व पुढील वर्षाच्या 30 जूनच्या आत ते नगरपरिषदेपुढे सादर करणे व त्याचा गोषवारा नगरपरिषद संचालकांना सादर करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही. या अधिनियमातील कलम 103 नुसार तिमाही व वार्षिक लेखे (जमा व खर्च) तसेच मंजूर अर्थसंकल्प नगरपरिषदेच्या कोणत्याही प्रोढ रहिवाश्यांस निरीक्षणासाठी खुले ठेवला पाहिजे. असे जमा खर्चाचे विवरणपत्र/अर्थसंकल्प निरीक्षणासाठी ठेवलेबाबतची स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही नगरपरिषदेने केलेली नाही..

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.48, 50, 94, 473 नुसार नमुना क्र.1 मध्ये सर्वसाधारण रोकडवही, नियम क्र.48, 52 ते 94, 473 नुसार नमुना नं.2 मध्ये सर्वसाधारण बँक पुस्तक ठेवणे आवश्यक आहे. नगरपरिषदेचे जेवढी बँक खाती असतील तेवढी नमुनी नं.2 ची सर्वसाधारण बँक पुस्तके ठेवणे आवश्यक आहे. सदर नमुना नं.2 नोंदवह्यातील व्यवहार दररोज बंद करण्यात येतील. नमुना नं.2 मधील दररोजची शिल्लक दुसऱ्या दिवशी पुढे ओढणे आवश्यक आहे व या नोंदवहीतील व्यवहाराची सर्वसाधारण खातेवही नमुना नं.2 (नियम क्र.48, 57 ते 60) मध्ये घेऊन या नोंदवहीची दररोजची शिल्लक पुढे ओढावयाची आहे. नमुना नं.3 (नियम 48, 55) नुसार प्रत्येक दिवसाची जर्नल नोंदवही, नमुना नं.4 (नियम 48, 57 ते 60) नुसार सर्वसाधारण खाते नोंदवही, नमुना नं.2 ची व बँक पासबुकातील नोंदीचा दरमहा नमुना नं.5 मध्ये ताळमेळ घ्यावयाचा आहे. परंतु नगरपरिषदेने नमुना नं.1 मध्ये रोखीचे व बँकचे व्यवहारांची एकच रोखवही तयार केलेली आहे व नमुना नं.2, 3, 4, 5 हे नमुने ठेवलेले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार विहित केलेली लेखांकन पध्दती नगरपरिषदेने अवलंबिली नाही.

3) नगरपरिषदेने नमुना नं.3 मध्ये जर्नल नोंदवही (रोजकिर्द) ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवहीमध्ये नोंद घेतांना प्रत्येक नोंदीचे नमुना नं.6 मधील जर्नल प्रमाणक ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदर जर्नल नोंदवहीमध्ये नगरपरिषदेस येणारे उत्पन्न (मत्ता) व दायित्व यांची नोंद घ्यावयाची आहे. परंतु अशी कार्यवाही नगरपरिषदेने केलेली नाही.

4) नगरपरिषदेने नमुना नं.7 (नियम क्र.60) नुसार तेरीज पत्रक (Trial Balance) तयार करावयाचा आहे. परंतु अशी कार्यवाही नगरपरिषदेने केलेली नाही.

5) नगरपरिषदेने वर्षाच्या शेवटी महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 385 ते 387 नुसार नमुना नं.80 (ताळेबंद), नमुना नं.81 (उत्पन्न व खर्च विवरणपत्र), नमुना नं.82 (जमा व प्रदाने खाते विवरणपत्र), नमुना नं.83 (रोख प्रवाह विवरणपत्र), तसेच नियम 388 नुसार दुय्यम अहवाल (जसे वृक्ष प्राधिकरण ,पाणीपुरवठा व जलनिस्सारण विल्हेवाट इ .) व नियम 390 नुसार इतर माहिती प्रकट करून त्याप्रमाणे वार्षिक विवरणपत्र तयार करुन नियम क्र.392 नुसार ते बरोबर असल्याबाबतचे नगरपरिषद लेखापरीक्षक प्रमाणपत्र देईल. परंतु नगरपरिषद, इचलकरंजी यांनी नमुना नं.82 (जमा व प्रदाने खाते विवरणपत्र) बनविण्यात आलेले नाही.त्यामुळे वार्षिक लेखे योग्य असलेबाबत तपासणी करता येत नाही.

6) सदर नमुना नं.63 लेखाशाखेस प्राप्त झाल्यानंतर त्यांची नोंद महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 62, 145, 256 नुसार नमुना नं.13 (प्राप्त देयकाची नोंदवही) ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

7) नगरपरिषदेने काढलेले परंतु तीन महिन्यात न वटलेल्या धनादेश विधीग्राह्य केल्याबाबत जर्नल नोंदवहीमध्ये नोंद नाही. त्यामुळे प्रलंबित धनादेशाबाबत पडताळणी करता येत नाही.

8) खाली नमुद केलेल्या वार्षीक लेख्यामधील जमा खर्च विवरणपत्र क्रमांक 81 व प्रत्यक्ष जमा रकमेत खाली नमुद केले प्रमाणे बाबी मध्ये तफावत आढळुन येते. उदाहरणादाखल सदर तफावत दाखवण्यात आली आहे उर्वरित सर्व बाबींची तपासणी करून योग्य ती दुरुस्ती करुन वार्षीक लेख्या मंजुरी करीता फेर सादर करणेत यावा.

कर	वार्षीक लेख्यातील लेखा कोड क्रमांक	वार्षीक लेख्यातील विवरणपत्र क्रमांक 81 मध्ये जमा बाजुस जमा दर्शवीलेली	प्रत्यक्ष जमा	तफावत कमी / जादा
एकत्रित	1111 (SHEDULE IE-A)	204315217	201713081	
भुई भाडे	1411 (SHEDULE IE-B)	6747997	5159259	
घंटागाडी भाडे	1460 (SHEDULE IE-D)	3556226	3544726	
पाणी पट्टी	9901190	70994187	60016325	10977862
भुयारी गटर कर	9441119 (SHEDULE 15)	13026846	13422833	395987
अग्निशमन कर	9161140	2112666	2157563	44897
वृक्षकर	9481119	7368586	7264240	104346
विशेष शिक्षण कर	9901190	20631444	20234011	397433
कचरा संकलन शुल्क	9901190	12625438	00	12625438
व्यंकोबा मैदान भाडे	4571411	1170478	00	1170478
मटन व फिश मार्केट भाडे	4431424	425077	509951	84874
विकली मार्केट फी	4441424	4514175	13560	4500615

भाजी मार्केट फी	4421424	1010100	7745832	6735732
शॉपिंग सेंटर भाडे	4511424	4787259	6359832	1572573
नाटयगृह भाडे	5111429	283000	280550	2450
कत्तलखाना भाडे	6711429	249866	00	249866
पे ॲण्ड युज टॉयलेट चार्जेस	3531517	165810	00	165810
दवाखाना सेवेपासून उत्पन्न	6101521	668316	660070	8246
माँटेसरी प्रवेश फी	8211525	44000	4400	39600
सर्व्हेअर फी / आर्केटेक्ट फी	4141543	142790	27000	115790
विवाह नोंदणी फी	0311549	396647	371000	25647
नकला व रुजवात फी	6401573	863084	852352	10732

9) दुहेरी लेख्यातील विवरण पत्रक क्रमांक 81 व 82 ची व प्रत्यक्ष खर्च वर्गीकरण यांचा ताळमेळ घेतला असता एकूण रक्कमेमध्ये सर्व खर्च बाबी मध्ये मोठ्या प्रमाणावर फरक दिसून येत आहे. त्यामुळे सदर चा करण्यात आलेला लेखा व प्रत्यक्ष झालेला खर्च यांची तपासणी करून आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

अ.क्र.	**लेखा शिर्ष (वार्षीक लेख्याची हेड नंबर)**	**लेखाशिर्षा चे नाव (वर्गीकरणामधील नोंद)**	**वर्गीकरणाची रक्कम**	**वार्षीक लेख्याची रक्कम**	**तफावत**
1	312111	कॉन्झरवन्सी व खास साफसफाई नोकर पगार	184789536	18479536	166310000
2	312111	मार्केट विभाग नोकर पगार	355200	नोंद नाही	355200
3	312111	सर्व बाग विभाग नोकर पगार	10268607	नोंद नाही	10268607
4	312111	पिजरेवाला घरे करणे नोकर पगार	686680	नोंद नाही	686680

5	312111	लसीकरण विभाग नोंकर पगार	891600	नोंद नाही	891600
6	312111	पोलीओ केंद्र नोकर पगार	366000	नोंद नाही	366000
7	312111	साथीचे रोग निर्मुलन विभाग	741000	नोंद नाही	741000
8	312112	गवंडी कुली सुतार नोकर पगार	2170920	नोंद नाही	
9		मार्केट विभाग नोकर पगार	76289	नोंद नाही	76289
10		सर्व बाग विभाग नोकर पगार	2202285	नोंद नाही	2202285
11	312221	फोनबील खर्च	1263146	142550	1120696
12	2322432	नाला आणी गटर सफाई	11195181	23671200	12476019
13	312211	पाणी चार्जेस	466707	4667070	4200363
14	6192214	दवाखाना छपाई खर्च	0	178410	178410
15	412290	को विड -19 खर्च	0	481194	481194
16	312410	बाग बगीच्या दुरूस्ती सुधारणा	2336405	11617834	9281429
17	312420	कंपाऊंड देखभाल व दुरूस्ती	0	968229	968229
18	312420	इमारत दुरूस्ती	2037048	2525265	488217
19	312420	इमारत आणि प रिसर खच	488217	3391404	2903187
20	2172433	खडी मुरूम व रस्ते दुरूस्ती	688869	1187774	498905
21	3522434	मुतारी संडास बांधणे व दुरूस्ती	240000	828086	588086
22	3162439	इतर स्थिर मालमत्त देखभाल दुरूस्ती	0	2732042	2732042
23	3192439	पापु दुरूस्ती व्यवस्थापन	40846664	41546414	699750
24	312450	विदुयत विभाग खर्च	17383535	18783535	1400000
25	3112480	फर्निचर्स खर्च	0	366855	366855
26	6172532	औषधे खरेदी	198442	615377	416935
27	5442550	स्विमींग कोच मक्ता पध्दत	0	291100	291100

28	3202510	पाणी खरेदी	0	5734136	5734136
29	312169	मानधन	226616	251387	24771
30	312214	छपाई	7159085	7179414	20329
31	312710	सानुग्रह अनुदान	14209000	13719187	489813
32	7202571	फॅ निसेशन ॲण्ड फंक्शन	0	1698746	1698746
33	8232710	व्यायामशाळ सुधारणा	0	2445132	2445132
34	3591521	शौचालय सफाई	0	875703	875703

10) दुहेरी लेख्यातील विवरण पत्रक क्र.81 मधील जमा बाब शेडयूल क्र.IE 5 नुसार एकूण रक्कम 20,34,644/- येत असताना विवरण पत्रकामध्ये 19,44,644/- घेतलेने रक्कम रु.90,000/-चा फरक दिसून येत आहे.

B/S

11) न.प.फंड आरंभिक शिल्लक ताळेबंदानुसार रक्कम रु.1123890071.32/- घेण्यात आली असून सदर रक्कम कोणत्या आधारे घेण्यात आली याबाबत लेखे उपलब्ध नाहीत.सन 20-21 अखेर न.प.फंडाची शिल्लक रक्कम 116,29,98,946/- होती मात्र 21-22 मध्ये कोणताही खर्च न नोंदवता अंतिम शिल्लक 1123890071.32/- दाखवलेने रक्कम रु.3,91,08,875/- इतका फरक दिसून येत आहे.

12) ताळेबंदामध्ये पुढील सब शेड्युल नुसार रक्कम घेण्यात आली आहे मात्र सदर रक्कम कोणत्या आधारे घेण्यात आलेली आहे याबबतचे लेखे उपलब्ध करण्यात आलेले नाहीत.

SUB SHEDULE	बाब	रक्कम
BS-3	GENERAL RESERVE	114635244.47
BS-4	CAPITAL RESERVE	9716130
BS-5	STATUTORY RESERVE	82112073
		206463447.47

13) ताळेबंदातील SHEDULE BS-B नुसार अखर्चित अनुदान बाबीची तपासणी केली असता लेख्यानुसार दाखवण्यात आलेली व प्रत्यक्षामध्ये किर्दी नुसार येणारी रक्कम यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून येत आहे

निधी	वार्षीक लेख्यातील लेखा कोड क्रमांक	वार्षीक लेख्यातील विवरणपत्र क्रमांक 81 नुसार अखर्चित	प्रत्यक्ष किर्दी नुसार अखर्चित	तफावत कमी / जादा
13 वित्त	0413211	11132907	18132907	7000000

14 वित्त	0413211	92777330.02	14038035	78739295.02
ROAD GRANT	0413221	9732388	22386596	12654208
NAGARI DALIT VASTI	0413222	62696103.50	उपलब्ध नाही	62696103.50
NAGARI SUDHARNAA	0413222	184942	उपलब्ध नाही	184942
LAND ACQUISITION	0413225	205449	उपलब्ध नाही	205449
N.AAPATTI NIVARAN	0413229	275847	108467	167380
TOILET CONNECTION	0413229	3240056	उपलब्ध नाही	3240056
TOILET GRANT	0413229	748972	उपलब्ध नाही	748972
		473997965.65		165636405.52

14) ताळेबंदामध्ये सब शेड्युल BS-C नुसार रक्कम रु.13,40,000/- घेण्यात आली आहे मात्र त्याबाबतचे लेखे उपलब्ध करण्यात आलेले नाहीत त्यामुळे सदर रक्कम कोणत्या आधारे निश्चित केली याबाबत तपासणी करता येत नाही.

15) ताळेबंदातील सब शेडयुल BS-15 नुसार सुरक्षा अनामत रक्कम रु.30,45,99,075/- रक्कम घेण्यात आलेली आहे मात्र न.प.कडील सदर लेख्या नुसार सदर रक्कम रु.35,21,38,740 असून न.प.लेखे व ताळेबंदा मध्ये रक्कम रु.47,53,96,65/- चा फरक दिसून येत आहे.

16)ताळेबंदातील मालमत्ता बाजूकडील शेड्युल BS-G नुसार एकूण स्थिर मालमत्ता रक्कम सन 20-21 अखेर 289,11,70,308/- असून तीच रक्कम 21-22 अखेर घेण्यात आलेली आहे त्यामुळे सन 21-22 मध्ये कोणतीही भांडवली गुंतवणूक/ खर्च केल्याचे दिसून येत नाही मात्र न.प. च्या एकेरी लेख्या नुसार एकूण भांडवली खर्च 101,10,86,244/ -झाल्याचे दिसून येत आहे. तरी सबंधित रक्कम मालमत्ते मध्ये का अंतर्भूत करण्यात आली नाहीत याबाबत खुलासा करावा.

17) ताळेबंदातील मालमत्ता बाजूकडील शेड्युल BS-I नुसार एकूण गुंतवणूक 199,42,62,188.50/- घेण्यात आलेली असून प्रत्यक्षात न.प.कडील एकूण गुंतवणूक मार्च 22 अखेर ची गुंतवणूक नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

18) 5% दिव्यांग, म.बा.क., क्रीडा व आर्थिक दुर्बल घटकांचे सन 21-22 मधील एकूण तरतूद , प्रत्यक्ष खर्च व उर्वरित अनुशेष याबाबत विवरण पत्रक क्र.80 मध्ये तरतूद करण्यात आलेली नाही त्यामुळे सन 2021-22 पूर्वी राहिलेला अनुशेष लेख्यावरून तपासता येत नाही

19) अखर्चीत निधीची रक्कम घेताना सबंधित निधीतून करण्यात आलेल्या मुदतबंद ठेवीची रक्कम अंतर्भूत करण्यात आलेली किंवा कसे याबाबत खुलासा करावा..

20) शेडयूल BS-18 शासकीय देणी एकूण रु. 16,79,432/- दिसून येत आहे मात्र याबाबत चा तपशील देण्यात आलेला नाही तसेच न.प. कडील सदर बाबत किती देणी आहेत याबाबतचा तपशील ठेवण्यात आलेला नाही.

21) stock in hand बाब schedule क्र.BS-J नुसार रक्कम रु.27,30,979/- इतके मूल्य घेण्यात आले असून असून सदर बाबत स्टोअर विभागाकडील शिल्लक मालाचा तपशील न घेता कोणत्या आधारे रक्कम निश्चित करण्यात आली याबाबत खुलासा करण्यात यावा. तसेच स्टोअर विभागाकडील दि.31 मार्च 2022 ला विभाग निहाय एकूण किती साहित्य शिल्लक होते याबाबत शिल्लक मालाची तपासणी मुख्याधिकारी यांचे मार्फत रक्कम निश्चित करणे आवश्यक आहे मात्र याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.सदर रक्कम कधीपासून व का घेण्यात आलेली आहे याबाबत खुलासा करावा.

22) ताळेबंदातील शेडयूल BS-M रोख व बँक शिल्लक ची एकूण रक्कम 71,96,87,982.31/- घेण्यात आली असून प्रत्यक्षात न.प.कडे ने सादर केलेल्या विवरण पत्रकानुसार एकूण शिल्लक रु.183,25,84,754/- दिसून येत आहे त्यामुळे प्रत्यक्ष जमेपेक्षा रक्कम रु.111,28,96,772/- कमी दाखवण्यात आलेली आहे.

23) मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम 1947 चे कलम 41(2) नुसार नगरपरिषद आपल्या कार्यक्षेत्रात प्राथमिक शिक्षणाची सुविधा पुरवित नसल्याने, नरपरिषदेने मालमत्ता करपात्र मुल्यांच्या 5% रक्कम प्राथमिक शिक्षण वर्गणी म्हणून जिल्हा परिषदेकडे प्रतिवर्ष जमा करणे आवश्यक असतांना सन 2021-22 या वितीय वर्षापर्यंत नगरपरिषदेने अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत कार्यवाही करुन तसे अनुपालन सादर करावे.

24) शासन नगरविकास विभाग निर्णय क्र.जीईएन-1093/1198/नवि-14 दि.14-7-1993 नुसार नगरपरिषदेने महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी त्यांच्या अर्थसंकल्पात तरतुद केलेल्या वार्षिक महसूली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरीत रक्कमेच्या 5% रक्कम महिला बालकल्याणावर खर्च करणे आवश्यक आहे. सन 2021-22 या वितीय वर्षापर्यंत नगरपरिषदेने अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत कार्यवाही करुन तसे अनुपालन सादर करावे तरी मागील अनुशेषासह खर्च करुन तसे अनुपालन सादर करावे.

25) शासन नगरविकास विभाग परिपत्रक क्र.संकिर्ण-2010/प्र.क्र.146/2010 दि.30-10-2010 अन्वये तसेच क्र.संकिर्ण-2015/प्र.क्र.118/नवि-20 दि.28-10-2015 अन्वये अपंग व्यक्तिंसाठी राखीव ठेवलेला निधी नागरी भागातील अंपगासाठी खर्च करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. सन 2021-22 या वितीय वर्षापर्यंत नगरपरिषदेने अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत कार्यवाही करुन तसे अनुपालन सादर करावे तरी मागील अनुशेषासह खर्च करुन तसे अनुपालन सादर करावे..

26) शासन नगरविकास विभाग परिपत्रक क्र.बीसीसी-1076/505/एमयुएन-2 दि.17-2-1976 अन्वये महसूली उत्पन्नाच्या 5% भाग दुर्बल घटकांच्या म्हणजेच अनु. जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासाठी राखून ठेवावा असे आदेश आहे. सन 2021-22 या वितीय वर्षापर्यंत नगरपरिषदेने अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तरी याबाबत कार्यवाही करुन तसे अनुपालन सादर करावे तरी मागील अनुशेषासह खर्च करुन तसे अनुपालन सादर करावे..

27) महाराष्ट्र नागरी क्षेत्र अधिनियम 1975 कलम 15 प्रमाणे मागील वर्षाच्या मालमत्ता कराच्या 0.5% रक्कम वृक्षकर निधीकडे वर्ग करणे व कलम 7 प्रमाणे वृक्ष गणना करुन नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

28) महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 105 सक्तीचे कर बसविणे यामधील 2क तसेच स्थायी निर्देश क्र.12 दि.10-4-2001 नुसार नागरी भागात असलेल्या मालमत्तांवरील एकत्रित कर आकारून त्यामध्ये पुरविलेल्या सेवेकरीता होणारा खर्च भागविणेसाठी नगरपरिषदेने मालमत्ता करामध्ये

दिवाबत्ती कर आकारणे आवश्यक आहे. नगरपरिषदेने सन 2021-22 या वित्तीय वर्षात दिवाबत्तीवर रु.2,27,03,611/- इतका खर्च केलेला आहे, परंतु दिवाबत्ती कराची आकारणी केलेली नाही. याबाबत प्रत्येक वर्षी आक्षेप घेण्यात येऊनही नगरपरिषदेने कार्यवाही केलेली नसल्याने नगरपरिषदेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. तरी याबाबत योग्य कार्यवाही करुन तसे अनुपालन सादर करावे.

29) सन 2021-22 अखेर न.प.कडे पुढील विभागांची देयके रक्कम रु. **217140340 /- ची** प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे मात्र याबाबत चे प्रलंबित देणे रक्कम ताळेबंदामध्ये दर्शवण्यात आलेली नाही.

अनु क्र.	**विभागाचे नाव**	**प्रलंबित देय रक्कम**
1	आरोग्य विभाग	29011273
2	पाणी पुरवठा विभाग	80941995
3	बांधकाम विभाग	63962593
4	नागरी सुविधा केंद्र	3758487
5	दवाखाना	125362
6	म.बा.क. विभाग	7063231
7	वाहन विभाग	1229548
8	विद्युत विभाग	2346369
9	शिक्षण विभाग	18816835
10	स्टोअर विभाग	9884647
		217140340

30) विवरण पत्रक क्र.81 मधील शेड्युल क्र.IE-61 नुसार PURCHASE OF CONSUMEBLE करिता प्रारंभिक व अंतिम शिल्लक रु. 2730979/- इतकी घेण्यात आलेली आहे मात्र सदर रक्कम कोणत्या आधारे घेण्यात आली याबाबत लेखे उपलब्ध करण्यात आले नाहीत.

31) विवरण पत्रक क्र.81 मधील शेड्युल क्र.IE-65,66,67,68,69,70,71 नुसार एकत्रित घसारा रक्कम रु.1,32,12,616/- घेण्यात आलेली आहे मात्र सबंधित मालमत्ते संदर्भातील जडसंग्रह नोंदवही लेखापरीक्षणामध्ये सादर करण्यात आली नाही त्यामुळे सदर रक्कम योग्य असलेबाबत खात्री करता आली नाही.

32) नगरपरिषद कर्मचान्यांना प्रशिक्षणाअभावी सनदी लेखापाल यांचेकडून तयार करण्यात आलेल्या लेख्यांची नगरपरिषद स्तरावर कोणतीही खातरजमा करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास येते. याकरीता नगरपरिषद लेखाविषयक कामकाज करणाच्या कर्मचान्यांना द्विनोंद लेख्यांबाबत योग्य ते प्रशिक्षण देण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्तरावरुन योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे, जेणेकरुन असे लेखे हे नगरपरिषद स्तरावरुन तयार करणे शक्य होईल व त्यामुळे सनदी लेखापाल यांचेकडून लेखे तयार करण्यामुळे होणान्या खर्चामध्येही बचत होऊ शकेल.

33) नमुना नं.80 ताळेबंदानुसार एकूण रक्कम रुपये 107344642/- इतकी रक्क्म नगरपरीषद मालमत्तांचे भाडेपासून येणे/वसुलपात्र रक्कम दर्शविण्यांत आले आहे परंतु प्रत्यक्षात मिळकत विभागाकडील थकबाकीपत्रकानुसार एकूण रक्कम रुपये 2,04,03,373/- आहे. यामध्ये रुपये 8,69,41,269/- तफावत आहे. तफावत रकमेबाबत योग्य ते ताळमेळ घेवून वार्षिक लेखे अचूक तयार करण्यात यावे.

34) नमुना नं.80 ताळेबंदानुसार एकूण रक्कम रुपये 528447003/- इतकी करापासून येणे/वसुलपात्र रक्कम दर्शविण्यांत आले आहे परंतु प्रत्यक्षात कर विभागाकडील थकबाकीपत्रकानुसार एकूण रक्कम रुपये 45,95,63,405/-/- आहे. यामध्ये रुपये 6,88,83,598/- तफावत आहे. तफावत रकमेबाबत योग्य ते ताळमेळ घेवून वार्षिक लेखे अचूक तयार करण्यात यावे.

तरी वर नमुद आक्षेपांची पूर्तता करण्यात येऊन अनुपालन सादर करण्यात यावे.

DATSBKM7201 (Ref No : 157, Hmm No : 215)

10 महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता2011 नुसार् अभिलेखे न ठेवलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 नुसार् सुधारित अभिलेखे तसेच विविध नोंदवहया ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 नुसार् सुधारित अभिलेखे तसेच विविध नोंदवहया ठेवून लेखापरिक्षणास पुर्तता सादर करावी.

DATABPM8101 (Ref No : 88, Hmm No : 43)

11 धनादेश नोंदवही व धनादेश प्रदान करणे यांमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

1) धनादेश साठा नोंदवही ही अपूर्ण असून त्यामध्ये आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 करिता किती धनादेश पुस्तक वाटप केले, कोणत्या दिनांकास वितरीत केले, कोणास वितरीत केले, धनादेश पुस्तक स्विकारनार्याची स्वाक्षरी, नाम व पदनाम याच्या तपशिलवार नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत तसेच मागील धनादेश पुस्तके किती शिल्लक राहिली आहेत याबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 171 अन्वये धनादेश साठा नोंदवही नियम क्रमांक 80 मध्ये नमूद केल्याप्रमाणे ठेवणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील प्रकरण 11 नियम 172 अन्वये रोखपालास धनादेश पुस्तिका प्राप्त झाल्यावर तो त्यातील धनादेश मोजण्याची व्यवस्था करील आणि त्यात असलेल्या धनादेशांची संख्या त्याच्या

दिनांकित सहीसह मलपृष्टावर नोंद करेल परंतु याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही तसेच तात्काळ प्रदानाची आवश्यक नसेल तर कोणत्याही धनादेशावर सही करण्यात येणार नाही. परंतु आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 मध्ये धनादेश नोंदवून ठेवण्यात आलेले आहेत परंतु अदा करण्यात आलेले नाहीत. तसेच नोंदविण्यात आलेले धनादेशावर रद्द (Cancel) चा शिक्का मारण्यात आलेला नाही. उदा.,

अ.क्र.	बँक व खाते क्रमांक	धनादेश क्रमांक	रक्कम
1	HDFC - 7299	000029 ते 000033	-
2	IDBI - 444	535607	1000
		535631	1000
		535643	5000
		603153	10000
		603161	2000
3	IDBI - 8870	352482	3048850
		352483	3046150
		352484	1139011
		352489	18800
		352491	10500
4	IDBI - 4089	597350	50000
		597351	320000
		597352	975000
		597377	846672
		597378	306550
		597379	977901

उपरोक्त नमूद धनादेश हे उदाहरण दाखल देण्यात आलेले आहे. लेखापरीक्षण 2020-21 व 2021-22 या आर्थिक वर्षातील संपूर्ण आढावा घेण्यात यावा व मुंबई वित्तीय नियम 1959 नुसार नियम क्र.57 व 58 अन्वये वित्तीय औचित्यांच्या सूत्रांचा वापर करून धनादेशांचा नाहक अपव्यय टाळण्याची दक्षता घ्यावी.

3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार प्रकरण 11 नियम 187 अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या प्रदानाची नोंद करण्याकरिता सही करण्यात आलेला धनादेश रद्द करण्यात आला असेल तर प्रदानाची उलट नोंद घेणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच रद्द करण्यात आलेला धनादेश उलट नोंद घेण्याकरिता प्रमाणकासह ठेवण्यात येईल आणि रोखपालाकडून रद्द करण्यात आला असा शिक्का मारण्यात

येईल. धनादेश रद्द करण्याचे कारण रोखपाल संबधित विभागास देईल आणि संबधित विभाग त्यांनी ठेवलेले अभिलेख्यामध्ये अशा रद्द धनादेशाची नोंद घेईल. याप्रमाणेही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच नगरपालिका इचलकरंजीकडील लेखापरीक्षणात रद्द धनादेशाच्या बदली दुसरा देण्यात आलेल्या धनादेशाचा खर्च किर्दीला नमूद करण्यात आलेला नाही तसेच प्रथम अदा करून रद्द करण्यात आलेला धनादेश हा लेखापरीक्षणास प्राप्त झालेला नाही त्यामुळे सदरची बाब ही गंभीर स्वरुपाची आहे. त्याबाबतची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे -

बँक व खाते क्रमांक	प्रथम अदा धनादेश क्र./दिनांक	बदली धनादेश क्र./दिनांक	रक्कम	तपशील
IDBI - 1860	795057/13.08.20	765231/23.12.20	2000	प्रथम धनादेश कालबाह्य झाल्याने वटलेला नाही व परत जमेला घेण्यात आलेला नाही. बदली धनादेश किर्दीला नमूद नाही.
IDBI - 444	535523/07.10.20	603146/31.03.21	5000	प्रथम धनादेश वटलेला नाही व परत जमेला घेण्यात आलेला नाही.त्याचे धनादेश पुस्तिका अप्राप्त.
IDBI - 1860	770404/23.03.21	770436/31.03.21	23423	प्रथम धनादेश वटलेला नाही व परत जमेला घेण्यात आलेला नाही. बदली धनादेश किर्दीला नमूद नाही.
IDBI - 444	419891/02.11.19	603216/09.03.22	5000	प्रथम धनादेश वटलेला नाही व परत जमेला घेण्यात आलेला नाही. बदली धनादेश किर्दीला नमूद नाही.
IDBI - 161	609165/26.10.21	634441/17.03.22	6534	प्रथम धनादेश वटलेला नाही व परत जमेला घेण्यात आलेला नाही. बदली धनादेश किर्दीला नमूद नाही.
	609198/27.10.21	636442/17.03.22	2458	प्रथम धनादेश वटलेला नाही व परत जमेला घेण्यात आलेला नाही. बदली धनादेश किर्दीला नमूद नाही.

उपरोक्त नमूद धनादेश हे उदाहरणदाखल व निवड महिन्यातील 17.03.22असून संपूर्ण आर्थिक वर्ष 2020-21-22 चा आढावा घेऊन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार प्रकरण 11 नियम 188 अन्वये रद्द केलेल्या धनादेशा बाबत रद्द केलेले धनादेश ज्या लेख्यांच्या कालावधीशी संबधित असतील त्या कालावधीच्या लेखांचे लेखापरीक्षण होईपर्यंत सुरक्षित ठेवण्यात येतील त्यानंतर अशा रद्द केलेल्या धनादेशांचे विवरणपत्र, बँकेच्या ज्या शाखेवर तो काढण्यात आला असेल ती बँकेची शाखा त्याचा क्रमांक रद्द करण्याचे कारण इ. सारखे धनादेशांच्या तपशिलांचे विवरणपत्र तयार करणे आवश्यक असता तसे करण्यात आलेले नाही.

12 नगरपरिषद कर्मचार्यांना वेतनातून पाणी भत्ता अदा केलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये वेतन देयकांची तपासणी केली असता जे कर्मचारी शासकीय निवासस्थानात राहत नाहीत त्यांना दरमहा 150 इतका पाणीभत्ता अदा केला असलेचे दिसुन येते. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेपूर-1209/प्रक्र.20/सेवा-9 दिनांक 27.02.2009 नुसार सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी स्वीकृत केल्या असुन सदर शासन निर्णयामधील परीच्छेद क्रमांक 3.25.2 अन्वये पोलीस शिपाई,पोलीस नाईक व पोलीस हवालदार यांना मिळणारे विशेष वेतन वगळुन अन्य सर्व संवर्ग पदाना मिळणारे विशेष वेतन बंद करणेची शिफारस स्वीकृत केली आहे त्यानुसार वरील संवर्गाव्यतीरिक्त अन्य सर्व संवर्गाना कोणतेही विशेष वेतन/भत्ता अनुज्ञेय नसतानाही एप्रिल 2020 ते ऑक्टोबर 2021 पर्यंत 150 रुपये प्रतिमाह प्रती कर्मचारी प्रमाणे एकुण अदा पाणी भत्ता अदा करण्यात आलेला आहे.

वित्तीय वर्ष	ldquo;इतरrdquo; या हेडखाली अदा करण्यात आलेली एकूण रक्कम
2020-21	7788005/-
2021-22	8208912/-
एकूण	15996917/-

सदर पाणी भत्त्याची रक्कम वार्षिक लेख्यामध्ये सेपरेट न दाखवता वरील प्रमाणे ldquo;इतरrdquo; या शीर्षखाली पाणी भत्ता वाहतूक भत्ता व इतर भत्ते हे एकत्रित दाखवण्यात आली आहेत. सदर वित्तीय वर्षात एकूण किती पाणी भत्ता अदा करण्यात आला आहे याची माहिती वारंवार मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. सबब सदर अदा करण्यात आलेल्या पाणी भत्त्याची रकम परीगणित करण्यात येवून वसूल करण्यात यावी.

DATGGAM9401 (Ref No : 62, Hmm No : 128)

13 नगरपरिषद इचलकरंजी शिक्षण मंडळाकडील प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालनाबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखा परीक्षणात याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही. शिक्षण मंडळाचे सन 1965-66 ते 2021-2022 अखेर एकूण 1303 परिच्छेद प्रलंबित आहे. संबंधित परिच्छेदांचे अनुपालन पुर्वलक्षी प्रभावाने करण्यात आले नाही. त्यामुळे आता न.पा. शिक्षण मंडळाचे थकीत परिच्छेदांचे अनुपालन नपाच्या शिक्षण विभागामार्फत सादर करुन तात्काळ गुंतलेल्या शासकीय व नपा निधीची

रक्कम वसुल करणेत यावी. उपरोक्त बाबींची पूर्तता करुन अनुपालन सादर करावे.

DATNDPM7201 (Ref No : 136, Hmm No : 24)

14 शिक्षण मंडळाकडील शाळांच्या अखर्चीत रकमा शासन खाती भरणा करणेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9अ	**अंतिम अमान्य**	: 42630.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखा परीक्षणात शिक्षण विभागाकडील शाळांची आर्थिक व्यवहाराची तपासणी केली असता बँकेकडुन जमा झालेल्या अखर्चित रकमा व त्यावरील व्याजाच्या रकमा खालीलप्रमाणे

अ.क्र.	शाळेचे नांव	व्याजाची रककम
1	रमा माता विदया मंदीर	2995
2	आनंदराव भिडे विदया मंदीर	6954
3	खंजीरे विदया मंदीर	1891
4	बाळकृष्ण सांगले वि.म.	3277
5	नाकोडा हिंदी वि.म.	1816
6	ना.बा.वि.म.	2404
7	सुभेदार वि.म.क्रं.48	4418
8	हुतात्मा आण्णा रामगोंडा पाटील हायस्कूल	5588
9	नाकोडा हिंदी हायस्कूल	2825
10	बापूजी साळुंखे वि.मं.	2720
11	व्यंकटराव हायस्कूल़	2960
12	इंदिरा गांधी वि.म.	2192
13	वेणूताई चव्हाण शा.नं.54	2590
14	एकूण	42630

वित्त विभाग शासन परिपत्रक कं.संकीर्ण/2018/प्रक्र 60/18/कोशा-प्रशा 5/दिनांक 14 मार्च 2018 नुसार

वरीलप्रमाणे अखर्चित रक्क्म रुपये 42630/-शासन निधीत भरणा चलन लेखापरिक्षणास सादर करावे.

DATNDPM7201 (Ref No : 141, Hmm No : 52)

कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

15 14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा विलगीकरण करुन गोळा करणे व न.प.च्या सुचनेप्रमाणे वाहतूक करणे तसेच नप.ने पुरविलेल्या वाहनांचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च करणे या खर्चातील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 4450711.00/-

नगरपरिषद इचलकरंजी च्या आर्थिक वर्ष 2020-2021 व सन 2021-2022 च्या लेखापरीक्षणात आरोग्य विभागाकडील लेखापरीक्षणामध्ये घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत इचलकरंजी नगरपरिषदेमार्फत शहरातील सर्व 1 ते 26 प्रशासकीय वॉर्डांमध्ये घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा विलगीकरण करुन गोळा करणे व न.प.च्या सुचनेप्रमाणे वाहतूक करणे तसेच न.प. ने पुरविलेल्या वाहनांचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च करणे या कामाच्या सन 2019-20 करिता राबविलेल्या निविदा प्रक्रियेस सन 2020-21 या आर्थिक वर्षाकरिता मुदतवाढ देऊन खर्च करण्यात आला आहे .

उपरोक्त कामासाठी सन 2019-20 करिता राबविलेल्या मूळ निविदा प्रक्रियेचा तपशील खालीलप्रमाणे :

कामाचे नाव	घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत इचलकरंजी नगरपरिषदेमार्फत शहरातील सर्व 1 ते 26 प्रशासकीय वॉर्डांमध्ये घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा विलगीकरण करुन गोळा करणे व न .प.च्या सुचनेप्रमाणे वाहतूक करणे तसेच न.प.ने पुरविलेल्या वाहनांचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च करणे
निधी	14 वा वित्त आयोग
मूळ अंदाजपत्रकीय रक्कम (सन 2019-20 करिता)	5,40,11,854/-
मूळ प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग: (सन 2019-20 करिता)	मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश (14 वा वित्त आयोग)- क्र.कार्या.11/नपा/एस.आर/727 इ/18 दि.04/12/2018 र.रु.5,40,11,854/-
अभिप्राय :	अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
तांत्रिक मान्यता- 14 वा वित्त आयोग:	उपलब्ध नाही
खर्च मान्यता ठराव (सन 2019-20 करिता)	न.प.कौ.ठ.नं.139/ दि.29/10/2018 र.रु.6,16,51,789/-
निविदा प्रकार	ई-निविदा
प्राप्त न्युनतम दर	5,40,11,854/-

दर मान्यता ठराव क्र. (सन 2019-20 करिता)	न.प इचलकरंजी मा.स्थायी समिती ठराव क्र.254 , दिनांक 07/04/2020
कामाचा आदेश (सन 2019-20 करिता)	जा.क्र. जनप./आवि/83-अ/2020-21 दि. 08/03/2019
कामाची मुदत (सन 2019-20 करिता)	12 महिने
मक्तेदाराचे नाव	आराध्या एंटरप्रायजेस/ निकीता एंटरप्रायजेस

सदर निविदेस सन 2020-21 करिता दिलेल्या पहिल्या मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे :

निधी	14 वा वित्त आयोग
प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग: (दि.09.03.2020 ते दि. 08.06.2020 करिता)	मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.कार्या 11/नपा/प्र.मा./एसआर/58/इ/2020 दि.21/05/2020 र.रु.13502964/-
खर्च मान्यता ठराव	सर्वसाधारण सभा : कौ.ठ.क्र.267 दि.28/02/2020
कामाचा आदेश	जा.क्र. 712/आरोग्य/2019-20 दि. 09/03/2020
कामाची मुदत	पुढील निविदा प्रक्रिया मंजूर होईपर्यंत

सदर निविदेस सन 2020-21 करिता दिलेल्या दुस-या मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे :

निधी	14 वा वित्त आयोग
प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग: (दि.09.06.2020 ते दि. 08.09.2020 करिता)	मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.कार्या 11/नपा/प्र.मा./एसआर/512/इ/2020 दि.28/09/2020 र.रु.13502964/-
खर्च मान्यता ठराव	सर्वसाधारण सभा : कौ.ठ.क्र.267 दि.28/02/2020
कामाचा आदेश	जा.क्र. 712/आरोग्य/2019-20 दि. 09/03/2020

सदर निविदेस सन 2020-21 करिता दिलेल्या तिस-या मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे :

निधी	14 वा वित्त आयोग
प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग: (दि.09.09.2020 ते दि. 08.12.2020 करिता)	मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.कार्या 11/नपा/प्र.मा./एसआर/168ब/2021 दि.30/03/2021 र.रु.13502964/-
खर्च मान्यता ठराव	सर्वसाधारण सभा : कौ.ठ.क्र.267 दि.28/02/2020

कामाचा आदेश	जा.क्र. 712/आरोग्य/2019-20 दि. 09/03/2020

सदर कामाकरिता झालेल्या खर्च प्रमाणकांचा तपशील खालीलप्रमाणे:

अ.क्र.	निधीचे नाव	देयक कालावधी	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम
1	14 वा वित्त आयोग	01.03.2020 ते 08.03.2020	01	13.04.2020	1245477
2	14 वा वित्त आयोग	09.03.2020 ते 31.03.2020	20	12.06.2020	3255511
3	14 वा वित्त आयोग	01.04.2020 ते 30.04.2020	21	12.06.2020	4500988
4	14 वा वित्त आयोग	01.05.2020 ते 31.05.2020	41	30.07.2020	4500988
5	14 वा वित्त आयोग	01.06.2020 ते 08.06.2020	57	17.08.2020	1245477
6	14 वा वित्त आयोग	01.07.2020 ते 31.07.2020	103	09.10.2020	4500988
7	14 वा वित्त आयोग	09.06.2020 ते 30.06.2020	104	09.10.2020	3255511
8	14 वा वित्त आयोग	01.08.2020 ते 31.08.2020	105	09.10.2020	4500988
9	14 वा वित्त आयोग	01.09.2020 ते 08.09.2020	288	31.03.2021	1245477
10	14 वा वित्त आयोग	09.09.2020 ते 30.09.2020	289	31.03.2021	3255509
11	14 वा वित्त आयोग	01.10.2020 ते 31.10.2020	290	31.03.2021	4500988
12	14 वा वित्त आयोग	01.11.2020 ते 30.11.2020	291	31.03.2021	4500988
13	14 वा वित्त आयोग	01.12.2020 ते 08.12.2020	205	27.10.2021	1245477
	एकूण खर्च				41754367

सदर खर्च प्रक्रियेतील लेखापरीक्षणास आढळलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे :

1) उपरोक्त नमूद कामाकरिता नगरपरिषदेमार्फत दैनिक पुढारी व दैनिक लोकमत मध्ये दिनांक 26.12.2018 रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत आली आहे. परंतु नस्तीस जोडलेल्या जाहिरातीचे अवलोकन केले असता जाहिरातीत कामाचा तपशील नमूद नाही. तसेच कामाचा कालावधी, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा फी इत्यादी तपशील नमूद करणेत आलेला नाही.

2) महाराष्ट्र शासन- उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-/2014/प्र.क्र.82/भाग-III/ उदयोग-4, दिनांक 01 डिसेंबर 2016 मधील नियम क्र.4.4.2 नुसार 25 लाख ते 5 कोटी पर्यतच्या निविदा जाहिराती एका प्रमुख विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात आणि एका राज्यस्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक असता नगरपरिषदेमार्फत केवळ दैनिक पुढारी व दैनिक लोकमत या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देणेत आलेली आहे. शासन निर्णयानुसार जाहिरात प्रसिध्द न केलेमुळे सदर कामाच्या निविदेस पुरेशी प्रसिध्दी मिळू

शकली नाही. व त्यामुळे अधिक तुलनात्मक दराच्या निविदा प्राप्त न झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.
3) निकीता एंटरप्रायजेस यांचे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तीचे विनियमन) अधिनियम 2018- नमुना "ग" (नियम 9) नुसार सादर केलेल्या नोंदणी प्रमाणपत्रामध्ये कामगार संख्या पुरुष-5 व स्त्री -0 अशी एकूण 5 कामगार संख्या असलेचे नमूद आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता सदर कामासाठी एकूण 208 कर्मचारी संख्या मक्तेदाराकडे असणे आवश्यक आहे. सदर बाबत योग्य तो तपशिल आवश्यक त्या अभिलेख्यासह लेखापरीक्षणास सादर करावा.
4) सदर कामाचे सविस्तर प्रकल्प अहवालाचे अवलोकन केले असता प्रति 1000 घरांकरिता 1 घंटागाडीची आवश्यकता असल्याचे नमूद केले असून एकूण 68 घंटागाड्यांची आवश्यकता असल्याचे नमूद आहे. परंतु प्रत्यक्ष नगरपरिषदेच्या घरांच्या संख्येबदल कर विभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक असता असे कोणतेही अभिप्राय घेण्यात आलेले नाहीत. घरांच्या संख्या योग्य असल्याचे कर विभागाने प्रमाणित केलेचे कोणतेही अभिलेखे नस्तीस उपलब्ध नाहीत. त्यामुळे अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ व बरोबर असलेची खात्री करता येत नाही.
5) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केले असता कर्मचारी वेतनामध्ये ESIC करिता रक्कम निश्चित केलेचे नमूद आहे. परंतु मक्तेदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा असा ESIC विमा उतरविलेबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.
6) सदर कामाचा करारनामा अट क्र. 49 नुसार मक्तेदाराने नेमलेल्या सर्व कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधी व शासकीय व विमा रक्कम भरणा करणे आवश्यक असून मक्तेदाराने अशी भविष्य निर्वाह निधी व विमा चलने सादर केल्यानंतरच मासिक देयके अदा केली जातील, अशी अट नमूद आहे. तथापि अशी चलने न घेता नगरपरिषदेमार्फत मक्तेदारास मासिक देयके अदा करण्यात आली आहेत.
7) सदर कामाच्या ई-निविदा तपशील अट क्र. D-a) नुसार मक्तेदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची व सदर कामासाठी वापरण्यात येणा-या सर्व वाहनांची यादी नगरपरिषदेस पुरविणे आवश्यक आहे. परंतु अशी कर्मचारी व वाहन यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तसेच नेमकी कोणती वाहने नगरपरिषदेकडून मक्तेदारास पुरविण्यात आली, याबाबतचे नगरपरिषद स्तरावरील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.
8) सदर कामाच्या ई-निविदा तपशील अट क्र. D-b) नुसार मक्तेदाराने वापरण्यात येणा-या सर्व वाहनांचे लॉगबूक ठेवणे आवश्यक आहे. परंतु वाहनांचे लॉगबूक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे कचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी वापरात असणा-या वाहनांनी त्यांना नेमून दिलेल्या मार्गावरील कचरा संकलन केल्याची पडताळणी करता आली नाही.
9) सदर कामाच्या ई-निविदा तपशील अट क्र. C-a) नुसार मक्तेदाराने शहरातील तक्रारींकरिता तक्रार नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी तक्रार नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.
10) दैनिक संकलित केलेल्या कचऱ्याचे वजन व त्याचे ओला व सुका कचरा वर्गीकरण नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे कचरा वाहतूकीसाठी झालेल्या वाहनाच्या खेपाची खात्री करता आली नाही.
11) सदर देयकातून 2 टक्के आयकर रक्कमा कपात करणेत आले आहेत. परंतु सदर कपातीच्या रक्कमांची शासन खाती भरणा केलेची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.
12) व्यवसाय कर अधिनियम 1975 मधील अनुक्रमांक 1(b) नुसार 5001 ते 10000 रु. वेतन घेणा-या कर्मचा-यांच्या देयकातून 175 रु. प्रति महिना व अनुक्रमांक 1(c) नुसार 10000 रुपयांपेक्षा जास्त वेतन घेणा-या कर्मचा-यांच्या देयकातून 2500 रु. प्रति वर्ष (फ़ेब्रुवारी वगळता प्रति महिना 200 रु व फ़ेब्रुवारी महिन्याकरिता 300 रु) व्यवसाय कर वजा करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. अंदाजपत्रकानुसार सदर कामासाठी एकूण 90 ड्रायव्हर व 118 हेल्पर यांची आवश्यकता असून अशा एकूण 208 कर्मचा-यांची व्यवसाय कराची प्रति कर्मचारी 2500/- रु प्रमाणे एकूण रक्कम रुपये 520,000/- शासन खाती भरणा केल्याची चलने लेखापरीक्षणास सादर करावीत.

13) नगरपरिषदेकडे मंजूर आकृतीबंधानुसार सन 2020-21 मध्ये एकूण 714 सफाई कर्मचारी कार्यरत असून

नगरपंचायत हद्दीतील सार्वजनिक रस्ते, गटार, औषध फवारणी, सार्वजनिक शौचालये साफसफाई ई. कामे करणे त्यांच्या कर्तव्यसुचीत समाविष्ठ आहेत. लेखापरीक्षण कालावधीत आर्थिक वर्ष 2020-21 करिता कार्यरत सफाई कर्मचारी यांचे वेतनावर रक्कम रुपये 219360019/- एवढा खर्च झालेला आहे. याबाबत आरोग्य निरीक्षक / विभाग प्रमुख आणि मुख्याधिकारी यांनी नगरपंचायतीकडील उपलब्ध मनुष्यबळ विचारात घेवून त्यांची कार्यकक्षा निश्चित करून प्रत्यक्ष कामासाठी लागणारे मनुष्यबळ बाह्य यंत्रणेद्वारे घेवुन काम करून घेणे अपेक्षित होते. परंतु उपलब्ध मनुष्य बळ विचारात न घेता बाह्य यंत्रणेदवारे सफाईचे काम करुन घेण्यात आले आहे.

14) अंदाजपत्रकानुसार कर्मचा-यांच्या किमान वेतना व्यतिरिक्त एक टक्के शासकीय विमा रक्कम मक्तेदारास अदा करण्यात आली आहे. परंतु मक्तेदाराने निविदा कालावधी दिनांक 09.03.2020 ते 08.12.2020 करिता कर्मचारी विमा रक्कम शासकीय विमा संचालनालयाकडे भरणा केल्याचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

15) मक्तेदाराने निविदा कालावधी दिनांक 09.03.2020 ते 08.12.2020 करिता कर्मचारी विमा रक्कम शासकीय विमा संचालनालयाकडे भरणा केल्याचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. नस्तीस उपलब्ध अभिलेख्यांनुसार मक्तेदाराने दिनांक 08.03.2019 ते 07.03.2020 या मूळ निविदा कालावधी करिता आराध्या एंटरप्रायजेस यांच्या नावे उपरोक्त नमूद प्रमाणे एकूण 208 कर्मचा-यांची शासकीय विमा रक्कम विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे भरणा केली आहे. परंतु सदर विमा भरणा रकमेचे चलन/ अभिलेखे तपासणी केली असता सर्व 208 कर्मचा-यांना केवळ रक्कम रु. 8000/- पर्यंत वेतन अदा होत असल्याचे नमूद आहे. यावरून सर्व 208 कर्मचा-यांना अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे किमान वेतन नियमाप्रमाणे वेतन अदा होत नसल्याचे दिसून येते. सदर बाब गंभीर असून किमान वेतन अधिनियम, 1948 चे उल्लंघन करण्यात आले आहे. सदर बाबीकडे मा. मुख्याधिकारी यांचे लक्ष वेधणेत येत आहे.

16) अंदाजपत्रकानुसार कर्मचा-यांच्या किमान वेतना व्यतिरिक्त किमान वेतनावर 4.75 टक्के ESIC विमा रक्कम मक्तेदारास अदा करण्यात आली आहे. परंतु कर्मचारी राज्य विमा (केंद्रीय) नियम, 1950 व कर्मचारी राज्य विमा (केंद्रीय) सुधारित नियम, 2019 नुसार सदर कालावधीकरिता ESIC विमा कर्मचारी अंशदान हे दि.01.07.2019 पासून किमान वेतनाच्या 3.25 टक्के इतके करण्यात आले आहे. परंतु सदर निविदा कालावधी दिनांक 09.03.2020 ते 08.12.2020 अशा 9 महिन्यांकरिता मक्तेदारास 4.75 टक्के प्रमाणे ESIC विमा रक्कम अदा करण्यात आली आहे. सदर अदा रकमेचा तपशील खालीलप्रमाणे:

अ.क्र.	कर्मचारी प्रकार	अंदाजपत्रकानुसार कर्मचारी संख्या	अंदाजपत्रकानुसार मासिक किमान वेतन (Basic + DA)	4.75 टक्के प्रमाणे वार्षिक अदा रक्कम (कर्मचारी संख्या x मासिक 4.75 % अदा रक्कम x 9 महिने) (A)	3.25 टक्के प्रमाणे वार्षिक देय रक्कम (कर्मचारी संख्या x मासिक 3.25 % देय रक्कम x 9 महिने) (B)	वार्षिक जादा अदा रक्कम (A) - (B)
1	हेल्पर (घंटागाडी,	110 (68 घंटागाडी	11246	110 x 534 x 9= 528660	110 x 365 x 9= 361350	167310

	ट्रिप्पर, कॉम्पॅक्टर ट्रक)	करिता 78 हेल्पर, 5 ट्रिप्पर व 2 कॉम्पॅक्टर ट्रक करिता एकूण 32 हेल्पर)				
2	घंटागाडी ड्रायव्हर	78	14455	78 x 687 x 9= 482274	78 x 471 x 9= 330642	151632
3	ट्रिप्पर ड्रायव्हर	6 (5 ट्रिप्पर करिता प्रत्येकी एक ड्रायव्हर व एक बदली ड्रायव्हर)	14805	12 x703 x 6= 50616	12 x 481 x 6= 34632	15984
4	कॉम्पॅक्टर ट्रक ड्रायव्हर	3 (2 कॉम्पॅक्टर ट्रक करिता प्रत्येकी एक ड्रायव्हर व एक बदली ड्रायव्हर)	14805	12 x703 x 3= 25308	12 x 481 x 3= 17316	7992
	एकूण	197				342918

उपरोक्तप्रमाणे मक्तेदारास रक्कम रु. 342918 /- जादा अदा करण्यात आली असून सदरची रक्कम संबंधितांकडून वसूलात आणून शासन खाती भरणा केल्याची पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

17) अंदाजपत्रकामध्ये नगरपरिषदेकडे 5 ट्रिप्पर व 5 कॉम्पॅक्टर ट्रक असून ते सदर कामासाठी मक्तेदारास मासिक भाडे तत्वावर देण्याचे नमूद आहे. परंतु नगरपरिषदेच्या वाहन विभागाकडील वाहनांची संख्या तपासणी केली असता केवळ 2 कॉम्पॅक्टर ट्रक उपलब्ध असून ते सदर कामासाठी मक्तेदारास पुरविण्यात आल्याचे अभिलेखे उपलब्ध आहेत. मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.कार्या 11/नपा/प्र.मा./एसआर/58/इ/2020 दि.21/05/2020 मधील अट क्र. 5 नुसार सदर अंदाजपत्रक वाहनांच्या होणा-या अंदाजित फे-यांवर आधारित आहे. प्रत्यक्ष कामकाज सुरू झालेनंतर Actual Data च्या आधारे अंदाजपत्रक सुधारणेची निविदेत तरतूद करणेत यावी. परंतु नगरपरिषदेकडे 2 कॉम्पॅक्टर ट्रक उपलब्ध असताना 5 कॉम्पॅक्टर ट्रक साठीचे अंदाजपत्रक बनविणे व त्याआधारे मक्तेदारास रक्कम अदा करणे ही गंभीर अनियमितता झाल्याचे दिसून येते. त्यामुळे उर्वरित 3 कॉम्पॅक्टर ट्रक करिता मक्तेदारास रक्कम जादा अदा झाली असून सदर रकमेचा तपशील खालीलप्रमाणे :.

अंदाजपत्रकानुसार उर्वरित 3 कॉम्पॅक्टर ट्रक साठीचा मासिक खर्च:

अ.क्र.	बाब	एका कॉम्पॅक्टर ट्रक साठीचा मासिक खर्च

1	इंधन खर्च (760 रु./दिवस)	22800
2	ड्रायव्हर वेतन	17764
3	प्रति कॉम्पॅक्टर 4 हेल्पर वेतन (प्रत्येकी 13661 रु. वेतन)	54644
4	देखभाल व दुरुस्ती खर्च (250,000 रु./वार्षिक)	20833
5	10% Overhead Charges (अ.क्र. 1 ते 4 वर)	11604
6	18% GST (अ.क्र. 2 ते 4 वर)	16784
	एकूण (एका कॉम्पॅक्टर ट्रक साठीचा मासिक खर्च)	144429
	एकूण (तीन कॉम्पॅक्टर ट्रक साठीचा मासिक खर्च)	144429 x 3 = 433287

वरीलप्रमाणे तीन कॉम्पॅक्टर ट्रक साठीचा मासिक खर्च रक्कम रुपये 433287/- प्रत्येक मासिक देयकातून वजा करुन मासिक देयके अदा करणे आवश्यक होते. तथापि अशी कपात करणेत आली नाही.

तसेच नगरपरिषदेने मक्तेदारास सदर कामी 5 ट्रिप्पर पुरविले असून करारनामा अट क्र.D नुसार एका ट्रिप्पर करिता मक्तेदाराकडून मासिक 10,000/- रु. प्रमाणे 5 ट्रिप्पर करिता एकूण भाडे रक्कम रुपये 50,000/- मक्तेदाराच्या मासिक देयकातून वजा करणे आवश्यक आहे. परंतु सदर कामाच्या प्रमाणकांची तपासणी केली असता मासिक देयकांमधून रुपये 50,000/- ऐवजी केवळ रक्कम रुपये 40,000/- कपात करण्यात आली आहे. उर्वरित एका ट्रिप्पर साठीचे मसिक भाडे रक्कम रु.10,000/- प्रत्येक मासिक देयकातून वसूल करुन शासन खाती भरणा करणेची कार्यवाही करणेत यावी.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही न केलेमुळे सदर कामासाठी मक्तेदारास जादा अदा झालेल्या रकमेचा मासिक प्रमाणकनिहाय तपशील खालीलप्रमाणे:

अ.क्र.	देयक महिना	देयक कालावधी	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	तीन कॉम्पॅक्टर ट्रक साठीचा मासिक खर्च	एका ट्रिप्पर साठीचे मसिक भाडे रक्कम
1	मार्च 2020	01.03.2020 ते 08.03.2020	01	13.04.2020	1245477	433287	10000
		09.03.2020 ते 31.03.2020	20	12.06.2020	3255511		

2	एप्रिल 2020	01.04.2020 ते 30.04.2020	21	12.06.2020	4500988	433287	10000
3	मे 2020	01.05.2020 ते 31.05.2020	41	30.07.2020	4500988	433287	10000
4	जून 2020	01.06.2020 ते 08.06.2020	57	17.08.2020	1245477	433287	10000
		09.06.2020 ते 30.06.2020	104	09.10.2020	3255511		
5	जुलै 2020	01.07.2020 ते 31.07.2020	103	09.10.2020	4500988	433287	10000
6	ऑगस्ट 2020	01.08.2020 ते 31.08.2020	105	09.10.2020	4500988	433287	10000
7	सप्टेंबर 2020	01.09.2020 ते 08.09.2020	288	31.03.2021	1245477	433287	10000
		09.09.2020 ते 30.09.2020	289	31.03.2021	3255509		
8	ऑक्टोबर 2020	01.10.2020 ते 31.10.2020	290	31.03.2021	4500988	433287	10000
9	नोव्हेंबर 2020	01.11.2020 ते 30.11.2020	291	31.03.2021	4500988	433287	10000
10	डिसेंबर 2020	01.12.2020 ते 08.12.2020	205	27.10.2021	1245477	433287/30 x 8 = 115543	10000/30 x 8 = 2667
		एकूण जादा अदा				4015126	92667

वरीलप्रमाणे मासिक देयकांतून तीन कॉम्पॅक्टर ट्रक साठीचा खर्च रक्कम व एका ट्रिप्पर साठीचे भाडे रक्कम वजा करुन मासिक देयके अदा करणे आवश्यक होते. तथापि अशी कपात न केलेमुळे तीन कॉम्पॅक्टर ट्रक साठीचा खर्च रक्कम रुपये 4015126 /- व एका ट्रिप्पर साठीचे भाडे रक्कम रक्कम रुपये 92667/- अशी एकूण रक्कम रुपये 4107793 /- संबंधितांकडून वसुलात आणून शासन खाती भरणा करून लेखापरीक्षणास पुर्तता सादर करणेत यावी.

18) संकलित केलेला कचरा कचरा डेपोस पोचल्यावर त्याचे वजन होऊन डेपोच्या आवक नोंदवहीस नोंद घेणे आवश्यक आहे. परंतु अशी आवक नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

19) संकलित केलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन निर्माण केलेल्या उपउत्पादनाच्या विक्रीतून आर्थिक संतुलन राखणे आवश्यक आहे. परंतु सदर निविदेच्या बाबतीत कचऱ्याचे वर्गीकरण , प्रक्रिया व उपउत्पादनाची निर्मित्ती

होत असलेचे कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनाचे उद्दिष्ट साध्य झाल्याचे दिसून येत नाही.

20) कामाचा करारनामा अट क्र. 5-22) नुसार मक्तेदाराने काम कालावधी पूर्ण झाल्यावर नगरपरिषदेची वाहणे सुस्थितीत नगरपरिषदेकडे सुपूर्द करणे आवश्यक असता वाहने सुपूर्द केलेचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

DATASKM9501 (Ref No : 5, Hmm No : 139)

16 14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड क्र23 मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न.प. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे कामातील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 286233.00/-

नगरपरिषद इचलकरंजी च्या आर्थिक वर्ष 2020-2021 व सन 2021-2022 च्या लेखापरीक्षणात आरोग्य विभागाकडील लेखापरीक्षणामध्ये 14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड क्र.23 मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न .प. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे कामी खर्च करण्यात आला आहे.

उपरोक्त कामाकरिता राबविलेल्या निविदा प्रक्रियेचा तपशील खालीलप्रमाणे :

कामाचे नाव	14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड क्र.23 मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न .प. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे.
निधी	14 वा वित्त आयोग
अंदाजपत्रकीय रक्कम	3810065/-
प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग:	मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश (14 वा वित्त आयोग)- क्र.कार्या.11/नपा/ आर.आर/364/इ/19, दि.01.09.2019 र.रु. 5014598/-
अभिप्राय :	अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
तांत्रिक मान्यता- 14 वा वित्त आयोग:	उपलब्ध नाही
मूळ निविदा खर्च मान्यता ठराव (सन 2018-19)	न.प.कौ.ठ.नं.06, दि.31.05.2018

खर्च मान्यता ठराव	न.प.कौ.ठ.नं.94, दि.02.08.2019
निविदा प्रकार	ई-निविदा
प्राप्त न्युनतम दर	3810065/-
दर मान्यता ठराव क्र.	न.प इचलकरंजी मा.स्थायी समिती ठराव क्र.108, दिनांक 18.08.2018 र.रु. 3810065/-
कामाचा आदेश	दि. 30.08.2019
कामाची मुदत	12 महिने
मक्तेदाराचे नाव	शिवाजी सिद्धू धुमाळ

सदर निविदेस दिलेल्या पहिल्या मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे :

निधी	14 वा वित्त आयोग
1)रस्ते व गटर साफसफाई कामासाठी अनुक्रमे 1575755 चौ.फुट व 20220 रनिंग मी. परिमाण निश्चित करण्यात आले आहे. मात्र हे परिमाण नेमके कसे परिगणित केले याचा तपशिल नस्तीमध्ये आढळून येत नाही. कामाचे तपशीलवार अंदाजपत्रक तयार करून त्यास तांत्रीक मंजूरी घेण्यात आलेली नाही. नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांची लांबी व रुंदी बांधकाम विभागाकडून प्रमाणित करण्यात आलेली नाही. तसेच अशा प्रकारच्या सदोष अंदाजपत्रकास शिवाजी विदयापीठाचे अभिप्राय घेणेत आले आहेत. शिवाजी विदयापीठ, आरोग्य विभागाच्या कामांना अभिप्राय/मान्यता देणेस सक्षम असलेबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर केलेली नाहीत. नस्तीसोबत कामाची मोजमाप नोंदवही, दैनंदिन रिपोर्ट असे कोणतेही अभिलेख जोडणेत आलेले नाहीत.

2)करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 9 नुसार सर्व कर्मचारी दररोज कामावर हजर असणे आवश्यक अहे. त्यांची नगरपालिका स्वच्छता निरिक्षक यांचेकडून दररोज हजेरीपत्रकात हजेरी घेणेची असून कर्मचारी हजेरीपत्रक (रजिस्टर) बील तपासणीवेळी लेखापरीक्षा विभागास सादर करावयाचे आहे. ते सादर करण्यात आलेले नाही.

3)नगरपरिषद इचलकरंजी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी टाटा कन्सल्टन्सी, इंजिनिअर्स लिमिटेड यांनी सादर केलेल्या डिटेल्ड प्रोजक्ट रिपोर्टमधील 5.2 मधील विवरणपत्र क्र. 5.2 नुसार रस्ता सफाईचे कामाचे अंदाजपत्रक पावसाळयातील महिने वगळून करणेचे नमूद केले आहे. मात्र पावसाळयातील चारही महिन्यात काम दाखवून रक्कम आदा करण्यात आली आहे. वरील प्रमाणकांनुसार वित्तीय वर्ष 2020-21 मधील माहे जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये अनुक्रमे रक्कम रू. 326842 + 337735 + 337700 + 326802 अशी पावसाळयात एकूण रू. 1329079/- आणि वित्तीय वर्ष 2021-22 मधील जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये अनुक्रमे रक्कम रू. 330093 + 341131 + 341131 + 330093 अशी आदा केलेली रक्कम रू. 1342448/- आहे.

रस्ते व गटर सफाईच्या देयकांसोबत मासिक गोषवा-याशिवाय अन्य कोणतेही अभिलेख उपलब्ध करून देणेत आलेले नाहीत. कर्मचारी रस्ते/गटर सफाई करीत असल्याचा एकही फोटो नस्तीसोबत जोडलेला नाही. कर्मचा-यांचे दैनंदिन हजेरीपत्रक लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. पुर्ण केलेल्या कामाचे क्षेत्रफळ निश्चित करण्यासाठी मोजमाप पुस्तक ठेवणे गरजेचे आहे. ते ठेवलेले नाही. तरी कामाची मोजमाप नोंदवही, कर्मचा-यायंची हजेरीपत्रके, कामापुर्वीचे व नंतरचे फोटो हे अभिलेख लेखापरीक्षणास सादर करून प्रत्यक्षात काम केलेची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी. तापर्यंत पावसाळी महिन्यांमध्ये आदा केलेली वर्ष 2020-21 मधील रू. 1329079/- व 2021-22 मधील 1342448/- अशी एकूण रक्कम रू. 2671527/- अंतीम अमान्य करण्यात येत

आहे.

4)घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 मधील 2.7 अन्वये लोकसंख्येची घनता, व्यापारी उलाढाल आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यानुसार रोजच्या रोज, एक दिवस आड किंवा आठवडयातून दोन वेळा अशा पध्दतीने रस्ता सफाई व गटर सफाईचे प्रमाण निश्चित करून रस्ते, गल्ल्या आणि उपगल्ल्या झाडून वर्गीकृत पध्दतीने कचरा जमा करावयाचा आहे. ज्याठिकाणी घरोघरी जाऊन दैनंदिन कचरा जमा केला जातो त्याठिकाणी रस्ता/गटर सफाईचे प्रमाण कमी ठेवावयास हवे म्हणजेच रोजच्या रोज ते करण्याची गरज नाही. मात्र नगरपरिषदेने रस्ता व गटर सफाईसाठी मक्ता देताना दैनंदिन तरतूद केली आहे. तथापी वरील उपपरिच्छेदात नमूद केलेप्रमाणे गटर सफाई व रस्ता सफाईचे काम दैनंदिन झालेची सत्यता अभिलेख्यांअभावी पडताळता येत नाही.

घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 मधील विवरणपत्र 2.7 नुसार शहराच्या उपनगरातील मुख्य रस्त्यांची आठवडयातून दोनदा सफाई करणे पुरेसे असताना नगरपरिषदेने दैनंदिन सफाई केल्यामुळे खालीलप्रमाणे नाहक खर्च झाला आहे.

वित्तीय वर्ष 2020-21 रस्ता सफाई खर्च			
महिना	आठवडयातून 2 वेळाप्रमाणे मासिक खर्च रू.	प्रत्यक्षात खर्च रू.	जादा प्रदान रू.
एप्रिल 20	24103	86493	62390
मे 20	27116	89399	62283
ऑक्टोबर20	27116	89392	62276
नोव्हेंबर 20	24103	86519	62416
डिसेंबर 20	27116	89402	62286
जानेवारी 21	27116	89377	62261
फेबुवारी 21	24103	80758	56655
मार्च 21	27116	89376	62260
		एकूण	492827

वित्तीय वर्ष 2021-22 रस्ता सफाई खर्च			
महिना	आठवडयातून 2 वेळाप्रमाणे मासिक खर्च रू.	प्रत्यक्षात खर्च रू.	जादा प्रदान रू.
एप्रिल 21	24103	86493	62390

मे 21	27116	89403	62287
ऑक्टोबर 21	27116	89403	62287
नोव्हेंबर 21	24103	86516	62413
			249377

वरीलप्रमाणे जादा प्रदान रू. 742204/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

5) शासन परिपत्रक नगर विकास विभाग क्र.स्वमअ 2017/प्र.क्र.60/नवि-34 दि.29.04.2017 अन्वये घनकच-याचे विलगीकरण न करता त्यावर प्रकिया करणारे प्रकल्प यशस्वी होत नसल्याचे व विलगीरकण केल्याशिवाय घनकच-यास मुल्य प्राप्त होत नसल्याचे नमूद करून घनकचरा निर्मीतीच्या जागीच 100% विलगीकरण करण्याची कार्यपध्दती व ओला कचरा,सुका कचरा व घरगुती घातक कच-यावरील प्रकीया याबाबतची सुस्पष्ट कार्यपध्दती परि.5 मधील 1 ते 15 अन्वये निश्चीत केली आहे. त्यानुसार विलगीकरण मोहीमेमध्ये नागरी संस्थेने नागरीकांना या मोहीमेची माहीती व्हावी म्हणून सोशल मिडीयाचा वापर,पथनाटय यांचे मार्फत जनजागृती,तसेच शासकीय व अशासकीय संस्था,युवक संघटना,बाजार संघटना,शाळा,महाविदयालये रहिवाशी, व व्यावसायीक व औदयागिक संस्थांचे प्रतिनिधी यांचा सहभाग घेवून विलगीकरण मोहीम यशस्वी करणेविषयी सूचित केले आहे. त्यामध्ये ओल्या कच-यावरील प्रकीये व्यतिरिक्त उदयानातील कचरा,व टाकाउ भाजीपाला व फळे यावर त्याच आवारात प्रक्रिया करणेविषयी सूचित केले आहे. तसेच विलगीकरण केलेलया सुक्या कच-याचे पुन्हा विलगीकरण करून (Secondary Segragation)व पूर्नप्रक्रिया करून पुर्नप्रकीया न होवू शकणारा सुका कचरा भरावभुमीवर पाठविण्यात यावा असे नमूद आहे.व घरगुती घातक कचरा संबंधी नपने 20 कि.मि. त्रिज्येच्या परसिरात संकलन केंद्र उभारून घरगुती घातक कचरा सुविधा केंद्रापर्यंत सुरक्षित वाहतूक करणेविषयी सूचित केले आहे. वरीलप्रमाणे नगरपंचायतीने स्थानिक संस्थांचा सहभाग घेवून व्यापक जनजागृती केल्याचे लेखे उपलब्ध व घातक कच-याबाबत केलेल्या कार्यवाहीचे लेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाहीत.

6) शासन निर्णय क्रं. उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्रं. बीसीए/2009/प्रक्र/108/कामगार/7अ दिनांक 17 जुन 2010 नुसार 1% उपकर वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार रू. 6674587/- च्या 1% रक्कम रू. 66746/- शासन निधीत भरणा करण्यात यावी.

7) शासन परिपत्रक नगर विकास विभाग क्र.स्वमअ/2018/प्र.क्र./212/नवि-34 दि.27.04.2018 मधील परि.क्र.8 व 9 नुसार 1 टन ओल्या कच-यापासून 150 ते 200 किलो कंपोस्ट खत तयार होणे अपेक्षित आहे.त्यानुसार 1 टन ओलया कच-यापासून जर महीन्यात 4 ते 6 टन चांगलया प्रतिचे कंपोस्ट खत तयार झाले तरच संबंधीत शहरातील कच-याचे 100% विलगीकरण केले आहे असे समजले जाईल असे नमूद आहे. व या बाबी केंद्र शासनाच्या mFMS पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. तथापी नगरपंचायतीचे अशा प्रकारचे खत निर्मीतीचे लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे घनकचऱ्याचे ओला कचरा व सुका कचरा असे विलगीकरण कचरा निर्मितीच्या ठिकाणी योग्य प्रकारे होत नसल्याचे स्पष्ट होते.

8)निविदेतील अटी व शर्ती क्र. 29 व करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 30 स्वच्छ भारत मिशन अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार नेमून दिलेल्या वॉर्डातून नागरिकांमधून निवडलेल्या स्वच्छता दूताचे सदर साफसफाई समाधानकारक केले असलेबाबतचा अहवाल देयके आदा करतेवेळी नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक यांना सादर करणे बंधनकारक आहे. तसा अहवाल देयकासोबत जोडलेला नाही. तथापी नगरपरिषदेकडील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेली मोजणी किंवा स्वच्छता दूतांचा अभिप्राय नस्तीसोबत दिसून येत नाहीत. तरीही देयक प्रदान करण्यात आले आहे.

9)वरील ईपीएफ भरणा केलेल्या देयकांसोबत कर्मचारी भविष्य निधी संगठन चे (EPFO) पेमेंट कन्फर्मेशन रिसीट जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे नेमके किती कर्मचारी कामांवरी होते त्यापैकी कितीजणांचे ईपीएफ जमा करण्यात आले आहे हे समजून येत नाही.

वरील प्रमाणे एकूण रक्कम रु. 3480477/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 115, Hmm No : 192)

21 वॉर्ड क्र. 14 मधील रस्ते व गटरी साफसफाई करून गोळा होणारा कचरा ओला व सुका कचरा विलगीकरण करून नगरपरिषदेच्या सुचनेप्रमाणे वाहतूक करणे

योजना	:	14th Finance Commision	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 1865382.00/-

नगरपरिषद इचलकरंजीकडील आरोग्य विभागाने वित्तीय वर्ष 2020-21 व 2021-22 मध्ये वॉर्ड क्र. 14 मधील रस्ते व गटरी साफसफाई करून गोळा होणारा कचरा ओला व सुका कचरा विलगीकरण करून नगरपरिषदेच्या सुचनेप्रमाणे वाहतूक करणे या कामांबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

कामाचे नाव	वॉर्ड क्र. 14 मधील रस्ते व गटरी साफसफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून नगरपरिषदेने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे.
लेखाशिर्ष / निधी	घनकचरा व्यवस्थापन / 14वा वित्त आयोग.
अंदाजपत्रकीय रक्कम रुपये	3393520/-
प्रशासकीय मंजूरी	जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे आदेश क्र.कार्या.11/नपा/आरआर/ 364/इ/19 दि. 1.9.2019
तांत्रिक मंजूरी आदेश	--
निविदा प्रक्रिया	ई-टेंडर.
निविदा मंजूर	इस्टीमेट दराने
मक्तेदाराचे नाव	श्री. गणेश बबन चोळके
कामाचा आदेश	मुख्याधिकारी, नगरपरिषद इचलकरंजी जा.क्र.इनप/ आरोग्य/ 477/1/2021 दि. 6.1.2021
काम सुरु दिनांक	दि. 30/11/2019
कालावधी	1.11.2020 ते 31.10.2021

	मे.कौ.ठराव क्र. 174 दि. 11.12.2020 नुसार पुढील निविदा प्रक्रिया होईपर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे.

खर्च तपशिल -

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल
18/15	21.5.2020	157076	ईपीएफ - नोव्हेंबर 2019 ते मार्च 2020
19/16	21.5.2020	224467	गणेश ब चोळके - एप्रिल 2020 च्या कामाचे देयक
27/24	15.6.2020	231969	गणेश ब चोळके - मे 2020 च्या कामाचे देयक
48/45	5.8.2020	224605	गणेश ब चोळके - जून 2020 च्या कामाचे देयक
60/57	17.8.2020	232074	गणेश ब चोळके - जुलै 20 च्या कामाचे देयक
82/78	15.9.2020	232071	गणेश ब चोळके - ऑगस्ट 2020 च्या कामाचे देयक
112/101	23.10.2020	224587	गणेश ब चोळके - सप्टेंबर 2020 च्या कामाचे देयक
144/120	19.11.2020	231850	गणेश ब चोळके - ऑक्टोबर 2020 च्या कामाचे देयक
145	19.11.2020	187966	ईपीएफ - एप्रिल 2020 ते ऑक्टोबर 2020
295/248	31.3.2021	232074	गणेश ब चोळके - मार्च 2021 च्या कामाचे देयक
304/255	31.3.2021	232077	गणेश ब चोळके - जानेवारी 2021 च्या कामाचे देयक
306/257	31.3.2021	209615	गणेश ब चोळके - फेब्रुवारी 2021 च्या कामाचे देयक
94	7.5.2021	386887	ईपीएफ - ऑक्टोबर 2020 ते मार्च 2021
110/102	30.06.2021	224605	गणेश ब चोळके - एप्रिल 2021 च्या कामाचे देयक
111/103	30.06.2021	232074	गणेश ब चोळके - मे 2021 च्या कामाचे देयक
145/127	30.7.2021	224591	गणेश ब चोळके - जून 2021 च्या कामाचे देयक
161/139	07.09.2021	232006	गणेश ब चोळके - जुलै 2021 च्या कामाचे देयक
178/155	15.09.2021	232097	गणेश ब चोळके - ऑगस्ट 2021 च्या कामाचे देयक
210/182	27.10.2021	224576	गणेश ब चोळके - सप्टेंबर 2021 च्या कामाचे देयक
231/199	26.11.2021	232113	गणेश ब चोळके - ऑक्टोबर 2021 च्या कामाचे देयक

333	18.1.2022	418439	ईपीएफ - एप्रिल 2021 ते ऑक्टोबर 2021
		5027819	

उपरोक्त कामावर केलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

1)रस्ते व गटर साफसफाई कामासाठी अनुक्रमे 643750 चौ.फुट व 14642 रनिंग मी. परिमाण निश्चित करण्यात आले आहे. मात्र हे परिमाण नेमके कसे परिगणित केले याचा तपशिल नस्तीमध्ये आढळून येत नाही. कामाचे तपशीलवार अंदाजपत्रक तयार करून त्यास तांत्रीक मंजूरी घेण्यात आलेली नाही. नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांची लांबी व रुंदी बांधकाम विभागाकडून प्रमाणित करण्यात आलेली नाही. तसेच अशा प्रकारच्या सदोष अंदाजपत्रकास शिवाजी विदयापीठाचे अभिप्राय घेणेत आले आहेत. शिवाजी विदयापीठ, आरोग्य विभागाच्या कामांना अभिप्राय/मान्यता देणेस सक्षम असलेबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर केलेली नाहीत. नस्तीसोबत कामाची मोजमाप नोंदवही, दैनंदिन रिपोर्ट असे कोणतेही अभिलेख जोडणेत आलेले नाहीत.

2)करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 9 नुसार सर्व कर्मचारी दररोज कामावर हजर असणे आवश्यक अहे. त्यांची नगरपालिका स्वच्छता निरिक्षक यांचेकडून दररोज हजेरीपत्रकात हजेरी घेणेची असून कर्मचारी हजेरीपत्रक (रजिस्टर) बील तपासणीवेळी लेखापरीक्षा विभागास सादर करावयाचे आहे. ते सादर करण्यात आलेले नाही.

3)नगरपरिषद इचलकरंजी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी टाटा कन्सल्टन्सी, इंजिनिअर्स लिमिटेड यांनी सादर केलेल्या डिटेल्ड प्रोजक्ट रिपोर्टमधील 5.2 मधील विवरणपत्र क्र. 5.2 नुसार रस्ता सफाईचे कामाचे अंदाजपत्रक पावसाळयातील महिने वगळून करणेचे नमूद केले आहे. मात्र पावसाळयातील चारही महिन्यात काम दाखवून रक्कम आदा करण्यात आली आहे. वरील प्रमाणकांनुसार वित्तीय वर्ष 2020-21 मधील माहे जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये अनुक्रमे रक्कम रू. 224605 + 232074 + 232071 + 224587 अशी पावसाळयात एकूण रू. 913337/- आणि वित्तीय वर्ष 2021-22 मधील जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये अनुक्रमे रक्कम रू. 224591 + 232006 + 232097 + 224576 अशी आदा केलेली रक्कम रू. 913270/- आहे.

रस्ते व गटर सफाईच्या देयकांसोबत मासिक गोषवा-याशिवाय अन्य कोणतेही अभिलेख उपलब्ध करून देणेत आलेले नाहीत. कर्मचारी रस्ते/गटर सफाई करीत असल्याचा एकही फोटो नस्तीसोबत जोडलेला नाही. कर्मचा-यांचे दैनंदिन हजेरीपत्रक लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. पुर्ण केलेल्या कामाचे क्षेत्रफळ निश्चित करण्यासाठी मोजमाप पुस्तक ठेवणे गरजेचे आहे. ते ठेवलेले नाही. तरी कामाची मोजमाप नोंदवही, कर्मचा-यायंची हजेरीपत्रके, कामापुर्वीचे व नंतरचे फोटो हे अभिलेख लेखापरीक्षणास सादर करून प्रत्यक्षात काम केलेची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

कामाचा मासिक गोषवारा पाहता त्यामध्ये प्रतिदिन न केलेल्या कामाचा तपशिल आहे. प्रत्येक महिन्यात न केलेले कामाच्या तपशिलात रस्ते सफाईमध्ये 3750चौ.फुट, 3000 चौ.फुट व 2000 चौ.फुट आणि गटर सफाईसाठी 37 रनिंग मी., 60 र.मी. व 75 र. मी हीच परिमाणे पुन्हा पुन्हा दिसून येतात व प्रत्येक महिन्यात ती संख्या जवळजवळ सारखीच आहे. प्रत्येक महिन्यात न केलेल्या कामाचे परिमाण प्रतिदिन तेवढेच रनिंग मीटर व कामाचे दिवसही जवळजवळ तेवढेच असणे हे विश्वसनिय नाही. त्यामुळे मासिक गोषवा-यात नमूद केलेले परिमाण मोघमपणे लिहिलेले दिसून येते. त्यामुळे वर नमूद अभिलेख लेखापरीक्षणास सादर करून प्रत्यक्षात काम केलेची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी. तोपर्यंत पावसाळी महिन्यांमध्ये आदा केलेली वित्तीय वर्ष 2020-21 मधील रू. 913337/- व 2021-22 मधील 913270/- अशी एकूण रक्कम रू. 1826607/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

4)घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 मधील 2.7 अन्वये लोकसंख्येची घनता, व्यापारी उलाढाल आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यानुसार रोजच्या रोज, एक दिवस आड किंवा आठवडयातून दोन वेळा अशा पध्दतीने

रस्ता सफाई व गटर सफाईचे प्रमाण निश्चित करून रस्ते, गल्ल्या आणि उपगल्ल्या झाडून वर्गीकृत पध्दतीने कचरा जमा करावयाचा आहे. ज्याठिकाणी घरोघरी जाऊन दैनंदिन कचरा जमा केला जातो त्याठिकाणी रस्ता/गटर सफाईचे प्रमाण कमी ठेवावयास हवे म्हणजेच रोजच्या रोज ते करण्याची गरज नाही. मात्र नगरपरिषदेने रस्ता व गटर सफाईसाठी मक्ता देताना दैनंदिन तरतूद केली आहे. तथापी वरील उपपरिच्छेदात नमूद केलेप्रमाणे गटर सफाई व रस्ता सफाईचे काम दैनंदिन झालेची सत्यता अभिलेख्यांअभावी पडताळता येत नाही.

घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 मधील विवरणपत्र 2.7 नुसार शहराच्या उपनगरातील मुख्य रस्त्यांची आठवडयातून दोनदा सफाई करणे पुरेसे असताना नगरपरिषदेने दैनंदिन सफाई केल्यामुळे नाहक खर्च झाला आहे. तो परिगणीत करून वसुल करणे क्रमप्राप्त आहे.

5) शासन परिपत्रक नगर विकास विभाग क्र.स्वमअ 2017/प्र.क्र.60/नवि-34 दि.29.04.2017 अन्वये घनकच-याचे विलगीकरण न करता त्यावर प्रकिया करणारे प्रकल्प यशस्वी होत नसल्याचे व विलगीरकण केल्याशिवाय घनकच-यास मुल्य प्राप्त होत नसल्याचे नमूद करून घनकचरा निर्मीतीच्या जागीच 100% विलगीकरण करण्याची कार्यपध्दती व ओला कचरा,सुका कचरा व घरगुती घातक कच-यावरील प्रकीया याबाबतची सुस्पष्ट कार्यपध्दती परि.5 मधील 1 ते 15 अन्वये निश्चीत केली आहे. त्यानुसार विलगीकरण मोहीमेमध्ये नागरी संस्थेने नागरीकांना या मोहीमेची माहीती व्हावी म्हणून सोशल मिडीयाचा वापर,पथनाटय यांचे मार्फत जनजागृती,तसेच शासकीय व अशासकीय संस्था,युवक संघटना,बाजार संघटना,शाळा,महाविदयालये रहिवाशी, व व्यावसायीक व औदयागिक संस्थांचे प्रतिनिधी यांचा सहभाग घेवून विलगीकरण मोहीम यशस्वी करणेविषयी सूचित केले आहे. त्यामध्ये ओल्या कच-यावरील प्रकीये व्यतिरिक्त उदयानातील कचरा,व टाकाउ भाजीपाला व फळे यावर त्याच आवारात प्रक्रिया करणेविषयी सूचित केले आहे. तसेच विलगीकरण केलेलया सुक्या कच-याचे पुन्हा विलगीकरण करून (Secondary Segragation)व पूर्नप्रक्रिया करून पुर्नप्रकीया न होवू शकणारा सुका कचरा भरावभुमीवर पाठविण्यात यावा असे नमूद आहे.व घरगुती घातक कचरा संबंधी नपने 20 कि.मि. त्रिज्येच्या परसिरात संकलन केंद्र उभारून घरगुती घातक कचरा सुविधा केंद्रापर्यंत सुरक्षित वाहतूक करणेविषयी सूचित केले आहे. वरीलप्रमाणे नगरपंचायतीने स्थानिक संस्थांचा सहभाग घेवून व्यापक जनजागृती केल्याचे लेखे उपलब्ध व घातक कच-याबाबत केलेल्या कार्यवाहीचे लेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाहीत.

6) शासन निर्णय क्रं. उद्योग,उर्जा व कामगार विभाग क्रं. बीसीए/2009/प्रक्र/108/कामगार/7अ दिनांक 17 जुन 2010 नुसार 1% उपकर वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार रू. 3877451/- च्या 1% रक्कम रू. 38775/- शासन निधीत भरणा करण्यात यावी.

7) शासन परिपत्रक नगर विकास विभाग क्र.स्वमअ/2018/प्र.क्र./212/नवि-34 दि.27.04.2018 मधील परि.क्र.8 व 9 नुसार 1 टन ओल्या कच-यापासून 150 ते 200 किलो कंपोस्ट खत तयार होणे अपेक्षित आहे.त्यानुसार 1 टन ओलया कच-यापासून जर महीन्यात 4 ते 6 टन चांगलया प्रतिचे कंपोस्ट खत तयार झाले तरच संबंधीत शहरातील कच-याचे 100% विलगीकरण केले आहे असे समजले जाईल असे नमूद आहे. व या बाबी केंद्र शासनाच्या mFMS पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. तथापी नगरपंचायतीचे अशा प्रकारचे खत निर्मीतीचे लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे घनकचऱ्याचे ओला कचरा व सुका कचरा असे विलगीकरण कचरा निर्मितीच्या ठिकाणी योग्य प्रकारे होत नसल्याचे स्पष्ट होते.

8)निविदेतील अटी व शर्ती क्र. 29 व करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 30 स्वच्छ भारत मिशन अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार नेमून दिलेल्या वॉर्डातून नागरिकांमधून निवडलेल्या स्वच्छता दूताचे सदर साफसफाई समाधानकारक केले असलेबाबतचा अहवाल देयके आदा करतेवेळी नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक यांना सादर करणे बंधनकारक आहे. तसा अहवाल देयकासोबत जोडलेला नाही. तथापी नगरपरिषदेकडील अधिकारी व

कर्मचारी यांनी केलेली मोजणी किंवा स्वच्छता दूतांचा अभिप्राय नस्तीसोबत दिसून येत नाहीत. तरीही देयक प्रदान करण्यात आले आहे.

वरीलप्रमाणे एकूण रक्कम रु. 1865382/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 116, Hmm No : 193)

22 शिक्षण विभागाकडील वैदयकीय देयकातून आयकर कमी वसूल केलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	294313.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	3598095.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात शिक्षण विभागाकडील वैदयकीय देयकांची तपासणी केली असता खालील शिक्षकांची वैदयकीय देयकातून आयकर कमी कपात केलेला आहे.

अ.क्रं	कर्मचा-याचे नांव	देय र. रु.	आयकर कपात र..रु.	कमी कपात र.रु.
1	शुभागी प्र.कलगुटके	43070	4307	1500
2	विलास द.रामाणे	18058	1806	1501
3	सचिन शं.रेळेकर	40479	4048	1275
4	छाया सु.कदम	72305	7231	1501
5	श्रीम.सु.श्री.गायकवाड	74800	7480	3980
6	नि.ल.तरवाळ	27232	2723	2723
7	अ.अ.शेळके	106734	10673	1499
8	म.बा.हिंगे	26775	2678	2678

9	सु.शि.गायकवाड	96103	9610	1500
10	धो.मा.आबेकर	76572	7657	7657
11	संजय रा.माने	125991	12599	9724
12	नरेश नि.कांबळे	24220	2422	2167
13	पा.ज.उरुणकर	62440	6444	6444
14	रा.हि.मूजावर	24138	2414	2414
15	मा.के.खेडेकर	78442	7844	4144
16	गिता अ.दसूर	80299	8030	8030
17	वि.द.रामाणे	20799	2080	1842
18	शुभांगी कलगुटकी	34466	3447	887
19	गणेश साळुंखे	17239	1724	1064
20	सागर खराडे	18327	1833	1033
21	आयुश मुल्ला	69881	6988	1500
22	संजय आवळे	22968	2297	926
23	अर्जून रानमाळे	34361	3436	641
24	तौफीक अहमद	24329	2433	2113

25	स.सा.खराळे	22909	2291	1491
26	सुरेखा श्री.गायकवाड	19124	1912	1912
27	व.द.खेडकर	26626	2663	1500
28	विक्रम कृ.खोत	65763	6576	1500
29	बाबाजान मु.जमादार	536802	53680	53680
30	शिवाजी के.डवरी	41532	4153	4153
31	धोडीराम मा.आबेकर	284907	28491	28491
32	रणजित दि.पाटील	21260	2126	2126
33	अनिल दे.कांरडे	27056	2706	2706
34	विजय म.कोळी	180000	18000	18000
35	पांडूरंग ज.उरुणकर	62440	6244	6244
36	रहमतुल्ला दि.मुजावर	24128	2413	2413
37	वर्षा मा.खेडेकर	67268	6727	6727
38	सुरेखा शंकर बिराजदार	176672	17667	17667
39	गीता अ.दसूर	80299	8030	8030
40	अर्चना सं.जाधव	137112	13711	13711

41	मालन अ.पाटील	205540	20554	20554
42	वर्षा मारुती खेडकर	36645	3665	3665
43	संजय रा.माने	123116	12312	12312
44	नरेश नि.कांबळे	23965	2397	2397
45	मोहन तु.वाघमारे	70605	7061	3111
46	शितल जो.कुभार	29709	2971	1721
47	बुशरा मि. अत्तार मणेर	114589	11459	11459
	एकूण	3598095	360013	294313

पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) शिक्षण विभागाकडील प्रमाणकांची पडताळणी केली असता कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय देयकातून आयकर रक्कम कपात करताना रु.15000 चे वरील रकमेवर आयकर कपात केली आहे. परंतु, सन 2019-20 पासून वेतनातून केल्या जाणाऱ्या आयकर कपातीबाबत वित्त विभाग,भारत सरकार यांचेकडील परिपत्रक क्र.4/2020 दिनांक 16/01/2020 मधील नियम 5.2.2 A (XV) नुसार पूर्ण वैद्यकीय देयक भरपाई रकमेतून 10% आयकर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार कमी भरणा र.रु.294313/- वसूल करुन चलन लेखा परीक्षणास सादर करावे.

2) सदर कर्मचारी वैदयकीय रजेवर असलेबाबतचे रजा मंजूरीचा आदेशाची रजा मंजूरी आदेश वैदयकीय देयकासोबत जोडणे आवश्य़क आहे. अ.क्रं. 1 ते 2 बाबींची पूर्तता करीतो पर्यत खर्च र.रु.3598095/- अंतिम अमान्य़ करण्यात येत आहे.

DATNDPM7201 (Ref No : 10, Hmm No : 27)

23 शिक्षण मंडळाकडील कुटूंब निवृत्तावरील महागाई भत्ता दुबार अदा केले बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	102791.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	102791.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखा परीक्षणात शिक्षण विभागाकडील सेवा

निवृत्ती वेतन देयके तपासणी केली असता कुटूंब निवृत्तावरील जादा महागाई भत्ता अदा केला आहे. कै.अैयाज मोमीन न.पा.शिक्षक शाळा क्रं.22 हे मयत झाले असून त्यांची पत्नी प्राथमिक आरोग्य केंद्र शिरोली येथे कार्यरत आहे. कै.मोमीन यांना 7व्या वेतन आयोगमध्ये माहे सप्टेबर 2019 ते सप्टेंबर 2021 याकालावधीत र.रु.102791/- महागाई भत्ता जादा अदा झाला आहे. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक मकोनी/1000/प्र.क्र.188 कोषा-5 दिनांक 04.03.2002 अन्वये प्रत्येक वर्षी जूनमध्ये प्रत्येक विभागाकडून अनुकंपा तत्त्वावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची व पुर्ननियुक्त कर्मचाऱ्यांची माहिती न घेतल्याने महागाई भत्त्याचे अति प्रदान झाले आहे. सदर र.रु.102791/ वसूलात आणून शासन निधीत भरणा करावी.

DATNDPM7201 (Ref No : 12, Hmm No : 28)

24 शिक्षण मंडळाकडील दिवाळी/ईद अग्रिम रकमा वसूल होणे बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 121513.00/-

नगरपरिषद इचलकरंजी शिक्षण मंडळाचे सन 2020-21 ते 2021-22 चे लेखापरिक्षणात अग्रीम/ तसलमात रजिस्टर स्कूल बोर्ड नमुना नंबर 9 नियम 14(2),25(1) व 32(1) ची तपासणी केली असता खालील प्रमाणे रक्कम येणे दिसून येते. सन 1980-81 कालावधी पासुन लेखा परीक्षण वर्ष सन 2021-2022 अखेर सदर रकमा वसुल झालेल्या नाहीत. तरी खालील रकमा वसुल करुन शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

अ.क्रं	दिनांक	तसलमात प्रयोजन	येणे अग्रीम
1	04/09/1980	दिवाळी / ईद अग्रिम	121513

वरील रक्कम रुपये 121513/- संबंधिताकडुन वसुल करुन 80 टक्के शासन निधीत व 20 टक्के न.पा. निधीत भरणा केल्याचे चलन लेखा परीक्षणास सादर करावे.

DATNDPM7201 (Ref No : 137, Hmm No : 25)

25 शिक्षण मंडळकडील मयत कुटुंब निवृत्तीधारक शिक्षक यांना वेतन जादा अदा केले बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 28536.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखा परीक्षणात शिक्षण विभागाकडील सेवा निवृत्ती वेतन देयके तपासणी केली असता कुटूंब निवृत्त वेतनधारक मयत झालेने त्यांना जादा अदा केला आहे. कुटुंब निवृत्त वेतनधारक मुबारक का.मुल्लाणी हे मयत झाले असून त्यांना दि.18/4/21 ते 30/6/2021 कालावधीत र.रु .28536/- अदा झाली आहे. सदर रक्कम वसूलात आणून शासन निधीत भरणा करावी.

DATNDPM7201 (Ref No : 138, Hmm No : 29)

26 शिक्षण मंडळाकडील निवृत्तधारक पेशन यांना वैदयकीय देयक अदा केले बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	176672.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखा परीक्षणात शिक्षण विभागाकडील वैदयकीय देयके तपासणी केली असता सौ.सुरेखा शंकर बिराजदार अध्यापिका अहिल्याबाई होळकर विदयामंदीर शाळा क्रं.30 यांचे पतीचे वैदयकीय देयक र.रु..176672/- अदा केले आहे. त्यांचे पती श्री.शंकर रामगोंडा बिराजदार हे पंचायत समिती शिरोळ येथून सेवा निवृत्त झाले आहेत. शासन निर्णय क्रं.वैखप्र-2017/प्र.क्रं.614/राकावि-2 दि.02 ऑगस्ट 2019 नुसार सातव्या आयोगाच्या शिफारशीनुसार सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-याच्या निवृत्ती वेतनात सुधारणा करण्यात आल्यानंतर शासन निर्णयातील अट क्रं.(iii) नुसार निवृत्त वेतनासह अन्य मार्गानाही उत्पन्न मिळत असेल तर अशा सर्व प्रकरणी, उपचार घेतेवेळी त्यांचे सर्व मार्गानी मिळणारे एकूण उत्पन्न हे दरमहा-रुपये 9000/-इतके मूळ निवृत्तीवेतन मर्यादित आहे.

श्री.शंकर रा.बिराजदार यांचे मूळ पं.स.शिरोळ निवृत्ती वेतन प्रमाणपत्रामध्ये मूळ वेतन र.रु.24030/- त्यांना दरमहा अदा होत असलेबाबतचा दाखला वैदयकीय देयका सोबत जोडला आहे. तरी शासन निर्णयानुसार र.रु.9000/- व त्यावर मिळणारे महागाई भत्ता पेक्षा जास्त असलेने त्यांना मूळ निवृत्त वेतन कमाल उत्पन्ना पेक्षा अधिक असलेन सदर वैदयकीय देयक अनुदेय हा ेत नाही. सदर र.रु. 176672/- वसूल करुन शासन निधीत जमा करुन चलन लेखा परीक्षणास सादर करावे.

DATNDPM7201 (Ref No : 139, Hmm No : 30)

27 शिक्षक दिन तसलमात रक्कम प्रलंबित असले बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	100000.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखा परीक्षणात शिक्षण विभागाकडील नगरपरिषदेच्या नोंदवहीनुसा शिक्षक दिन साजरा करणेसाठी र.र.100000/- इतकी रक्कम दि.12/8/2021 नुसार जमा खर्च व रोखवहीवरुन् प्रलंबित आहे. याबाबत अभिप्राय पुढील प्रमाणे-

1) सदर तसलमात प्रलंबित आहे त्याचे समायोजन अद्यापही करण्यात आलेले नाही. सदर बाबतीत वित्तीय अनियमितता झालेली आहे, ही बाब गंभीर असून यामध्ये आर्थीक गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या अग्रीमाचा व आकस्मिक खर्च व भत्ते भागविण्याकरिता प्राधिकृत अधिकाऱ्यास देण्यात आलेल्या तसलमात/अग्रीमाचा लेखा महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 नियम 276 नुसार नमुना 22 मध्ये ठेवण्यात आलेले नाही. . त्यामुळे सदर नोंदवहीतील तसलमात रक्कमेबाबतची निश्चिती होत नाही ही बाब

गंभीर आहे.

3) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्र. 35 मधील अ.क्र.15 अन्वये प्रलंबित अग्रीम समायोजनास प्रथम प्राधान्य देण्यात यावे. संबंधीत खातेप्रमुखांवर तसेच जबाबदार कर्मचाऱ्यांवर लेखी जबाबदारी सोपवावी. त्यानुसार थकबाकीदारांना रक्कमेच्या समायोजनासाठी कमाल 60 दिवसांची मुदत द्यावी, मुदतीत समायोजन न झाल्यास ही रक्कम नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 96 नुसार नगरपरिषदेची आर्थिक हानी समजण्यात यावी. त्यासाठी सक्तीची उपाययोजना अंमलात आणाव्यात व संबंधितांना उक्त अधिनियमाचे कलम 150,151,152 अन्वये अनुक्रमे मागणीचे बील द्यावे. नोटीस द्यावी तरीही रक्क्म वसुल न झाल्यास अधिपत्र बजावून वसूली करण्यात यावी तसेच स्थायी निर्देश क्र. 35 मधील अनुक्रमांक 17 व 18 अन्वये वरील प्रमाणे रक्कम 15 दिवसांत रक्कम वसूल न झाल्यास 12% चक्रवाढ व्याजाची आकारणी करण्यात यावी. ज्या कर्मचा-यावर ही वसुलीची जबाबदारी सोपवण्यात येईल त्यांनी वसुली न केल्यास ही रक्कम संबंधित कर्मचा-यांचे वेतनातून वसूल करणेत यावी. सर्व प्रलंबित अग्रीमाचा आढावा घेवून तीन महिन्यात समायोजनासाठी जबाबदारी संबंधित खातेप्रमुखावर सोपिवण्यात यावी व समायोजन न होणा-या रकमेची वसुली वेतनातून/सक्तीच्या मार्गाने करण्यात यावी. रक्कम रुपये 100000/- इतकी वसूुूलात आणूण लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

DATNDPM7201 (Ref No : 140, Hmm No : 51)

28 न. प. इचलकरंजी हद्दीमध्ये पाणीपुरवठा विभागाकडून सन2021-22 मध्ये विविध ठिकाणी केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	261718.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

न. प. इचलकरंजी आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणा मध्ये सन 2021-22 मध्ये पाणीपुरवठा विभागाकडून विविध ठिकाणी केलेल्या कामामध्ये पुढीलप्रमाणे अनियमितता दिसून येतात.

अक्र	कामाचे नाव	सन 21-22 मध्ये अदा रक्कम	DSR वर्ष
1	प्र.क्र. 3 म्हाडा कॉलनी HDPE पाईप टाकणे	246406	19-20
2	प्र.क्र. 16 संजय गांधी नगर GI पाईप टाकणे	80259	18-19
3	देखभाल दुरुस्ती अंतर्गत A झोन मध्ये विविध ठिकाणी GI पाईप टाकणे	6721	18-19
4	टाकवडे वेस येथील 18 द. ल. लि. क्षमतेच्या प्रस्तावित मलशुद्धीकरण केंद्र येथील कुंपणाकरिता जी.आय. पत्रे पुरविणे	3376	18-19
5	टाकवडे वेस येथील 18 द. ल. लि. क्षमतेच्या प्रस्तावित मलशुद्धीकरण केंद्र येथील कुंपणाकरिता जी.आय. पत्रे	40728	18-19

	पुरविणे		
	एकूण	377490	

3) उक्त नमूद दरसुचीमधील General Notes मधील सूचना क्रमांक 17 नुसार संबंधित पाईपची समाधानकारक Hydraulic test झाल्याशिवाय Refilling of the trenches of pipeline या बाबीचे देयक रक्कम अदा करू नये असे नमूद आहे. परंतु अशी test घेतली नसतानाही मक्तेदारास खालीलप्रमाणे नमूद बाबीचे देयक रक्कम रुपये अदा करण्यात आले आहेत. तरी सदर रक्कम रु. 29936 वसूलपात्र करणेत येत आहे.

अ . क्र	**कामाचे नाव**	**बाब तपशील**	**दिलेला दर**
1	प्र.क्र. 3 म्हाडा कॉलनी HDPE पाईप टाकणे	Refilling the trenches	11876.63
2	प्र.क्र. 16 संजय गांधी नगर GI पाईप टाकणे	Refilling the trenches	4758.13
3	देखभाल दुरुस्ती अंतर्गत A झोन मध्ये विविध ठिकाणी GI पाईप टाकणे	Refilling the trenches	13301.44
		एकूण	**29936.2**

4)सदर कामात GI Pipe, GI specials, Burnt Bricks बाबींचा वापर करण्यात आलेला आहे. परंतू त्याचा वापर करण्यापुर्वी प्रयोगशाळेतून चाचणी अहवाल घेतलेला नाही. त्यामुळे काम तांत्रिकद्रुष्टया योग्य झाले किंवा नाही याची खात्री करता येत नाही.

5) खालील सर्व कामांमध्ये बाब क्र. 7 नुसार BB masonry stand post साठी रक्कम अदा केली आहे परंतु कामांच्या नस्ती सोबत जोडलेल्या छायाचित्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये एकही stand post दिसून येत नाही. सबब stand post साठी अदा केलेली र. रु. 56964 वसूल होणे आवश्यक आहे.

अ . क्र	**कामाचे नाव**	**बाब तपशील**	**प्रमाण**	**दिलेला दर**	**एकूण अदा रक्कम**
1	प्र.क्र. 16 संजय गांधी नगर GI पाईप टाकणे	BB masonry stand post	28	1419	39732
2	देखभाल दुरुस्ती अंतर्गत A झोन मध्ये विविध ठिकाणी GI पाईप टाकणे	BB masonry stand post	12	1436	17232
		एकूण			**56964**

6)वरील सर्व कामांमध्ये 1% विमा कपात करणे आवश्यक असता 0.50% विमा कपात केला आहे. सबब खालील प्रमाणे कमी कपात विमा रक्कम रु. 6204 शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

अ . क्र	**कामाचे नाव**	**कमी कपात विमा रक्कम रु.**

1	देखभाल दुरुस्ती अंतर्गत A झोन मध्ये विविध ठिकाणी GI पाईप टाकणे	3894
2	टाकवडे वेस येथील 18 द. ल. लि. क्षमतेच्या प्रस्तावित मलशुद्धीकरण केंद्र येथील कुंपणाकरिता जी.आय. पत्रे पुरविणे	1423
3	टाकवडे वेस येथील 18 द. ल. लि. क्षमतेच्या प्रस्तावित मलशुद्धीकरण केंद्र येथील कुंपणाकरिता जी.आय. पत्रे पुरविणे	887
	एकूण	**6204**

7)GST ACT 2017 As per section 76 व महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- टीडीएस-0918/(प्र.क्र.590/18)/मोप्र-1 दिनांक 13.11.2018 मधील 1.3 नुसार कंत्राटदाराने वस्तु व सेवा कर भरणा केल्याच्या पुष्ठ्यर्थ सादर केलेल्या परिपूर्ण प्रमाणित कागदपत्रांची तपासणी केलेनंतरच त्यांना 12 टक्के GST चा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार कंत्राटदाराने GST रक्कम भरणा केलेबाबतचे GST-R-1 चलनाची पडताळणी केलेनंतरच कंत्राटदारास रक्कम देणे आवश्यक असता GST-R-1 न घेताच कंत्राटदारास मोजमाप पुस्तिकेनुसार बिलामधून खालीलप्रमाणे रक्कम रुपये 168614.17/- वस्तु व सेवा कर रक्कम अदा केली आहे. सदर रक्कम लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येणार नाही.

अ . क्र	**कामाचे नाव**	**12% GST रक्कम**
1	प्र.क्र. 3 म्हाडा कॉलनी HDPE पाईप टाकणे	31932.18
2	प्र.क्र. 16 संजय गांधी नगर GI पाईप टाकणे	30419.49
3	देखभाल दुरुस्ती अंतर्गत A झोन मध्ये विविध ठिकाणी GI पाईप टाकणे	106262.5
	एकूण	**168614.17**

सबब वरील अनियमिततांच्या पुर्ततेअभावी रक्कम रु. 261718 वसुलपात्र करण्यात यावेत.

DATRVPF8701 (Ref No : 15, Hmm No : 111)

29 न. प. इचलकरंजी हद्दीमध्ये पाणीपुरवठा विभागाकडून सन2020-21 मध्ये विविध ठिकाणी केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 293031.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

न. प. इचलकरंजी आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणामध्ये सन 2020-21 मध्ये पाणीपुरवठा विभागाकडून न.प. हद्दीमध्ये न. प. निधीमधून विविध ठिकाणी केलेल्या कामामध्ये पुढीलप्रमाणे खर्च झालेचे दिसून

येते.

अक्र	कामाचे नाव	प्र.क्र./दिनांक	DSR	Est.	मुल्यांकन	एकूण खर्च
1	सांगली नाका पाण्याच्या टाकी करिता टॅकर भरणेसाठी व्यवस्था करणे, न.प. इमारती करिता प्लंबिंग करणे, जलशुद्धीकारण केंद्राकरिता पाईप लाईन करणे	591/426-31.3.21	2019-2020	556667	542350	542350

1)वरील कामासाठी सन 2019-2020 या वर्षाच्या दरसूची चा वापर केला असून अंदाजपत्रक बाब क्र.1 नुसार GI पाईप पुरविणे MEDIUM 100 MM या बाबीसाठी GENERAL NOTES मधील अट क्र. 9 नुसार 5% SUGAR CANE AREA चा दर देय नसताना अदा करण्यात आला आहे. तपशिल खालीलप्रमाणे.

परिमाण	5% जादा दर	जादा अदा रक्कम रक्कम
60 RMT	35.7	2142

सबब सदर जादा अदा रक्कम रु. 2142 वसूल होणे आवश्यक आहे.

अक्र	कामाचे नाव	DSR
1	प्र.क्र. 25 मधील गोंधळी गल्ली आणि केटकळ गल्ली येथे DIK 7 पाईप लाईन टाकणे	2018-2019

2)वरील कामाच्या खर्च नस्तीचे अवलोकन केले असता WORK ORDER- 165/13/2/2019 - कामाचा कालावधी 30 दिवस असून करारपत्रातील अट क्र 5 नुसार विलंबास रु. 100 प्रती दिन दंडाची तरतूद केली आहे. प्रत्यक्षत सदर काम हे दि. 12.9.2019 रोजी पूर्ण झाले आहे. सदर काम 210 दिवस विलंबाने काम पूर्ण झाल्याचे दिसून येते. सबब 210*100=21000 विलंब शुल्क संबधित मक्तेदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

अक्र	कामाचे नाव	प्र.क्र./दिनांक	DSR	Est.	मुल्यांकन	एकूण खर्च
1	तांबेमाळ शाळेमध्ये ड्रेनेज व्यवस्था करणे	422/192-30.3.21	2018-2019	478070	468886	468886

3)वरील कामासाठी सन 2018-2019 या वर्षाच्या दरसूची चा वापर केला असून अंदाजपत्रक बाब क्र.1 नुसार Providing ISI RCC pipes 250 mm चा दर 394 असताना 402 ने अदा केला आहे.

बाब	परिमाण	देय दर	दिलेला दर	जादा दर	जादा अदा रक्कम रक्कम
Providing ISI RCC pipes 250 mm	113.79Mtr.	394	402	8	910

सबब सदर जादा अदा रक्कम रु. 910 वसूल होणे आवश्यक आहे.

4)वरील सर्व कामांमध्ये 1% विमा कपात करणे आवश्यक असता 0.50% विमा कपात केला आहे. सबब खालील प्रमाणे कमी कपात विमा रक्कम रु. 9307 शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

अ . क्र	कामाचे नाव	कमी कपात विमा रक्कम रु.
1	प्र.क्र. 16 मधील तांबे माळ पाण्याची टाकी ते रामनगर व षटकोन चौक परिसर व कुडचे मळा परिसरात DI पाईप जोडणे	1778
2	प्र.क्र. 25 मधील गोंधळी गल्ली आणि केटकळ गल्ली येथे DIK 7 पाईप लाईन टाकणे	1964
3	सांगली नाका पाण्याच्या टाकी करिता टॅकर भरणेसाठी व्यवस्था करणे, न.प. इमारती करिता प्लंबिंग करणे, जलशुद्धीकारण केंद्राकरिता पाईप लाईन करणे	2059
4	तांबेमाळ शाळेमध्ये ड्रेनेज व्यवस्था करणे	1796
5	प्रभाग क्र. 24 मधील पुजारी माळा परिसरामध्ये विविध व्यासाच्या GI पाईप टाकणे	1710
	एकूण	**9307**

5)GST ACT 2017 As per section 76 व महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- टीडीएस-0918/(प्र.क्र.590/18)/मोप्र-1 दिनांक 13.11.2018 मधील 1.3 नुसार कंत्राटदाराने वस्तु व सेवा कर भरणा केल्याच्या पुष्ठ्यर्थ सादर केलेल्या परिपूर्ण प्रमाणित कागदपत्रांची तपासणी केलेनंतरच त्यांना 12 टक्के GST चा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार कंत्राटदाराने GST रक्कम भरणा केलेबाबतचे GST-R-1 चलनाची पडताळणी केलेनंतरच कंत्राटदारास रक्कम देणे आवश्यक असता GST-R-1 न घेताच कंत्राटदारास मोजमाप पुस्तिकेनुसार बिलामधून खालीलप्रमाणे रक्कम रुपये 259672/- वस्तु व सेवा कर रक्कम अदा केली आहे. सदर रक्कम लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येणार नाही.

अ . क्र	कामाचे नाव	12% GST रक्कम
1	प्र.क्र. 16 मधील तांबे माळ पाण्याची टाकी ते रामनगर व षटकोन चौक परिसर व कुडचे मळा परिसरात DI पाईप जोडणे	50529
2	प्र.क्र. 25 मधील गोंधळी गल्ली आणि केटकळ गल्ली येथे DIK 7 पाईप लाईन टाकणे	53338.27
3	सांगली नाका पाण्याच्या टाकी करिता टॅकर भरणेसाठी व्यवस्था करणे, न.प. इमारती करिता प्लंबिंग करणे, जलशुद्धीकारण केंद्राकरिता पाईप लाईन करणे	58108.88
4	तांबेमाळ शाळेमध्ये ड्रेनेज व्यवस्था करणे	50237.8
5	प्रभाग क्र. 24 मधील पुजारी माळा परिसरामध्ये विविध व्यासाच्या GI पाईप टाकणे	47458.5

	एकूण	**259672.45**

सबब वरील अनियमिततांच्या पुर्ततेअभावी रक्कम रु. 293031 वसुलपात्र करण्यात येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 16, Hmm No : 112)

30 पाणीपुरवठा विभागाकडील पंपांचे ठिकाणचे वीजदेयकांबाबत2020-21

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 276468.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2020-21 चे लेखापरीक्षणात सबमर्सिबल पंपाचे ठिकाणची विज देयके अदा करण्यात आली आहेत.

1)पाणीपुरवठा विभागाने वेळोवेळी सबमर्सिबल पंपाचे जोडण्यांची तपासणी करून त्यानुसार जोडणी चालू-बंद ठेवणे आवश्यक आहे, परंतु सदरप्रमाणे नियमित तपासणी न झालेने एक वर्ष इतक्या मोठ्या कालावधीमध्ये बंद असलेल्या जोडण्यांबाबत योग्य कार्यवाही झालेली नाही.

2)सबमर्सिबल पंपाचे ठिकाणची विद्युत देयके तपासणी केली असता पुढीलप्रमाणे 71 ठिकाणच्या देयकांचा एक वर्ष इतक्या कालावधीकरिता शून्य (0) युनिट वापर दिसून येतो.तरीही देयक रक्कम अदा केल्याचे दिसून येते.तरी सदरप्रमाणे पंपावरील वीजवापर शून्य (0) आहे म्हणजेच सदर पंप विनावापर आहे असे स्पष्ट होते. असे असताना एक वर्ष इतक्या कालावधीकरिता या पंपावरील विद्युत जोडणी चालू ठेवणे ही बाब संयुक्तिक नाही. जोडणी बंद न केलेने या पंपांचे नाहक स्थिर आकार व इतर शुल्क भरणा करावे लागत आहे.

अ.क्र.	ग्राहक क्रमांक	सबमर्सिबल पंपाचे ठिकाण	देयक कालावधी		बिल रक्कम रुपये	युनिट वापर	झिरो (0) युनिट वापर कालावधी
1	250382548911	विकासनगर	30.4.2020	30.5.2020	4380	0	पूर्ण ले.प.वर्ष
2	250382551041	9/4 कक्क खानावळ	30.4.2020	30.5.2020	780	0	पूर्ण ले.प.वर्ष
3	250382547124	स्वामी कारखाना रोड	30.4.2020	30.5.2020	1850	0	पूर्ण ले.प.वर्ष
4	250382547213	जयहिंद मंडळ	3.5.2020	2.6.2020	3680	0	पूर्ण ले.प.वर्ष
5	250382548783	जवाहर नगर व्यंकटेश कॉलनी	3.5.2020	2.6.2020	1800	0	पूर्ण ले.प.वर्ष

6	250382549526	जवाहर हायस्कूल जवळ	3.5.2020	2.6.2020	1800	0	पूर्ण ले.प.वर्ष
7	250382550591	शहापूर योगाश्रम ढवळे	1.5.2020	31.5.2020	7030	0	पूर्ण ले.प.वर्ष
8	250382549666	गुलाब पैलवान जवळ	2.5.2020	1.6.2021	1840	0	पूर्ण ले.प.वर्ष
9	250382548691	मॉडर्न हायस्कूल जवळ	30.4.2020	30.5.2020	1800	0	पूर्ण ले.प.वर्ष
10	250382548490	10/32 चौगले घर	3.7.2020	3.8.2020	1940	0	पूर्णले.प. वर्ष
11	250382548503	आपटे मळा मंत्री फॅकटरी	2.5.2020	1.6.2020	1800	0	पूर्ण ले.प.वर्ष
12	250382546411	तुरंबेकर घराजवळ	1.3.2020	31.1.2021	0	0	पूर्ण ले.प.वर्ष
13	250382550010	राधाकृष्ण टोकीज जवळ	30.4.2020	30.5.2020	1800	0	पूर्ण ले.प.वर्ष
14	250382549984	विक्रम नगर जुना शहापूर नाका	30.4.2020	30.6.2020	1440	0	पूर्ण ले.प.वर्ष
15	250382549844	दत्त नगर शेडबाळे घराजवळ	30.4.2020	30.5.2020	164	0	पूर्ण ले.प.वर्ष
16	250382547795	भाग्यश्री कॉलनी	3.5.2020	2.6.2020	1610	0	पूर्ण ले.प.वर्ष
17	250382547019	सोलगे पाटील	30.4.2020	30.5.2020	1850	0	पूर्ण ले.प.वर्ष
18	250382551598	कामाक्षी ज्वेलर्स यशवंत कॉलनी	5.5.2020	4.6.2020	1870	0	पूर्ण ले.प.वर्ष
19	250382547086	रामनगर नायकवडी	30.4.2020	30.5.2020	1870	0	पूर्ण ले.प.वर्ष
20	250382550770	वार्ड नं. 10 शिरपुरे बंगला	1.4.2020	31.3.2021	0	0	पूर्ण ले.प.वर्ष

21	250382550605	शाळा नं. 48 गोरे घराजवळ	30.4.2020	30.5.2020	1800	0	पूर्ण ले.प.वर्ष
22	250380119770	इंड इस्टेट गणेश ऑईल	2.5.2020	1.6.2020	1560	0	पूर्ण ले.प.वर्ष
23	25048693466	लिंगाडे मळा दत्त मंदिर	2.5.2020	1.6.2020	2050	0	पूर्ण ले.प.वर्ष
24	250380147641	गणेश नगर गल्ली नं 3 कोलार कारखाना	30.4.2020	30.5.2020	1760	0	पूर्ण ले.प.वर्ष
25	250648693814	आदर्श झोपडपट्टी	30.4.2020	30.5.2020	1750	0	पूर्ण ले.प.वर्ष
26	250380310712	डॉ. आंबेडकर चौक शहापूर	1.5.2020	31.5.2020	3840	0	पूर्ण ले.प.वर्ष
27	250380324551	शिवशंकर सायझिंग	30.4. 2020	30.5.2020	3810	0	पूर्ण ले.प.वर्ष
28	250653441866	सूर्यवंशी घराजवळ/ निलगिरी बाग	3.5.2020	2.6.2020	7680	0	पूर्ण ले.प.वर्ष
29	250643078186	बिलगिकर घराजवळ ढवळे हॉस्पिटल	2.5.2020	1.6.2020	4500	0	पूर्ण ले.प.वर्ष
30	250382552276	अरविंद पाटील घर शास्त्रीय सोसायटी	30.4. 2020	30.5.2020	1760	0	पूर्ण ले.प.वर्ष
31	250645166651	गावडे घराजवळ पोस्ट ऑफिस जवाहर नगर	3.4.2020	30.5.2020	2670	0	पूर्ण ले.प.वर्ष
32	250653451071	मिक्की माउस स्कूल जवाहर नगर	30.4. 2020	30.5.2020	1920	0	पूर्ण ले.प.वर्ष
33	250653447554	शहापूर पाण्याची टाकी	1.5.2020	31.5.2020	1760	0	पूर्ण ले.प.वर्ष
34	250653447422	जवाहर नगर जुनी पाण्याची टाकी	30.4. 2020	30.5.2020	1760	0	पूर्ण ले.प.वर्ष
35	250657729953	म्हसोबा गल्ली शिक्षक सोसायटी जवाहरनगर	30.4.2020	30.5.2020	8810	0	पूर्ण ले.प.वर्ष

36	250655026629	देसाई घराजवळ सावली सो.	1.5. 2020	31.5.2020	1400	0	पूर्ण ले.प.वर्ष
37	250653459919	IGM हॉस्पिटल	2.5.2020	1.6.2020	1710	0	पूर्ण ले.प.वर्ष
38	250653462511	रामनगर	1.5.2020	31.5.2020	6720	0	पूर्ण ले.प.वर्ष
39	250643081624	बास्केटबॉल मैदान आदर्श जिम शाहू पुतळा	2.5.2020	1.6.2020	1760	0	पूर्ण ले.प.वर्ष
40	250382553353	समाजवादी प्रबोधनी	2.5.2020	1.6.2020	6250	0	पूर्ण ले.प.वर्ष
41	250653479987	प्र. क्र. 5 गणेश नगर	30.4.2020	30.5.2020	2040	0	पूर्ण ले.प.वर्ष
42	250653480004	प्र. क्र. 9 कोतवाल गल्ली	3.5.2020	2.6.2020	4650	0	पूर्ण ले.प.वर्ष
43	25065379049	सुरेश हाळवणकरसो शिंदे दुकान	30.4.2020	30.5.2020	1580	0	पूर्ण ले.प.वर्ष
44	250653479481	वार्ड नं.1 विनायक हायस्कूल शहापूर	1.5.2020	31.5.2020	2340	0	पूर्ण ले.प.वर्ष
45	250651248961	बागवान गल्ली हजारे घर	30.4.2020	30.5.2020	1950	0	पूर्ण ले.प.वर्ष
46	250651250583	प्र. क्र.1 योगाश्रमामागे	17.4. 2020	17.5.2020	2070	0	पूर्ण ले.प.वर्ष
47	250385053581	प्र. क्र.2 समीर मुल्ला लेन तोरणानगर	14.5.2020	13.6.2020	2100	0	पूर्ण ले.प.वर्ष
48	250385056067	प्र. क्र.2 अशोक भोसले घराजवळ	14.5.2020	13.6.2020	2100	0	पूर्ण ले.प.वर्ष
49 A zone	250382546713	लक्ष्मी टेंपल	30.4. 2020	30.5.2020	3670	0	पूर्ण ले.प.वर्ष
50	250382549879	संग्राम चौक पटेल	1.6.2020	1.7.2020	1190	0	पूर्ण

		फणी वाला					ले.प.वर्ष
51	250382550371	कलानगर सुर्वे मळा	1.4.2020	4.3.2021	0	0	पूर्ण ले.प.वर्ष
52	250382546888	गुजरी पेठ महादेव मंदिर	2.3.2020	5.8.2020	720	0	पूर्ण ले.प.वर्ष
53	250382546624	ठाणेकर घराजवळ	30.4. 2020	30.5.2020	1770	0	पूर्ण ले.प.वर्ष
54	250382547965	शिवाजी स्कूल जवळ	30.5.2020	29.6.2020	11470	0	पूर्ण ले.प.वर्ष
55	250382547973	वार्ड नं. 5 गांधी पुतळया जवळ	1.6.2020	1.7.2020	12540	0	पूर्ण ले.प.वर्ष
56	250382546811	रिंग रोड	2.5.2020	1.6.2020	3530	0	पूर्ण ले.प.वर्ष
57	250382548112	अवधूत आखाडा	2.5.2020	1.6.2020	1870	0	पूर्ण ले.प.वर्ष
58	250382548023	डीस्पेसरी जनरेट रूम	2.5.2020	1.6.2020	2310	0	पूर्ण ले.प.वर्ष
59	250382547493	दाते मळा	1.5.2020	31.5.2020	3310	0	पूर्ण ले.प.वर्ष
60	250380110047	प्र. क्र.45 कॉंग्रेस कमिटी	1.5.2020	31.5.2020	2620	0	पूर्ण ले.प.वर्ष
61	250382545946	आसरा नगर पूर्व	2.5.2020	1.6.2020	1720	0	पूर्ण ले.प.वर्ष
62	250382550541	तांबे मळा सिद्धेश्वर फॉ	30.4.2020	30.5.2020	1830	0	पूर्ण ले.प.वर्ष
63	250380148028	बेलबाग	30.4.2020	30.5.2020	1170	0	पूर्ण ले.प.वर्ष
64	250380319981	आन्ना भाऊ साठे समाजमंदीर	30.4.2020	30.5.2020	1100	0	पूर्ण ले.प.वर्ष

65	250380318683	हेरलगे मळा मुसळे सायझिंग	1.5.2020	31.5.2020	1740	0	पूर्ण ले.प.वर्ष
66	250382551784	वरपेघर शिक्षक कॉलनी आमराई रोड	1.6.2020	1.7.2020	3980	0	पूर्ण ले.प.वर्ष
67	250382553108	नारायण नगर हौ. सोसायटी लालनगर	30.4. 2020	29.6.2020	8480	0	पूर्ण ले.प.वर्ष
68	250382557154	पवार घर पवार मळा	2.5.2020	1.7.2020	9230	0	पूर्ण ले.प.वर्ष
69	250382555241	पाथरवट मस्जिद पुजारी मळा	31.5. 2020	30.6.2020	17730	0	पूर्ण ले.प.वर्ष
70	250653476783	जय शिवराय युवक मंडळ	30.4. 2020	29.6.2020	1590	0	पूर्ण ले.प.वर्ष
71	250382562026	प्र.क्र 21 पंचवटी थिएटर	30.4.2020	30.5.2020	2140	0	पूर्ण ले.प.वर्ष
				एकूण	**219114**		

3)सदरचे लेखापरीक्षण हे चाचणी लेखापरीक्षण असलेने पूर्ण लेखापरीक्षण वर्षातील देयकांची पडताळणी करून उपरोक्तप्रमाणे विनावापर असलेल्या जोडण्या बंद करून नाहकचा खर्च थांबवणे आवश्यक आहे.

4)बी झोन मधील ग्राहक क्र. 250382551130 माहे ऑक्टोबर 2020 च्या बिलामध्ये युनिट वापर 332 झाला असून सदर युनिटच्या वापराचे बिल 1378 रु. भरणे आवश्यक असता Principal Arrears रु. 57354 नाहक जादा आकारणी केली आहे. व सदर बाबत कोणतीही खातरजमा न करता विभागाने सदर रक्कम अदा केली. सबब सदर जादा अदा रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी रक्कम रु. 276468 वसूल होणे आवश्यक आहे.

DATRVPF8701 (Ref No : 33, Hmm No : 113)

31 पाणीपुरवठा विभागाकडील पंपांचे ठिकाणचे वीजदेयकांबाबत21-22

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	419677.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2021-22 चे लेखापरीक्षणात सबमर्सिबल पंपाचे ठिकाणची विज देयके अदा करण्यात आली आहेत.

1)पाणीपुरवठा विभागाने वेळोवेळी सबमर्सिबल पंपाचे जोडण्यांची तपासणी करून त्यानुसार जोडणी चालू-बंद

ठेवणे आवश्यक आहे, परंतु सदरप्रमाणे नियमित तपासणी न झालेने एक वर्ष इतक्या मोठ्या कालावधीमध्ये बंद असलेल्या जोडण्यांबाबत योग्य कार्यवाही झालेली नाही.

2)सबमर्सिबल पंपाचे ठिकाणची विद्युत देयके तपासणी केली असता पुढीलप्रमाणे 66 ठिकाणच्या देयकांचा 4 महिने ते एक वर्ष इतक्या कालावधीकरिता शून्य (0) युनिट वापर दिसून येतो. तरीही देयक रक्कम अदा केल्याचे दिसून येते. तरी सदरप्रमाणे पंपावरील वीजवापर शून्य (0) आहे म्हणजेच सदर पंप विनावापर आहे असे स्पष्ट होते. असे असताना एक वर्ष इतक्या कालावधीकरिता या पंपावरील विद्युत जोडणी चालू ठेवणे ही बाब संयुक्तिक नाही. जोडणी बंद न केलेने या पंपांचे खालीलप्रमाणे नाहक स्थिर आकार व इतर शुल्क भरणा करावे लागत आहे.

अ.क्र.	ग्राहक क्रमांक	सबमर्सिबल पंपाचे ठिकाण	देयक कालावधी		बिल रक्कम रुपये	युनिट वापर	झिरो (0) युनिट वापर कालावधी
1	2503825501041	खानावळ जवळ	1.4.2021	5.3.2022	3250	0	
2	250382547124	स्वामी कारखाना रोड	1.4.2021	5.3.2022	1480	0	पूर्ण ले.प.वर्ष
3	250382548783	जवाहर नगर	1.4.2021	5.3.2022	1360	0	पूर्ण ले.प.वर्ष
4	250382549526	जवाहर हायस्कूल जवळ	1.4.2021	5.3.2022	1350	0	--
5	250382548691	मॉडर्न हायस्कूल जवळ	1.4.2021	5.3.2022	1390	0	--
6	250382548503	आपटे मळा	1.9.2021	13.2.2022	1160	0	पूर्ण ले.प.वर्ष
7	250382550010	राधाकृष्ण टोकिज जवळ	30.6.2021	5.3.2022	1560	0	पूर्ण ले.प.वर्ष
8	250382547019	सोलगे पाटील	31.8.2021	5.3.2022	1240	0	--
9	250382551598	कामाक्षी ज्वेलर्स	31.8.2021	5.3.2022	1640	0	--
10	250382547086	रामनगर नायकवडी	31.8.2021	5.3.2022	3690	0	--
11	250382550559	सोलगे मळा वेदपाठक घर	1.4.2021	1.3.2022	2780	0	--
12	250382551407	कुलकर्णी चाळ	1.4.2021	30.10.2021	2340	0	पूर्ण

		तोरणानगर					ले.प.वर्ष
13	250382548996	जुना स्टेशन नाका	1.4.2021	18.3.2022	3740	0	पूर्ण ले.प.वर्ष
14	250380115057	पंचागंगा कारखाना शहापूर	1.4.2021	8.2.2022	11820	0	--
15	250382550605	शाळा नं. 46 गोरे घराजवळ	31.8.2021	1.3.2022	1390	0	--
16	250648693466	लिंगाडे मळा दत्त मंदिर	2.4.2021	18.3.2022	7890	0	--
17	250648693814	आदर्श झोपडपट्टी	5.10.2021	5.3.2022	900	0	--
18	250380317831	plot No 4 दत्तनगर रानभरे घराजवळ	5.5.2021	5.3.2022	8800	0	पूर्ण ले.प.वर्ष
19	250380319914	आन्नारामगोंडा शाळा माने तालीम	1.4.2021	18.3.2022	38440	0	पूर्ण ले.प.वर्ष
20	250657726768	तानाजी काटकर घर यशवंत कॉलनी	1.4. 2021	6.3.2022	4390	0	--
21	25065347287	प्रकाश माने आरगे व्या याम शाळा	1.4.2021	5.3.2022	3350	0	--
22	250655026921	कुंभार हॉस्पिटल जवाहर नगर	30.4.2021	5.3.2022	10830	0	--
23	250653479499	वार्ड नं. 3 रामनगर	1.6.2021	1.3.2022	2250	0	--
24	250653478948	नगारे मळा विकास नगर	31.5.2021	5.3.2022	6310	0	पूर्ण ले.प.वर्ष
25	250382557821	जय शिवराय गल्ली नं. 2	1.4.2021	28.2.2022	12730	0	पूर्ण ले.प.वर्ष
26	250653476635	रामनगर राम मंदिर	30.4.2021	4.2.2022	2990	0	पूर्ण ले.प.वर्ष
27	250381962918	वार्ड नं. 2 शहापूर समाज मंदिर	1.5. 2021	1.3.2022	55570	0	पूर्ण ले.प.वर्ष

28	250651247299	प्र.क्र 7 जवाहर नगर इंदिरा हौ. सोसा.	30.4. 2021	5.2.2022	3250	0	पूर्ण ले.प.वर्ष
29	250651248988	प्र.क्र 4 धोत्रे घर धनगर माळ	6.7.2021	1.3.2022	3130	0	पूर्ण ले.प.वर्ष
30	250651247345	प्र.क्र 10 लिंगाडे मळा भारत सायझिंग	30.4. 2021	2.3.2022	3150	0	पूर्ण ले.प.वर्ष
31	250653480659	प्र.क्र 24 यशवंत कॉलनी	31.5.2021	2.3.2022	21690	0	पूर्ण ले.प.वर्ष
32	250653478310	लक्ष्मण गायकवाड घर राजराजेश्वरी नगर	3.7. 2021	9.3.2022	2530	0	पूर्ण ले.प.वर्ष
33	250653485766	प्र.क्र 5 भास्कर माळगे इंदिरा नगर	6.5.2021	5.3.2022	3140	0	पूर्ण ले.प.वर्ष
34	250651251717	प्र.क्र 7 भारतमाता हौ. सोसा.	1.9. 2021	5.3.2022	1970	0	पूर्ण ले.प.वर्ष
35	250382548171	अनुबाई कन्या शाळेजवळ	4.7.2021	3.3.2022	7710	0	पूर्ण ले.प.वर्ष
36	250382551440	फुले पुतळ्याजवळ	2.5.2021	1.3.2022	4000	0	पूर्ण ले.प.वर्ष
37	250382546519	नारायण नगर	2.4.2021	2.3.2022	3220	0	पूर्ण ले.प.वर्ष
38	250382548074	डॉ. चावरे जवळ	1.9. 2012	1.3.2022	1600	0	पूर्ण ले.प.वर्ष
39	250382548023	डीस्पेसरी जनरेट रूम	1.6.2021	1.11.2021	2500	0	पूर्ण ले.प.वर्ष
40	250382551091	स्वामी मिल	4.6. 2021	3.3.2022	2720	0	पूर्ण ले.प.वर्ष
41	250382549755	कबाडे कॉर्नर	4.4.2021	3.3.2022	3370	0	पूर्ण ले.प.वर्ष
42	250382547493	दाते मळा	4.4.2021	3.3.2022	13020	0	पूर्ण ले.प.वर्ष

43	250382548180	जगताप तालीम	4.4.2021	3.3.2022	3370	0	पूर्ण ले.प.वर्ष
44	250380122088	श्रीपादनगर गार्डन जवळ	4.4.2021	3.3.2022	3160	0	पूर्ण ले.प.वर्ष
45	250380146548	नामदेव भवन स्टेडीयम	4.4.2021	3.11.2021	1730	0	पूर्ण ले.प.वर्ष
46	250380147714	सांगली रोड डॉ. चौगुले हॉस्पिटल जवळ	4.4.2021	3.3.2022	3670	0	पूर्ण ले.प.वर्ष
47	250380148028	बेलबाग संडास जवळ	4.4.2021	1.11.2021	2170	0	पूर्ण ले.प.वर्ष
48	250380312723	बरगाले गस एजन्सी जवळ	3.4.2021	3.3.2022	3270	0	पूर्ण ले.प.वर्ष
49	250380148451	शक्ती सबमर्सिबल पंप जवळ	3.4.2021	3.3.2022	3483	0	पूर्ण ले.प.वर्ष
50	250648715630	तुकाराम डाके घर	1.4.2021	1.3.2022	3440	0	पूर्ण ले.प.वर्ष
51	250382552918	लोहार घराजवळ प्रियदर्शनी चौक	3.3. 2021	3.3.2022	3320	0	पूर्ण ले.प.वर्ष
52	250382553761	गुलाबकुंज इमारत	4.3.2021	3.3.2022	13120	0	पूर्ण ले.प.वर्ष
53	250382554236	तांबे माळ	1.3. 2021	1.3.2022	4250	0	पूर्ण ले.प.वर्ष
54	250382557545	डॉ. दरुरे अशोकनगर	2.3.2021	2.3.2022	3210	0	पूर्ण ले.प.वर्ष
55	250653453325	आसरा नगर	4.4. 2021	3.3.2022	3610	0	पूर्ण ले.प.वर्ष
56	250382556981	म. रा. वि. मंडळ हनुमान नगर	4.4.2021	3.11.2021	1630	0	पूर्ण ले.प.वर्ष
57	250382557511	रुग्गे घर घोरकेनगर	1.4. 2021	1.3.2022	2740	0	पूर्ण

							ले.प.वर्ष
58	250641560746	गांधी कम्प गाताडे घर	4.3.2021	3.3.2022	18010	0	पूर्ण ले.प.वर्ष
59	250643087118	प्र.क्र.27 जुने वैरण बाजार	4.3. 2021	3.11.2021	1780	0	पूर्ण ले.प.वर्ष
60	250641561114	प्रकाश लाईट हाऊस	4.3.2021	3.3.2022	3270	0	पूर्ण ले.प.वर्ष
61	250641561181	वार्ड नं. 26 शिवाजीनगर	4.3. 2021	3.11.2021	1710	0	पूर्ण ले.प.वर्ष
62	250653476783	जय शिवराय युवक मंडळ संत मळा	4.3.2021	4.2.2022	56600	0	पूर्ण ले.प.वर्ष
63	250641560525	पोतदार हॉस्पिटल फुले पुतळ्याजवळ	4.3. 2021	3.3.2022	3250	0	पूर्ण ले.प.वर्ष
64	250641560258	महादेव नगर यशोदीप उद्यान	4.3.2021	4.3.2022	2720	0	पूर्ण ले.प.वर्ष
65	250648724477	प्र.क्र.19 अष्टविनायक कॉलनी	1.3. 2021	1.3.2022	3054	0	पूर्ण ले.प.वर्ष
66	250653498361	मधुबन हौसिंग सोसायटी	1.11.2021	1.3.2022	1470	0	पूर्ण ले.प.वर्ष
				एकूण	**419677**		

3)सदरचे लेखापरीक्षण हे चाचणी लेखापरीक्षण असलेने पूर्ण लेखापरीक्षण वर्षातील देयकांची पडताळणी करून उपरोक्तप्रमाणे विनावापर असलेल्या जोडण्या बंद करून नाहकचा खर्च थांबवणे आवश्यक आहे.

वरील त्रुटी पुर्तेतेअभावी रक्कम रु. 419677 वसूल होणे आवश्यक आहे.

DATRVPF8701 (Ref No : 34, Hmm No : 114)

32 इचलकरंजी शहर भुयारी गटर योजने अंतर्गत बी झोन ट्रंक मेन मधील भुयारी गटर देखभाल दुरुस्ती करणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	40558.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी सन 2020-21 ते 21-22 चे लेखापरीक्षणात भुयारी गटर योजने अंतर्गत बी झोन ट्रंक मेन मधील भुयारी गटर देखभाल दुरुस्ती करणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची पडताळणी केली असता त्यामध्ये पुढीलप्रमाणे उणिवा आहेत.

कामाचे नाव -	इचलकरंजी शहर भुयारी गटर योजने अंतर्गत बी झोन ट्रंक मेन मधील भुयारी गटर देखभाल दुरुस्ती करणे
लेखाशिर्ष/निधीचा प्रकार -	नगर पालिका निधी
अंदाजपत्रकीय रक्कम -	997290
डीएसआर वर्ष/करारनामा दि. -	MJP DSR 2018-19
प्रशासकीय मान्यता -	स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 244 दिनांक 28.1.2019
तांत्रिक मान्यता -	उपलब्ध नाही.
निविदा रक्कम -	997290+8.50% जादा दर
मंजूर निविदा रक्कम -	वाटाघाटीअंती 8.50% जादा दराने मंजूर
मक्तेदाराचे नांव -	मौलाली बंदगीसाब बागवान
कामाचे आदेश -	दि.19/07/2020
काम सुरु दिनांक -	दि.04/01/2019
काम पूर्ण दिनांक -	दि. 01/09/2021
कामाची मुदत -	1 वर्ष
मोजमाप पुस्तक क्रमांक -	क्रमांक 377, 379
खर्च तपशिल -	RA-I = 708207 RA-II FINAL =352798 (प्र.क्रमांक 546-676/31.03.2022) **TOTAL =1061005**

1)महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त कामाबाबत रुपये 100 चे मुद्रांक पेपर वर करार करण्यात आला आहे. तरी उर्वरित रुपये 400 वसूल करून भरणा करावे.

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या

मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. असे असताना खालील बाबीचे परिमाणामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते.

Item no.	**Qty.as per Estimate**	**Qty as per MB**	**Given Rate per unit**	**कमी खर्च रुपये**	**जादा रक्कम रुपये**
1-Prov.ISI std RCC class NP II 250 MM pipe	30 M	70 M	402	0	16080
Labour section				0	0
1.Excavation in hard rmurum boulders	80.30 CuM	367.27 CuM	192.50	0	55241.72
2. Refilling of the trenches	191.46CuM	304.41CuM	69.30		7827.43
			एकूण	**0**	**79149.15**

3)वरील कामांमध्ये 1% विमा कपात करणे आवश्यक असता 0.50% विमा कपात केला आहे. सबब दोन्ही देयकातील कमी कपात विमा रक्कम रु. 5932 शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4)निविदा नस्ती मधील पान क्र. 89 नुसार सदर कामासाठी शे. 8.50% ही सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झाली असून नस्ती मधील पान क्र. 90 वरील श्री बागवान यांचे पत्रानुसार वाटाघाटी अंती सदर काम शे. 5% जादा दरात करण्यास तयारी दर्शवली आहे. तरी मक्तेदारास कामाच्या देयकामधून 5% जादा दर देणे आवश्यक असता 8.50% जादा दर दिलेने र. रु. 30558.88 व त्यावरील 12% GST TDS र. रु. 3667.06 असे एकूण र. रु. 34226रु. जादा प्रदान झाले आहे. तरी सदर रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

1) मक्तेदारासोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र.4 नुसार स्ट्रीट लाईट दुरुस्तीसाठी मक्तेदाराचे कर्मचारी/कामाचा आवश्यक शासकीय विमा मक्तेदाराने उतरवायचा आहे. असा विमा न उतरवल्यास रनिंग बिल क्र.1 मधून अंदाजपत्रकाच्या 1% रक्कम वसूल केली जाईल. त्यानुसार मूळ कामाचा विमा उतरविला आहे. याची मुदत 11.06.2019 पर्यंत आहे. परंतु सदर मक्तेदारास मुदत संपलेनंतर पुढील वर्षासाठी वाढीव कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. सदर वाढीव कामाचा विमा नस्तीस उपलब्ध झाला नाही. तसेच नस्तीस उपलब्ध असलेल्या रनिंग बिल क्र.1 मधील तपशील पाहता कामाचे अंदाजपत्रकाचे 1% प्रमाणे विमा रक्कम रु.54839 कपात केलेली नाही. तरी विमा रकम रु.54839 वसूल करून शासन खाती भरणा करावी.

2) प्रतिज्ञापत्र- महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रं. सीएटी/2018/प्रक्र 127/इमा-2 मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये कंत्राटदारानी ई निविदेसोबत अपलोड केलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ठ 1) रुपये 500/- च्या स्टँप पेपरवर लिफाफा क्र. 1 मध्ये जोडणे आवश्यक आहे. परंतु असे प्रतिज्ञापत्र जोडण्यात आलेले नाही. तथापि उपरोक्त कामाचे तीनही निविदाधारकाचे रुपये 500/- प्रमाणे रुपये 1500 वसूल करून भरणा करावे.

3) ई-निविदा प्रक्रियेतील सुधारित सूचनांबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय, क्रमांक:सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दिनांक 27 सप्टेंबर, 2018 मधील मुद्दा क्रमांक 4.6.2 अन्वये प्राप्त निम्नतम **निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 10% पर्यंत कमी दरांचा (1% ते 10%)** असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या 1% एवढ्या किमतीची बँकेची प्रतिपूर्ती हमी/तेवढ्या रकमेचा Demand Draft परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून सादर करावी. सुधारणा परिपत्रक दिनांक 26 नोव्हेंबर, 2018 नुसार लिफाफा क्रमांक 1 व लिफाफा क्रमांक 2 उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L-1 निविदाकाराने अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional performance security deposit) आठ दिवसाच्या आत संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा करण्याबाबतच्या अटीचा समावेश निविदांमध्ये करून पुढील कार्यवाही करावी. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथिलक्षम असणार नाही.

त्यानुसार उपरोक्त निविदा 20.01% कमी दराने मंजूर केली असल्याने उक्त नियमाप्रमाणे निविदाधीन रक्कम रु. 5483870 च्या 1% रक्कम रुपये 54839 चा Demand Draft परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून सादर केलेली नाही.

<u>MB व अंदाजपत्रक अभिप्राय</u>

4) सदर कामामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत विभाग) दरसूची 2018-19 चा वापर करण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत विभाग) दरसूची 2018-19 चा वापर करून सदर कामाचे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. अंदाजपत्रकातील काही बाबींचे दर मार्केट रेट नुसार घेण्यात आले आहेत. परंतु सदर बाबींचे दर CSR मध्ये उपलब्ध असताना मार्केट रेट नुसार दर निश्चित करून देण्यात आले आहेत. तसेच या

बाबींचे तपशील न घेता मोघम स्वरुपात बाब निश्चित केली आहे. त्यामुळे CSR मधील नेमका दर घेता येत नाही. तथापि मार्केट रेट नुसार घेणेत आलेले हे दर CSR पेक्षा अधिक असणेची शक्यता नाकारता येत नाही.

5) कामाचे फोटो- निविदा करारातील अट क्र.24 नुसार प्रस्तावित काम सुरु करणेपूर्वीचे फोटो व व काम पूर्ण झालेनंतरचे फोटो काढून मक्तेदाराने जमा नगरपरिषदेकडे जमा करणे बंधनकारक राहील. परंतु उपरोक्तपैकी काही कामांचे वगळता इतर कामांची छायाचित्रे मोजमाप पुस्तिकेस उपलब्ध नाहीत.

6) GST परतावा- वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 कलम 76 नुसार कोणतीही अदायगी ज्यामध्ये GST कराचा समावेश करून अदा करण्यात आली असेल अशा अदायगी बाबत अदाकार्त्याने ज्यांस असे देयक अदा करण्यात आले आहे. याबाबत पुढील महिन्याच्या 10 तारखेपर्यंत अथवा पुढील देयक अदा करण्यापूर्वी आधी अदा केलेल्या देयकाचा संबधिताने मागील कराचा परतावा (प्रमाणपत्र GSTR किंवा GSTR 3B) कर दायित्व अदा केलेबाबत सादर करणे बंधनकारक आहे, परंतु उक्त कामामध्ये असे प्रमाणपत्र कंत्राटदाराकडून घेण्यात आलेले नाही. तथापि उक्त देयकांतून अदा केलेली 12% GST ची एकूण रक्कम लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही.

7) कामाची पाहणी- स्थायी निर्देश क्र.37 -नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील आदेश क्रमांक नपप्रस- 1005/ विकास कामे/43/05 दि.03/01/2006 नुसार नगरपरिषदेच्या विकास कामांची गुणवत्ता/दर्जा चांगला राहील याबाबत मुख्याधिकारी पूर्णपणे जबाबदार असतील. त्याबरोबरच आदेश क्रमांक 7 नुसार नगरपरिषद क्षेत्रात होणाऱ्या प्रत्येक विकास कामाचे देयक अदा करणेपूर्वी मुख्याधिकारी यांनी झालेल्या कामाचे स्थळ निरीक्षण करावे. मुख्याधिकारी यांनी तपासणी करण्यापूर्वी वरिष्ठ तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत कामाची तपासणी झाली आहे किंवा नाही याची खात्री करावी. यानंतर मोजणी पुस्तकात घेतलेल्या मोजणी बाबत स्वतः स्थळ निरीक्षण करून आपल्या समोर कमीत कमी 10% बाबींची तपासणी करून घ्यावी. आदेश क्रमांक 8 नुसार कामाची तपासणी करतेवेळी लोकप्रतिनिधी शक्य असल्यास प्रभागातील नागरिक यांना आमंत्रित करावे/सोबत ठेवावे. आदेश क्रमांक 9 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याने कामाची मोजमापे घेतलेल्या स्वाक्षरी व दिनांकाची स्पष्ट नोंद मोजमाप पुस्तकात करावी.त्याचप्रमाणे सोबत असलेले लोकप्रतिनिधी/नागरिक यांची स्वाक्षरी सुद्धा घेण्यात यावी. सदर दिनांक असलेशिवाय लेखा विभागाने देयक अदा करून नये. परंतु उपरोक्तप्रमाणे कामाचे निरीक्षण, मोजणी, नागरिक स्वाक्षरी व इतर बाबींची कार्यवाही झालेली नसताना देयकाचे प्रदान करण्यात आले आहे.

8) सदर कामातील दुरुस्ती अंतर्गत जुने साहित्य काढून नवे साहित्य वापरण्यात आलेचे मोजमाप नोंदवहीवरून दिसून येते. परंतु साठा रजिस्टर उपलब्ध न झालेने सदर साहित्याच्या नोंदी साठा रजिस्टर ला घेतलेबाबत पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अनुपालन सादर करावे.

DATRDMF8501 (Ref No : 19, Hmm No : 146)

41 लो.शा.आ.भा.साठे ना.वस्ती०योजनेतून प्र .क्र.17 सा.नं.102 वसाहतीमधील मुख्य रस्ते व जवळपासचे जोड रस्त्यांना इलेक्ट्रिक पोल व हायमास्ट बसविणे कामातील उणिवाबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	3000.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	453954.00/-

नगरपरिषद इचलकरंजीकडील सन 2020-21-22 चे लेखापरीक्षणात विद्युत विभागाकडील लो.शा.आ.भा.साठे

ना.वस्तीर योजनेतून **प्र.क्र.17 सा.नं.102 वसाहतीमधील मुख्य रस्ते व जवळपासचे जोड रस्त्यांना इलेक्ट्रिक पोल व हायमास्ट बसविणे** नस्तीची पडताळणी केली असता त्यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे-

अ . क्र .	**तपशील**	**निरीक्षण**
1	कामाचे नाव	प्र.क्र.17 सा.नं.102 वसाहतीमधील मुख्य रस्ते व जवळपासचे जोड रस्त्यांना इलेक्ट्रिक पोल व हायमास्ट बसविणे
2	निधी / योजनेचे नाव	लो.शा.आ.भा.साठे ना.वस्zwj;ती योजना
3	निविदा / काम वाटप तपशिल	ई-निविदा 2020_DMA_591968_1
4	अंदाजपत्रकीय रक्कम	4945560
5	प्रशासकीय मंजुरी रक्कम व क्रमांक	मा.जिल्हाधिकारी कार्यालय को.न.प.प्रशां.विभाग आदेश क्रमांक कार्य/1/नपा/आरआर/73/क/2020 दि.25.02.2020 रक्कम रु.4945560/-
6	तांत्रिक मंजूर रक्कम व दिनांक	कार्यकारी अभियंता मजीप्रा कोल्हापूर यांचे जापक्र/रेशा/तांमं(यां) इचलकरंजी/293/2020 दि.23.02.2020
7	प्रथम निविदा जाहिरात	दैनिक राष्ट्रगीत व दैनिक महासत्ता दि.14.05.2020
8	प्रथम निविदेस प्राप्त निविदा	एक
9	फेरनिविदेस प्राप्त निविदा	1) अभिजित एजन्सीज,अकलूज 2) SGA इले.नाशिक 3) ओंकार इले.नाशिक 4) मार्तंड एंटरप्रायजेस नाशिक 5) राजसन इले.नाशिक 6) गणेश इले.पुणे
10	मंजूर निविदा रक्कम	अंदाजपत्रकापेक्षा 19.19% कमी दराने
11	मंजूर कंत्राटदाराचे नाव	अभिजित एजन्सीज, अकलूज
12	कार्यारंभ आदेश	नगरपरिषद इचलकरंजी जा.क्र.इ.न.प./विद्युत/216/2020 दि.09.12.2020
13	काम पूर्ण दिनांक	दि.12.07.2021
14	त्रयस्थ ले.प अहवाल-	शासकीय तंत्रनिकेतन,,कोल्हापूर यांचे जा.क्र.शांतनिको/विद्युत/2020/2227 दिनांक 14.07.2021

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

1) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक: सीएटी/2017/प्रक्र 08/इमा-2 दिनांक 27 सप्टेंबर, 2018 मधील आदेश क्रमांक 4.6.2 नुसार प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 10% पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या 1% एवढ्या किमतीची बँक प्रतिपूर्ती हमी/तेवढ्या रकमेचा DEMAND DRAFT परफॉर्मन्स सिक्युरिटी सादर करावी. तसेच सदर शासन निर्णयातील तरतुदीवर

स्पष्टीकरण करणारे शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/2017/प्रक्र 08/इमा-2 दिनांक 26 नोव्हेंबर, 2018 नुसार लिफाफा क्र.1 व लिफाफा क्र.2 उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L-1 निविदाकाराने Additional Performance Security Deposit आठ दिवसाच्या आत संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे जमा करण्याबाबतच्या अटीचा समावेश यापुढील निविदांमध्ये करण्यात यावा व निविदेबाबत पुढील कार्यवाही करावी.ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणास्तव शिथिल करण्यात येऊ नये.

परंतु उक्त कामाचे बाबत निविदाकार अभिजित एजन्सीज यांनी उक्त शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे (10% पर्यंत कमी दरासाठी 1%) +(15 % पर्यंत कमी दरासाठी 15-10=5%)+(19.19% पर्यंत कमी दरासाठी 19.19-15=4.19% करिता 4.19x2%=8.38%) असे अंदाजपत्रकीय रक्कम रु. 4945560 च्या एकूण (1+5+8.38)=14.38 % प्रमाणे रु.711171 रकमेचा DD सादर केलेला नाही. तरीही मक्तेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

2) **प्रतिज्ञापत्राबाबत**- महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रं. सीएटी/2018/प्रक्र 127/इमा-2 मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये कंत्राटदारानी ई निविदेसोबत अपलोड केलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ठ 1) रुपये 500/- च्या स्टँप पेपरवर लिफाफा क्र.1 मध्ये जोडणे आवश्यक आहे. परंतु असे प्रतिज्ञापत्र जोडण्यात आलेले नाही. तथापि उपरोक्त कामातील सहा निविदाधारकांचे प्रत्येकी रुपये 500/-प्रमाणे रु.3000 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. तरी सदर रक्कम रु.3000 वसूलपात्र करणेत येत आहे.

3) **निविदा प्रसिद्धी**- महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक सीएटी / 2017/प क्र08 / इमा-2 मंत्रालय, मुंबई 400 032. दिनांक 27/09/2018 प्रकरण 2.1.1 नुसार रु.3 लाख ते रु.50 लाख किंमतीच्या कामाची जाहिरात जिल्हा स्तरावरील एका मराठी वृत्तपत्रात आणि राज्यस्तरावरील एक मराठी व एक इंग्रजी वृत्तपत्रात देणे बंधनकारक आहे. परंतु सदर कामाची निविदा स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिलेने निविदेस व्यापक प्रसिद्धी मिळालेली नाही. परिणामी प्रथम वेळेस एकच निविदा प्राप्त झालेचे दिसून येते. तसेच फेरनिविदेचेवेळी कोविड-19 मुळे जाहिरात प्रसिद्धी करता आली नसलेचे नमूद आहे. तरीही या फेरनिविदेस 6 निविदाकारांनी निविदा भरली आहे. सदर बाबींमध्ये विरोधाभास दिसून येतो.

4) **GST परतावा**- वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 कलम 76 नुसार कोणतीही अदायगी ज्यामध्ये GST कराचा समावेश करून अदा करण्यात आली असेल अशा अदायगी बाबत अदाकार्त्याने ज्यांस असे देयक अदा करण्यात आले आहे. याबाबत पुढील महिन्याच्या 10 तारखेपर्यंत अथवा पुढील देयक अदा करण्यापूर्वी आधी अदा केलेल्या देयकाचा संबधिताने मागील कराचा परतावा (प्रमाणपत्र GSTR किंवा GSTR 3B) कर दायित्व अदा केलेबाबत सादर करणे बंधनकारक आहे, परंतु उक्त कामांमध्ये असे प्रमाणपत्र कंत्राटदाराकडून घेण्यात आलेले नाही. तरी पुढील तक्त्याप्रमाणे अदा केलेली GST रक्कम रुपये **453954** वसूल करून शासन खाती भरणा करावी.

देयक तपशील	**प्रमाणक क्र./दिनांक = रक्कम**	**अदा केलेली GST रक्कम रु.**
RA-1	38/31.3.2021=1480428	158617
RA-IInd Final	6/4.8.2021=2756479	295337
	एकूण	**453954**

5) **ISI साहित्य वापर नाही** - उपरोक्त कामाकरिता वापरण्यात आलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग(विद्युत) कडील CSR 2018-19 वर आधारित 2019-20 दर देण्यात आले आहेत. त्यामधील General Note क्रमांक 3 नुसार कामामध्ये ISI मार्क असलेले साहित्य वापरणे बंधन कारक आहे परंतु ISI मार्क साहित्य वापरलेबाबत लेखे उपलब्ध नाहीत.

6) **साहित्याची चाचणी**- CSR 2018-29 मधील General Note क्रमांक 4 नुसार कामाकरिता वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी केलेली नाही. तथापि योग्य दर्जाचे साहित्य वापरलेबाबत पडताळणी करता येत नाही.

7) **काम पूर्णतेचा दाखला**- न.प.लेखासंहिता 2011 नियम 139 प्रमाणे नगरअभियंत्याने नियम 210 मध्ये विहित केल्यानुसार नमुना 62 मध्ये पूर्णतेचा अहवाल सादर करील किंवा तसे प्रमाणपत्र देईल. परंतु प्रमाणकांस संलग्न असलेल्या काम पूर्णत्वाच्या दाखल्यावर नगरअभियंता यांनी साक्षांकन केलेले नाही तसेच काम पूर्णतेचा अहवाल देऊन तसे प्रमाणीकरण केलेले नाही.

8) कामाचे निरीक्षण- स्थायी निर्देश क्र.37 -नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील आदेश क्रमांक नपप्रस- 1005/ विकास कामे/43/05 दि.03/01/2006 नुसार नगरपरिषदेच्या विकास कामांची गुणवत्ता/दर्जा चांगला राहणेची जबाबदारी तसेच आदेश क्रमांक 7 नुसार नगरपरिषद क्षेत्रात होणाऱ्या प्रत्येक विकास कामाचे देयक अदा करणेपूर्वी मुख्याधिकारी यांनी झालेल्या कामाचे स्थळ निरीक्षण करणे यावर कार्यवाही दिसून येत नाही. मुख्याधिकारी यांनी तपासणी करण्यापूर्वी वरिष्ठ तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत कामाची तपासणी झाली आहे किंवा नाही याची खात्री करावी. यानंतर मोजणी पुस्तकात घेतलेल्या मोजणी बाबत स्वतः स्थळ निरीक्षण करून आपल्या समोर कमीत कमी 10% बाबींची तपासणी करून घ्यावी. आदेश क्रमांक 8 नुसार कामाची तपासणी करतेवेळी लोकप्रतिनिधी शक्य असल्यास प्रभागातील नागरिक यांना आमंत्रित करावे/सोबत ठेवावे. आदेश क्रमांक 9 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याने कामाची मोजमापे घेतलेल्या स्वाक्षरी व दिनांकाची स्पष्ट नोंद मोजमाप पुस्तकात करावी.त्याचप्रमाणे सोबत असलेले लोकप्रतिनिधी/नागरिक यांची स्वाक्षरी सुद्धा घेण्यात यावी.सदर दिनांक असलेशिवाय लेखा विभागाने देयक अदा करू नये.

परंतु उपरोक्तप्रमाणे कामाचे निरीक्षण, मोजणी, नागरिक स्वाक्षरी व इतर बाबींची कार्यवाही झालेचे दिसून येत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अनुपालन सादर करावे.

DATRDMF8501 (Ref No : 20, Hmm No : 147)

42 महादेव मंदिर (गावभाग) समोर हायमास्ट उभा करून लाईटची व्यवस्था करणे कामातील उणिवाबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 26227.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजीकडील सन 2020-21-22 चे लेखापरीक्षणात विद्युत विभागाकडील इलेक्ट्रिक फिक्चर्स लेखाशिर्षांतर्गत नस्तींची पडताळणी केली असता त्याचा तपशील पुढीलप्रमाणे--

अ . क्र .	तपशील	निरीक्षण
1	कामाचे नाव	महादेव मंदिर (गावभाग) समोर हायमास्ट उभा करून लाईटची व्यवस्था करणे कामातील उणिवाबाबत
2	निधी / योजनेचे नाव	नगरपरिषद निधी

3	निविदा / काम वाटप तपशिल	ई-निविदा
4	अंदाजपत्रकीय रक्कम	461215
5	मंजूर मक्तेदार	गडगे इलेक्ट्रिकल,इचलकरंजी

खर्च तपशील-

प्र.क्र./दिनांक	**रक्कम रु.**	**देयक**
384/27.03.2019	231721	RA-I
363/28.03.2022	42695	RA-II
एकूण	**274416**	

त्यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे-

1) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार ldquo;कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपर्यंत रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक असताना रु.100 चे मुद्रांक घेतलेने उर्वरित रु.400 चे मुद्रांक शुल्क वसूल करून भरणा करावे.

2) कामातील बाब क्रमांक 2 (DSR 2013-14 NO.16-3-11) providing and casting M-20 CC foundation suitable for 12.5 m raising lowering high mast considering the safe etc. चा basic rate 32796 असून वाढीव 5% दराने एकूण 34436 दर देय ठरतो. सदर बाब हे foundation चे काम असलेने एका पोल साठी 1च करणे क्रमप्राप्त ठरते.परंतु RA-1 मध्ये 1 परिमाण व RA-II मध्ये 0.75 परिमाणाचे काम दर्शविण्यात आले आहे.

RA-1 ची पडताळणी केली असता उक्त बाबीतील क्रमांक 2 चे FOUNDATION चे काम व 12.5 मी.हायमास्ट बसवणे संबंधी सर्व अनुषंगिक काम पूर्ण झालेचे दिसून येते. मोजमाप नोंदवहीनुसार मोजमापाचा दिनांक 20.02.2019 आहे. असे असताना RA-II मध्ये लगेचच पुढील दिनांकास 21.02.2019, 0.75 परिमाणाचे FOUNDATION कामकाज केलेचे दिसून येते. एकदा FOUNDATION व अनुषंगिक कामे झालेनंतर पुन्हा FOUNDATION कामाचा प्रश्नच उद्भवत नाही. तथापि RA-II मधून सदर बाबीकरिता अदा केलेली रक्कम रु.25827 लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करणेतयेत आहे.

बाब क्रमांक - तपशील	**RA-II**	**दर प्रति युनिट**	**एकूण अदा रक्कम**
2-M-20 CC FOUNDATION	0.75	34436	25827

3) **GST परतावा** - वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 कलम 76 नुसार कोणतीही अदायगी ज्यामध्ये GST कराचा समावेश करून अदा करण्यात आली असेल अशा अदायगी बाबत अदाकार्त्याने ज्यांस असे देयक अदा करण्यात आले आहे. याबाबत पुढील महिन्याच्या 10 तारखेपर्यंत अथवा पुढील देयक अदा करण्यापूर्वी आधी अदा केलेल्या देयकाचा संबधिताने मागील कराचा परतावा (प्रमाणपत्र GSTR किंवा GSTR 3B) कर दायित्व अदा केलेबाबत सादर करणे बंधनकारक आहे, परंतु उक्त कामामध्ये असे प्रमाणपत्र कंत्राटदाराकडून घेण्यात आलेले नाही. तथापि RA-II देयकातून अदा केलेली 12% GST ची एकूण रक्कम रु.854 लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अनुपालन सादर करावे.

DATRDMF8501 (Ref No : 21, Hmm No : 148)

43 'प्रासंगिक कामे/कार्यक्रमाकरिता रोषणाई,ध्वनी यंत्रणा करणे व इतर व्यवस्था आणि स्ट्रीट लाईट दुरुस्ती (EESL अंतर्गत नसलेली) कामे करणे' निविदा प्रक्रिया व देयकातील उणिवाबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	18275.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजीकडील सन 2020-21-22 चे लेखापरीक्षणात विद्युत विभागाकडील प्रासंगिक विद्युत कामासंबंधी निविदा नस्ती व प्रमाणकानुसार तपशील पुढीलप्रमाणे --

अ . क्र .	तपशील	निरीक्षण
1	कामाचे नाव	प्रासंगिक कामे/कार्यक्रमाकरिता रोषणाई,ध्वनी यंत्रणा करणे व इतर व्यवस्था आणि स्ट्रीट लाईट दुरुस्ती (EESL अंतर्गत नसलेली) कामे करणे
2	निधी / योजनेचे नाव	नगरपरिषद निधी
3	निविदा / काम वाटप तपशिल	ई-निविदा
4	अंदाजपत्रकीय रक्कम	2480657
5	तांत्रिक मंजुरी	नगरअभियंता, नगरपरिषद इचलकरंजी
6	प्रशासकीय मंजुरी रक्कम व क्रमांक	स्थायी समिती ठराव क्रमांक 55 दि.09.02.2021
7	निविदा रक्कम	अंदाजपत्रकापेक्षा 9.9% कमी दराने रु.2235071.96
	कमी दाराची निविदा असलेने मान्यता	स्थायी सभा क्र.4 ठराव क्रमांक 55 दिनांक 09.02.2021
8	निविदा मंजूर कंत्राटदाराचे नाव	आरती इलेक्ट्रिकल,इचलकरंजी
9	मुदत	1 वर्ष
10	कार्यारंभ आदेश	नगरपरिषद इचलकरंजी जा.क्र.इ.न.प./विद्युत/145/1/2021 दि.01.04.2021

11	काम पूर्ण	दि.30.04.2022
12	मोजमाप पुस्तिका क्रमांक	01/2021-22

सदर कामावर पुढील प्रमाणकान्वये खर्च दिसून येतो.

प्रमाणक क्र./दिनांक	**रक्कम रु.**	**WORK PORTION**	**अदा केलेली 12% GST रक्कम**	**देयक तपशील**	**मक्तेदार**
208/27.01.2022	875436	867524	93797	RA-1	आरती इलेक्ट्रिकल, इचलकरंजी
152/17.03.2022	580417	575171	62187	RA-2	
644/727-31.03.2022	388181	346589	41590	RA-3	
694/775-31.03.2022	245301	219019	26282	RA-4	
एकूण	**2089335**		**223856**		

उक्त निविदा नस्ती व प्रमाणकांची पडताळणी केली असता त्यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे-

निविदा प्रक्रियेतील उणिवा-

1) प्रतिज्ञापत्र- महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रं. सीएटी/2018/प्रक्र 127/इमा-2 मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये कंत्राटदारानी ई निविदेसोबत अपलोड केलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट 1) रुपये 500/- च्या स्टँप पेपरवर लिफाफा क्रं. 1 मध्ये जोडणे आवश्यक आहे. परंतु असे प्रतिज्ञापत्र जोडण्यात आलेले नाही. तथापि उपरोक्त कामाचे एकाकी निविदाधारकाचे रुपये 500/- वसूल करून भरणा करावे.

2) ई-निविदा प्रक्रियेतील सुधारित सूचनांबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक:सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दिनांक 27 सप्टेंबर, 2018 मधील मुद्दा क्रमांक 1.1 नुसार रुपये 3 लक्ष ते रुपये 50 लक्ष किमतीच्या कामांची प्रसिद्धी एका मराठी जिल्हास्तरीय वृत्तपत्र आणि एका मराठी व एक इंग्रजी राज्यस्तरीय वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धी देणे आवश्यक आहे. परंतु सदर नस्तीवरून कामाची जाहिरात सदर कामाची जाहिरात दैनिक राष्ट्रगीत व दैनिक महासत्ता या स्थानिक वृत्तपत्रात देण्यात आलेचे दिसून येते. त्यामुळे निविदेस निविदेस व्यापक प्रसिद्धी मिळालेली नाही. परिणामी दोन वेळेस निविदा मागवूनही एकच निविदा प्राप्त झाली आहे.

3) ई-निविदा प्रक्रियेतील सुधारित सूचनांबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय, क्रमांक:सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दिनांक 27 सप्टेंबर, 2018 मधील मुद्दा क्रमांक 4.6.2 अन्वये प्राप्त निम्नतम **निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 10% पर्यंत कमी दरांचा (1% ते 10%)** असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या 1% एवढ्या किमतीची बँकेची प्रतिपूर्ती हमी/तेवढ्या रकमेचा Demand Draft परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून सादर करावी.

सदर दिनांक 27 सप्टेंबर,2018 च्या शासन निर्णयातील तरतुदींवर स्पष्टीकरणाबाबत शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2, दिनांक 26 नोव्हेंबर, 2018 नुसार लिफाफा क्रमांक 1 व लिफाफा क्रमांक 2

उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या L-1 निविदाकाराने अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional performance security deposit) आठ दिवसाच्या आत संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडे जमा करण्याबाबतच्या अटीचा समावेश निविदांमध्ये करून पुढील कार्यवाही करावी. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथिलक्षम असणार नाही.

त्यानुसार उपरोक्त निविदा 9.90% कमी दराने मंजूर केली असल्याने उक्त नियमाप्रमाणे निविदाधीन रक्कम रु. 2480657 च्या 1% रक्कम रुपये 24806 चा Demand Draft परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून सादर केलेली नाही.

<u>MB व अंदाजपत्रक अभिप्राय</u>

4) सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत विभाग) दरसूची 2018-19 चा वापर कौन सदर कामाचे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. अंदाजपत्रकातील काही बाबींचे दर मार्केट रेट नुसार घेण्यात आले आहेत. परंतु सदर बाबींचे दर CSR मध्ये उपलब्ध असताना मार्केट रेट नुसार दर निश्चित करून देण्यात आले आहेत. तसेच या बाबींचे तपशील न घेता मोघम स्वरुपात बाब निश्चित केली आहे. त्यामुळे CSR मधील नेमका दर घेता येत नाही. तथापि मार्केट रेट नुसार घेणेत आलेले हे दर CSR पेक्षा अधिक असणेची शक्यता नाकारता येत नाही.

5) RA-3 व RA-4 मधून मीटरपेटी,फळी,अर्थिंग अंतर्गत बाब क्रमांक 9 मध्ये 63x500 मेन स्वीच पुरवठा करून जोडणेrsquo; या अनुक्रमे एक-एक बाबीचे रु.2685.90 प्रमाणे देयक अदा केले आहेत. परंतु सदर बाब ही अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेतील abstract नुसार नमूद केलेल्या पानावर नोंद नाही. तथापि सदर बाब ही प्रत्यक्ष मोजमापात अंतर्भूत नाही. तथापि सदर बाबीवरील एकूण खर्च रक्कम रु.5372 लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही.

6) कामाचे फोटो- निविदा करारातील अट क्र.24 नुसार प्रस्तावित काम सुरु करणेपूर्वीचे फोटो व व काम पूर्ण झालेनंतरचे फोटो काढून मक्तेदाराने जमा नगरपरिषदेकडे जमा करणे बंधनकारक राहील. परंतु उपरोक्तपैकी काही कामांचे वगळता इतर कामांची छायाचित्रे मोजमाप पुस्तिकेस उपलब्ध नाहीत.

7) उक्त कामाकरिता वापरण्यात आलेल्या CSR 2018-19 च्या General Notes च्या बाब क्रमांक 11 नुसार कामाचा विमा काढणे बंधनकारक आहे. आणि मक्तेदाराने विमा पॉलिसी सादर न केल्यास निविदा रकमेच्या 1% रक्कम पहिल्या देयकातून वसूल करावे. परंतु मक्तेदाराने विमा कागदपत्रे सादर केलेली नसताना त्यांचे बिलातून 1% प्रमाणे रु.24806 वसूल करणे आवश्यक असताना केवळ रु.12403 रक्कम दुसरे देयकातून वसूल केलेली आहे. तरी उर्वरित रक्कम रु.12403 वसूल करून संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करावी.

8) GST परतावा- वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 कलम 76 नुसार कोणतीही अदायगी ज्यामध्ये GST कराचा समावेश करून अदा करण्यात आली असेल अशा अदायगी बाबत अदाकार्त्याने ज्यांस असे देयक अदा करण्यात आले आहे. याबाबत पुढील महिन्याच्या 10 तारखेपर्यंत अथवा पुढील देयक अदा करण्यापूर्वी आधी अदा केलेल्या देयकाचा संबधिताने मागील कराचा परतावा (प्रमाणपत्र GSTR किंवा GSTR 3B) कर दायित्व अदा केलेबाबत सादर करणे बंधनकारक आहे, परंतु उक्त कामामध्ये असे प्रमाणपत्र कंत्राटदाराकडून घेण्यात आलेले नाही. तथापि उक्त देयकांतून अदा केलेली 12% GST ची एकूण रक्कम रु.223856 लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही.

9) कामाची पाहणी- स्थायी निर्देश क्र.37 -नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील आदेश क्रमांक नपप्रस- 1005/ विकास कामे/43/05 दि.03/01/2006 नुसार नगरपरिषदेच्या विकास कामांची गुणवत्ता/दर्जा चांगला राहील याबाबत मुख्याधिकारी पूर्णपणे जबाबदार असतील. त्याबरोबरच आदेश क्रमांक 7 नुसार नगरपरिषद क्षेत्रात होणाऱ्या प्रत्येक विकास कामाचे देयक अदा करणेपूर्वी मुख्याधिकारी यांनी झालेल्या कामाचे

स्थळ निरीक्षण करावे. मुख्याधिकारी यांनी तपासणी करण्यापूर्वी वरिष्ठ तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत कामाची तपासणी झाली आहे किंवा नाही याची खात्री करावी. यानंतर मोजणी पुस्तकात घेतलेल्या मोजणी बाबत स्वतः स्थळ निरीक्षण करून आपल्या समोर कमीत कमी 10% बाबींची तपासणी करून घ्यावी. आदेश क्रमांक 8 नुसार कामाची तपासणी करतेवेळी लोकप्रतिनिधी शक्य असल्यास प्रभागातील नागरिक यांना आमंत्रित करावे/सोबत ठेवावे. आदेश क्रमांक 9 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याने कामाची मोजमापे घेतलेल्या स्वाक्षरी व दिनांकाची स्पष्ट नोंद मोजमाप पुस्तकात करावी.त्याचप्रमाणे सोबत असलेले लोकप्रतिनिधी/नागरिक यांची स्वाक्षरी सुद्धा घेण्यात यावी. सदर दिनांक असलेशिवाय लेखा विभागाने देयक अदा करून नये. परंतु उपरोक्तप्रमाणे कामाचे निरीक्षण, मोजणी, नागरिक स्वाक्षरी व इतर बाबींची कार्यवाही झालेली नसताना देयकाचे प्रदान करण्यात आले आहे.

10) सदर कामातील दुरुस्ती अंतर्गत जुने साहित्य काढून नवे साहित्य वापरण्यात आलेचे मोजमाप नोंदवहीवरून दिसून येते. परंतु साठा रजिस्टर उपलब्ध न झालेने सदर साहित्याच्या नोंदी साठा रजिस्टर ला घेतलेबाबत पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अनुपालन सादर करावे.

DATRDMF8501 (Ref No : 22, Hmm No : 149)

44 प्रभाग क्र.1 मधील पाण्याची टाकी शहापूर जवळील नगरपरिषद शाळेमधील खराब झालेले इलेक्ट्रिक वायरिंग बदलणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 8981.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजीचे आर्थिक वर्ष 2020-21-22 लेखापरीक्षण दरम्यान विद्युत विभागाकडील प्रभाग क्र.1 मधील पाण्याची टाकी शहापूर जवळील नगरपरिषद शाळेमधील खराब झालेले इलेक्ट्रिक वायरिंग बदलणे या देयकांचे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा आढळून आल्या.

कामाचे नाव	प्रभाग क्र.1 मधील पाण्याची टाकी शहापूर जवळील नगरपरिषद शाळेमधील खराब झालेले इलेक्ट्रिक वायरिंग बदलणे
अंदाजपत्रकीय रक्कम	60372
निविदा	जाहीर निविदा
प्रशासकीय मान्यता	स्थायी समिती सभा ठराव क्र.142 दि.23.10.2018
मंजूर निविदा	तुषार इलेक्ट्रिकल
कामाचा आदेश	जा.क्र.इ.न.प./विद्युत/ /2018 दि.01.02.2019
काम पूर्ण दिनांक	21.02.2019

कामाची मुदत	60 दिवस
मोजमाप पुस्तक क्र.	3
खर्च तपशील	RA-I=38885 RA-II Final-21196(प्र.क्र.- 416/28.03.2022)

1)नस्तीस जोडलेल्या जाहिरातीचे अवलोकन केले असता जाहिरातीत कामाचा तपशील नमूद नाही. तसेच कामाचा कालावधी, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा फी इत्यादी तपशील नमूद करणेत आलेला नाही. त्यामुळे अधिक तुलनात्मक दराच्या निविदा प्राप्त न झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2)निविदेचे लिफाफे आवक नोंद करून घेण्यात आलेले नाहीत.

3)उपरोक्त कामामध्ये खालीलप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये घेणेत आलेले दर व प्रत्यक्षात DSR मधील दर यात तफावत दिसून येते.

Item	Basic rate (DSR 17-18)	5% non tribal	Total rate	Rate(as per MB)	difference	Qty as per MB	जादा अदा
1-9-16 पॉईट वायरिंग करणे	272	13.6	285.6	356	70.4	43	3027.2
1-9-13 प्लग पॉईट वायरिंग करणे	93	4.65	97.65	116	18.35	8	146.8
2-13-2 1200mm सिलिंग फॅन बसविणे	1476	73.8	1549.8	1975	425.2	3	1275.6
1-8-20 फॅन डीमर बसविणे	214	10.7	224.7	270	45.3	3	135.9
1-6-3 2*2.5mm मेन वायर	118	5.9	123.9	153	29.1	132	3841.2
5-1-3 32*250 मेन स्वीच बसविणे	779	38.95	817.95	1040	222	1	222
5-10-6 16 ॲपियर फ्युज बसविणे	92	4.6	96.6	114	17.4	1	17.4
2-1-10 ट्यूब बसविणे	46	2.3	48.3	62	13.7	23	315.1
						total	8981.2

जादा अदा रक्कम रु.8981.2/- वसूल करण्यात यावी.

4)देयकांमधून शासकीय कपाती करण्यात आल्या असून, सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

5)काम पूर्णत्व दाखल्यावर दिनांक नमूद नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी रक्कम रु.8981/- लेखापरीक्षणामध्ये वसूलपात्र करण्यात येत आहे.

DATRKPF9301 (Ref No : 77, Hmm No : 177)

45 EESL(Energy Efficiency Services Limited) कडून पुरवण्यात आलेल्या एल ई डी दिव्यांच्या जोडणी खर्चाबाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजी च्या सन 2020-2021 व 2021-2022 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणात विद्युत विभागाकडील EESL(Energy Efficiency Services Limited) व नगरपरिषद इचलकरंजी यांच्यातील करारानुसार EESL(Energy Efficiency Services Limited) कडून पुरवण्यात आलेल्या एल ई डी दिव्यांच्या जोडणी खर्चाच्या बिलाच्या प्रमाणकाचे तपशील खालीलप्रमाणे ndash;

अ.क्र.	प्र.क्र./दिनांक	रक्कम	तपशील
1	14/05.10.2020	9124734	फेब्रुवारी 2020 ते जुलै 2020 अखेर 6 महिन्यांचे बिल
2	384/27.11.2020	1520789	ऑगस्ट 2020 चे देयक
3	100/08.03.2021	3041578	सप्टेंबर 2020 ते ऑक्टोंबर 2020 अखेर 2 महिन्याचे बिल
4	106/151/10.02.2022	3041578	एप्रिल 2021 ते मे 2021 अखेर 2 महिन्याचे बिल
5	63/14.02.2022	1520789	नोव्हेंबर 2021 चे देयक
6	64/14.02.2022	3041578	सप्टेंबर 2021 ते ऑक्टोंबर 2021 अखेर 2 महिन्याचे बिल
7	602/31.03.2022	1520789	1 महिन्याचे देयक
	एकूण	22811835	

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे ndash;

1)EESL ने केलेल्या नवीन LED दिव्यांच्या जोडणीनंतर जुन्या बल्ब व इतर साहित्याचे काय केले याबाबत लेखे उपलब्ध झाले नाहीत.

सदर त्रुटीबाबत अनुपालन सादर करावे.

DATRKPF9301 (Ref No : 83, Hmm No : 213)

46 महिला व बालकल्याण विभागांतर्गत मॉंटेसरी मुलांना खेळणी/जीम व्यवस्था योजनेमधून ओपन जीम साहित्य बसविणे कामामधील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	10500.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषदेमधील महिला व बालकल्याण विभागांतर्गत मॉंटेसरी मुलांना खेळणी/जीम व्यवस्था योजनेमधून ओपन जीम साहित्य बसविणे कामामधील देयकांचे लेखापरीक्षण केले असता आढळलेल्या उणिवा निदर्शनास आणून खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

देयकांचा तपशिल :-

अक्र	प्रमाणक क्र. व दिनांक	देयकाची रक्कम	तपशील	मक्तेदाराचे नाव
1	355/31-3-2021	298311	प्रभाग.क्र. 3 सोलगे मळ्यामध्ये ओपन जीम साहित्य बसविणे	सिटी स्पोर्ट्स
2	356/31-3-2021	296499	प्र.क्र.16 नारायण मळा रोड बागडे घराजवळ ओपनस्पेस मध्ये ओपन जीम साहित्य बसविणे	सिटी स्पोर्ट्स
3	357/31-3-2021	296500	प्र.क्र.16 सोलगे मळा शिवमंदिरमागे ओपनस्पेस मध्ये ओपनजीम साहित्य बसविणे	सिटी स्पोर्ट्स
4	358/31-3-2021	296500	आदिनाथ सोसायटी म्हसोबा मंदिर ओपनस्पेस मध्ये ओपनजीम साहित्य बसविणे	सिटी स्पोर्ट्स
5	359/31-3-2021	296500	प्र.क्र.16 कुलकर्णी घराजवळ ओपनस्पेस मध्ये ओपनजीम साहित्य बसविणे	सिटी स्पोर्ट्स
6	360/31-3-2021	298311	प्रभाग.क्र. 3 चिनार सोसायटी येथे ओपन जीम साहित्य बसविणे	सिटी स्पोर्ट्स
7	361/31-3-2021	296500	प्र.क्र.16 दत्त कॉलनी शहापुरे घरासमोर ओपनजीम साहित्य	सिटी स्पोर्ट्स

			बसविणे	

1) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि. 01/12/2016 परिच्छेद क्र.3.2.3 अन्वये मोठे आदेश लहान-लहान आदेशात विभागणी करण्यावर बंधने घालण्यात आले आहेत. या योजनेतील लेखापरिक्षणास प्राप्त एकूण 7 देयकाची रक्कम रुपये 2079121/- एवढी होत आहे. सदर योजनेमध्ये ई-टेंडर प्रक्रिया टाळण्यासाठी लहान-लहान आदेशात विभागणी करण्यात आली आहे.

2) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 2.9.3 अन्वये खरेदी करत असताना खरेदी समिती स्थापन करून त्यांनी वस्तूच्या किमंतीचा वाजवीपणा ठरविणेबाबत परिच्छेद क्र. 3.1.2.2 नुसार बाजारपेठेतील दरांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असून त्यानुसार विहित नमुना परिशिष्ठ 1 मधील विहित नमुन्यात प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.तसेच सदर समितीतील सदस्यांचे दरपत्रक स्वीकृत करण्यासाठी मागविण्यात आलेल्या पुरवठादारांशी कोणतेही संबंध नसल्याचे परिशिष्ट 11 मधील विहीत नमुन्यात प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

3) निविदेचे लिफाफे आवक नोंद करून घेण्यात आलेले नाहीत तसेच निविदा उघडताना समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षऱ्या दिनांकासहित व शेऱ्यासहित लखोट्यावर नमूद नाही.

4) करारनामा अटी व शर्ती क्र 18 नुसार वापरण्यात येणाऱ्या साहित्याची तसेच कामाची प्रतवारी चांगली असलेबाबत योग्य त्या प्रयोगशाळेतून तपासणी करणे आवश्यक आहे परंतु त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

5) करारनामा अटी व शर्ती क्र 22 नुसार सदर काम सुरु करणेपुर्वी कामाचे ठिकाण, कामाचे मंजूर एस्टीमेट, मंजूर मक्तेदाराचे नाव, काम सुरु तारीख, योजनेचे नाव इत्यादी बाबीचा फलक लावणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

6) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 3.1.2.1 नुसार निवीदा रू.500000/- पर्यंतच्या निवीदेस रू.1000 इतकी निवीदा शुल्क घेणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त नमूद 7 कामांच्या देयकांच्या प्रत्येक नस्तीस निवीदाधारकांची संख्या 3 असून त्यांचेकडून निवीदा शुल्क रू.1000 प्रमाणे रू. 21000 इतके वसूल करणे आवश्यक असता रू.500 प्रमाणे वसूल केली आहे सबब उर्वरित रू.500 प्रमाणे होणारी रक्कम रू.10500 वसूल करून अनुपालन सादर करण्यात यावे.

7) सदरच्या नस्तीस उपयोगिता प्रमाणपत्र, काम सुरु-पुर्ण फोटो आणि काम पूर्णत्वाचा दाखला जोडण्यात आलेला नाही. मूळ मोजमापपुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

8) सदर वस्तू प्राप्त झाल्यानंतर त्या सुस्थितीत असल्याची खात्री करून त्या वस्तूची नोंद साठा/मत्ता नोंदवही मध्ये घेण्यात आलेली नाही.

9) करारनामा अटी व शर्थी क्र 18 नुसार कामाच्या देयकासोबत, बिल मागणी अर्जासोबत संबंधित बिलाचा GST TAX INVOICE जोडणे आवश्यक आहे परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच सदर वस्तूंचे त्रयस्थ पक्षाकडून चाचणी अहवाल घेण्यात आलेले नाही.

10) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 नुसार तांत्रिक समिती गठीत करण्यात आली नाही.

DATGSDM8201 (Ref No : 31, Hmm No : 61)

47 महिला व बालकल्याण विभागांकडील वेगवेगळ्या योजना राबविणे अंतर्गतमहिला व मुलींना प्रशिक्षण देणे योजनेमधील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	88152.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषदेमधील महिला व बालकल्याण विभागातील वेगवेगळ्या योजना राबविणे अंतर्गत महिला प्रशिक्षण देणे. खालील देयकांचे लेखापरीक्षण केले असता उणिवा निदर्शनास आल्या सदरबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

देयकांचा तपशिल :-

अ.क्र	तपशील	मक्तेदाराचे नाव	देयकाची रक्कम	प्रमाणक क्र. व दिनांक
1	महिला व मुलींना टू व्हिलर ड्रायव्हिंग प्रशिक्षण देणे	श्रृंगार इंस्टिटयूट कोल्हापूर	293941/-	586/ दि.31.03.21
2	महिला व मुलींना शिवणक्लास प्रशिक्षण देणे	श्रृंगार इंस्टिटयूट कोल्हापूर	293706/-	587/ दि.31.03.21
3	महिला व मुलींना ॲडव्हांस ब्युटी पार्लर प्रशिक्षण देणे	श्रृंगार इंस्टिटयूट कोल्हापूर	293882/-	588/ दि.31.03.21

1) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि. 01/12/2016 परिच्छेद क्र.3.2.3 अन्वये मोठे आदेश लहान-लहान आदेशात विभागणी करण्यावर बंधने घालण्यात आले आहेत. या योजनेतील लेखापरिक्षणास प्राप्त एकूण देयकाची रक्कम रुपये 881529/- एवढी होत आहे. सदर योजनेमध्ये ई-टेंडर प्रक्रिया टाळण्यासाठी लहान-लहान आदेशात विभागणी करण्यात आली आहे.

2) शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.संकीर्ण 2005/प्र.क्र.156/05/नवि-20 दि.30.12.2006 व शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.संकीर्ण 2005/प्र.क्र.255/05/नवि-20 दि.08.11.2010 अन्वये प्रशिक्षण शुल्काच्या 10% रककम लाभार्थ्यांने स्वत: भरावयाची आहे.तथापी नगरपरिषदेने लाभार्थ्यांकडून सदर रककम भरून घेतली नाही.यास्तव एकूण अदा रक्कमेच्या अनुषंगाने रूपये 88152/- इतकी वसूल करून अनुपालन सादर करावे.

3) उपरोक्त नमूद कामाच्या निविदा जाहिरात ई निविदा नसलेने वर्तमानपत्रात विस्तृत स्वरूपात देणे आवश्यक आहे तसे न देता संक्षिप्त स्वरूपात दिली आहे त्यामुळे प्रशिक्षणाचा तपशील तसेच राबिवणे बाबतची माहिती सोबत जोडणेत आलेल्या वर्तमान पत्रातील जाहीर निविदेमध्ये सदरील प्रशिक्षणाचा समावेश आहे किंवा कसे

याबाबत खात्री होत नाही.

4) निविदेचे लिफाफे आवक नोंद करून घेण्यात आलेले नाहीत तसेच निविदा उघडताना समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षऱ्या दिनांकासहित व शेऱ्यासहित लखोट्यावर नमूद नाही.

5) टू व्हिलर ड्रायव्हिंग प्रशिक्षण याकरिता प्रशिक्षणार्थी यांचेकडे आवश्यक प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा दुचाकी शिकावू परवाना आणि ॲडव्हांस ब्युटी पार्लर प्रशिक्षण याकरिता बेसिक ब्युटी पार्लर प्रशिक्षण झाले असलेबाबतचा दाखला लेखापरीक्षणास उपलब्ध नसलेने खर्चाची सत्यता पडताळता येत नाही.
6) सुधारित मुद्रांक अधिनियम 2015 मधील अनुसूची-1 मधील अनुछेद 63, खंड अनुसार रु. 10,00,000/- पर्यंतच्या कामाचे करारपत्रक हे रु. 500/- च्या मुद्रांकावर करणे आवश्यक असताना देखील कामाचे करारपत्रक हे 100/- च्या मुद्रांकावर घेण्यात आलेले आहे.

7) या योजनेतील उपरोक्त नमूद मक्तेदारांची देयके पडताळणी केली असता बिलातून जी.एस.टी. आणि 9% सुरक्षा अनामत कपात केलेली दिसून येत नाही.

8) लाभार्थी निवडीबाबत लाभार्थ्यांची निवड कशाप्रकारे करण्यात आली तसेच सबंधित लाभार्थ्यांना प्रशिक्षण आवश्यक असलेबाबतचे कोणतेही अभिलेख उपलब्ध न झाल्याने योग्य त्या लाभार्थ्याची निवड केली आहे किंवा कसे याबाबतची खात्री करता येत नाही.

9) लाभार्थ्यांची निवड करताना कुटुंब मर्यादित असल्याबाबतचे कागदपत्रे नस्तीस उपलब्ध झाले नाहीत.

10) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 3.1.2.1 नुसार निवीदा रू.500000/- पर्यंतच्या निवीदेस रू.1000 इतकी निवीदा शुल्क घेणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त नमूद 3 कामांच्या देयकांच्या प्रत्येक नस्तीस निवीदाधारकांची संख्या 3 असून त्यांचेकडून निवीदा शुल्क रू.1000 प्रमाणे रू. 9000 इतके वसूल करणे आवश्यक असता रू.500 प्रमाणे वसूल केली आहे सबब उर्वरित रू.500 प्रमाणे होणारी रक्कम रू. 4500 वसूल करून अनुपालन सादर करण्यात यावे.

11) सदरच्या नस्तीस पूर्णत्वाचा दाखला आणि फलश्रुती जोडण्यात आलेली नाही.

DATGSDM8201 (Ref No : 32, Hmm No : 62)

48 महिला व बालकल्याण विभागांतर्गत वेगवेगळ्या योजना राबविणे अंतर्गत महिला व मुलींना प्रशिक्षण देणे.

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	338859.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजीचे आर्थिक वर्ष 2020-21-22 लेखापरीक्षण दरम्यान महिला व बालकल्याण विभागातील वेगवेगळ्या योजना राबविणे अंतर्गत महिला व मुलींना प्रशिक्षण देणे या देयकांचे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा आढळून आल्या.

देयकांचा तपशिल :-

अ.क्र.	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	मक्तेदाराचे नाव	तपशील
1	658/739	31.03.2022	257348	इंदिरा गांधी महिला मंडळ	बेसिक फॅशन डिझाईनचे प्रशिक्षण देणे
2	659/740	31.03.2022	296941	इंदिरा गांधी महिला मंडळ	बेसिक ॲडव्हान्स कॉम्प्युटर कोर्स(हार्डवेअर)प्रशिक्षण देणे
3	660/741	31.03.2022	296941	इंदिरा गांधी महिला मंडळ	ॲडव्हान्स फॅशन डिझाईनचे प्रशिक्षण देणे
4	661/742	31.03.2022	262298	इंदिरा गांधी महिला मंडळ	मॉटेसरी टीचिंग प्रशिक्षण देणे
5	662/743	31.03.2022	296941	इंदिरा गांधी महिला मंडळ	बेसिक कॉम्प्युटर आणि बेसिक टॅलीचे प्रशिक्षण देणे
6	663/744	31.03.2022	296941	इंदिरा गांधी महिला मंडळ	ॲडव्हान्स टॅली आणि जीएसटीचे प्रशिक्षण देणे
7	664/745	31.03.2022	262298	इंदिरा गांधी महिला मंडळ	ॲडव्हान्स कुकिंगचे प्रशिक्षण देणे
8	665/746	31.03.2022	296941	इंदिरा गांधी महिला मंडळ	ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देणे
9	666/747	31.03.2022	267300	इंदिरा गांधी महिला मंडळ	कुंफु व ज्योदो कराटे प्रशिक्षण देणे
10	667/748	31.03.2022	267300	इंदिरा गांधी महिला मंडळ	योग व प्राणायम कोर्सचे प्रशिक्षण देणे
11	668/749	31.03.2022	257349	इंदिरा गांधी महिला मंडळ	स्पोकन इंग्लिश पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रशिक्षण देणे
		एकूण	3058598		

1)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि. 01/12/2016 परिच्छेद क्र.3.2.3 अन्वये मोठे आदेश लहान-लहान आदेशात विभागणी करण्यावर बंधने घालण्यात आले आहेत. या योजनेतील लेखापरिक्षणास प्राप्त एकूण देयकाची रक्कम रुपये 3058598/- एवढी होत आहे. सदर योजनेमध्ये ई-टेंडर प्रक्रिया टाळण्यासाठी लहान-लहान आदेशात विभागणी करण्यात आली आहे.

2)नस्तीस जोडलेल्या जाहिरातीचे अवलोकन केले असता जाहिरातीत कामाचा तपशील नमूद नाही. तसेच कामाचा कालावधी, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा फी इत्यादी तपशील नमूद करणेत आलेला नाही. त्यामुळे अधिक तुलनात्मक दराच्या निविदा प्राप्त न झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3)शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.संकीर्ण 2005/प्र.क्र.156/05/नवि-20 दि.30.12.2006 व शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.संकीर्ण 2005/प्र.क्र.255/05/नवि-20 दि.08.11.2010 अन्वये प्रशिक्षण शुल्काच्या 10% रककम लाभार्थ्यांने स्वत: भरावयाची आहे.तथापी नगरपरिषदेने लाभार्थ्यांकडून सदर रककम भरून घेतली नाही. यास्तव एकूण अदा रक्कमेच्या अनुषंगाने रूपये 305859/- इतकी वसूल करून अनुपालन सादर करावे.

4)शासन निर्णय नगरविकास विभागस क्र.संकीर्ण 2005/प्र.क्र.156/05/नवि-20 दि.30.12.2006 अन्वये उक्त योजनेसाठी रू.10 लाखाच्या आतील योजना राबविण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना असून त्यावरील योजनेस आयुक्त,महिला व बालविकास पुणे यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.अशा प्रकारची मान्यता घेण्यात आली नाही.

5)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 2.9.3 अन्वये प्रशिक्षण संस्थांची निवड करताना खरेदी समिती स्थापन करून त्यांनी वस्तूच्या किमंतीचा वाजवीपणा ठरविणेबाबत परिच्छेद क्र. 3.1.2.2 नुसार बाजारपेठेतील दरांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असून त्यानुसार विहित नमुना परिशिष्ठ 1 मधील विहित नमुन्यात प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना सदर योजनेसाठी त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर समितीतील सदस्यांचे दरपत्रक स्वीकृत करण्यासाठी मागविण्यात आलेल्या पुरवठादारांशी कोणतेही संबंध नसल्याचे परिशिष्ट 11 मधील विहीत नमुन्यात प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

6)निविदेचे लिफाफे आवक नोंद करून घेण्यात आलेले नाहीत

7)महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील परिच्छेद 4.2 नुसार दरपत्रके उघडण्याच्या वेळी निविदाकारांचे जे प्रतिनिधी उपस्थित राहतील, त्यांचे एक हजेरीपत्रक ठेवण्यात यावे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच निविदा उघडताना खरेदी समिती सदस्यांच्या स्वाक्ष-या दिनांकासहित व शे-यासहित नमूद नाहीत. हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी व निविदा प्रक्रिया पारदर्शी पार पडण्यासाठी या बाबी महत्त्वाच्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8)निविदा धारकाने विविध वस्तूंच्या किंमती नमूद केलेले सविस्तर विवरणात्मक दरपत्रक देयकास उपलब्ध झाले नाही. तिन्ही निविदा धारकांचे तुलनात्मक तक्ता नस्तीस उपलब्ध झाला नाही.

9)या योजनेतील प्रशिक्षणार्थींचा तपशील, प्रशिक्षणाचा कालावधी, प्रशिक्षणाचे ठिकाण, लाभार्थ्यांची निवड, लाभार्थ्यांची यादी,त्यांचे प्रस्ताव,मक्तेदाराचे देयक,प्रशिक्षणाचे हजेरीपत्रक इ.बाबी नस्तीस पहावयास मिळाल्या नाहीत.

10)लाभार्थी निवडीबाबत लाभार्थ्यांची निवड कशाप्रकारे करण्यात आली याबाबत चे कोणतेही अभिलेख उपलब्ध न झाल्याने योग्य त्या लाभार्थ्याची निवड केली आहे किंवा कसे याबाबतची खात्री झाली नाही.

11)लाभार्थ्यांची निवड करताना कुटुंब मर्यादित असल्याबाबतचे कागदपत्रे नस्तीस उपलब्ध झाले नाही.

12)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 3.1.2.1 नुसार निवीदा रू.500000/- पर्यंतच्या निवीदेस रू.1000 इतकी निवीदा शुल्क घेणे आवश्यक आहे.सदर देयकांच्या नस्तीस निवीदाधारकांची संख्या 3 असून त्यांचेकडून निवीदा शुल्क घेतल्याच्या पावत्या उपलब्ध झाल्या नाहीत.उक्त देयकातील प्रत्येकी 3 निवीदाधारकांचे रू.1000 प्रमाणे रू.33000/- इतके निवीदा शुल्क वसूल करून अनुपालन सादर करण्यात यावे.

13)उपरोक्त खर्च तपशील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देयकांमधून आयकर व GST TDS कपात करण्यात आला

आहे, परंतु सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

14)सदरच्या नस्तीस पूर्णत्वाचा दाखला आणि फलश्रुती जोडण्यात आलेली नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी रक्कम रु.338859/- लेखापरीक्षणामध्ये वसूलपात्र करण्यात येत आहे.

DATRKPF9301 (Ref No : 67, Hmm No : 92)

49 महिला व बालकल्याण विभागांतर्गत बालोद्यान विकसित करणे अंतर्गत डस्टबिन पुरविणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 6000.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजीचे आर्थिक वर्ष 2020-21-22 लेखापरीक्षण दरम्यान महिला व बालकल्याण विभागातील बालोद्यान विकसित करणे अंतर्गत डस्टबिन पुरविणे या देयकांचे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा आढळून आल्या.

देयकांचा तपशिल :-

अ.क्र.	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	मक्तेदाराचे नाव	तपशील
1	314	28/03/2022	286952	कादरीया ट्रेडर्स	इ.न.पा.सुंदर बाग(महात्मा गांधी)उद्यानामध्ये आतील बाजूस 14 डस्टबिन पुरविणे
2	315	28/03/2022	286952	कादरीया ट्रेडर्स	इ.न.पा.राणी बागेमध्ये आतील बाजूस 14 डस्टबिन पुरविणे
		एकूण	573904		

1)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि. 01/12/2016 परिच्छेद क्र.3.2.3 अन्वये मोठे आदेश लहान-लहान आदेशात विभागणी करण्यावर बंधने घालण्यात आले आहेत. या योजनेतील लेखापरिक्षणास प्राप्त एकूण देयकाची रक्कम रुपये 573904/- एवढी होत आहे. सदर योजनेमध्ये ई-टेंडर प्रक्रिया टाळण्यासाठी लहान-लहान आदेशात विभागणी करण्यात आली आहे.

2)महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-2016/प्र.क्र.215/ उद्योग-4 दिनांक 24/08/2017 नुसार खरेदीदार विभागास गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस (GEM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांमधून खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि सदरची खरेदी ही स्थानिक दरपत्रके मागवून केली आहे. तसेच संबंधित वस्तू व सेवा या GEM पोर्टलवर उपलब्ध नसलेबाबत खरेदी समितीने प्रमाणपत्र दिलेले नाही.

3)निविदा प्रसिद्धीची जाहिरात लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

4)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4

दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 2.9.4 अन्वये खरेदी करताना खरेदी समिती स्थापन करून त्यांनी वस्तूच्या किमंतीचा वाजवीपणा ठरविणेबाबत परिच्छेद क्र. 3.1.2.2 नुसार बाजारपेठेतील दरांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असून त्यानुसार विहित नमुना परिशिष्ठ 1 मधील विहित नमुन्यात प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना सदर योजनेसाठी त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर समितीतील सदस्यांचे दरपत्रक स्वीकृत करण्यासाठी मागविण्यात आलेल्या पुरवठादारांशी कोणतेही संबंध नसल्याचे परिशिष्ट 11 मधील विहीत नमुन्यात प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

5)निविदेचे लिफाफे आवक नोंद करून घेण्यात आलेले नाहीत.

6)निविदा सूचना, प्राप्त निविदेमध्ये डस्टबिन चा तपशिल (आकार,उंची,मटेरियल) देण्यात आल्याचा दिसून येत नाही. असे असताना कोणत्या आधारे दर निश्चित करून सदर निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे हे लेखापरीक्षणात तपासता आले नाही.

7)कनिष्ठ अभियंता स्थापत्य यांनी खरेदीपूर्वी कोणत्याठिकाणी डस्टबिन बसवण्यात येणार आहेत याचा सर्वे करून जागा निश्चित केल्याचे दिसून येत नाही.

8)महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील परिच्छेद 4.2 नुसार दरपत्रके उघडण्याच्या वेळी निविदाकारांचे जे प्रतिनिधी उपस्थित राहतील, त्यांचे एक हजेरीपत्रक ठेवण्यात यावे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच निविदा उघडताना खरेदी समिती सदस्यांच्या स्वाक्ष-या दिनांकासहित व शे-यासहित नमूद नाहीत. हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी व निविदा प्रक्रिया पारदर्शी पार पडण्यासाठी या बाबी महत्त्वाच्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9)निविदा धारकाने विविध वस्तूंच्या किंमती नमूद केलेले सविस्तर विवरणात्मक दरपत्रक देयकास उपलब्ध झाले नाही. तिन्ही निविदा धारकांचे तुलनात्मक तक्ता नस्तीस उपलब्ध झाला नाही.

10)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 3.1.2.1 नुसार निवीदा रू.500000/- पर्यंतच्या निवीदेस रू.1000 इतकी निवीदा शुल्क घेणे आवश्यक आहे.सदर देयकांच्या नस्तीस निवीदाधारकांची संख्या 3 असून त्यांचेकडून निवीदा शुल्क घेतल्याच्या पावत्या उपलब्ध झाल्या नाहीत.उक्त देयकातील प्रत्येकी 3 निवीदाधारकांचे रू.1000 प्रमाणे रू.6000/- इतके निवीदा शुल्क वसूल करून अनुपालन सादर करण्यात यावे.

11)उपरोक्त खर्च तपशील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देयकांमधून आयकर व GST TDS कपात करण्यात आला आहे, परंतु सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

12)काम सुरु करणेपुर्वीचे व काम पूर्ण झाले नंतरचे फोटो उपलब्ध झाले नाही.

13)जडसंग्रह नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

14)सदरच्या नस्तीस पूर्णत्वाचा दाखला आणि फलश्रुती जोडण्यात आलेली नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी रक्कम रु.6000/- लेखापरीक्षणामध्ये वसूलपात्र करण्यात येत आहे.

50 महिला व बालकल्याण विभागांतर्गत महिलांसाठी सॅनिटरी नॅपकीन मशीन बसविणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 73000.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजीचे आर्थिक वर्ष 2020-21-22 लेखापरीक्षण दरम्यान महिला व बालकल्याण विभाग अंतर्गत महिलांसाठी सॅनिटरी नॅपकीन मशीन बसविणे या देयकांचे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा आढळून आल्या.

देयकांचा तपशिल :-

अ.क्र.	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	मक्तेदाराचे नाव	तपशील
1	21	04/03/2022	812000	श्री समर्थ ट्रेडर्स	इचलकरंजी शहरामध्ये विविध 28 ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन इन्सिनेटर मशीन बसविणे(28 नग खरेदी)
2	22	04/03/2022	588000	श्री समर्थ ट्रेडर्स	इचलकरंजी शहरामध्ये विविध 28 ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन वेडिंग मशीन बसविणे(28 नग खरेदी)
		एकूण	1400000		56 नग खरेदी

1)सदरची खरेदी गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस (GEM) पोर्टलवरून करण्यात आली आहे.

2)महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 व महाराष्ट्र मुद्रांक (सुधारीत) अधिनियम 2015 च्या अनुसूची 1 मधील कलम 63 खंड अ नुसार 10 लाख रुपयां पर्यतच्या कामासाठी 500/- रुपये व त्यावरील प्रत्येक 1 लाख रुपयांकरीता 100/- रुपये प्रमाणे करारपत्र करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणे सदर कामासाठी रक्कम रुपये 500/- किंमतीच्या मुद्रांकावर करारपत्र करणे आवश्यक आहे.सदर कामासाठी 500/-रुपये प्रमाणे रक्कम रुपये 1000/- मक्तेदाराकडून वसूल करुन शासन खाती भरणा केलेची चलने लेखापरीक्षणास सादर करावीत.

3)महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील परिशिष्ट 8 नुसार 5 ते 10 लाख रुपयापर्यंतच्या कामासाठी निविदाधारकांडून निविदा शुल्क 2000 रू. घेणे आवश्यक आहे. सॅनिटरी नॅपकिन इन्सिनेटर मशीन खरेदी प्रकीयेसाठी 19 निविदाधारकांनी व सॅनिटरी नॅपकिन वेडिंग मशीन खरेदी प्रकीयेसाठी 17 निविदाधारकांनी असे एकूण 36 निविदाधारकांनी निविदा भरल्या असुन सर्व निविदाधारकांडून प्रत्येकी रुपये 2000 रु. प्रमाणे एकूण रुपये 72000/- निविदा शुल्क वसूल करून अनुपालन सादर करावे.

4)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.- 2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि. 01/12/2016 मधील मुद्दा क्र. 2.9.4 अन्वये खरेदी करताना खरेदी समिती स्थापन करून त्यांनी वस्तूच्या किंमतीचा वाजवीपणा ठरविणेबाबत परिच्छेद क्र. 3.1.2.2 नुसार बाजारपेठेतील दरांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असून त्यानुसार विहित नमुना परिशिष्ठ 1 मधील विहित नमुन्यात बाजारभावानुसार सदरचे प्राप्त दर योग्य असलेबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना सदर खरेदिसाठी बाजारातून दरपत्रके मागविली नाहीत. त्यामुळे

नियमबाहयता झालेली आहे.

5)महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जावकामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील 4.5.2 नुसार संबंधित खरेदी अधिकारी हा निविदेचा निकाल ज्याच्या बाजूने लागला आहे, अशा पुरवठादारामध्ये त्याचा कोणताही हितसंबंध गुंतलेल्या नसल्याबाबत परिशिष्ट 11 च्या नमुन्यात लेखी पुष्टी देईल, अशा सूचना आहेत. परंतु ठेकेदाराकडून परिशिष्ठ 11 नमुन्यामधील प्रमाणपत्र घेतलेले नाही.

6)कनिष्ठ अभियंता स्थापत्य यांनी खरेदीपूर्वी कोणत्याठिकाणी मशीन बसवण्यात येणार आहेत याचा सर्वे करून जागा निश्चित केल्याचे दिसून येत नाही. तसेच खरेदी नंतर मशीन कुठे बसवण्यात आल्या याच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

7)सदर योजनेस मान्यता देणारा कौन्सिल ठराव क्र.44 दिनांक 30/06/2021 नुसार एकूण 48 ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन इन्सिनेटर मशीन व सॅनिटरी नॅपकिन वेडिंग मशीन बसविण्याची मंजुरी देण्यात आली आहे.सदर मंजुरीनंतर आरोग्य विभागाकडून माहिती मागविली असता त्यापैकी 4 ठिकाणी आरोग्य विभागाकडून मशीन बसविण्यात आली आहेत. एकूण 28 ठिकाणी मशीन बसविण्याकरिता एकूण 56 मशीन जेम पोर्टल वरून खरेदी केली आहेत.नस्तीसोबत फक्त 10 ठिकाणी मशीन बसविल्याचे फोटो उपलब्ध झाले.नस्तीसोबत उपलब्ध कागदपत्रावरून आरोग्य विभागाकडून कोणत्या ठिकाणी मशीन बसविली तसेच म.बा.क.कडून कोणत्या ठिकाणी किती मशीन बसविणे गरजेचे होते,याचा अहवाल व किती ठिकाणी वास्तविक बसविण्यात आले याची खात्री करता येत नाही.

8)योजनेतून खरेदी करण्यात आलेल्या सर्व मशीनचा गुणवत्ता तपासणी अहवाल तपासला असता सदर तपासणी अहवाल शासन मान्यताप्राप्त संस्थेकडून घेतला असल्याची खात्री करता येत नाही.

9)उपरोक्त खर्च तपशील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देयकांमधून आयकर व GST TDS कपात करण्यात आला आहे, परंतु सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

10)काम सुरु करणेपुर्वीचे व काम पूर्ण झाले नंतरचे फोटो उपलब्ध झाले नाही.

11)मशीन खरेदीची नोंद जडसंग्रह नोंदवहीला घेण्यात आलेली नाही.

12)सदरच्या नस्तीस पूर्णत्वाचा दाखला आणि फलश्रुती जोडण्यात आलेली नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी रक्कम रु.73000/- लेखापरीक्षणामध्ये वसूलपात्र करण्यात येत आहे.

DATRKPF9301 (Ref No : 69, Hmm No : 94)

51 महिला व बालकल्याण विभागांतर्गत खेळणी साहित्य बसविणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	9000.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजीचे आर्थिक वर्ष 2020-21-22 लेखापरीक्षण दरम्यान महिला व बालकल्याण

विभागातील खेळणी साहित्य बसविणे या देयकांचे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा आढळून आल्या.

देयकांचा तपशिल :-

अ.क्र.	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	मक्तेदाराचे नाव	तपशील
1	676/757	31.03.2022	297514	आर.एस.चौधरी	प्र.क्र.16 मधील दत्त कॉलनीमध्ये खेळणी साहित्य बसविणे
2	677/758	31.03.2022	297514	आर.एस.चौधरी	प्र.क्र.21 मधील महालक्ष्मी झोपडपट्टीलगत असलेल्या शौचालयालगत न.पा.ओपनस्पेसमध्ये खेळणी साहित्य बसविणे
3	678/759	31.03.2022	297514	आर.एस.चौधरी	प्र.क्र.16 नारायण मळा रोड बागडे साहेबांच्या घराच्या मागील बाजूस न.पा.ओपन स्पेसवर खेळणी बसविणे
		एकूण	892542		

1)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि. 01/12/2016 परिच्छेद क्र.3.2.3 अन्वये मोठे आदेश लहान-लहान आदेशात विभागणी करण्यावर बंधने घालण्यात आले आहेत. या योजनेतील लेखापरिक्षणास प्राप्त एकूण देयकाची रक्कम रुपये 892542/- एवढी होत आहे. सदर योजनेमध्ये ई-टेंडर प्रक्रिया टाळण्यासाठी लहान-लहान आदेशात विभागणी करण्यात आली आहे.

2)महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-2016/प्र.क्र.215/ उद्योग-4 दिनांक 24/08/2017 नुसार खरेदीदार विभागास गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस (GEM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांमधून खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि सदरची खरेदी ही स्थानिक दरपत्रके मागवून केली आहे. तसेच संबंधित वस्तू व सेवा या GEM पोर्टलवर उपलब्ध नसलेबाबत खरेदी समितीने प्रमाणपत्र दिलेले नाही.

3)नस्तीस जोडलेल्या जाहिरातीचे अवलोकन केले असता जाहिरातीत कामाचा तपशील नमूद नाही. तसेच कामाचा कालावधी, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा फी इत्यादी तपशील नमूद करणेत आलेला नाही. त्यामुळे अधिक तुलनात्मक दराच्या निविदा प्राप्त न झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

4)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 2.9.4 अन्वये खरेदी करताना खरेदी समिती स्थापन करून त्यांनी वस्तूच्या किमंतीचा वाजवीपणा ठरविणेबाबत परिच्छेद क्र. 3.1.2.2 नुसार बाजारपेठेतील दरांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असून त्यानुसार विहित नमुना परिशिष्ठ 1 मधील विहित नमुन्यात प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना सदर योजनेसाठी त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर समितीतील सदस्यांचे दरपत्रक स्वीकृत करण्यासाठी मागविण्यात आलेल्या पुरवठादारांशी कोणतेही संबंध नसल्याचे परिशिष्ट 11 मधील विहीत नमुन्यात प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

5)निविदेचे लिफाफे आवक नोंद करून घेण्यात आलेले नाहीत.

6)महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील परिच्छेद 4.2 नुसार दरपत्रके उघडण्याच्या वेळी निविदाकारांचे जे प्रतिनिधी उपस्थित राहतील, त्यांचे एक हजेरीपत्रक ठेवण्यात यावे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच निविदा उघडताना खरेदी समिती सदस्यांच्या स्वाक्ष-या दिनांकासहित व शे-यासहित नमूद नाहीत. हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी व निविदा प्रक्रिया पारदर्शी पार पडण्यासाठी या बाबी महत्त्वाच्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7)निविदा धारकाने विविध वस्तूंच्या किंमती नमूद केलेले सविस्तर विवरणात्मक दरपत्रक देयकास उपलब्ध झाले नाही. तिन्ही निविदा धारकांचे तुलनात्मक तक्ता नस्तीस उपलब्ध झाला नाही.

8)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 3.1.2.1 नुसार निवीदा रू.500000/- पर्यंतच्या निवीदेस रू.1000 इतकी निवीदा शुल्क घेणे आवश्यक आहे.सदर देयकांच्या नस्तीस निवीदाधारकांची संख्या 3 असून त्यांचेकडून निवीदा शुल्क घेतल्याच्या पावत्या उपलब्ध झाल्या नाहीत.उक्त देयकातील प्रत्येकी 3 निवीदाधारकांचे रू.1000 प्रमाणे रू.9000/- इतके निवीदा शुल्क वसूल करून अनुपालन सादर करण्यात यावे.

9)उपरोक्त खर्च तपशील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देयकांमधून शासकीय कपाती करण्यात आल्या आहे, परंतु सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

10)मक्तेदार आर.एस.चौधरी यांच्या मक्तेदार रजिस्टर सर्टिफिकेटची मुदत 31 मार्च 2021 रोजी संपली असताना कोणत्या आधारे त्यांची निविदा मंजूर केली समजून येत नाही,याबाबत खुलासा सादर करण्यात यावा.

11)कामाच्या आदेशातील टीप क्र.5 नुसार मक्तेदाराने स्वतः मंजूर कामाचे काम सुरु करणेपुर्वी व प्रत्येक टप्प्यावर एक फोटो काढून संबंधित शाखा अभियंता यांचेकडे देणेचे असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

12)जडसंग्रह नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

13)सदरच्या नस्तीस फलश्रुती जोडण्यात आलेली नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी रक्कम रु.9000/- लेखापरीक्षणामध्ये वसूलपात्र करण्यात येत आहे.

DATRKPF9301 (Ref No : 70, Hmm No : 95)

52 महिला व बालकल्याण विभागांतर्गत महिला महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम खर्चातील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	57000.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजीचे आर्थिक वर्ष 2020-21-22 लेखापरीक्षण दरम्यान महिला व बालकल्याण विभागातील महिला महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम खर्चाच्या देयकांचे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा आढळून आल्या.

आर्थिक वर्ष 2020-21 मधील देयकांचा तपशिल :-

अ.क्र.	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	मक्तेदाराचे नाव	तपशील
1	524	31.03.2021	285000	मनमृणाल मेडिया	पाककला स्पर्धा,रांगोळी स्पर्धा,मेहंदी स्पर्धा,सोलो डान्स,महिला आरोग्य व आहार चर्चा सत्र,महिला कायदे सबलीकरण,उद्योग व्यवसाय मार्गदर्शन,माय मराठी कलारंजन मुंबई सांस्कृतिक कार्यक्रम
2	570	31.03.2021	290000	ओंकार बाळकृष्ण भागवत	जीवन गाणी निर्मित उमेन्स मेलेडी संगीत नृत्य कार्यक्रम,शिवरत्न प्रोडक्शन पुणे निर्मित लावणी कार्यक्रमासाठी लागणारे कॅमेरा ऑनलाईन सेटअप
3	571	31.03.2021	115000	विनित क्रिएशन	स्टेज सेटअप,साऊड सेटअप,एल.ई.डी. वॉल,इंटरनेट कनेक्शन,शुटींग इ.पुरविणे
		एकूण	690000		

आर्थिक वर्ष 2021-22 मधील देयकांचा तपशिल :-

अ.क्र.	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	मक्तेदाराचे नाव	तपशील
1	317	28.03.2022	140000	कादरिया ट्रेडर्स	100 कलाकार,परीक्षक,स्वयंसेवक यांचेसाठी 3 दिवस 2 वेळ जेवण व चहा नाश्ता,मानचिन्हे,प्रशिस्तपत्रे,निमंत्रण पत्रिका,शाली,बुके इ.पुरविणे.
2	318	28.03.2022	170000	कादरिया ट्रेडर्स	घोरपडे नाट्यगृहात विद्युत रोषणाई,जनरल लाईट मंडप,स्वागत कमान नग-2 सिल्क पार्टेशन,एल.ई.डी,साऊड सिस्टीम,माईक,फोटोग्राफी,व्हिडीओ शुटींग,सीडी पुरविणे
3	319	28.03.2022	290000	कादरिया ट्रेडर्स	स्टेज,मंडप,नेट वरून आतून व्हाईट सिलिंग,कापडी स्टॉल,टेबल,खुर्च्या पुरविणे
		एकूण	600000		

20-21 मधील खर्चाच्या देयकातील उणीवा-

1)वरील खर्चासाठी राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

2)सदर निविदा प्रक्रियेतील निविदाधारकांची निविदा प्रक्रिया साठीची आवश्यक कागदपत्रे जसे की नोंदणी प्रमाणपत्र,कामाचा अनुभव असलेबाबतचे प्रमाणपत्र,जीएसटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, आधार कार्ड झेरॉक्स, पॅनकार्ड झेरॉक्स लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.तरी सदर निविदाधारकांना काय आधारे पात्र ठरवण्यात आले याबबत खुलासा होत नाही.

3)मक्तेदाराशी करण्यात आलेले करारपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

21-22 मधील खर्चाच्या देयकातील उणीवा-

1)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि. 01/12/2016 परिच्छेद क्र.3.2.3 अन्वये मोठे आदेश लहान-लहान आदेशात विभागणी करण्यावर बंधने घालण्यात आले आहेत. सदर योजनेमध्ये ई-टेंडर प्रक्रिया टाळण्यासाठी लहान-लहान आदेशात विभागणी करण्यात आली आहे.

2)नस्तीस जोडलेल्या जाहिरातीचे अवलोकन केले असता जाहिरातीत कामाचा तपशील नमूद नाही. तसेच कामाचा कालावधी, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा फी इत्यादी तपशील नमूद करणेत आलेला नाही. त्यामुळे अधिक तुलनात्मक दराच्या निविदा प्राप्त न झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3)निविदेचे लिफाफे आवक नोंद करून घेण्यात आलेले नाहीत

4)महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील परिच्छेद 4.2 नुसार दरपत्रके उघडण्याच्या वेळी निविदाकारांचे जे प्रतिनिधी उपस्थित राहतील, त्यांचे एक हजेरीपत्रक ठेवण्यात यावे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच निविदा उघडताना खरेदी समिती सदस्यांच्या स्वाक्ष-या दिनांकासहित व शे-यासहित नमूद नाहीत. हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी व निविदा प्रक्रिया पारदर्शी पार पडण्यासाठी या बाबी महत्त्वाच्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5)निविदा धारकाने विविध वस्तूंच्या किंमती नमूद केलेले सविस्तर विवरणात्मक दरपत्रक देयकास उपलब्ध झाले नाही. तिन्ही निविदा धारकांचे तुलनात्मक तक्ता नस्तीस उपलब्ध झाला नाही.

6)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 3.1.2.1 नुसार निवीदा रू.500000/- पर्यंतच्या निवीदेस रू.1000 इतकी निवीदा शुल्क घेणे आवश्यक आहे.सदर देयकांच्या नस्तीस निवीदाधारकांची संख्या 3 असून त्यांचेकडून निवीदा शुल्क घेतल्याच्या पावत्या उपलब्ध झाल्या नाहीत.उक्त देयकातील प्रत्येकी 3 निवीदाधारकांचे रू.1000 प्रमाणे रू.9000/- इतके निवीदा शुल्क वसूल करून अनुपालन सादर करण्यात यावे.

7)आयकर अधिनियम 1961 कलम 194 J अन्वये देयकातून 10% आयकर कपात करणे आवश्यक आहे परंतु आर्थिक वर्ष 2021-22 च्या देयकातून 2 % प्रमाणे आयकर वसूल केला आहे.

अ.क्र.	प्र.क्र.	रक्कम	न.प.कडून कपात करण्यात आलेली आयकर रक्कम(2% प्रमाणे)	आयकर अधिनियमानुसार कपात करणे आवश्यक आयकर रक्कम(10% प्रमाणे)	उर्वरित आयकर कपात रक्कम
1	317	140000	2800	14000	11200

2	318	170000	3400	17000	13600
3	319	290000	5800	29000	23200
				एकूण	48000

वरील देयकांचे रू. 48000/- आयकर कपात करून अनुपालन सादर करावे.

8)उपरोक्त खर्च तपशील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देयकांमधून आयकर व GST TDS कपात करण्यात आला आहे, परंतु सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

9)करारपत्रातील अट क्र.9 नुसार कामाच्या देयकासोबत डिलिव्हरी चलन व बिल सादर करणे बंधनकारक असून त्याशिवाय देयक अदा केले जाणार नाही. परंतु वरील देयकासोबत डिलिव्हरी चलने सादर करण्यात आलेली नाहीत.

10)सदरच्या नस्तीस पूर्णत्वाचा दाखला आणि फलश्रुती जोडण्यात आलेली नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी रक्कम रु.57000/- लेखापरीक्षणामध्ये वसूलपात्र करण्यात येत आहे.

DATRKPF9301 (Ref No : 71, Hmm No : 96)

53 इचलकरंजी शहरातील नवजात शिशु यांना बेबी किट व स्तनदा मातांना पोषक आहार व इतर साहित्य पुरविणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 5500.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजीचे आर्थिक वर्ष 2020-21-22 लेखापरीक्षण दरम्यान महिला व बालकल्याण विभागातील वेगवेगळ्या योजना राबविणे अंतर्गत इचलकरंजी शहरातील नवजात शिशु यांना बेबी किट व स्तनदा मातांना पोषक आहार व इतर साहित्य पुरविणे या देयकांचे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा आढळून आल्या.

देयकांचा तपशिल :-

अ.क्र.	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	मक्तेदाराचे नाव
1	669/750	31.03.2022	1811385	श्री दगडू साताप्पा माने
		एकूण	1811385	

1)नवजात शिशु यांना बेबी कीट व स्तनदा मातांना पोषक आहार देणे या बाबींसाठी अंदाजपत्रक तयार करणेसाठी कोटेशन मागविण्यात आले आहेत. परंतु सदर कोटेशन मागविणारे दिनांक 22/06/2021 च्या सर्क्युलर ची तपासणी केली असता मोघम स्वरूपात साहित्याचा तपशील टाकण्यात आलेला दिसून येतो. तपशीलवार

माहिती उपलब्ध नसलेने साहित्याचे अपेक्षित प्रमाण, दर्जा, किंमत याचा बोध होत नसलेने प्राप्त झालेल्या कोटेशन मधील किमतीत मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून येते. सबब त्यामध्ये योग्य प्रकारे तुलना झालेली दिसून येत नाही.

2)नगरविकास विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2005/प्र.क्र.255//05/नवि-20 दिनांक 08/11/2010 नुसार एखादी नवीन योजना हाती घ्यावयाची असेल किंवा विद्यमान योजनेच्या अटींमध्ये बदल करावयाचा असल्यास मा.आयुक्त महिला व बालविकास यांची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु सदर योजनेची नस्ती तपासली असता संपूर्ण निविदा प्रक्रिया सन 2021 मध्ये केल्याचे दिसून येते तसेच करारनामा दिनांक 24/09/2021 चा दिसून येतो. परंतु माननीय आयुक्त यांचेकडे तांत्रिक मान्यता मागणीसाठी दिनांक 03/12/2021 रोजी अर्ज केला असून सदर तांत्रिक मान्यता मा. आयुक्त महिला व बालविकास यांचेकडून दिनांक 28/01/2022 ला दिल्याचे दिसून येते. सबब तांत्रिक मान्यता मिळण्याआधी कोणत्या आधारावर निविदा प्रक्रिया करण्यात आली याचा बोध होत नाही.

3)माननीय आयुक्त महिला व बालविकास कडील दिनांक 13/11/2022 कडील पत्रानुसार राज्यातील शहरी भागात नवजात शिशुना आवश्यक ते साहित्य व स्तनदा मातांना पोषक आहार एकात्मिक बालविकास योजने अंतर्गत बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे मार्फत पुरविण्यात येतो. सदर योजनेतून लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना वगळून इतर गरजू लाभार्थ्यांना लाभ देण्याचे या पत्राराद्वारे सुचीत केले असूनही बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या कडून सदर लाभार्थी यांचा तपशील मिळण्या अगोदरच कीट वाटप केले असल्याने दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) सदर योजनेतून किती व कोणत्या लाभार्थ्यांना किट वाटप करण्यात आले, लाभार्थ्यांची निवड, त्यांचे प्रस्ताव याबाबतची माहिती व त्यांची पोहोच लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. इतर कोणत्या योजनेतून बेबी किटचा लाभ मिळाला नाही याचे प्रमाणपत्रही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

5) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 चे अनुच्छेद 63(1)(2) मधील 24 एप्रिल 2015 ची अधिसुचना सुधारणेनुसार कार्य करार करतांना दहा लक्ष पर्यंतच्या रकमांच्या कार्यकराराकरीता रक्कम रुपये 500/- किंमतीचे मुद्रांक शुल्क व दहा लक्षपेक्षा अधिक असेल त्याबाबत प्रत्येकी 1 लाखाला 100/-रुपये मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक व निविदा रक्कम तपासली असता रक्कम रुपये 6445512/- रुपये अंदाजपत्रकीय दिसून येते. सबब एकूण 6000/- रुपये चा मुद्रांक जोडणे आवश्यक असताना फक्त रक्कम रुपये 500/- चा घेतल्याचे दिसून येतो. सबब उर्वरित रक्कम रुपये 5500/- संबंधिताकडून वसूल करून शासन निधीत भरण्यात यावे.

6) सदर देयकांच्या नस्तीस निवीदाधारकांची संख्या 4 असून त्यांचेकडून निवीदा शुल्क घेतल्याच्या पावत्या व बयाणा रक्कम घेतल्याच्या पावत्या उपलब्ध झाल्या नाहीत.

7) महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन परिपत्रक क्र. टीडीएस. 0918/ प्र.क्र. 590118) मोप्र 1 दि. 13.11.2018 मुद्दा क्रमांक 1.3 नुसार कंत्राटदाराने वस्तू व सेवा कर भरणा केल्याच्या पृष्ठर्थ परिपूर्ण प्रमाणित कागदपत्रे सादर केल्यानंतर कार्यकारी अभियात्यानी विभागीय लेखापालामार्फत पडताळणी करून अनुज्ञेय वस्तू व सेवा कराचा परतावा प्रस्ताव मान्य झालेल्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत अदा करणे आवश्यक असताना. परंतु वरील मक्तेदारांनी सदर कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसतानाही त्यांना जीएसटी रककम अदा करण्यात आलेली आहे. सबब सदर प्रमाणित कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करणे आवश्यक आहे. तोपर्यंत 12 टक्के जीएसटी रक्कम रुपये 217368/- आक्षेपाधीन ठेवण्यात येते.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी रक्कम रु.5500/- लेखापरीक्षणामध्ये वसूलपात्र करण्यात येत आहे.

DATRKPF9301 (Ref No : 72, Hmm No : 97)

54 महिला व बालकल्याण विभागांतर्गत स्वातंत्र्यदिन/प्रजासत्ताक दिन कार्यक्रम अंतर्गत खर्चातील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजीचे आर्थिक वर्ष 2020-21-22 लेखापरीक्षण दरम्यान महिला व बालकल्याण विभागातील स्वातंत्र्यदिन/प्रजासत्ताक दिन कार्यक्रम खर्चाच्या देयकांचे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा आढळून आल्या.

आर्थिक वर्ष 2020-21 मधील देयकांचा तपशिल :-

अ.क्र.	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	मक्तेदाराचे नाव	तपशील
1	282	12.11.2020	323910	दगडू सत्याप्पा माने	प्रजासत्ताक दिनानिमित्त राजाराम मैदानामध्ये विद्यार्थ्यांना मसाला दुध,बिस्किटे,फेटे अल्पोपहार पुरविणे
2	283	12.11.2020	305301	दगडू सत्याप्पा माने	लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती 2019 अंतर्गत व्याख्यानमाला,पोवाडा,भीमगीते प्रदर्शित करणे व रॅली काढणेसाठी आवश्यक साहित्य पुरविणे
		एकूण	629211		

1)आर्थिक वर्ष 20-21 मधील उपरोक्त प्रमाणकान्वये करण्यात आलेल्या खर्चासाठीची निविदा प्रक्रिया ही आर्थिक वर्ष 2017-18 मधील वापरण्यात आलेली आहे.ठराव क्र.115 दिनांक 17.09.2019 नुसार पुढील निविदा मंजूर होईपर्यंतचे मुदतवाढ मंजूरी देण्यात आली आहे.सदर ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

2)सदर खर्चास प्रशासकीय, तांत्रिक मंजुरी घेतली नाही.तसेच सदर खर्चाचे अंदाजपत्रक उपलब्ध झाले नाही.

3)निविदा प्रक्रिया उपलब्ध झाली नाही. सदर निविदा प्रक्रियेतील निविदाधारकांची निविदा प्रक्रिया साठीची आवश्यक कागदपत्रे जसे की नोंदणी प्रमाणपत्र,कामाचा अनुभव असलेबाबतचे प्रमाणपत्र,जीएसटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, आधार कार्ड झेरॉक्स, पॅनकार्ड झेरॉक्स लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.तरी सदर निविदाधारकांना काय आधारे पात्र ठरवण्यात आले याबबत खुलासा होत नाही.

4)उपरोक्त खर्च तपशील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देयकांमधून आयकर व GST TDS कपात करण्यात आला आहे, परंतु सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

5)सदरच्या नस्तीस पूर्णत्वाचा दाखला आणि फलश्रुती जोडण्यात आलेली नाही.

याबाबत लेखापरीक्षणास खुलासा सादर करण्यात यावा.

DATRKPF9301 (Ref No : 73, Hmm No : 169)

55 शिक्षण कमिटी अंतर्गत क्रीडांगण विकसित करणे विविध कामातील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	3000.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगर परिषद इचलकरंजी च्या आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणा दरम्यान महिला व बालकल्याण विभागाकडील शिक्षण कमिटी अंतर्गत क्रीडांगण विकसित करणे विविध कामातील अनियमिततांचा तपशील खालीलप्रमाणे:

अ.क्र.	आर्थिक वर्ष	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	कामाचा तपशील	मक्तेदाराचे नाव
1	2020-21	631/563	31.03.2021	405763	प्र.क्र.15 आरगेभवन व्यायाम शाळेसाठी जिम साहित्य पुरविणे.	दर्शन जोशी
2	2021-22	261/431	28.03.2022	620347	प्र.क्र.14 वंदे मातरम क्रीडांगणालगत भगतसिंग व्यायामशाळेमध्ये व्यायाम साहित्य पुरविणे	दर्शन जोशी
			एकूण	1026110		

उपरोक्त नमूद ओपनजीम साहित्य बसविणे प्रक्रियेतील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे:

1)सदरची ओपनजीम साहित्य खरेदी नगरपरिषदेमार्फत निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन उध्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-2016/प्र.क्र.215/ उद्योग-4 दिनांक 24/08/2017 नुसार खरेदीदार विभागास गव्हर्नमेंट - ई मार्केटप्लेस (GEM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांमधून खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि सदरची खरेदी ही आर्थिक वर्ष 2020-21-22 करिता जाहीर ई निविदेच्या पद्धतीने केली आहे. तसेच संबंधित वस्तू व सेवा या GEM पोर्टलवर उपलब्ध नसलेबाबत खरेदी समितीने प्रमाणपत्र दिलेले नाही. सबब सदरची खरेदी प्रक्रिया विहीत शासन निर्णयानुसार करण्यात आलेली नाही.

2)नस्तीस जोडलेल्या जाहिरातीचे अवलोकन केले असता जाहिरातीत कामाचा तपशील नमूद नाही. तसेच कामाचा कालावधी,अंदाजपत्रकीय रक्कम,निविदा फी इत्यादी तपशील नमूद करणेत आलेला नाही. त्यामुळे अधिक तुलनात्मक दराच्या निविदा प्राप्त न झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.- 2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि. 01/12/2016 मधील मुद्दा क्र. 2.9.4 अन्वये खरेदी करताना खरेदी समिती स्थापन करून त्यांनी वस्तूच्या किंमतीचा

वाजवीपणा ठरविणेबाबत परिच्छेद क्र. 3.1.2.2 नुसार बाजारपेठेतील दरांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असून त्यानुसार विहित नमुना परिशिष्ठ 1 मधील विहित नमुन्यात बाजारभावानुसार सदरचे दरपत्रकाद्वारे प्राप्त दर योग्य असलेबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना सदर योजनेसाठी त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4)महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील परिच्छेद 4.2 नुसार दरपत्रके उघडण्याच्या वेळी निविदाकारांचे जे प्रतिनिधी उपस्थित राहतील, त्यांचे एक हजेरीपत्रक ठेवण्यात यावे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच निविदा उघडताना खरेदी समिती सदस्यांच्या स्वाक्ष-या दिनांकासहित व शे-यासहित नमूद नाहीत. हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी व निविदा प्रक्रिया पारदर्शी पार पडण्यासाठी या बाबी महत्त्वाच्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5)शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.-2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि.01/12/2016 मधील मुद्दा क्र. 3.1.2.1 नुसार निवीदा रू.500000/- पर्यंतच्या निवीदेस रू.1000 इतकी निवीदा शुल्क घेणे आवश्यक आहे.सदर देयकांच्या नस्तीस निवीदाधारकांची संख्या 3 असून त्यांचेकडून निवीदा शुल्क घेतल्याच्या पावत्या उपलब्ध झाल्या नाहीत.उक्त देयकातील 3 निवीदाधारकांचे रू.1000 प्रमाणे रू.3000/- इतके निवीदा शुल्क वसूल करून अनुपालन सादर करण्यात यावे. तसेच बयाणा रक्कम घेतल्याच्या पावत्या उपलब्ध झाल्या नाहीत.

6)उपरोक्त खर्च तपशील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देयकांमधून शासकीय कपाती करण्यात आल्या आहे, परंतु सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

7)मक्तेदार दर्शन जोशी यांनी सादर केलेल्या मक्तेदार रजिस्टर सर्टिफिकेटची मुदत 31 मार्च 2019 रोजी संपत असल्याचे दिसून येते. सदर मक्तेदार रजिस्टर सर्टिफिकेटची मुदतवाढ घेतलेची नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. प्रत्यक्षात सदर कामाचा आदेश हा आर्थिक वर्ष 2019-20 मधील आहे. सदर मक्तेदाराचे मक्तेदार रजिस्टर सर्टिफिकेटची मुदत संपली असताना कोणत्या आधारे सदर मक्तेदारास कामाचा आदेश दिला समजून येत नाही,याबाबत खुलासा सादर करण्यात करावा.

8)सदर साहित्याचे उपयोगिता प्रमाणपत्र / विनियोग दाखला लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

9)सदरच्या नस्तीस काम पूर्णत्वाचा दाखला आणि फलश्रुती जोडण्यात आलेली नाही.

10)सदर कामांच्या काम पुर्णत्वाचे फोटो नस्तीस नमूद नाहीत.

11)सदर कामांची मुल्यांकन नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी रक्कम रु.3000/- लेखापरीक्षणामध्ये वसूलपात्र करण्यात येत आहे.

DATRKPF9301 (Ref No : 74, Hmm No : 212)

56 इचलकरंजी नगरपरिषदेकडील राजर्षी छत्रपतीशाहू हायस्कूलमधील विविध कामांबाबत

योजना	:	N P FUND	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	120385.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात न.प. निधीतून केलेल्या राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूलमधील विविध कामांचा तपशिल व अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

कामाचे नांव	1)राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूलमधील सायकल पार्कींग करीता पत्रा शेड उभा करणे.
	2)राजर्षी छ. शाहू हायस्कूलमध्ये स्लायडींग खिडकी बसविणे व दुरूस्ती करणे.
	3)राजर्षी छ. शाहू हायस्कूल मधील चेअरमन केबीन आणि मुख्याध्यापक केबीन करणे आणि रंगकाम करणे.
	4) राजर्षी छ. शाहू हायस्कूल मधील मैदानात मुरूम टाकणे व पसरविणे आणि कंपाऊंड गेट बसविणे.
अंदाजपत्रकीय रककम	1)276240/-
	2)296820/-
	3)266540/-
	4)227280/-
ठराव	1)स्थायी समिती ठराव क्र. 93 दि. 25.11.2019
	2)मा.अध्यक्ष व मुख्याधिकारी यांची समिती ठराव दि. 01.01.2021
	3)मा.अध्यक्ष व मुख्याधिकारी यांची समिती ठराव दि. 01.01.2021
	4) स्थायी समिती ठराव क्र. 93 दि. 25.11.2019
तांत्रिक मंजूरी	1)--
	2)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/651 दि. 4.12.2020
	3)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/649 दि. 4.12.2020
	4)---
मक्तेदाराचे नांव	सुहास किसन शिंगाडे
कामाचा आदेश	1)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. दि. 16.12.2019
	2)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. दि. 20.01.2021
	3)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. दि. 20.01.2021

	4)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. दि. 16.12.2019			
काम क्र. 1)	काम सुरु दिनांक	16.12.2019	काम पुर्ण दिनांक	8.1.2020
काम क्र. 2)	काम सुरु दिनांक	20.1.2021	काम पुर्ण दिनांक	8.2.2021
काम क्र. 3)	काम सुरु दिनांक	20.1.2021	काम पुर्ण दिनांक	15.2.2021
काम क्र. 4)	काम सुरु दिनांक	16.12.2019	काम पुर्ण दिनांक	8.1.2020

मोजमाप पुस्तिका	काम क्र. 1)	MB no. 1111 पृष्ठ क्र. 15	
	काम क्र. 2)	MB no. 176 पृष्ठ क्र. 25	
	काम क्र. 3)	MB no. 176 पृष्ठ क्र. 32	
	काम क्र. 4)	MB no. 1111 पृष्ठ क्र. 11	

कामावरील एकूण खर्च	प्रमाणक क्रमांक	दिनांक	खर्च
काम क्र. 1)	34/123	8.3.2021	289754
काम क्र. 2)	214/383	27.1.2022	289248
काम क्र. 3)	615/701	31.3.2022	264322
काम क्र. 4)	36/125	8.3.2021	232721
		एकूण	1076045

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/2018/प्र.क्र. 127/इमा-2 मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रीयेअंतर्गत निविदा तपासणी, स्विकृती देयके अदा करणे व निविदा अंतिम झाल्यानंतर उत्तरदायित्वाबाबत सुधारित सूचनानुसार निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुपये 500 च्या मुद्रांकासह लिफाफा क्रमांक 1 मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार निविदाधारकाकडून प्रत्येकी रुपये 500/- प्रमाणे प्रतिकाम एकूण रुपये 1500/- प्रमाणे 4 कामांचे रू. 6000/- वसुल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

2)करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 9 / 18 नुसार कामासाठी वापरण्यात येणा-या साहित्याची तसेच केलेल्या कामाची प्रतवारी चांगली असलेबाबत योग्य त्या प्रयोगशाळेतून तपासणी करून ती चांगली असल्याची खात्री झाल्यानंतरच देयक आदा करावयाचे आहे. करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 6(ब) नुसार सुरक्षा ठेवीची 9% रक्कम 6 महिन्यानंतर कामाची प्रत योग्य असेल तरच मक्तेदारास परत करावयाची आहे.

नस्तीसोबत कामात वापरण्यात आलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाहीत.

3)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास खालीलप्रमाणे रक्कम रु. 114385/- आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 114385/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

कामाचा अ.क्र.	मुल्यांकन र.रू.	जीएसटी 12% र.रू.
1	256420	30770
2	255971	30717
3	233957	28075
4	206862	24823
	एकूण	114385

4)नपा संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रं. 36 मधील निविदा मंजूरीखालील मुद्दा क्रं. 45 प्रमाणे नगरविकास विभागाकडुन शासन परिपत्रक क्र. जीईएन/1093/2365/प्रक्र 126/93 नवी 14 दिनांक 20 ऑक्टोबर 1993 नुसार नपाच्या विविध कामासाठी निविदा मागविण्याच्या/ स्विकारण्याच्या संदर्भात काही मार्गदर्शक सूचना परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्राप्त निविदा अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जादा रकमेच्या असल्या तर त्या अंदापत्रकातील रकमेपेक्षा का जादा आहेत याचे बाबनिहाय परिक्षण करुन निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनेचे काटेकोर पालन करणे बाबत निर्देशित केले आहे तसेच स्थायी निर्देश क्र. 36 मधील मुद्दा क्रं. 45 व 46 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना, नगरपरिषदेने काम क्र. 1 व काम क्र. 4 या दोन्ही कामांच्या निविदा 4.9 टक्के जादा दराने स्वीकारल्याने रू. 21640/- अनावश्यक जादा खर्च झालेला आहे.

5)उपरोक्त सर्व कामांच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत व काम क्र. 1 व काम क्र. 4 च्या तांत्रीक मान्यता लेखापरीक्षणास सादर करण्यात आल्या नाहीत.

वरील बाबींची पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये 120385/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 112, Hmm No : 121)

57 आरोग्य विभागाकडील अर्सेनिक अल्बम गोळया खरेदी व वाटपाबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	9696.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात इचलकरंजी शहरातील 50 वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या नागरिकांचा महा-आयुष सर्वे करून त्यांना रोग प्रतिकारक शक्ती वाढवणे कामी अर्सेनिक अल्बम गोळ्या खरेदी करून वाटप करण्यात आलेल्या आहेत त्याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

	तपशील
फंड	14 वा वित्त आयोग व न.प.निधी
अंदाजपत्रकीय रक्कम	540000/-
ठराव	कौ.ठ.क्र.09,दि-16/09/2020 अ.क्र.10 अन्वये
जाहीर निविदा व आदेश	ई-निविदा जा.क्र/आरोग्य/निविदा सूचना/772/20-21, नगरपरिषद इचलकरंजी कार्यालय,इचलकरंजी दि.-06/07/2020 (कार्योत्तर मान्यता)
जाहिरात	दै.राष्ट्रगीत/महानकार्य
निविदाधारक	एस.एम.मेडिकल
वर्क ऑर्डर	जा.क्र/इनप /764 /2020 इ.न.प. इचलकरंजी दि.22/07/2020
खर्चाचे प्रमाणक क्र. व दिनांक	89/29.09.2020
एकूण खर्च	484800/-

1)सदर खर्चान्वये 50 वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या नागरिकांना अर्सेनिक अल्बमच्या 24 नगांचे 60000 पॅकेट खरेदी करून वाटप करण्यात आले आहे. अर्सेनिक अल्बम गोळ्या पुरवठा केल्याचे पोहोच सदर नस्ती सोबत उपलब्ध झाले नाही. तसेच वाटपाबाबतच्या परिपूर्ण नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे पुरवठ्याबाबत ताळमेळ घेता आला नाही.

2)खरेदी केलेल्या 60000 पॅकेट गोळ्या संपूर्णपणे वाटप करण्यात आलेल्या नाहीत. साठा आरोग्य विभागाच्या साठा नोंद वहीतील पान क्र 151 वर सदर गोळ्यांच्या वाटपाबाबत नोंदी घेण्यात आलेल्या आहेत त्या वरून 14250 पॅकेट गोळ्या शिल्लक असल्याचे दिसून येते. त्यामुळे आवश्यकतेपेक्षा जास्त गोळ्या खरेदी केल्या आहेत किंवा कसे तसेच खरेदी केलेल्या गोळ्यांचा पुरवठा 100 टक्के का केला नाही याबाबत खात्री होत नाही. सदर शिल्लक 14250 पॅकेट गोळ्याचे मंजूर दर 8.08 रु प्रमाणे रक्कम रुपये 115140/- तात्पुरते अमान्य करण्यात येत आहे.

3) करारपत्रात नमूद केलेप्रमाणे अटी व शर्ती क्र. 3 नुसार पुरवणेत आलेले अर्सेनिक अल्बम 30 गोळ्यांची एक्सपायरी दिनांक नमूद नाही त्यामुळे सदरच्या गोळ्या स्पेसिफिकेशन प्रमाणे आहे किंवा कसे याबाबत खात्री होत नाही.

4)निविदा प्रक्रियेबाबत अभिलेख्यांचे लेखापरीक्षण केले असता सदर मक्तेदाराचे जीएसटी रजिस्ट्रेशन बाबत कोणतेही अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत तसेच सदर खर्चाच्या बिल क्र.315 दि 17/08/2020 रोजीच्या पुरवठा बिलावरही जीएसटी कपाती बाबत नमूद नाही. तसेच शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 2018/प्र.क्र.144 2018/कोषा

प्रशा-5 दि.28 सप्टेंबर 2018 मधील (5) अन्वये वस्तू किंवा सेवा अथवा दोन्ही यांच्या पुरवठ्यासाठी करावयाच्या प्रदानावेळी जर सदरहू पुरवठ्याची संविदा करपात्र वस्तू किंवा सेवा अथवा दोन्हीच्या संदर्भात असेल व त्या संविदेचे मूल्य 250000/- रकमेच्या वर असल्यास अशी वजावट करणे बंधनकारक आहे तरी 2 टक्के जीएसटी रक्कम रुपये 9696/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

DATPDDF9401 (Ref No : 42, Hmm No : 182)

58 आरोग्य विभागाकडील जंतुनाशके व द्रव्ये खरेदी खर्चातील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजीचे आर्थिक वर्ष 2020-21-22 लेखापरीक्षण दरम्यान आरोग्य विभागाकडील जंतुनाशके व द्रव्ये खरेदी देयकांचे लेखापरीक्षण केले असता खालील उणीवा आढळून आल्या.

देयकांचा तपशिल(आर्थिक वर्ष 2020-21) :-

अ.क्र.	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	मक्तेदाराचे नाव	तपशील
1	106	12.11.2020	2242730	डॉल्फिन सेल्स कार्पोरेशन	MALL ALL 5 जंतुनाशक (23000 किलो खरेदी)
2	105	12.11.2020	1121365	डॉल्फिन सेल्स कार्पोरेशन	MALL ALL 5 जंतुनाशक (11500 किलो खरेदी)(जादा खरेदी)
3	107	12.11.2020	720500	श्रीराम ॲग्रो एजन्सी	फ्लायगॉन 76% EC कीटकनाशक (500 लि.खरेदी)
4	141	16.10.2020	360250	श्रीराम ॲग्रो एजन्सी	फ्लायगॉन 76% EC कीटकनाशक (250 लि.खरेदी)-जादा खरेदी
5	104	12.11.2020	297000	डॉल्फिन सेल्स कार्पोरेशन	लार्वाटिक्स कीटकनाशक (50 लि.खरेदी)
6	140	16.10.2020	546675	श्रीराम ॲग्रो एजन्सी	ब्लॅक बेल्ट फिनेल कीटकनाशक (1500 लि.खरेदी)जादा खरेदी
		एकूण	5288520		

देयकांचा तपशिल(आर्थिक वर्ष 2021-22) :-

अ.क्र.	प्र.क्र.	दिनांक	रक्कम	मक्तेदाराचे नाव	तपशील
1	106	15.03.2022	1093350	श्रीराम ॲग्रो एजन्सी	ब्लॅक बेल्ट फिनेल कीटकनाशक (3000 लि.खरेदी)
2	107	15.03.2022	1247040	रमेश ॲग्रो कार्पोरेशन	ओडोट्रिट ऑडर कॅन्ट्रोल पावडर
		एकूण	2340390		

1)आयुक्त तथा नगरपरिषद संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्र. 36 दि. 29.12.2005 मधील बाब क्र. 09 नगरपरिषदेने निविदा मागविण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी घेवून तांत्रिक मंजुरी घेतल्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 72 अन्वये प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु तांत्रिक, प्रशासकीय मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2)सदर जंतुनाशके व किटकनाशके औषधे उत्कृष्ट दर्जाचे असल्याबाबत दि इंडियन इंस्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स यांचा तपासणी अहवाल नस्तीसोबत आढळून आला नाही.

3)आर्थिक वर्ष 2020-21 मध्ये लार्वाटेक्स कीटकनाशकाची 50 लि.खरेदी करण्यात आली आहे. सदर कीटकनाशक खरेदीची निविदा प्रक्रियेची नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

4)काही जंतूनाशकाची अंदाजपत्रकापेक्षा जादा खरेदी करण्यात आली असून जादा खरेदी मंजुरीचा स्थायी समितीचा ठराव उपलब्ध नाही.तसेच जादा खरेदीच्या देयकातून सुरक्षा अनामत कपात करण्यात आलेली नाही.

5)ब्लॅक बेल्ट फिनेल कीटकनाशकाच्या बिलांवर तसेच डिलिवरी चलनावर कीटकनाशक निर्मिती तारीख,वापराची अंतिम तारीख व batch नंबर नमूद नाहीत,त्यामुळे सदर कीटकनाशक वापरण्यायोग्य गुणवत्तेची असल्याची खात्री करता येत नाही.

6)वरील पैकी एकाही जंतुनाशकाची साठानोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे त्याचा वापर कुठे व कसा केला याच्या नोंदी लेखापरीक्षणात तपासणी करता आली नाही. त्यामुळे सदर खरेदीचा वापर योग्य प्रकारे झाला किवा कसे हे समजू शकत नाही.

7)नपा सुधारित लेखासंहिता दिनांक 23 जानेवारी 2013 मधील प्रकरण 17 वस्तुसुची अंतर्गत नियम 250 प्रमाणे वस्तुची नोंदवही ही कायम अभिलेख असुन ती प्राधिकृत अधिकाऱ्याच्या वैयक्तिक पर्यवेक्षणाखाली ठेवण्यात आली पाहिजे.तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8)स्टोअर विभागाकडे वस्तु सुची प्राप्त करण्याच्या कार्यपध्दतीबाबत नियम क्रं. 256 प्रमाणे वस्तुची मागणी प्राप्त झालेनंतर त्या वस्तु स्विकारुन भांडार अधिकारी यांनी पडताळणी करुन मोजमाप करुन व आवश्यकतेप्रमाणे माल वितरीत करेल व वितरण चलनास भांडार अधिकाऱ्याकडुन पोचपावती देण्यात येईल. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9)माल पुरविण्याची चलने इत्यादि ची नस्ती संग्रही ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

10)लेखासंहिता नियम क्रं. 254 प्रमाणे साहित्य प्राप्त टिपणी 3 प्रतीत तयार करुन एक प्रत मागणी पत्र केलेल्या /मालाची मागणी केलेल्या विभागाकडे पाठविले पाहिजे साहित्य प्राप्त टिपणीव्दारे नमुना क्रं.21 मध्ये ठेवण्यात

आलेल्या वस्तुसुची नोंदवहीमध्ये साहित्य प्राप्त झाल्याची नोंद करण्यात येईल.

11)सुधारित लेखासंहितेतील नियम क्रं. 256 प्रमाणे वस्तुसुची पुरवठादाराकडुन प्राप्त झालेली देयके, नियम 257 प्रमाणे देयकाची छाननी, नियम 258 ते 264 प्रमाणे साहित्य देणे व नियम क्रं. 265 प्रमाणे साहित्य परत करणे इत्यादि बाबीची नियमाप्रमाणे पुर्तता करणे आवश्यक आहे.

12)उपरोक्त खर्च तपशील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देयकांमधून आयकर व GST TDS कपात करण्यात आला आहे, परंतु सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

सदरच्या अनियमीततेबाबत खुलासा सादर करणेत यावा.

DATRKPF9301 (Ref No : 76, Hmm No : 176)

59 वॉर्ड 13 मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न.प. सुचनेप्रमाणे जमा करणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

कामाचे नाव	वॉर्ड 13 मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न.प. सुचनेप्रमाणे जमा करणे
लेखा शि र्षक	14 वा वzwj;ित्zwj;त आयोग
अंदाजपत्रकीय रक्कम	5822445/- ठराव क्र. 06, दि. 31/05/2018
प्रशासकिय मान्यता	मा.जिल्हाधिकारी यांचे आदेश क्र. कार्या.11/नपा/एस.आर./375/इ/19,दि. 11/09/2019 क्र. कार्या11/नपा/आरआर/670/इ/2021दि.04/01/2021 क्र.कार्या.11/नपा/प्र.मा/एसआर/18/ब/2021,दि.20/09/2021
तांत्रिक मान्यता	नस्तीसोबत नाही
ठराव	क्र. 108 ,दि. 18/08/2018 ने मंजुर क्र. 94 ,दि. 16/09/2020 ने मंजुर 1 वर्ष मुदतवाढ क्र.87, दि.06/08/2021 ने मंजुर
निविदा	ई निविदा ठराव क्र. 108 ,दि. 18/08/2018 ने मंजुर

मक्तेदाराचे नाव	1) श्री अनिल आबासो शिंदे अंदाजपत्रकीय दराने 2)zwj; श्री संतोष ग मोने अंदाजपत्रकीय दराच्या 7 टक्के जादा 3) श्री राहुल रोहिदास गायकवाड अंदाजपत्रकीय दराच्या 10 टक्के जादा
कामाचा आदेश	क्र. इनप/आरोग्य/504 /2019,दि. 31/08/2019 मुदतवाढ- कौ.ठ.क्र.74,दि. 16/09/2020 ने 1 वर्षासाठी मुदतवाढ क्र.इपन/596(1)वशि/2021,दि.22/12/2021
काम सुरू दिनांक	01/09/2020 ते 31/08/2021 01/09/2021 ते 31/03/2022
काम पुर्ण दिनांक	31/03/2022
मोजमाप zwj; zwj; पुस्तिका	विहीत नमुन्यात ठेवण्यात आली नाही

सन 2020-21 मधील खर्च			सन 2021-22 मधील खर्च		
प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम
10	21/05/2020	397987	128	13/07/2021	402087
31	15/06/2020	411302	129	13/07/2021	415427
40	30/07/2020	398014	194	27/10/2021	415533
74	20/08/2020	411298	195	27/10/2021	415521
83	15/09/2020	411283	196	27/10/2021	402176
207	11/02/2021	401994	350	10/02/2022	402194
208	11/02/2021	415384	351	10/02/2022	415582
209	11/02/2021	401966	352	10/02/2022	402140
210	11/02/2021	415411	353	10/02/2022	415561
226	31/03/2021	414390			
227	31/03/2021	375289			
228	31/03/2021	414416			

एकूण		**4868734**			**3686221**

खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नस्तीची तपासणी केली असता स्थायी निर्देश क्र.36 मधील नियम 33 नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. 1 लाख ते 1 कोटी या दरम्याने असेल तर निविदा सुचनांना जास्तीत जास्त प्रसिध्दी देणेसाठी अ प्रमाणे राज्य स्तरीय दैनिक व ब प्रमाणे 20000 प्रती खप असलेले जिल्हास्तरीय दैनिक मध्ये जाहीरात देणे आवश्यक होते तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार नियम क्र. 466 परिशिष्ट 3 मधील खंड 19 मधील तरतुदीनुसार 5 लक्ष ते 50 लक्ष पर्यंतच्या अंदाजपत्रक रकमेच्या निविदा कोणत्याही राज्य स्तरीय दैनिक व दैनंदिन 20000 विक्री असणारे जिल्हास्तरीय दैनिकामध्ये जाहीरात देणे आवश्यक असताना तशी जाहीरात नगरपरिषदेने दिलेली नाही. नगरपरिषदेने निविदा जाहीरात ही दै.सकाळ व दै. पुढारी या वर्तमान पत्रात जाहीरात दिल्याने सदर निविदेला व्यापक प्रसिध्दी मिळालीनाही त्यामुळे नगरपरिषदेचे नुकसान झाले आहे.

2) मोजमाप नोंदवही महाराष्ट्र नगरपरिष्द लेखासंहिता 2011 नुसार नमुना न.33 ठेवणे आवश्यक असताना तशी न ठेवता ती रजिष्टरमध्ये नोंदवून मक्तेदाराला रक्कम अदा केली आहे.

3) घनकचरा व्यास्थापन शासन निर्णय दि.26/10/2006 च्या परिच्छेक्रमांक 21 नुसार सर्व प्रभागासाठी व कचरा प्रक्रियेसाठी एकच निविदा देवून त्यातून बहूव्याप्त कंपनीस कंत्राट दिले असते तर घनकचरा व्यवस्थापेनवर नगरपरिषदेचे संनियंत्रण योग्य रितीने झाले असते परंतू नगरपरिषदेने मक्तेदाराच्या सोयीनुसार वेगवेगळया प्रभागानुसार निविदा मागविल्याचे zwj; दिसून येते. शासन निर्णयाचे उल्ल्घन केल्याचे दिसून येते.

4) सदर देयकातून आयकर व विमा कपात केल्याचे दिसून येते पंरतू शासन खाती भरणा पावती लेखापरिक्षणास तपासणीसाठी उपलब्ध झाली नाहीत.

5) करारनाम्यातील अट क्र.9 नुसार साफसफाईच्या कामावर कमीत कमी 29 कर्मचारी हजर असणे आवश्यक असून त्यांची रोजच्या रोज स्वच्छता निरिक्षक यांचेकडून हजेरी घेणे आवश्यक आहे त्याप्रमाणे देयकासोबत हजेरी पत्रक जोडले नसल्यामुळे अदा करण्यात आलेल्या देयकाची ते योग्य असलेबाबत खात्री होत नाही.

6) करारनाम्यातील अट क्र. 33 नुसार zwj; कामावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची zwj; प्रॉव्हिडंट फंड भरणे बाबतची चलनाची प्रत सादर केल्यानंतर देयक अदा करणे आवश्यक आहे परंतू देयकासोबत कर्मचा-यांची zwj; प्रॉव्हिडंट फंड भरणे बाबतची चलने देयकासोबत जोडली नसल्यामुळे सदर अटीचे पालन केल्याची खात्री पटवावी.

7) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता एका सफाई कर्मचा-याची एक दिवसाची सफाई क्षमता 50000 चौरस फुट रस्ता व 800 मीटर रनिंग मीटर गटर सफाई करणे अशी असल्याचे नमूद आहे. परंतू हे प्रमाण कोणत्या आधारे घेण्यात आले याचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत त्यामुळे सदर कामासाठी 28 कर्मचारी व एक सुपरवायझर असे एकूण 29 कर्मचारी संख्या कोणत्या आधारे zwj; निश्चीत करण्यात आली हे समजून येत नाही.

8) नस्तीची तपासणी केली असता रस्ते 1364075 चौ.फुट व गटारी 27219 रनिंग मीटर स्वच्छता निरीक्षक यांनी प्रमाणीत केले आहे परंतू याबाबत लेखापरिक्षणाची खात्री होत नाही. सदर रस्त्याचीं व गटारींची मापे इंजिनियर बांधकाम विभाग यांच्याकडून प्रमाणीत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

9) वॉर्डमधील दैनिक कचरा सफाई अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे प्रमाणकादवारे अदा केलेली रक्कम योग्य असल्याबाबतची खात्री होत नाही.

DATABPM8101 (Ref No : 98, Hmm No : 44)

60 वॉर्ड 21 मधील (अंशता) रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न.प. सुचनेप्रमाणे जमा करणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 3900.00/-

कामाचे नाव	वॉर्ड 21 मधील (अंशता) रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न.प. सुचनेप्रमाणे जमा करणे
लेखा शि र्षक	14 वा वित्त् आयोग
अंदाजपत्रकीय रक्कम	4841268/- ठराव क्र. 06, दि. 31/05/2018
प्रशासकिय मान्यता	मा.जिल्हाधिकारी यांचे आदेश क्र. कार्या.11/नपा/एस.आर./375/इ/19,दि. 11/09/2019 क्र. कार्या11/नपा/आरआर/670/इ/2021दि.04/01/2021 क्र.कार्या.11/नपा/प्र.मा/एसआर/18/ब/2021,दि.20/09/2021
तांत्रिक मान्यता	नस्तीसोबत नाही
ठराव	क्र. 108 ,दि. 18/08/2018 ने मंजुर क्र. 74 ,दि. 16/09/2020 ने मंजुर 1 वर्ष मुदतवाढ क्र.87, दि.06/08/2021 ने मंजुर
निविदा	ई निविदा ठराव क्र. 108 ,दि. 18/08/2018 ने मंजुर
मक्तेदाराचे नाव	1) श्री अनिल नबि zwj; शिकलगार अंदाजपत्रकीय दराने 2) श्री संतोष ग मोने अंदाजपत्रकीय दराच्या 2.5 टक्के जादा 3) श्री राहुल रोहिदास गायकवाड अंदाजपत्रकीय दराच्या 5 टक्के जादा
कामाचा आदेश	क्र. इनप/आरोग्य/ /2019,दि. 31/08/2019

	मुदतवाढ- कौ.ठ.क्र.74,दि. 16/09/2020 ने 1 वर्षासाठी मुदतवाढ क्र.इपन/596/1वशि/2021,दि.22/12/2021
काम सुरू दिनांक	01/09/2020 ते 31/08/2021 01/09/2021 ते 31/03/2022
काम पुर्ण दिनांक	31/03/2022
मोजमाप पुस्तिका	विहीत नमुन्यात ठेवण्यात आली नाही

सन 2020-21 मधील खर्च			सन 2021-22 मधील खर्च		
प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम
09	21/05/2020	328986	82	07/05/2021	343604
34	01/06/2020	340134	83	07/05/2021	310278
50	05/08/2020	329081	114	30/06/2021	343681
73	20/08/2020	340185	115	----//----	332603
84	12/09/2020	340220	151	12/08/2021	332569
189	11/02/2021	343624	199	27/10/2021	343670
190	11/02/2021	332525	200	----//----	343752
194	11/02/2021	343882	375	10/02/2021	343634
195	11/02/2021	332482	376	----//---	332557
234	31/03/2021	343659	377	----//----	343626
			378	----//----	332526
			388	14/03/2022	343702
			415	**14/03/2022**	**310354**
एकूण		**3374778**			**4356556**

याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नस्तीची तपासणी केली असता स्थायी निर्देश क्र.36 मधील नियम 33 नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. 1 लाख ते 1 कोटी या दरम्याने असेल तर निविदा सुचनांना जास्तीत जास्त प्रसिध्दी देणेसाठी अ प्रमाणे राज्य स्तरीय

दैनिक व ब प्रमाणे 20000 प्रती खप असलेले जिल्हास्तरीय दैनिक मध्ये जाहीरात देणे आवश्यक होते तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार नियम क्र. 466 परिशिष्ट्र 3 मधील खंड 19 मधील तरतुदीनुसार 5 लक्ष ते 50 लक्ष पर्यंतच्या अंदाजपत्रक रकमेच्या निविदा कोणत्याही राज्य स्तरीय दैनिक व दैनंदिन 20000 विक्री असणारे जिल्हास्तरीय दैनिकामध्ये जाहीरात देणे आवश्यक असताना तशी जाहीरात नगरपरिषदेने दिलेली नाही. नगरपरिषदेने निविदा जाहीरात ही दै.सकाळ व दै. पुढारी या वर्तमान पत्रात जाहीरात दिल्याने सदर निविदेला व्यापक प्रसिध्दी मिळालीनाही त्यामुळे नगरपरिषदेचे नुकसान झाले आहे.

2) श्री विठठल रामभाऊ जाधव यांचे नस्तीसोबत अनुभवाबाबतचे कागदपत्र जोडले असताना त्यांना निविदा प्रक्रियेतून अपात्र का ठरवले याबाबत समर्पक खुलासा करावा.

3) मंजूर केलेल्या कामाचे मक्तेदाराकडुन करारनामा करुन घेताना मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 34 व शासन परिपत्रक क्रं. ZPA/2009/वित्त 9/दिनांक 20/11/2009 च्या तरतूदीनुसार रुपये 10 लाखापर्यंत रुपये 500/- चा मुद्रांक घेणे व पुढील 1 लाखास रुपये 100/- चा मुद्रांक घेणे आवश्यक आहे. सन 2020-21 साठी रू. 4400/- च्या मुद्रांक शुल्कावर करार करणे आवश्यक असताना तो रू. 500/- केलेला आहे. कमी मुद्रांक शुल्क रू. 3900/- वसुली करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

4) मोजमाप नोंदवही महाराष्ट्र नगरपरिष्द लेखासंहिता 2011 नुसार नमुना न.33 ठेवणे आवश्यक असताना तशी न ठेवता ती रजिष्टरमध्ये नोंदवून मक्तेदाराला रक्कम अदा केली आहे.

5) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता एका सफाई कर्मचा-याची एक दिवसाची सफाई क्षमता 50000 चौरस फुट रस्ता व 800 मीटर रनिंग मीटर गटर सफाई करणे अशी असल्याचे नमूद आहे. परंतू हे प्रमाण कोणत्या आधारे घेण्यात आले याचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत त्यामुळे सदर कामासाठी 28 कर्मचारी व एक सुपरवायझर असे एकूण 29 कर्मचारी संख्या कोणत्या आधारे निश्चीत करण्यात आली हे समजून येत नाही.

6) करारनाम्यातील अट क्र.9 नुसार साफसफाईच्या कामावर कमीत कमी 29 कर्मचारी हजर असणे आवश्यक असून त्यांची रोजच्या रोज स्वच्छता निरिक्षक यांचेकडून हजेरी घेणे आवश्यक आहे त्याप्रमाणे देयकासोबत हजेरी पत्रक जोडले नसल्यामुळे अदा करण्यात आलेल्या देयकाची ते योग्य असलेबाबत खात्री होत नाही.

7) घनकचरा व्यास्थापन शासन निर्णय दि.26/10/2006 च्या परिच्छेक्रमांक 21 नुसार सर्व प्रभागासाठी व कचरा प्रक्रियेसाठी एकच निविदा देवून त्यातून बहूव्याप्त कंपनीस कंत्राट दिले असते तर घनकचरा व्यवस्थापेनवर नगरपरिषदेचे संनियंत्रण योग्य रितीने झाले असते परंतू नगरपरिषदेने मक्तेदाराच्या सोयीनुसार वेगवेगळया प्रभागानुसार निविदा मागविल्याचे दिसून येते. शासन निर्णयाचे उल्ल्घन केल्याचे दिसून येते.

8) सदर देयकातून आयकर व विमा कपात केल्याचे दिसून येते पंरतू शासन खाती भरणा पावती लेखापरिक्षणास तपासणीसाठी उपलब्ध झाली नाहीत.

9) करारनाम्यातील अट क्र.9 नुसार साफसफाईच्या कामावर कमीत कमी 29 कर्मचारी हजर असणे आवश्यक असून त्यांची रोजच्या रोज स्वच्छता निरिक्षक यांचेकडून हजेरी घेणे आवश्यक आहे त्याप्रमाणे देयकासोबत हजेरी पत्रक जोडले नसल्यामुळे अदा करण्यात आलेल्या देयकाची ते योग्य असलेबाबत खात्री होत नाही.

10) करारनाम्यातील अट क्र. 33 नुसार कामावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची प्रॉव्हिडंट फंड भरणे बाबतची चलनाची प्रत सादर केल्यानंतर देयक अदा करणे आवश्यक आहे परंतू देयकासोबत कर्मचा-यांची प्रॉव्हिडंट फंड भरणे बाबतची चलने देयकासोबत जोडली नसल्यामुळे सदर अटीचे पालन केल्याची खात्री पटवावी.

11) नस्तीची तपासणी केली असता रस्ते 1364075 चौ.फुट व गटारी 27219 रनिंग मीटर स्वच्छता निरीक्षक यांनी प्रमाणीत केले आहे परंतू याबाबत लेखापरिक्षणाची खात्री होत नाही. सदर रस्त्याचीं व गटारींची मापे इंजिनियर बांधकाम विभाग यांच्याकडून प्रमाणीत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

12) वॉर्डमधील दैनिक कचरा सफाई अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे प्रमाणकादवारे अदा केलेली रक्कम योग्य असल्याबाबतची खात्री होत नाही.

DATABPM8101 (Ref No : 99, Hmm No : 207)

61 वॉर्ड 21 मधील डेक्कमील समोर दररोज आणि इंदिरा परिसरात मंगळवार व शुक्रवार या दिवशी आठवडा बाजार स्वच्छता व कचरा उठाव करणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 1672203.00/-

कामाचे नाव	वॉर्ड 21 मधील डेक्कनमील समोर दररोज आणि इंदिरा परिसरात मंगळवार व शुक्रवार या दिवशी आठवडा बाजार स्वच्छता व कचरा उठाव करणे
लेखा शि र्षक	14 वा वित्तzwj; आयोग
अंदाजपत्रकीय रक्कम	1122000/- कौ.ठ.क्र.231, 30/01/2020
प्रशासकिय मान्यता	मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचे आदेश क्र. कार्या.11/नपा/प्रमा/एसआर/17ब/2021, दि.20/09/2021
तांत्रिक मान्यता	नस्तीसोबत जोडलेली नाही
ठराव	स्थायी समिती ठराव क्र. 180,दि.24/03/2020
निविदा मंजुर दर	ई-निविदा अंदाजपत्रकीय दराने
मक्तेदाराचे नाव	1) श्री अनिल नबि zwj; शिकलगार अंदाजपत्रकीय दराने 2)zwj; श्री मनिष महादेव मेटे अंदाजपत्रकीय दराच्या 7 टक्के जादा 3) श्री एकनाथ पाथरवट अंदाजपत्रकीय दराच्या 5 टक्के जादा
कामाचा आदेश	मुख्याधिकारी, इचलकरंजी यांचे आदेश क्र. जा.क्र.इनप/ 2020, दि.31/03/2020
काम सुरू दिनांक	01/04/2020

कामाची मुदत	मुदतवाढीचे आदेश नस्तीसोबत नाहीत
मोजमाप zwj; पु सतिका	विहीत नमुन्यात ठेवण्यात आली नाही

सन 2020-21 मधील खर्च			सन 2021-22 मधील खर्च		
प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम
51	05/08/2020	39354	163	07/09/2021	81380
117	23/10/2020	46378	389	14/03/2022	63778
118	23/10/2020	78764	390	14/03/2022	41754
155	19/01/2021	85589	391	14/03/2022	44359
191	11/02/2021	79507	392	14/03/2022	87007
192	----//---	88506	393	14/03/2022	86257
193	---//---	85362	394	14/03/2022	85362
231	31/03/2021	87007	395	14/03/2022	84757
232	---//---	80687	396	14/03/2022	86930
233	---//---	87757	397	14/03/2022	86257
			398	14/03/2022	84764
			414	28/03/2022	80687
एकूण		**758911**			**913292**

याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वॉर्ड नं.21(अंशता) मधील रस्ते, गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न.प.ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे या कामाचा ठेका श्री अनिल नबी zwj; शिकलगार यांना सन 2021-21 व 2021-22 साठी zwj;दिला आहे. त्यासंबंधीचा करार हा करारनामा क्र.AX498958 दि.17/08/2020 व करारनामा AZ590895 दि. 24/09/2021 करार केला आहे. करारमान्यातील अट क्र.26 नुसार माझ्याकडे(मक्तेदाराकडे) मक्त्याने असणारे विभागात येणारे भाजी मार्केट, आठवडाबाजार यांची दैनंदिन साफसफाई करेन असे नमूद असताना मक्तेदाराला सदर वॉर्ड मधील आठवडाबाजाराची देयके वरील प्रमाणे सन 2020-21 मध्ये रू.758911/- व 2021-22 मध्ये रू. 913292/- अशी एकूण रू.1672203/- अदा केली आहेत. तरी सदर रक्कम रू. 1672203/- लेखापरिक्षणास कायम स्वरूपी मान्य करता येणार नाही तरी सदर रक्कम रू. 1672203/- संबंधित मक्तेदाराकडून वसुल करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी. सदर करारनाम्यावर आरोग्य अधिकारी, मुख्याधिकारी न.प. इचलकरंजी यांच्या स्वाक्ष-या असताना त्यांनी करारनाम्याचे अवलोकन न करता रक्कम मक्तेदारास अदा करून नगरपरिषदेचे नुकसान केले आहे त्यामुळे zwj; अधिका-यांनासुध्दा जबाबदार धरून कारवाई का करण्यात येवू

नये याबाबत समर्पक खुलासा करावा.

2) नस्तीची तपासणी केली असता स्थायी निर्देश क्र.36 मधील नियम 33 नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. 1 लाख ते 1 कोटी या दरम्याने असेल तर निविदा सुचनांना जास्तीत जास्त प्रसिध्दी देणेसाठी अ प्रमाणे राज्य स्तरीय दैनिक व ब प्रमाणे 20000 प्रती खप असलेले जिल्हास्तरीय दैनिक मध्ये जाहीरात देणे आवश्यक होते तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार नियम क्र. 466 परिशिष्ट्र 3 मधील खंड 19 मधील तरतुदीनुसार 5 लक्ष ते 50 लक्ष पर्यंतच्या अंदाजपत्रक रकमेच्या निविदा कोणत्याही राज्य स्तरीय दैनिक व दैनंदिन 20000 विक्री असणारे जिल्हास्तरीय दैनिकामध्ये जाहीरात देणे आवश्यक असताना तशी जाहीरात नगरपरिषदेने दिलेली नाही. नगरपरिषदेने निविदा जाहीरात ही दै. राष्ट्रगीत या एकाच वर्तमान पत्रात जाहीरात दिल्याने सदर निविदेला व्यापक प्रसिध्दी मिळालीनाही त्यामुळे नगरपरिषदेचे नुकसान झाले आहे.

3) मंजूर केलेल्या कामाचे मक्तेदाराकडुन करारनामा करुन घेताना मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 34 व शासन परिपत्रक क्रं. ZPA/2009/वित्त 9/दिनांक 20/11/2009 च्या तरतूदीनुसार रुपये 10 लाखापर्यंत रुपये 500/- चा मुद्रांक घेणे व पुढील 1 लाखास रुपये 100/- चा मुद्रांक घेणे आवश्यक आहे.

4) मोजमाप नोंदवही महाराष्ट्र नगरपरिष्द लेखासंहिता 2011 नुसार नमुना न.33 ठेवणे आवश्यक असताना तशी न ठेवता ती रजिष्टरमध्ये नोंदवून मक्तेदाराला रक्कम अदा केली आहे.

5) नस्ती तपासली असता मक्तेदार श्री मनिष महादेव मेटे यांचे मक्तेदार रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटवर सन 2019-20 साठीची आहे. सन सर्टीफिकेट पाहता त्यावर सदरचे रजिस्ट्रेशन दि.31/03/2020 साठी आहे. त्या पुढील कालावधीसाठी फेरनोंदणी केल्याशिवाय नविन कामासाठी निविदा भरता येणार नाही असे असताना सन 2020-21 साठि नव्योन रजिस्ट्रेशन करणे आवश्यक होते पंरतू तसे zwj; रजिस्ट्रेशन केले नाही. याचाच अर्थ सन 2020-21 साठी मक्तेदार रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट नसताना सदर निविदा धारकाला निविदा प्रक्रियेतून बाद करून नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

6) मेक्तेदार श्री अजित गंगाधर तोडकर यांचे जीएसटी zwj; रजिस्ट्रेशन सर्टी फि केट तपासणीस उपलब्ध झाले

नाही.

7) श्री अनिल नबी शिकलगार यांनी मक्तेदार यादीत नाव नोंदणी करणेसाठी नगरपरिषदेकडे अर्ज केला आहपरंतू त्या अर्जावर दिनांक नमूद नाही त्यामुळे कोणत्या कालावधीसाठी मागणी केली आहे याचा बोध होत नाही. आरोग्य अधिकारी यांची टिपणी पाहता ती सन 2019-20 साठी रजिस्ट्रेशन मंजुरी साठी मुख्याधिकारी यांनी कळविले आहे. याचाच अर्थ सन 2020-21 साठी मक्तेदार रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट नसताना निविदा धारकेतून बाद करून नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

8) श्री एकनाथ यल्लाप्पा पाथरवट यांचे मक्तेदार रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट नस्तीसोबत नाही. श्री पाथरवट यांनी नगरपरिषदेकडे मक्तेदार यादीत नाव नोंदणीसाठी सन 2019-20 या वर्षासाठी अर्ज केला आहे परंतू त्यांना सन 2020-21 साठी मक्तेदार रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट घेतलेले नाही.

9) सदर कामासाठी एकूण 5 निविदा धारकांनी निविदा भरण्यात आलेली होती त्यातील 2 निविदा धारकांची कागदपत्रे अपूर्ण असल्यामुळे मंजूर केली नाहीत परंतू राहीलेली 3 निविदा धारकांची मक्तेदार रजिस्ट्रेशन सर्टि फिकेट नसलाना त्यांच्या निविदा पात्र करून कमी दराची निविदा मंजूर केली आहे वास्तवीकता सदर निविदा प्रक्रिया फेटाळून पुन्हा निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते.

10) घनकचरा व्यास्थापन शासन निर्णय दि.26/10/2006 च्या परिच्छेक्रमांक 21 नुसार सर्व प्रभागासाठी व कचरा

प्रक्रियेसाठी एकच निविदा देवून त्यातून बहूव्याप्त कंपनीस कंत्राट दिले असते तर घनकचरा व्यवस्थापेनवर नगरपरिषदेचे संनियंत्रण योग्य रितीने झाले असते परंतू नगरपरिषदेने मक्तेदाराच्या सोयीनुसार वेगवेगळया प्रभागानुसार निविदा मागविल्याचे zwj; दिसून येते.

11) करारनाम्यातील अट क्र. 13 नुसार महाराष्ट्र कामगार कल्याण अधि.1953 नुसार कामगार कल्याण निधी/वर्गणी मक्तेदाराने भरणा केल्याची कागदपत्रे नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाहीत.

12) करारनाम्यातील अट क्र. 24 नुसार मक्तेदाराकडे कामावर असलेल्या कर्मचा-यांचे 25.36 टक्के प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम भरलेच्या पावत्या देयकासोबत जोडलेल्या नाहीत त्यामुळे त्या भरणा केल्याबाबतची खात्री होत नाही.

तरी वरील आक्षेपांची पुर्तता होईपर्यंत रक्कम रू. 1672203 /- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

DATABPM8101 (Ref No : 100, Hmm No : 208)

62 डस्टबीनवर बारकोड प्रणाली राबविणे बाबत

योजना	:	Nagar Parishad nidhi	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	2203006.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषदचे वित्तीय वर्ष 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणात डस्टबीनवर बारकोड प्रणाली राबविणे या बाबीवर केलेल्या खर्चाचा तपशिल व अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

निधी	नगरपरिषद निधी
प्र.मा	विशेष सभा क्रमांक 04 विषय क्रमांक 05 ठराव क्रमांक 33 दिनांक 29-11-2018
तां.मा.	घेतलेली नाही
अं.र.	17,09,160/-
निविदा प्रसिध्दी	ई-निविदा निविदा प्रसिध्द दिनांक 20/12/2018, पहिली मुदतवाढ दिनांक 28/12/2018, दुसरी मुदतवाढ दिनांक 04/01/2019
निविदा धारक	ओमेगा टेक्नॉलॉजी अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा 9 टक्के जादा
मंजूर निविदा	वाटाघाटीअंती ओमेगा टेक्नॉलॉजीज अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 4.50 टकके जादा दराची निविदा मंजूर
करारनामा मुद्रांक	1300/-
कार्यारंभ आदेश	01/11/2019
मुदत	3 महिने

पुर्ण दिनांक	20/02/2020
विलंब कालावधी तील दंडाची अट	विहित मुदतीत काम पुर्ण न झालेस प्रतीदिन दंड रुपये 100/-
खर्च प्र.क्र./दिनांक रक्कम रुपये	655/609/31-03-2021-952199/-(18% जीएसटीसह) 668/622/31-03-2021-416936/-(18% जीएसटीसह) 98/317/29-10-2021-833871/-(18% जीएसटीसह) एकुण रक्कम रुपये 2203006/-
देयकातील कपाती	9% सुरक्षा ठेव 2% आयकर 1% विमा 2% जीएसटी

इचलकरंजी नगरपरिषदेअंतर्गत अंदाजे 62007 कुटूंबे आहेत. नगरपरिषदेतर्फे सर्व कुटूंबांना ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवणेसाठी कलर कोटेड 2 डस्टबीन देण्यात आलेले आहेत. रोजच्या रोज घरोघरी जावुन कचरा संकलन होते किंवा नाही, घरोघरी कचरा विलगीकरण किती प्रमाणात होते, घंटागाडीतून दररोज किती कुटूंबांचा कचरा संकलीत होतो, घंटागाडी सर्व कुटूंबांपर्यंत पोहोचते किंवा नाही याची अचूक माहिती मिळविण्याचे उददेशाने तसेच 100% कच-याचे संकलन व विलगीकरण कचरा निर्मितीच्या ठिकाणीच व्हावे, यासाठी नागरिकांना प्रोत्साहन देणे, ज्या नागरिकांचे डस्टबीन ओला व सुका कचरा यासाठी वेगवेगळे ठेवून कचरा 90% पेक्षा जास्त कामाच्या दिवशी घंटागाडीस देतात त्यांना करामध्ये सवलत देवून त्यांना प्रोत्साहीत करणे, जे घंटागाडीचालक आपल्या निर्धारित क्षेत्रातील 90% ते 100% घरापर्यंत प्रत्येक दिवशी पोहचतात त्यांना प्रोत्साहन प्रमाणपत्र देणे व जे नागरीक स्वत:चा कचरा स्वत:चे घरी मुरवून त्याची खतनिर्मिती करतात त्यांना करामध्ये सुट देणे या उददेशाने सदर डस्टबीनसाठी युनिक बारकोड देणेकामी सॉफटवेअर तयार करणे, डेटा एन्ट्री करणे, बार कोड स्टीकर प्रिंटींग करणे व बारकोड स्कॅनर घेणे इत्यादि कामासाठी GEM पोर्टल वरुन माहिती घेतली असता, पोर्टल वर नगरपरिषदेस हवे तसे बारकोड, मेंटेनन्स, सर्विस तसेच डेटा एंट्री करुन देणारे बिडडर आढळून येत नसलेने नगरपरिषदेस आवश्यकतेनुसार बारकोड, मेंटेनन्स, सर्विस तसेच डेटा एंट्री करुन देणारे स्थानिक पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागविले असता खालीलप्रमाणे तीन पुरवठादार यांचे दर प्राप्त झाले.

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव	एकुण रक्कम	शेरा
1.	ओमेगा टेक्नॉलॉजीज	1709160	सर्वात कमी
2.	मेट्रीक सेक्युअर टेक्नॉलॉजीज	1785034	--
3.	इनसायना सेक्युअर सिस्टीम	2054321	--

यासाठी सर्वात कमी दर रुपये 1709160/- ओमेगा टेक्नॉलॉजीज यांचे खालील तपशिलाप्रमाणे.

अ.क्र.	बाब	दर	परिमाण	एकुण रक्कम
1.	बारकोड ईएमएस सॉफटवेअर	110000	01	110000
2.	सॉफ्फटवेअर डेटा एंट्री	65000	01	65000
3.	बारकोड स्टीकर प्रिंटींग	04	125310	501240
4.	बारकोड स्कॅनर	9900	78	772200
			एकुण	1448440
			+ जीएसटी 18%	260720
			एकुण एकंदर	17,09,160

याप्रमाणे एकुण अपेक्षित खर्च रक्कम रुपये 1709160/- गृहीत धरुन ई-निविदा प्रणाली राबवुन निविदा मागविणेत आले. सदर कामासाठी पहिली निविदा दिनांक 20/12/2018 रोजी मागविली, पहिली मुदतवाढ दिनांक 28/12/2018 रोजी मागविणेत आली व दुसरी मुदतवाढ दिनांक 04/01/2019 रोजी मागविणेत आली होती. प्राप्त निविदांची किमान संख्या कालावधीत वाढ करुनही एकापेक्षा जादा निविदा प्राप्त झालेले नसलेने ओमेगा टेक्नॉलॉजीज यांची 9 टक्के जादा दराची आलेने त्यांचेबरोबर वाटाघाटीअंती 4.5 टक्के जादा दर निश्चित करुन त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

मंजूर निविदा धारकास रक्कम रुपये 2203006/- इतकी रक्कम अदा केल्याची नोंद आहे.

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1)बारकोड प्रणाली राबविणेसाठी संगणकिय आज्ञावली तयार करणे ही तांत्रिक बाब असुन त्यासाठी सक्षम शासकीय तांत्रिक यंत्रणा एनआयसी किंवा शासकीय तंत्रनिकेतन महाविदयालय यांचेकडून तांत्रिक तपासणी करुन तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक होते तथापि तशी कोणतीही तांत्रिक मान्यता न घेता निविदा प्रक्रीया राबवुन कामाचा ठेका दिलेने अनियमितता झालेली आहे.

2) मंजूर ठेकेदाराच्या तांत्रिक अभिलेख्यांची तपासणी केली असता, ठेकेदाराने CCTV बसविण्याचा अनुभव असलेबाबतची कागदपत्रे निविदेसोबत जोडली आहेत. सॉफ्टवेअर तयार करण्याचा कोणताही पुर्वानुभव नसताना ठेकेदारास निविदा देण्यात आली आहे. तसेच निविदा अटी शर्तीमधील क्र.२ अन्वये दैनंदिन रिपोर्टस ठेकेदाराने नगरपालिकेस सादर केलेले नाही. यावरुन ठेकेदार काम करण्यास सक्षम नसल्याचे स्पष्ट होते.

3)सदर कामाच्या नस्तीची व देयकाची तपासणी केली असता, देयकासोबत घंटागाडी चालकांनी रोजच्या रोज घरोघरी जावुन डस्टबीन वरील बारकोड स्कॅन केलेचे व संगणकीय प्रणालीमधून जनरेट झालेले दैनंदिन अहवाल (रिपोर्ट) तपासणी कामी लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. याबाबतची माहिती घेतली असता, बारकोड स्कॅनिंग प्रणाली चालू नसल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे. त्यामुळे ज्या उद्देशासाठी सदर बाबीवर खर्च करण्यात आला तो उददेश सफल झालेला नाही. त्यामुळे यासाठी जबाबदार संबंधित अधिकारी कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन सदरची रक्कम वसुल करुन नगरपरिषद निधीत भरणा केल्याची पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

4)महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2016/प्र.क्र.215/उद्योग-4

दिनांक 24 ऑगस्ट 2017 नुसार गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस (GeM) वरुन खरेदी करणे बंधनकारक आहे. सदर कामासाठी पुरवठादार यांनी एकुण 78 नग स्कॅनर मशिन नगरपरिषदेस पुरवल्याचे देयकावरुन दिसुन येते व प्रमाणक क्र.655/609 दि.31/03/2021 अन्वये ठेकेदारास रक्कम रु.952991/- आदा केले आहे. गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस (GeM) पोर्टल वर सदर स्कॅनरचे दराबाबत खात्री करण्यात आलेली नाही. तसेच सदर 78 नग स्कॅनरची नोंद साठा नोंदवहीस घेतल्याबाबतची साठा नोंदवही लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

5)घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असुन त्यातील परिच्छेद 5.3.4 सोबतच्या टिप नुसार प्रती एक हजार कुटूंबासाठी एक घंटागाडी आवश्यक आहे. तसेच परिच्छेद 2.4.1 नुसार इचलकरंजी नगरपरिषदे अंतर्गत 62007 कुटूंबे असुन 62 घंटागाडयांसाठी 62 नग बारकोड स्कॅनर घेणे आवश्यक असताना पुरवठादाराकडून 78 नग स्कॅनर घेण्यात आलेले आहेत. आवश्यकतेपेक्षा 16 नग जादा स्कॅनर घेतल्याने प्रती नग दर रुपये 9900/- व त्यावरील 18 टक्के जीएसटी रुपये 1782 एकुण रुपये 11682/- तसेच 4.5 टक्के जादा दराचे निविदेची रक्कम 526/- अशी एकुण रुपये 12208/- प्रती नग प्रमाणे एकुण 16 नगावरील एकुण रुपये 195328/- ची अनावश्यक खरेदी केलेली आहे.

6) प्रमाणक क्र.668/622 दि.31/03/2021 अन्वये बारकोड प्रणाली राबविणे त्या अनुषंगाने इतर कामे करणे या कामापोटी ठेकेदारास रु.416936/- आदा केले आहेत. सदरची बाब अंदाजपत्रकामध्ये समाविष्ठ नसल्याने वसूलपात्र ठरते. प्रमाणक क्र.98/317 दि.29/10/2021 अन्वये ठेकेदारास रु.833871/- आदा केले आहेत. तसेच प्रमाणक क्र.655/609 दि.31/03/2021 अन्वये ठेकेदारास रु.952199/- आदा केले आहेत. एकूण तिन प्रमाणकान्वये ठेकेदारास रु.2203006/- आदा केले आहे. अंदाजपत्रकाप्रमाणे कामाची रक्कम रु.1709160/- असलेने ठेकेदारास रक्कम रु.493846/- चे अतिप्रदान झाले आहे. सदरची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी.

7) प्रमाणक क्र.98/317 दि.29/10/2021 अन्वये ठेकेदारास रु.833871/- आदा केले आहेत. त्यामधील बारकोड स्टिकर प्रिंट करणेसाठी एकूण डस्टबिन 125310 X रु.4.18/- प्रती स्टिकर याप्रमाणे रु.523796/- आदा केले आहेत. दैनंदिन ओला व सुका कचरा एकाच घंटागाडीद्वारे उचलला जात असल्याने प्रती डस्टबीन ऐवजी एकाच डस्टबिन साठी स्टिकर लावणे आवश्यक होते. अंदाजपत्रक तयार करताना या बाबीचा विचार न केल्याने व एकच काम दुबार नमूद केल्याने महानगरपालिकेचे रु.261898/- आर्थिक नुकसान झालेले आहे.

8) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-2014/ प्र.क्र. 82 / भाग- iii उदयोग -4/ दिनांक 1/12/2016 मधील 4.1 नुसार खरेदी करावयाच्या वस्तूचे विनिर्देश, एकूण संख्या, अंदाजित किंमत ठरवून महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थाळावरुन ई निविदा मागवून अथवा उद्योग उर्जा विभाग शासन निर्णय दि.24/08/2017 अन्वये GeM पोर्टलवरुन वस्तूंची खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच नियमपुस्तिकेमधील नियम 3.1.1.1 नुसार ISI चिन्हांकित वस्तूची खरेदी करणे आवश्यक आहे. तथापि बारकोड स्कॅनर खरेदी करताना बारकोडचे स्पेसिकिशन व स्पेसिकिशन प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम न ठरविताचा स्कॅनरची किंमत रु.11682/- व निविदा 4.5 टक्के जादाने मंजूर केल्याने रक्कम रुपये 526 अशी एकूण रुपये 12208/- प्रती स्कॅनर ठेकेदारास आदा केली आहे. खरेदीच्या विहित पद्धतीचा अवलंब न केल्याने एकूण स्कॅनर 78 X रुपये 12208/- प्रती नग स्कॅनर = रक्कम रु.952224/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

9)महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण क्रमांक संकिर्ण-2019/ प्र.क्र.247/नवि-33 दिनांक 25 जून 2021 मधील परिच्छेद 1 मध्ये दिनांक 01/07/2017 नंतरच्या नवीन कामांच्या कंत्राटांच्या बाबतीत अवलंबावयाची कार्यपध्दती दिलेली आहे. त्यामधील उपपरिच्छेद 4 नुसार कंत्राटदाराने वस्तु व सेवा कर भरणा केल्याच्या पुष्ठयर्थ परिपुर्ण प्रमाणित कागदपत्रे सादर केल्यानंतर संबंधितांनी अशा प्रस्तावांची व कागदपत्रांची छाननी लेखापाल/सनदि लेखापाल/लेखाधिकारी यांचेकडून वस्तु व सेवा कराचा परतावा प्रस्ताव प्राप्त झालेल्या

दिनांकापासून 30 दिवसाचे आत अदा करावा अशा सूचना असताना ठेकेदारास जीएसटीची पूर्ण रक्कम अदा केली आहे. ठेकेदाराकडून जीएसटीची रक्कम भरलेबाबत जीएसटी आर-1 घेतलेनंतरच जीएसटी रक्कम देणे आवश्यक असताना कोणतीही छाननी न करता जीएसटी रक्कम अदा केलेने रक्कम रुपये 272450/- ठेकेदाराकडून वसुलपात्र करण्यात येत आहे.

10) नगरपालिकेने ठेकेदाराबरोबर करारपत्र केले असून करारपत्रामधील अट क्र.01 नुसार या कामी सर्व प्रणाली आवश्यक त्या सर्व प्रक्रीयेद्वारे डेटा एंट्री, इन्स्टॉलेशन, टेस्टींग इ.सह सुरू करुन देणे आवश्यक आहे तसेच अट क्र.2 नुसार सदर प्रणालीद्वारे नगरपरिषदेच्या मागणी प्रमाणे सर्व दैनदिन रिपोर्ट काढून देणे आवश्यक आहे. तथापि नगरपालिकेकडे याबाबतचा एकही दैनंदिन रिपोर्ट नाही. यावरुन सदरची यंत्रणा कार्यान्वित झाली नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर बाबीवर केलेला खर्च रक्कम रु. 17,09,160 वाया गेला आहे. सदर यंत्रणा का कार्यान्वयीत केली नाही याचा खुलासा आरोग्य विभागाने केलेला नाही.

11) कौन्सिल ठराव क्र.43 दि.29/06/2019 अन्वये मंजूर कामामधील अ.क्र.59 अन्वये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नागरिकांना देण्यात आलेले बारकोड कार्ड सुस्थितीत राहण्यासाठी पी.व्ही.सी कोटेड कव्हर व सदर कव्हरवर रिबन छपाई करुन घेणे या बाबीसाठी अंदाजपत्रकीय तरतूद रु.787500/- करून अंदाजपत्रक मंजूर केले आहे. बारकोड प्रणाली राबविणेचा कौन्सिल सभा क्र.10 ठराव क्र.207 दि.30/11/2018 मंजूर करण्यात आला आहे. अंदाजपत्रकानुसार बार कोड स्टिकर डस्टबिन वर चिटकविणे ही बाब नमूद असून त्या प्रमाणे ठेकेदाराकडून काम करुन घेण्यात आले आहे. त्यामुळे बारकोड कार्ड सुस्थितीत राहण्यासाठी पी.व्ही.सी कोटेड कव्हरची आवश्यकता नाही. सदरचा खर्च अनावश्यक असल्याने तो लेखापरिक्षणास अमान्य करण्यात येत आहे. याबाबीवर खर्च झाल्याबाबतचे प्रमाणक लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

उपरोक्त सर्व बाबींच्या पुर्तते अभावी डस्टबीनवर बारकोड प्रणाली राबविणे या योजनेवरील एकुण खर्चाची रक्कम रुपये 2203006/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

DATDJSM7401 (Ref No : 121, Hmm No : 58)

63 वॉर्ड क्रमांक 6,7,8,9,11,13,14,15,18,20 ते 26 मधील सारण गटार साफसफाई करुन वाहतूक करणे.

योजना	:	Nagar Parishad nidhi	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	3304460.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषदचे वित्तीय वर्ष 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणात वॉर्ड क्रमांक 6,7,8,9,11, 13,14,15,18,20 ते 26 मधील सारण गटार साफसफाई करुन वाहतूक करणे या बाबीवर केलेल्या खर्चाचा तपशिल व अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

निधी	नगरपरिषद निधी
प्र.मा	कौन्सिल ठराव क्रमांक 43, दिनांक 29-06-2019
तां.मा.	घेतलेली नाही

अं.र.	4999138/-(एकुण सारण गटार 18078.76 घनमीटर) सन 2018-19 मजिप्रा जिल्हा दरसूची मधील बीडी-अे-1/259 नुसार दर रुपये 145/-+7.25+1.45=153.7 अधिक वाहतूक 5 किमी 115.87+विमा 5.79+1.16=122.82 एकुण रक्कम रुपये 276.52/-
निविदा प्रसिध्दी	ई-निविदा
	निविदा फी 5900/- बयाना-49991/-
निविदा धारक	1-राहूल रोहीदास गायकवाड-पात्र-5% जादा दराची निविदा 2-विठठल रामभाऊ जाधव-अपात्र- 3-एकनाथ यलाप्पा पाथरवट-पात्र-6.30% जादा दराची निविदा 4-संतोष भुपाल मोने-पात्र-अंदाजपत्रकीय दराने 5-शनेश ज्ञानदेव माने-अपात्र-
मंजूर निविदा	संतोष भुपाल मोने
करारनामा मुद्रांक	रुपये 500/-
कार्यारंभ आदेश	696 दिनांक 15/02/2020
मुदत	1 वर्ष
मुदतवाढीसाठी अर्जाचा दिनांक	01/02/2021
मुदतवाढ मंजूर ठराव क्रमांक	284 दिनांक 15/03/2021
करारनामा मुद्रांक	रुपये 100/-
कार्यारंभ आदेश	दिनांक 19/03/2021
खर्च रक्कम रुपये	10049268/-(मोजमाप पुस्तकानुसार एकुण 27 धावती देयके)
देयकातील कपाती	9 टक्के डिपॉझिट 1 टक्के आयकर 1 टक्के विमा

1)सारण गटरीचे लांबी, रुंदी व खोली/उंची बाबत बांधकाम विभागाने अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असता,

आरोग्य अधिकारी यांनी आरोग्य विभागाकडील नोंदी प्रमाणे एकूण 16 स्वच्छता निरीक्षक यांचे नावापुढे प्रत्येकी एकूण सारण घनमीटर अशा नोंदीप्रमाणे एकुण 18078.76 घनमीटर क्षेत्र गृहीत धरुन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. तथापि सदर अंदाजपत्रकाची पडताळणी करुन आरोग्य अधिकारी यांनी प्रमाणित केलेली नाही. तसेच नगरपरिषद बांधकाम विभागाकडील रस्ते व गटर यांचे नोंदी व क्षेत्र बरोबर असल्याबाबत कोणतेही प्रमाणपत्र घेतलेले नाही अथवा तांत्रिक मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे आरोग्य विभागाने सक्षम प्राधिका-याच्या तांत्रिक मान्यतेशिवाय तयार केलेले अंदाजपत्रक सदोष असल्याचे स्पष्ट होते.

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 121 नुसार नगर अभियंता यांनी कामाचे अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. तसेच नियम 124 नुसार अ वर्ग नगर अभियंत्यास रु.10 लक्ष पर्यंतचे तांत्रिक मंजूरीचे अधिकार आहेत. त्यापेक्षा जास्त रक्कमेच्या कामांना शासनाने प्राधिकृत केलेल्या राज्य शासनाच्या अभियांत्रिकी सेवेतील अधिका-याकडून तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक आहे. तथापि सारण गटारी साफ करणे या कामास आरोग्य अधिकारी यांनी तयार केलेल्या (अंदाजपत्रकावर स्वाक्षरी नाही) रक्कम रु.4999138/- च्या अंदाजपत्रकास (एकुण सारण गटार 18078.78 घनमीटर) लेखासंहिता 2011 मधील नियम 124 मध्ये नमूद केलेल्या सक्षम प्राधिका-याकडून तांत्रिक मंजूरी न घेताच कौन्सिलची मान्यता घेतली आहे. ही बाब नियमबाह्य व लेखासंहितेमधील नियमाशी विसंगत आहे.

3)या कामाची निविदा कौन्सिल ठराव क्रमांक 43, दिनांक 29-06-2019 अन्वये मागविणेबाबत ठराव करण्यात आला आहे. तथापि कामाची ई निविदा सूचना मागविणेबाबत दि.21/12/2020 रोजी निविदा समितीने मान्यता दिली आहे. निविदा वर्तमानपत्रामध्ये दि.23/12/2019 रोजी व दि.29/12/2020 रोजी शासनाच्या ई पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आली असून निविदा 4 जानेवारी 2022 रोजी उघडण्यात आल्या आहेत व कामाचा कार्यादेश जा.क्र.आरोग्य /696/2020 दि.15/02/2020 रोजी मुख्याधिकारी यांचे स्वाक्षरीने दिला आहे. या एकूण प्रक्रीयेस अंदाजे आठ महिन्याचा दिनावधी लागला आहे. गटर सफाईचे काम नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असताना निविदा अंतिम करुन वर्क आर्डर देण्यासाठी झालेला विलंब अनावश्यक आहे. तसेच या कालावधीमध्ये गटर सफाई कोणामार्फत करण्यात आली याचा खुलासा करण्यात यावा. तसेच दैनंदिन गटारी स्वच्छ करणे हे नगरपालिकेचे कर्तव्य असतानाही नगरपालिका आपले कर्तव्य बजावत नसल्याचे स्पष्ट होते.

4)मंजूर ठेकेदारास कामाचा कार्यादेश जा.क्र.आरोग्य/696/2020 दि.15/02/2020 अन्वये मुख्याधिकारी यांचे स्वाक्षरीने दिला आहे. कार्यादेशामध्ये कामाचा कालावधी कार्यारंभ आदेश दिल्यापासून एक वर्ष असा नमूद केला आहे. तथापि गटर महिन्यामधून किती वेळा व कधी साफ करणे आवश्यक आहे. याबाबत नमूद केलेले नाही.

5)ठेकेदाराने कामास मुदतवाढ मिळावी म्हणून दि.01/02/2021 रोजी अर्ज केला असून (नस्तीमधील पृष्ठ क्र.421) त्यामध्ये काम दि.17/02/2020 पासून सुरू केले असून कामाची मुदत संपल्यामुळे मंजूर निविदा दरामध्ये काम करण्यास तयार असल्याने मुदतवाढ देणेची मागणी केली आहे. त्यानुसार आरोग्य विभागाने दि.26/02/2021 रोजी प्रस्तावित केलेल्या टिपणीनुसार कौन्सिल सभा क्र.05,ठराव क्र.284 दि.15/03/2021 अन्वये मंजूर ठेकेदारास मागील दराने काम करण्यास मुदवाढ देण्यात आली आहे. कामाचा कालावधी एक वर्षाचा असल्याने कामाची मुदत संपण्यापूर्वी नविन निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक असता, आरोग्य विभागाने ठेकेदाराच्या मागणी नुसार मुदतवाढ दिली आहे. आरोग्य विभागाची सदरची कृती चुकीची असल्याचे स्पष्ट होते.

6)मागील मंजूर ठेकेदार यांचे समवेत रु.100 च्या मुद्रांकपेपरवर दि.16/03/2021 रोजी करारनामा केला असून नविन करारनाम्यामध्ये ही गटर महिन्यातून किती वेळा साफ करणे आवश्यक आहे. या अटीचा समावेश केलेला नाही. कामाचा कार्यादेश दि.19/03/2021 रोजी करण्यात आला असून कामाची मुदत एक वर्षाची देण्यात आली आहे.

7)महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 व महाराष्ट्र मुद्रांक (सुधारित) अधिनियम 2015 च्या अनुसूची 1 मधील कलम 63 -खंड -अ-नुसार दहा लाख रुपयांपर्यंत 500/- रुपये व त्यापुढील प्रत्येक लाख रुपयांसाठी 100/- रुपये याप्रमाणे मुद्रांकावर करारपत्र करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी रुपये 5000/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना रुपये 500/- च्या मुद्रांकावर करारनामा केल्याने शासन महसुलाची हानी झालेली आहे. रक्कम रुपये 4500/- संबंधित मक्तेदाराकंडून वसूलात आणून शासन खाती भरून लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

8)निविदेस आर्थिक वर्ष 2021-22 साठी सर्वसाधारण सभा क्र.05 कौन्सिल ठराव क्र.284 दि.15/03/2021 अन्वये मुदतवाढ दिल्याने ठेकेदाराकडून रु.4600/- किमतीच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असता तो न केल्याने रक्कम रु. 4600/- वसूल करण्यात यावी.

9)सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे आर्थिक वर्ष 2018-19 चे जिल्हा दरसूचीमधील दर गृहीत धरण्यात आलेले आहेत. सदरचा दर सॉफ्ट मुरूम खुदाईचा रु.153.70/- घेण्यात आला आहे. (MJP DSR 2018-19) (BD-A-1/259) तसेच गटारीमधून काढलेला गाळ 5 किमी अंतरावर वाहतूक करणेचा दर 122.82/- प्रती घ.मी घेतलेला आहे. परंतु वाहतूक दराबाबत दरसूचीमधील अ.क्र.,पृष्ठ क्र. अंदाजपत्रकामधील या बाबीपुढे व दर पृथ:करणामध्ये नमूद नसल्याने वहातूकीची अंदाजीत रक्कम कशाचे अधारे परिगणित केली ते लेखापरीक्षणास समजून येत नाही. याबाबीचा खुलासा करणे आवश्यक आहे. सदर दरसूचीमधील सर्वसाधारण सूचना मधील परिच्छेद 26 मध्ये सूचित केलेनुसार कामगार विमा याबाबीसाठी 1 टक्के रक्कम ही प्रत्येक बाबीमध्ये समाविष्ठ आहे. 1 टक्के विम्याची वेगळी तरतूद करणेची आवश्यकता नाही असे असताना अंदाजपत्रकात 1 टक्के विम्याची रक्कम धरणेत आल्यामुळे मक्तेदारास जादा प्रदान झालेले आहे. मोजमाप पुस्तकानुसार एकुण 1 ते 27 धावती देयके झालेली असुन एकूण 36341.92 घनमीटर चे काम झालेले आहे. त्यासाठी प्रती घनमीटर दर रुपये 276.52 प्रमाणे एकूण रुपये 1,00,49,268/- इतकी रक्कम मक्तेदारास अदा झालेली आहे. सदर रक्कमेमध्ये 1% प्रमाणे विमा रक्कम समाविष्ठ असुन एकुण रक्कम रुपये 100493/- संबंधितांकडून वसुल करण्यात यावी.

10) सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे आर्थिक वर्ष 2018-19 चे जिल्हा दरसूचीमधील दर गृहीत धरण्यात आलेले आहेत. सॉफ्ट मुरूम खुदाईचा रु.153.70/- (MJP DSR 2018-19) (BD-A-1/259) तसेच गटारीमधून काढलेला गाळ 5 किमी अंतरावर वाहतूक करणेचा दर 122.82/- (DSR नमूद नाही) प्रती घनमीटर घेतलेला आहे. एकुण रक्कम रुपये 276.52/- प्रती घनमीटर दर अंदाजपत्रकामध्ये नमूद केला आहे. तथापि काम गटारीमधून गाळ काढण्याचे असल्याने खुदाईचा दर या कामास लागू करता येणार नाही. तांत्रिक अधिका-यांनी अंदाजपत्रक तयार न केल्याने व त्यास तांत्रिक मंजूरी न घेतल्याने अंदाजपत्रक सदोष झाल्याचे स्पष्ट होते. तसेच अंदाजपत्रकास पाईपलाईन टाकण्यासाठी चर खुदाईचा दर घेतला आहे. तो चुकीचा आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आर्थिक वर्ष 2018-19 च्या DSR मधील पृष्ठ क्र.29, अ.क्र.87, बाब क्र.2.11 MORTH301,Exczvztion for Roadway in soft murum etc या बाबीचा दर रु.72 प्रती घ.मी. असा आहे. या दरानुसार कामाची एकूण मुल्यांकन 18078.76 घ.मी. X रु. 72 प्रती घ.मी. प्रमाणे रु.1301671/- होत आहे. तथापि चुकीच्या अंदाजपत्रक केल्याने 18078.76 घ.मी. X रु. 153.70 प्रती घ.मी. प्रमाणे रु.2778705/- आदा करावे लागले आहेत. त्यामुळे ठेकेदारास रु.2778705 - रु.1301671 = रु.1477034/- अतिप्रदान झाले आहे. आर्थिक वर्ष 2020-21 मधील मंजूर निविदादारास आर्थिक वर्ष 2021-22 साठी मागील अंदाजपत्रकीय दराने मुदतवाढ दिल्याने एकूण रक्कम रु.1477034/- + रु.1477034/- = 2954068/- चे अतिप्रदान झाले आहे. सदरची बाब गंभीर असून नगरपालिकेच्या प्रशासकीय चुकीमुळे नगरपालिका स्वनिधीची/14 वित्त आयोगामधील अनुदानाची आर्थिक हानी झाली आहे.

11) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 137 नुसार मोजमाप पुस्तक नमूना 61 मध्ये ठेवून त्यामध्ये कामाचे नाव, कंत्राटदाराने पूर्ण केलेल्या कामाची रक्कम, काम पुर्ण करण्याचा अंदाजित दिनांक याची

माहिती देणे आवश्यक आहे. तथापि आरोग्य विभागाने स्वत:च्या नमून्यामधील मोजमाप पुस्तक ठेवलेले आहे.त्यामध्ये केलेल्या कामाची लांबी ,रुंदी,उंची न नोंदविता फक्त घ.मी. काम केल्याची नोंद केलेली आहे. नियमानुसार मोजमाप घेतलेली नसल्याने काम केलेबाबतची स्पष्टता होत नाही.

देयक क्रमांक	प्र.क्र.	दिनांक	एकूण घ.मी	एकुण रक्कम रुपये (प्रती घ.मी. दर रु.276.52 प्रमाणे)	निधी
01	667/621	31/03/21	1562.37	432026	न.पा.
02	666/620	31/03/21	1485.19	410685	न.पा.
03	367/493	28/03/22	1391.36	384739	न.पा.
04	161/303	20/01/22	1952.43	539886	न.पा.
05	--	--	872.91	241377	न.पा.
06	--	--	1609.21	444979	न.पा.
07	--	--	1464.96	405091	न.पा.
08	--	--	1395.07	385765	न.पा.
09	--	--	1657.30	458277	न.पा.
10	162/304	20/01/22	1670.25	461858	न.पा.
11	163/305	20/01/22	1104.40	305389	न.पा.
12	164/306	20/01/22	1738.20	480647	न.पा.
13	--	--	1646.80	455373	न.पा.
14	--	--	1122.60	310421	न.पा.
15	--	--	819.79	226688	न.पा.
16	609/699	31/03/22	650.85	179973	न.पा.
17	608/698	31/03/22	1206.12	333516	न.पा.
18	607/697	31/03/22	1229.02	339849	न.पा.
19	606/696	31/03/22	1182.41	326960	न.पा.

20	605/695	21/03/22	1252.17	346250	न.पा.
21	--	--	1096.96	303331	न.पा.
22	--	--	999.19	276296	न.पा.
23	--	--	1760.85	486910	न.पा.
24	--	--	1625.70	449539	न.पा.
25	--	--	1579.00	436625	न.पा.
26	--	--	1921.20	531250	न.पा.
27	--	--	345.61	95568	न.पा.
		एकूण	36341.92	10049268	

12.अंदाजपत्रकात नमूद केलेनुसार वॉर्डातील सारण गटरचे क्षेत्र व मोजमाप पुस्तकात घेतलेले क्षेत्र यातील तफावत

अ.क्र.	वॉर्ड क्रमांक	अं.प. नुसार क्षेत्र घ.मी.	मो.पु.नुसार क्षेत्र घ.मी.	फरक घ.मी.	दर प्रती घ.मी. र.रु.	जादा अदा रुपये	मो.पु.पृष्ठ क्रमांक माहे
1.	26	362.8	365.00	2.2	276.52	608.34	26 जुलै, 20
2.	10	00.00	863.65	863.65	276.52	238816.49	34 एप्रिल, 21
3.	21	817.02	819.79	2.77	276.52	765.96	37 माहे एप्रिल 21
4.	26	362.8	365.00	2.2	276.52	608.34	39 माहे मे 21
		1542.62	2413.44	870.82	276.52	240799.13	

वर नमूद तपशिलाप्रमाणे अंदाजत्रक व मोजमाप पुस्तकातील नमूद सारण गटरचे क्षेत्र यामध्ये तफावत आहे. याचाच अर्थ तफावतीत नमूद सारण गटरचे क्षेत्र नसताना त्याची सफाई केल्याचे नमूद केल्यामुळे एकुण रक्कम रुपये 240799/- इतकी जादा रक्कम मक्तेदारास अदा झालेली आहे. सदर जादा प्रदानाची रक्कम संबंधितांकडून वसुल करुन नगरपरिषद निधीमध्ये भरणा केल्याची पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

एकुण वसुलपात्र रक्कम रुपये 3304460/-

DATDJSM7401 (Ref No : 122, Hmm No : 59)

64 विशेष बाब म्हणून सेवा नियमित केलेल्या42 कर्मचारी यांना देय नसताना सातवा वेतन आयोग फरकाबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2020-21 व 2021-22 सालचे आस्थापना विभागाकडील पगारपत्रकांची तपासणी केली असता 42 कर्मचारी यांना खालील विभाग प्रमाणे सातवा वेतन आयोग फरकापोटी पहिला व दुसरा हप्ता देण्यात आला आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

निधी	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	तपशील
न.प. फंड	79	02/01/2021	2360902/-	सातवा वेतन आयोग फरक पहिला हप्ता
न.प. फंड	486	31/03/2021	2360902/-	सातवा वेतन आयोग फरक दुसरा हप्ता
एकूण			4721804/-	

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमयुएन -2016/प्र.क्र.323/नावि-18 दिनांक 02 फेब्रुवारी 2019 नुसार यादीमध्ये देण्यात आलेल्या एकूण 54 कर्मचारी यांची नियुक्ती हि निवड मंडळातर्फे व विहित मार्गाने नसतानाही त्यांची दिर्घ सेवा लक्षात घेवून एक विशेष व अपवादात्मक बाब म्हणून त्यांच्या सेवा इचलकरंजी आस्थापनेवर नियमित करण्यास शासनाने खालील अटी व शर्तीनुसार शासन मान्यता दिली आहे.

नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमयुएन -2016/प्र.क्र.323/नावि-18 दिनांक 02 फेब्रुवारी 2019 मधील परिच्छेद अ नुसार सदर कर्मचारी यांच्या सेवा या शासन निर्णयाच्या दिनांकापासून कायम / नियमित करण्यात येत आहेत. या शासन निर्णयातील परीच्छेद ब नुसार सदर कर्मचाऱ्यांची या आधीची सेवा केवळ सेवानिवृत्ती विषयक प्रयोजनासाठी ग्राह्य धरण्यात यावी. परीच्छेद क नुसार सदर कर्मचारी यांच्या सेवा विशेष बाब म्हणून नियमित करण्यात आल्यामुळे या आधीच्या सेवेतील वेतनवाढी वा अन्य कोणताही आर्थिक लाभ त्यांना मिळणार नाही. याबाबत संबंधित कर्मचाऱ्याचे हमीपत्र आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी घ्यावे. सदर हमीपत्र प्राप्त झाल्यानंतरच या ५४ कर्मचारी यांना सेवेत कायम करण्याबाबतचे आदेश संचालनालयाने निर्गमित करावेत. सदर प्रक्रिया शासन निर्णयाच्या दिनांकापासून १५ दिवसात करण्यात यावी. असे स्पष्ट नमूद असताना कर्मचारी यांचेकडून हमीपत्र घेतलेचे व त्यानंतर या कर्मचारी यांना सेवेत कायम करण्याबाबतचे संचालनालयाचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. या ५४ कर्मचारी यांच्या सेवा विशेष बाब म्हणून नियमित करण्यात आल्यामुळे या आधीच्या सेवेतील वेतनवाढी वा अन्य कोणताही आर्थिक लाभ त्यांना मिळणार नाही असे शासन निर्णयात स्पष्ट नमूद असतानाही या कर्मचारी याना सातवा वेतन आयोग फरक दिनांक 1 जानेवारी 2016 ते 30 एप्रिल 2019 अखेरचा रक्कम रुपये 4721804/- अदा करण्यात आला आहे.

DATGGAM9401 (Ref No : 63, Hmm No : 129)

65 न. प. निधीतून करण्यात आलेल्या HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे कामांबाबत. (गुणिना कन्स्ट्रक्शन)

योजना	:	N P FUND	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 1468966.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात न.प. निधीतून HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे (गुणिना कन्स्ट्रक्शन) कामाचा तपशिल व अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

कामाचे नांव	1)नाटयगृह रोड, अग्रसेन भवन ते राधेशाम घरा पर्यंत HPOIL साईडपटटी मधील खुदाई चर डांबरी करणे
	2)महेश भवन अभय शॉपी, पार्वती घर गल्ली, भारतकुंज गल्ली, शांती मेडिकल व नयनामनोहर अपार्टमेंट पर्यंत HPOIL साईडपटटी मधील खुदाई चर डांबरी करणे
	3)प्र. क्र. 23 अयोध्या कॉलनीतील रस्त्याचे HPOIL खुदाई चर पॅचवर्क करणे.
	4)प्र.क्र.11 महिंद्रा शोरूम ते गल्ली शेवट (डावी बाजू) HPOIL साईडपटटी मधील खुदाई चर डांबरी करणे
अंदाजपत्रकीय रककम	1)971066/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	2)972060/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	3)884847/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	4)554399/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
ठराव	1)स्थायी समिती ठराव क्र. 54 दि. 09.02.2021
	2)स्थायी समिती ठराव क्र. 54 दि. 09.02.2021
	3)स्थायी समिती ठराव क्र. 2 दि. 25.6.2021
	4) स्थायी समिती ठराव क्र. 54 दि. 09.02.2021
तांत्रिक मंजूरी	1) नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/744 दि. 11.2.2021
	2)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/752 दि. 11.02.2021
	3) नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/916 दि. 1.07.2021

	4)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/775 दि. 11.02.2021			
निविदा प्रक्रिया	ईटेंडर			
निविदा मंजूर	1)9.90 टक्के जादा दराने			
	2)9.90 टक्के जादा दराने			
	3)8.05 टक्के जादा दराने			
	4)9.90 टक्के जादा दराने			
मक्तेदाराचे नांव	काम क्र. 1 ते 3 - गुणिना कन्स्ट्रक्शन काम क्र. 4 - श्री. भगवान भांबुरे			
कामाचा आदेश	1)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 72 दि. 5.10.2021			
	2)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 39 दि. 5.10.2021			
	3)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 1844 दि. 7.1.2022			
	4)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 64 दि. 13.08.2021			
काम क्र. 1)	काम सुरु दिनांक	5.10.2021	काम पुर्ण दिनांक	25.11.2021
काम क्र. 2)	काम सुरु दिनांक	5.10.2021	काम पुर्ण दिनांक	25.11.2021
काम क्र. 3)	काम सुरु दिनांक	7.01.2022	काम पुर्ण दिनांक	13.01.2022
काम क्र. 4)	काम सुरु दिनांक	13.8.2021	काम पुर्ण दिनांक	03.10.2021

मोजमाप पुस्तिका	काम क्र. 1)	MB no. 149 पृष्ठ क्र. 43	
	काम क्र. 2)	MB no. 149 पृष्ठ क्र. 37	
	काम क्र. 3)	MB no. 222 पृष्ठ क्र. 21	
	काम क्र. 4)	MB no. 183 पृष्ठ क्र. 29	

कामावरील एकूण खर्च	प्रमाणक क्रमांक	दिनांक	खर्च
काम क्र. 1)	22/153	10.12.2021	195049

	23/154	10.12.2021	971066
काम क्र. 2)	20/151	10.12.2021	168729
	21/12	10.12.2021	972063
काम क्र. 3)	17/51	2.2.2022	884847
	18/52	2.2.2022	166836
काम क्र. 4)	53/160	13.01.2022	688492
		एकूण	4047082

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)कामाची बाबनिहाय अंदाजपत्रकीय तरतूद पाहता, बाब क्र. 1 - Excavation for roadway in earth soil .... साठी SSR 2020-21 I/P 2.10/27 या Manual means बाबीचा रू. 272/- मूळ दर घेऊन दर पृथ्थकरण केले आहे. मात्र SSR मध्ये नमूद केलेनुसार अधिक्षक अभियंता यांची मंजूरी घेतलेली नाही. ज्याठिकाणी यांत्रीक पध्दतीने खुदाई करणे शक्य नाही अशाच ठिकाणी मजूरांकरवी खुदाई करणेची आहे. कामाचे फोटो पाहता काम प्रशस्त रस्त्यावरती आहे व काही फोटोंमध्ये जेसीबीच्या सहाय्याने खुदाई केलेचे स्पष्ट दिसून येते. यांत्रीक खुदाई करून दर मात्र मानवी खुदाईचा घेतला आहे. SSR 2020-21 I/P 2.11/27 चा यांत्रीक खुदाईचा मूळ दर रू. 85/- न घेतल्यामुळे खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

बाब	मूळ दर	cess	5% SFA	Cess	Total	i.e.	तफावत
दिलेला दर	272	-5.44	13.33	+5.44	285.33	285.35	196.20
देय दर	85	-1.70	4.17	+1.7	89.17	89.15	

कामनिहाय जादा प्रदान पुढीलप्रमाणे

काम क्र.	बाब क्र. 1 - Excavation for roadway चे परिमाण (घ.मी.)	प्रति घ.मी. झालेले जादा प्रदान	एकूण जादा प्रदान
1	182.05	196.20	35718
2	147.43	196.20	28926
3	170.91	196.20	33533
		एकूण	98177

2)कामांमध्ये डांबराचा वापर करण्यात आला असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/2011/प्रक्र 464/ रस्ते दिनांक 21.11.11 मधील नियम 1-ड नुसार कामासाठी वापरण्यात

येणाऱ्या डांबराच्या खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणेत आलेली नाही.

3)महाराष्ट्र शासन, बांधकाम विभागाकडील SSR 2020-21 मधील सेक्शन D iii) नुसार कामात वापरण्यात आलेल्या विविध साहित्यांच्या आवश्यक त्या सर्व चाचण्या करून घेणे मक्तेदारास बंधनकारक आहे. जर मक्तेदाराने चाचणी अहवाल सादर केला नाही. तर संबंधित अभियंत्यानी पत्राव्दारे मक्तेदारास चाचणी अहवाल सादर करणेस सुचित करावे व 10 दिवसाच्या विहित मुदतीत चाचणी अहवाल सादर केला नाही, तर चाचणी अहवालासाठी येणारा खर्च व खर्चाच्या पाचपट रक्कम दंड म्हणून मक्तेदाराकडून वसुल करावयाची आहे.

करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 9 / 18 नुसार कामासाठी वापरण्यात येणा-या साहित्याची तसेच केलेल्या कामाची प्रतवारी चांगली असलेबाबत योग्य त्या प्रयोगशाळेतून तपासणी करून ती चांगली असल्याची खात्री झाल्यानंतरच देयक आदा करावयाचे आहे. करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 6(ब) नुसार सुरक्षा ठेवीची 9% रक्कम 6 महिन्यानंतर कामाची प्रत योग्य असेल तरच मक्तेदारास परत करावयाची आहे.

नस्तीसोबत कामात वापरण्यात आलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल नाहीत. कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र. 9 Lab Testing Charges .. नुसार साहित्याच्या चाचणी अहवालासाठी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे. चाचणी अहवाल सादर करण्यास मक्तेदाराने निष्काळजीपणा दाखवलेचे दिसून येते. त्यामुळे चाचणी अहवालाची तरतूद रक्कम व त्याच्या 5 पट रक्कम खालीलप्रमाणे मक्तेदाराकडून वसुल करणेची कार्यवाही करावी.

काम क्र.	चाचणी अहवालासाठी तरतूद रू.	तरतूदीच्या 5पट दंडाची रक्कम रू.	एकूण वसुल करावयाची रक्कम रू.
1	48950	244750	293700
2	48950	244750	293700
3	46800	234000	280800
4	48300	--	48300
		एकूण	916500

वरील काम क्र. 4 च्या नस्तीसोबत शरद इन्स्टिटयूट, टेक्निकल कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचा चाचणी अहवाल जोडला आहे. त्यानुसार देयकातून रक्कम रू. 48300/- आदा करण्यात आली आहे. मात्र त्या संस्थेच्या अहवालात टेस्ट चार्जेसची रक्कम नमूद नाही किंवा रिसीटही जोडणेत आले नसलेने पावती सादर करावी अथवा रक्कम वसुल करण्यात यावी.

महाराष्ट्र शासन, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक - कौविउ-2017/प्र.क्र./237/अभियान-1/दि. 28.08.2018 नुसार शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविदयालये यांना निरीक्षण संस्था म्हणून दर्जा बहाल करण्यात आलेला आहे. त्यामुळे शरद इन्स्टिटयूट, इचलकरंजी या खाजगी अभियांत्रिकी महाविदयालयाचा चाचणी अहवाल घेणे नियमबाहय आहे.

4)महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/2018/प्र.क्र. 127/इमा-2 मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रीयेअंतर्गत निविदा तपासणी, स्विकृती देयके अदा करणे व निविदा अंतिम झाल्यानंतर उत्तरदायित्वाबाबत सुधारित सूचनानुसार निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुपये 500 च्या मुद्रांकासह लिफाफा क्रमांक 1 मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार निविदाधारकाकडून प्रत्येकी रुपये 500/- प्रमाणे

प्रतिकाम एकूण रुपये 1500/- प्रमाणे 4 कामांचे रू. 6000/- वसुल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

5)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास खालीलप्रमाणे रक्कम रु. 429778/- आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 429778/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

कामाचा अ.क्र.	मुल्यांकन र.रू.	जीएसटी 12% र.रू.
1	1031960	123835
2	1009551	121146
3	930693	111683
4	609285	73114
	एकूण	429778

6)नपा संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रं. 36 मधील निविदा मंजूरीखालील मुद्दा क्रं. 45 प्रमाणे नगरविकास विभागाकडुन शासन परिपत्रक क्रं. जीईएन/1093/2365/प्रक्र 126/93 नवी 14 दिनांक 20 ऑक्टोबर 1993 नुसार नपाच्या विविध कामासाठी निविदा मागविण्याच्या/ स्विकारण्याच्या संदर्भात काही मार्गदर्शक सूचना परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्राप्त निविदा अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जादा रकमेच्या असल्या तर त्या अंदापत्रकातील रकमेपेक्षा का जादा आहेत याचे बाबनिहाय परिक्षण करुन निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनेचे काटेकोर पालन करणे बाबत निर्देशित केले आहे तसेच स्थायी निर्देश क्र. 36 मधील मुद्दा क्रं. 45 व 46 नुसार कार्यवाही न करता नगरपरिषदेने जादा दराच्या निविदा स्वीकारल्याने अनावश्यक जादा खर्च झालेला आहे.

7)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता मधील नियम 138 नुसार मोजमाप पुस्ताकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर लेखापाल व लेखापरीक्षक स्वाक्षरी करतील असे असतानाही नगरपरिषद इचलकरंजी यांनी मोजमाप पुस्तिकेत अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 चे परिशिष्ठ 24 नियम 12 अन्वये मोजमाप पुस्तकात नोंद केलेली मोजमापे कंत्राटदाराला मान्य असल्याबाबत त्याची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असता ती घेणेत आलेली नाही.

8)रॉयल्टी रक्कमेवर मंजूर निविदेचा जादा दर लावल्यामुळे व रॉयल्टी रक्कमेवर जी.एस.टी. कर कपात करण्यात आल्यामुळे नगरपरिषदेकडून मक्तेदारास खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

काम अ. क्र.	कामातील गौण खनिजाचे परिमाण	प्रति चौ.मी. प्रमाणे रॉयल्टी रक्कम रू.	निविदेचा जादा दर %	रॉयल्टी रक्कम x निविदा जादा दर	रॉयल्टी रक्कम x 12% GST	एकूण जादा प्रदान रू.

	cum			रू.		
1	2	3(2 x 141.34) **OR** 3(2 x 212)	4	5(3 x 4)	6(3x12%)	7(5+6)
1	44.93	6350	9.9	629	762	1391
2	48.07	6794	9.9	673	815	1488
4	84.77	19981	9.9	1186	2398	3584
					एकूण	6463

9)काम क्र. 3 चे कामात 55.73 घ.मी. गौण खनिज वापरण्यात आले आहे. मात्र रॉयल्टी रक्कम कपात केलेली नाही व देयकात नमूद केलेली नाही. शासन निर्णय महाराष्ट्र राज्य, महसुल व वन विभाग राजपत्र क्र. 146 दि. 4 जून 2021 सुधारीत रॉयल्टी दर रू. 211.92/- प्रती घ.मी. + 4.23 (सरचार्ज) = 216.18 दराने 55.73 घ.मी.चे रू. 12048/- शासन खाती भरणा करून चलन लेखापरीक्षणास सादर करावे.

वरील बाबींची पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये 1468966/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 103, Hmm No : 32)

66 न. प. निधीतून करण्यात आलेल्या HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे कामांबाबत. (पाटणी कन्स्ट्रक्शन)

योजना : न प नि्धी **लेखाशीर्ष** : 00 **वसुलपात्र** : 3137538.00/-
निधी : नगर परिषद स्व- निधी **कलम** : 9ब **अंतिम अमान्य** : 0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात न.प. निधीतून HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे (पाटणी कन्स्ट्रक्शन) कामाचा तपशिल व अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

कामाचे नांव	1)कागवाडे मळा परिसरातील रस्त्याचे HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे (पाटणी कन्स्ट्रक्शन)
	2)लिंबू चौक कुडचे मळा परिसरातील रस्त्याचे HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे
	3)आर.बी.रोड पदमा लॉंड्री हॅवन पिझ्झा पर्यंत HPOIL खुदाई चर डांबरी करणे.
	4)प्र.17 सहकारनगर परिसरातील रस्त्याचे HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे
	5) प्र.क्र. 26 बावणे गल्ली परिसरातील रस्त्याचे HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे (टप्पा क्र. 2)
	6) प्र.क्र. 28/29 लिंबू चौक, दातार मळा,, तांबे माळ शाळा परिसरातील रस्त्याचे HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे

	7)प्र.क्र. 16 महासत्ता चौक ते बिग बझार रस्त्याचे HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे (टप्पा क्र. 2)
	8)प्र.क्र.26 राजाराम स्टेडिअम परिसरात वारणा बँक ते जनता बँक HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे
	9)सहयोग दवाखाना ते अभिनव दुकान (डावी बाजू) व जनता चौक जवळील रस्त्यापर्यंत HPOIL चर खुदाई डांबरी करणे
अंदाजपत्रकीय रककम	1)957185/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	2)649499/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	3)688089/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	4)734008/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	5)526989/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	6)868403/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	7)868403/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	8)1123524/-
	9)462031/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
ठराव	1)स्थायी समिती ठराव क्र. 2 दि. 25.6.2021
	2)स्थायी समिती ठराव क्र. 2 दि. 25.6.2021
	3)स्थायी समिती ठराव क्र. 54 दि. 09.02.2021
	4)स्थायी समिती ठराव क्र. 2 दि. 25.6.2021
	5)स्थायी समिती ठराव क्र. 2 दि. 25.6.2021
	6)स्थायी समिती ठराव क्र. 2 दि. 25.6.2021
	7)स्थायी समिती ठराव क्र. 2 दि. 25.6.2021
	9)स्थायी समिती ठराव क्र. 54 दि. 09.02.2021
तांत्रिक मंजूरी	1) नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/937 दि. 1.7.2021

	2)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/938 दि. 1.7.2021
	3) नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/743 दि. 11.02.2021
	4)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/913 दि. 1.7.2021
	5)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/930 दि. 1.7.2021
	6)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/936 दि. 1.7.2021
	7)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/905 दि. 1.7.2021
	8)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/925 दि. 1.7.2021
	9)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/770 दि. 11.2.2021
प्र.मा.	आदेश क्र. 86 दि. 20.12.2021
निविदा प्रक्रिया	ईटेंडर
निविदा मंजूर	1)8.13 टक्के जादा दराने
	2)8.09 टक्के जादा दराने
	3)9.90 टक्के जादा दराने
	4)8.13 टक्के जादा दराने
	5)8.05 टक्के जादा दराने
	6)8.00 टक्के जादा दराने
	7)8.30 टक्के जादा दराने
	8)8.09 टक्के जादा दराने
	9)9.90 टक्के जादा दराने

मक्तेदाराचे नांव	पाटणी कन्स्ट्रक्शन			
कामाचा आदेश	1)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 1838 दि. 07.01.2022			
	2)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 1842 दि. 07.01.2022			
	3)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 71 दि. 05.10.2022			
	4)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 1854 दि. 7.01.2022			
	5)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 2093 दि. 20.01.2022			
	6)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 1976 दि. 20.01.2022			
	7)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 1837 दि. 7.01.2022			
	8)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 1843 दि. 7.01.2022			
	9)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 62 दि. 5.10.2021			
काम क्र. 1)	काम सुरु दिनांक	07.1.2022	काम पुर्ण दिनांक	12.01.2022
काम क्र. 2)	काम सुरु दिनांक	7.1.2022	काम पुर्ण दिनांक	12.01.2022
काम क्र. 3)	काम सुरु दिनांक	5.10.2021	काम पुर्ण दिनांक	24.11.2021
काम क्र. 4)	काम सुरु दिनांक	7.1.2022	काम पुर्ण दिनांक	14.2.2022
काम क्र. 5)	काम सुरु दिनांक	20.1.2022	काम पुर्ण दिनांक	25.1.2022
काम क्र. 6)	काम सुरु दिनांक	12.1.2022	काम पुर्ण दिनांक	13.01.2022
काम क्र. 7)	काम सुरु दिनांक	7.1.2022	काम पुर्ण दिनांक	27.01.2022
काम क्र. 8)	काम सुरु दिनांक	7.1.2022	काम पुर्ण दिनांक	14.3.2022
काम क्र. 9)	काम सुरु दिनांक	5.10.2021	काम पुर्ण दिनांक	24.11.2021

मोजमाप पुस्तिका	काम क्र. 1)	MB no. 215 पृष्ठ क्र. 18	
	काम क्र. 2)	MB no. 215 पृष्ठ क्र. 14	
	काम क्र. 3)	MB no. 149 पृष्ठ क्र. 41	
	काम क्र. 4)	MB no. 229 पृष्ठ क्र. 27	

	काम क्र. 5)	MB no. 222 पृष्ठ क्र. 27	
	काम क्र. 6)	MB no. 222 पृष्ठ क्र. 22	
	काम क्र. 7)	MB no. 229 पृष्ठ क्र. 18	
	काम क्र. 8)	MB no. 214 पृष्ठ क्र. 19	
	काम क्र. 9)	MB no. 149 पृष्ठ क्र. 35	

कामावरील एकूण खर्च	प्रमाणक क्रमांक	दिनांक	खर्च
काम क्र. 1)	114/2489	18.01.2022	817047
	115/250	18.01.2022	157242
काम क्र. 2)	116/251	18.1.2022	547421
	117/252	18.1.2022	105903
काम क्र. 3)	24/155	10.12.2021	777541
	25/156	10.12.2021	143532
काम क्र. 4)	75/172	11.3.2022	829429
	76/173	11.3.2022	124009
काम क्र. 5)	7/41	02.02.2022	595498
	8/42	02.02.2022	105575
काम क्र. 6)	6/39	02.02.2022	981295
	6(1)/40	02.02.2022	114740
काम क्र. 7)	199/267	10.02.2022	637103
	200/268	10.02.2022	1231870
काम क्र. 8)	181/366	24.3.2022	1123524
काम क्र. 9)	26/157, 27/158	10.12.2021	522095
		एकूण	8813824

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)कामाची बाबनिहाय अंदाजपत्रकीय तरतूद पाहता, बाब क्र. 1 - Excavation for roadway in earth soil ...साठी SSR 2020-21 I/P 2.10/27 या Manual means बाबीचा रू. 272/- मूळ दर घेऊन दर पृथ्थकरण केले आहे. मात्र SSR मध्ये नमूद केलेनुसार अधिक्षक अभियंता यांची मंजूरी घेतलेली नाही. ज्याठिकाणी यांत्रीक पध्दतीने खुदाई करणे शक्य नाही अशाच ठिकाणी मजूरांकरवी खुदाई करणेची आहे. कामाचे फोटो पाहता काम प्रशस्त रस्त्यावरती आहे व काही फोटोंमध्ये जेसीबीच्या सहाय्याने खुदाई केलेचे स्पष्ट दिसून येते. यांत्रीक खुदाई करून दर मात्र मानवी खुदाईचा घेतला आहे. SSR 2020-21 I/P 2.11/27 चा यांत्रीक खुदाईचा मूळ दर रू. 85/- न घेतल्यामुळे खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

बाब	मूळ दर	cess	5% SFA	Cess	Total	i.e.	तफावत
दिलेला दर	272	-5.44	13.33	+5.44	285.33	285.35	196.20
देय दर	85	-1.70	4.17	+1.7	89.17	89.15	

कामनिहाय जादा प्रदान पुढीलप्रमाणे

काम क्र.	बाब क्र. 1 - Excavation for roadway चे परिमाण (घ.मी.)	प्रति घ.मी. झालेले जादा प्रदान	एकूण जादा प्रदान
1	171.93	196.20	33733
2	208.56	196.20	40920
3	137.80	196.20	27036
4	248.26	182.85	45394
5	114.77	196.20	22518
7	166.73	196.20	32712
8	225.10	196.20	44165
9	88.01	196.20	17268
		एकूण	263746

काम क्र. 4 च्या बाबतीत खुदाई दर रू. 272/- ने देणेत आला आहे, त्यामुळे प्रति घ.मी. जादा प्रदान रू.182.85 घेणेत आले आहे. काम क्र. 6 मध्ये खुदाई करण्यात आलेली नाही.

2)कामांमध्ये डांबराचा वापर करण्यात आला असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/2011/प्रक्र 464/ रस्ते दिनांक 21.11.11 मधील नियम 1-ड नुसार कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणेत आलेली नाही.

3)महाराष्ट्र शासन, बांधकाम विभागाकडील SSR 2020-21 मधील सेक्शन D iii) नुसार कामात वापरण्यात आलेल्या विविध साहित्यांच्या आवश्यक त्या सर्व चाचण्या करून घेणे मक्तेदारास बंधनकारक आहे. जर मक्तेदाराने चाचणी अहवाल सादर केला नाही. तर संबंधित अभियंत्यानी पत्राव्दारे मक्तेदारास चाचणी अहवाल

सादर करणेस सुचित करावे व 10 दिवसाच्या विहित मुदतीत चाचणी अहवाल सादर केला नाही, तर चाचणी अहवालासाठी येणारा खर्च व खर्चाच्या पाचपट रक्कम दंड म्हणून मक्तेदाराकडून वसुल करावयाची आहे.

करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 9 / 18 नुसार कामासाठी वापरण्यात येणा-या साहित्याची तसेच केलेल्या कामाची प्रतवारी चांगली असलेबाबत योग्य त्या प्रयोगशाळेतून तपासणी करून ती चांगली असल्याची खात्री झाल्यानंतरच देयक आदा करावयाचे आहे. करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 6(ब) नुसार सुरक्षा ठेवीची 9% रक्कम 6 महिन्यानंतर कामाची प्रत योग्य असेल तरच मक्तेदारास परत करावयाची आहे.

नस्तीसोबत कामात वापरण्यात आलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल नाहीत. कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र. 9 Lab Testing Charges नुसार साहित्याच्या चाचणी अहवालासाठी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे. चाचणी अहवाल सादर करण्यास मक्तेदाराने निष्काळजीपणा दाखवलेचे दिसून येते. त्यामुळे चाचणी अहवालाची तरतूद रक्कम व त्याच्या 5 पट रक्कम खालीलप्रमाणे मक्तेदाराकडून वसुल करणेची कार्यवाही करावी.

काम क्र.	चाचणी अहवालासाठी तरतूद रू.	तरतूदीच्या 5पट दंडाची रक्कम रू.	एकूण वसुल करावयाची रक्कम रू.
1	46800	234000	280801
2	46800	234000	280801
3	48300	241500	289800
5	46800	234000	280801
6	46800	234000	280801
7	46800	234000	280801
9	48300	241500	289800
		एकूण	1983605

4)महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/2018/प्र.क्र. 127/इमा-2 मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रीयेअंतर्गत निविदा तपासणी, स्विकृती देयके अदा करणे व निविदा अंतिम झाल्यानंतर उत्तरदायित्वाबाबत सुधारित सूचनानुसार निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुपये 500 च्या मुद्रांकासह लिफाफा क्रमांक 1 मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार निविदाधारकाकडून प्रत्येकी रुपये 500/- प्रमाणे प्रतिकाम एकूण रुपये 1500/- प्रमाणे 9 कामांचे रू. 13500/- वसुल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

5)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास खालीलप्रमाणे रक्कम रु. 858893/- आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 858893/-

वसुलपात्र करण्यात येत आहे.

कामाचा अ.क्र.	मुल्यांकन र.रू.	जीएसटी 12% र.रू.
1	1007516	120902
2	682841	81941
3	815110	97813
4	843750	101250
5	620419	74450
6	969943	116393
7	671657	80599
8	994269	119312
9	551943	66233
	एकूण	858893

6)नपा संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रं. 36 मधील निविदा मंजूरीखालील मुद्दा क्रं. 45 प्रमाणे नगरविकास विभागाकडुन शासन परिपत्रक क्र. जीईएन/1093/2365/प्रक्र 126/93 नवी 14 दिनांक 20 ऑक्टोबर 1993 नुसार नपाच्या विविध कामासाठी निविदा मागविण्याच्या/ स्विकारण्याच्या संदर्भात काही मार्गदर्शक सूचना परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्राप्त निविदा अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जादा रकमेच्या असल्या तर त्या अंदापत्रकातील रकमेपेक्षा का जादा आहेत याचे बाबनिहाय परिक्षण करुन निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनेचे काटेकोर पालन करणे बाबत निर्देशित केले आहे तसेच स्थायी निर्देश क्र. 36 मधील मुद्दा क्रं. 45 व 46 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना नपानी सदर कामांबाबत जादा दराच्या निविदा स्वीकारल्याने अनावश्यक जादा खर्च शासन निधीवर पडलेला आहे.

7)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता मधील नियम 138 नुसार मोजमाप पुस्ताकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर लेखापाल व लेखापरीक्षक स्वाक्षरी करतील असे असतानाही नगरपरिषद इचलकरंजी यांनी मोजमाप पुस्तिकेत अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 चे परिशिष्ठ 24 नियम 12 अन्वये मोजमाप पुस्तकात नोंद केलेली मोजमापे कंत्राटदाराला मान्य असल्याबाबत त्याची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असता ती घेणेत आलेली नाही.

8)रॉयल्टी रक्कमेवर मंजूर निविदेचा जादा दर लावल्यामुळे व रॉयल्टी रक्कमेवर जी.एस.टी. कर कपात करण्यात आल्यामुळे नगरपरिषदेकडून मक्तेदारास खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

काम अ. क्र.	कामातील गौण खनिजाचे परिमाण cum	प्रति चौ.मी. प्रमाणे रॉयल्टी रक्कम रू.	निविदेचा जादा दर %	रॉयल्टी रक्कम x निविदा जादा दर रू.	रॉयल्टी रक्कम x 12% GST	एकूण जादा प्रदान रू.

1	2	3(2 x 141.34) **OR** 3(2 x 212)	4	5(3 x 4)	6(3x12%)	7(5+6)
3	44.93	6350	9.9	629	762	1391
4	82.75	17543	8.13	1426	2105	3531
5	37.42	7933	8.05	639	952	1591
7	91.07	19307	8.30	1603	2317	3920
8	225.10	31816	8.09	2574	3818	6392
9	31.30	4424	9.90	438	531	969
					एकूण	17794

9)काम क्र. 1 चे मोजमाप पुस्तिक लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

वरील बाबींची पुर्तता करेपर्यंत रक्कम रुपये 3137538/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 104, Hmm No : 85)

67 न. प. निधीतून करण्यात आलेल्या HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे कामांबाबत. (ओम कन्स्ट्रक्शन)

योजना	:	न.प. नि्धी	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	588552.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात न.प. निधीतून HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे कामाचा तपशिल व अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

कामाचे नांव	1)प्र.क्र. 25/27 मेन रोड जनता चौक ते महात्मा गांधी पुतळा व पीएनजी ज्वेलर्स ते महेश भवन पर्यंत HPOIL साईडपटटी मधील खुदाई चर डांबरी करणे
	2)प्र.क्र. 22 व 23 शाहू महाराज पुतळा ते तीन बत्ती चौक (उजवी बाजू) पर्यंत HPOIL साईडपटटी मधील खुदाई चर डांबरी करणे
	3)प्र. क्र. 28 आवाडेनगर परिसरातील रस्त्याचे HPOIL खुदाई चर पॅचवर्क करणे.
	4)मंगळवार पेठ नारायण टॉकीज परिसर केबल खुदाई चर डांबरी पॅचवर्क करणे
अंदाजपत्रकीय रककम	1)870088/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी
	2)880536/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी

	3)821616/- /- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी			
	4)816085/- + 1%कामगार उपकर + 12% जीएसटी			
ठराव	1)स्थायी समिती ठराव क्र. 54 दि. 09.02.2021			
	2)स्थायी समिती ठराव क्र. 54 दि. 09.02.2021			
	3)स्थायी समिती ठराव क्र. 2 दि. 25.6.2021			
	4)स्थायी समिती ठराव क्र. 244 दि. 28.1.2019			
तांत्रिक मंजूरी	1) नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/741 दि. 11.2.2021			
	2)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/751 दि. 11.02.2021			
	3) नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/916 दि. 1.07.2021			
	4)शहर अभियंता, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/93 दि. 7.2.2019			
निविदा प्रक्रिया	ईटेंडर			
निविदा मंजूर	1)10.40 टक्के जादा दराने			
	2)9.90 टक्के जादा दराने			
	3)8.21 टक्के जादा दराने			
	4)7.53 टक्के जादा दराने			
मक्तेदाराचे नांव	काम क्र. 1 ते 3 - ओम कन्स्ट्रक्शन काम क्र. 4 - पाकिजा कन्स्ट्रक्शन			
कामाचा आदेश	1)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 27 दि. 11.06.2021			
	2)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 32 दि. 30.12.2021			
	3)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 2174 दि. 31.1.2022			
	4)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 64 दि. 13.08.2021			
काम क्र. 1)	काम सुरु दिनांक	11.6.2021	काम पुर्ण दिनांक	22.8.2021

काम क्र. 2)	काम सुरु दिनांक	30.12.2021	काम पुर्ण दिनांक	30.12.2021
काम क्र. 3)	काम सुरु दिनांक	31.1.2022	काम पुर्ण दिनांक	8.02.2022
काम क्र. 4)	काम सुरु दिनांक	19.9.2019	काम पुर्ण दिनांक	19.11.2019

मोजमाप पुस्तिका	काम क्र. 1)	MB no. 197 पृष्ठ क्र. 19
	काम क्र. 2)	MB no. 02 पृष्ठ क्र. 23
	काम क्र. 3)	MB no. 197 पृष्ठ क्र. 32
	काम क्र. 4)	MB no. 17 पृष्ठ क्र. --

कामावरील एकूण खर्च	प्रमाणक क्रमांक	दिनांक	खर्च
काम क्र. 1)	125/294	29.09.2021	1082348
काम क्र. 2)	96/208 97/209	14.3.2022	1030710
काम क्र. 3)	94/207	14.3.2022	977860
काम क्र. 4)	538/371	31.3.2021	857013
		एकूण	3947931

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)कामाची बाबनिहाय अंदाजपत्रकीय तरतूद पाहता, बाब क्र. 1 - Excavation for roadway in earth soil .. साठी SSR 2020-21 I/P 2.10/27 या Manual means बाबीचा रू. 272/- मूळ दर घेऊन दर पृथ्थकरण केले आहे. मात्र SSR मध्ये नमूद केलेनुसार अधिक्षक अभियंता यांची मंजूरी घेतलेली नाही. ज्याठिकाणी यांत्रीक पध्दतीने खुदाई करणे शक्य नाही अशाच ठिकाणी मजूरांकरवी खुदाई करणेची आहे. कामाचे फोटो पाहता काम प्रशस्त रस्त्यावरती आहे व काही फोटोंमध्ये जेसीबीच्या सहाय्याने खुदाई केलेचे स्पष्ट दिसून येते. यांत्रीक खुदाई करून दर मात्र मानवी खुदाईचा घेतला आहे. SSR 2020-21 I/P 2.11/27 चा यांत्रीक खुदाईचा मूळ दर रू. 85/- न घेतल्यामुळे खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

काम क्र.	बाब	मूळ दर	cess	5% SFA	Cess	Total	i.e.	तफावत
1 व 2	दिलेला दर	272	--	--	---	--	272.00	182.85

	देय दर	85	-1.70	4.17	+1.7	89.17	89.15	
3	दिलेला दर	272	-5.44	13.33	+5.44	285.33	285.35	196.20

कामनिहाय जादा प्रदान पुढीलप्रमाणे

काम क्र.	बाब क्र. 1 - Excavation for roadway चे परिमाण (घ.मी.)	प्रति घ.मी. झालेले जादा प्रदान	एकूण जादा प्रदान
1	93.93	182.85	17175
2	246.90	182.85	45146
3	122.11	196.20	23958
		एकूण	86279

2)कामांमध्ये डांबराचा वापर करण्यात आला असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/2011/प्रक्र 464/ रस्ते दिनांक 21.11.11 मधील नियम 1-ड नुसार कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणेत आलेली नाही.

3)महाराष्ट्र शासन, बांधकाम विभागाकडील SSR 2020-21 मधील सेक्शन डी iii) नुसार कामात वापरण्यात आलेल्या विविध साहित्यांच्या आवश्यक त्या सर्व चाचण्या करून घेणे मक्तेदारास बंधनकारक आहे. जर मक्तेदाराने चाचणी अहवाल सादर केला नाही. तर संबंधित अभियंत्यानी पत्राव्दारे मक्तेदारास चाचणी अहवाल सादर करणेस सुचित करावे व 10 दिवसाच्या विहित मुदतीत चाचणी अहवाल सादर केला नाही, तर चाचणी अहवालासाठी येणारा खर्च व खर्चाच्या पाचपट रक्कम दंड म्हणून मक्तेदाराकडून वसुल करावयाची आहे.

करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 9 / 18 नुसार कामासाठी वापरण्यात येणा-या साहित्याची तसेच केलेल्या कामाची प्रतवारी चांगली असलेबाबत योग्य त्या प्रयोगशाळेतून तपासणी करून ती चांगली असल्याची खात्री झाल्यानंतरच देयक आदा करावयाचे आहे. करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 6(ब) नुसार सुरक्षा ठेवीची 9% रक्कम 6 महिन्यानंतर कामाची प्रत योग्य असेल तरच मक्तेदारास परत करावयाची आहे.

नस्तीसोबत चाचणी अहवाल नाहीत किंवा पावती नाही. कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र. 9 Lab Testing Chargeshellip; नुसार साहित्याच्या चाचणी अहवालासाठी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे. चाचणी अहवाल सादर करण्यास मक्तेदाराने निष्काळजीपणा दाखवलेचे दिसून येते. त्यामुळे मक्तेदाराकडून चाचणी अहवाल व त्याची पावती रक्कम प्राप्त करून घ्यावी अन्यथा रक्कम रू. 54080/- खालीलप्रमाणे मक्तेदाराकडून वसुल करणेची कार्यवाही करावी.

काम क्र.	चाचणी अहवाल तरतूद रू.	आदा केलेली रक्कम रू.	वसुल करावयाची रक्कम रू.	शेरा
1	48950	5100	5100	चाचणी अहवाल व पावती नाही.
2	48980	--	48980	पावती नाही.

		एकूण	54080	

4)महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/2018/प्र.क्र. 127/इमा-2 मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रीयेअंतर्गत निविदा तपासणी, स्विकृती देयके अदा करणे व निविदा अंतिम झाल्यानंतर उत्तरदायित्वाबाबत सुधारित सूचनानुसार निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुपये 500 च्या मुद्रांकासह लिफाफा क्रमांक 1 मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार निविदाधारकाकडून प्रत्येकी रुपये 500/- प्रमाणे प्रतिकाम एकूण रुपये 1500/- प्रमाणे 4 कामांचे रू. 6000/- वसुल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

5)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास खालीलप्रमाणे रक्कम रु. 428229/- आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 428229/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

कामाचा अ.क्र.	मुल्यांकन र.रू.	जीएसटी 12% र.रू.
1	957830	114940
2	1030710	123685
3	977860	98594
4	758419	91010
	एकूण	428229

6)नपा संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रं. 36 मधील निविदा मंजूरीखालील मुद्दा क्रं. 45 प्रमाणे नगरविकास विभागाकडुन शासन परिपत्रक क्र. जीईएन/1093/2365/प्रक्र 126/93 नवी 14 दिनांक 20 ऑक्टोबर 1993 नुसार नपाच्या विविध कामासाठी निविदा मागविण्याच्या/ स्विकारण्याच्या संदर्भात काही मार्गदर्शक सूचना परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्राप्त निविदा अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जादा रकमेच्या असल्या तर त्या अंदापत्रकातील रकमेपेक्षा का जादा आहेत याचे बाबनिहाय परिक्षण करुन निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनेचे काटेकोर पालन करणे बाबत निर्देशित केले आहे तसेच स्थायी निर्देश क्र. 36 मधील मुद्दा क्रं. 45 व 46 नुसार कार्यवाही न करता नगरपरिषदेने जादा दराच्या निविदा स्वीकारल्याने अनावश्यक जादा खर्च झालेला आहे.

7)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता मधील नियम 138 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर लेखापाल व लेखापरीक्षक स्वाक्षरी करतील असे असतानाही नगरपरिषद इचलकरंजी यांनी मोजमाप पुस्तिकेत अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 चे परिशिष्ठ 24 नियम 12 अन्वये मोजमाप पुस्तकात नोंद केलेली मोजमापे कंत्राटदाराला मान्य असल्याबाबत त्याची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असता ती घेणेत आलेली नाही.

8)रॉयल्टी रक्कमेवर मंजूर निविदेचा जादा दर लावल्यामुळे व रॉयल्टी रक्कमेवर जी.एस.टी. कर कपात करण्यात आल्यामुळे नगरपरिषदेकडून मक्तेदारास खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

काम अ. क्र.	कामातील गौण खनिजाचे परिमाण cum	प्रति चौ.मी. प्रमाणे रॉयल्टी रक्कम रू.	निविदेचा जादा दर %	रॉयल्टी रक्कम x निविदा जादा दर रू.	रॉयल्टी रक्कम x 12% GST	एकूण जादा प्रदान रू.
1	2	3(2 x 141.34) **OR** 3(2 x 212)	4	5(3 x 4)	6(3x12%)	7(5+6)
1	44.43	6280	10.40	653	753	1406
2	141.22	19960	9.90	1976	2395	4371
3	61.04	12940	8.21	1062	1553	2615
4	162.00	22897	7.53	1724	2748	4472
					एकूण	12864

9)वरील काम क्र. 1 मुदतीपेक्षा 11 दिवसांनी विलंबाने झालेने करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 6 नुसार प्रतिदिन रू. 100/- प्रमाणे रू. 1100/- वसुल करून पुर्तता सादर करावी.

वरील प्रमाणे एकूण रक्कम रु. 588552/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 105, Hmm No : 115)

68 शहापूर चावडी ते चौंडश्वरी कॉलनीपर्यंतच्या रस्त्याकरीता डिव्हायडर करणे

योजना	:	सर्वसाधारण रस्ता अनुदान	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 103656.00/-

नगरपरिषद इचलकरंजीने सन 2021-22 मध्ये केलेल्या शहापूर चावडी ते चौंडश्वरी कॉलनीपर्यंतच्या रस्त्याकरीता डिव्हायडर करणे कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. सदरबाबत अर्धसमास पत्र दzwj;िले होते. त्यास उत्तर प्राप्त न झालेने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

कामाचे नाव	शहापूर चावडी ते चौंडश्वरी कॉलनीपर्यंतच्या रस्त्याकरीता डिव्हायडर करणे.
लेखाशिर्षक	सर्वसाधारण रस्ता अनुदान
अंदाजपत्रकीय रक्कम रु.	874565/-
प्रशासकीय मंजूरी	जिल्हाधिकारी कोल्हापूर क्र.कार्या.11/नपा/प्र.मा/एसआर/
तांत्रिक मंजूरी आदेश	शहर अभियंता 780 दि.11.02.2021

मक्तेदाराचे नाव	शंभूराजे कन्स्ट्रक्शन्स
कामाचा आदेश	जा.क्र.न.प./बांध/02/2021 -2022 दि. 08.07.2021
काम सुरु दिनांक	08.07.2021
काम पूर्ण दिनांक	18.07.2021
कामाची मुदत	60 दिवस
मोजमाप पुस्तिका	**मो.मा. पुस्तिका क्र. 96 पान क्र. 29**

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	
09	15.02.2022	818200	1ले व अंतीम देयक

नगरपरिषद इचलकरंजी यांनी उपरोक्त विकास कामावर केलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

1)कामाची बाबनिहाय अंदाजपत्रकीय तरतूद पाहता, बाब क्र. 1 - Excavation for foundation in hard murum .. साठी SSR 2020-21 I/P 21.06/131 मधील बिल्डींग सेक्शनचा दर घेण्यात आला आहे. सदरचे काम रस्त्याचे असल्याने रोड सेक्शनचा Excavation for roadway in hard murum .. I/P 2.13/27चा दर घेणे आवश्यक होते. तो न घेतल्यामुळे खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

बाब	मूळ दर	cess	5% SFA	Cess	Total	i.e.	तफावत
दिलेला दर	200	-4	9.8	+4	209.80	209.80	111.20
देय दर	94	-1.88	4.61	+1.88	98.61	98.60	

वरीलप्रमाणे रू. 111.20 प्रति घ.मी. जादा प्रदान झालेने 36.47 घ.मी. परिमाणापोटी एकूण रू. 4055/- जादा प्रदान झाले आहे.

2)Government polytechniq, Kolhapur या त्रयस्थ शासकीय संस्थेचा जा.क्र. GPKP/CED/ 2022/ 453 दि. 29.01.2022 रोजीचा लेखापरीक्षण अहवाल पाहता बाब क्र. 5 - Pro/Lay/fising pvc pipes of 50mm dia .. (SSR 2021-22 मधील 42.26) हे काम केल्याचे नमूद आहे. मात्र अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार व देयक प्रदान करताना SSR 2021-22 मधील 42.27 Pro/Lay/fising pvc pipes of 50mm dia.. चा दर दिल्याने पुढीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

बाब	मूळ दर	cess	5% SFA	Cess	Total	तफावत
दिलेला दर	350	-7	343	+7	367.15	5.25
देय दर	345	-6.9	338.10	+6.9	361.90	

269.90 रनिंग मीटर पाईपसाठी रू. 5.25 नुसार रक्कम रू. 1417/- जादा प्रदान झाले आहे.

3)चाचणी अहवालापोटी रू. 14601/- आदा करण्यात आले आहेत. नस्तीसोबत शरद इन्स्टिटयूट, इचलकरंजी

यांचे चाचणी अहवाल आहेत मात्र पावती नाही. त्यामुळे शरद इन्स्टिटयूट, इचलकरंजी यांची चाचणी अहवालाची पावती सादर करावी. तसेच महाराष्ट्र शासन, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक - कौविउ-2017/प्र.क्र./237/अभियान-1/दि. 28.08.2018 नुसार शासकीय तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविदयालये यांना निरीक्षण संस्था म्हणून दर्जा बहाल करण्यात आलेला आहे. त्यामुळे शरद इन्स्टिटयूट, इचलकरंजी या खाजगी अभियांत्रिकी महाविदयालयाचा चाचणी अहवाल घेणे नियमबाहय आहे.

4)महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. बीडीजी 2016/प्र.क्र.132/इमा.2 दि. 27.06.2016 नुसार कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावण्याच्या बाबीचा अंदाजपत्रक तसेच निविदा शर्तीमध्ये समाविष्ठ करून फलक लावणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. मात्र नस्तीसोबत माहितीफलकाचा फोटो जोडलेला नाही.

5)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास रक्कम रु. 818200/- (मुल्यांकन रू. 98184 * 12%) आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 98184/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

6)कामाचे मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

वरील आक्षेपांची पूर्तता लेखापरीक्षणास सादर करण्यात यावी तोपर्यंत रक्कम रु. 103656/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 106, Hmm No : 116)

69 शहापूर चावडी ते योगाश्रम मंदिरापर्यंत रस्ता डांबरी करणे

योजना	:	सर्वसाधारण रस्ता अनुदान	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	112854.00/-

नगरपरिषद इचलकरंजीने सन 2021-22 मध्ये केलेल्या शहापूर चावडी ते योगाश्रम मंदिरापर्यंत रस्ता डांबरी करणे कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नाव	शहापूर चावडी ते योगाश्रम मंदिरापर्यंत रस्ता डांबरी करणे.
लेखाशिर्षक	सर्वसाधारण रस्ता अनुदान
अंदाजपत्रकीय रक्कम रु.	879604/-
तांत्रिक मंजूरी आदेश	शहर अभियंता 785 दि.11.02.2021
मक्तेदाराचे नाव	पाकिजा कन्स्ट्रक्शन्स

कामाचा आदेश	मुख्याधिकारी, नगरपरिषद इचलकरंजी जा.क्र.न.प./बांध/07/2021 -2022 दि. 06.07.2021
काम सुरु दिनांक	06.07.2021
काम पूर्ण दिनांक	18.07.2021
कामाची मुदत	60 दिवस
मोजमाप पुस्तिका	**मो.मा. पुस्तिका क्र. 183 पान क्र. 05**
निविदा मंजूर	**6.10 टक्के जादा दराने**

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	
06	31.12.2021	879602	

नगरपरिषद इचलकरंजी यांनी उपरोक्त विकास कामावर केलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

1)सदर कामाची प्रशासकीय मान्यता लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

2)नपा संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रं. 36 मधील निविदा मंजूरीखालील मुद्दा क्रं. 45 प्रमाणे नगरविकास विभागाकडुन शासन परिपत्रक क्रं. जीईएन/1093/2365/प्रक्र 126/93 नवी 14 दिनांक 20 ऑक्टोबर 1993 नुसार नपाच्या विविध कामासाठी निविदा मागविण्याच्या/ स्विकारण्याच्या संदर्भात काही मार्गदर्शक सूचना परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्राप्त निविदा अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जादा रकमेच्या असल्या तर त्या अंदापत्रकातील रकमेपेक्षा का जादा आहेत याचे बाबनिहाय परिक्षण करुन निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनेचे काटेकोर पालन करणे बाबत निर्देशित केले आहे तसेच स्थायी निर्देश क्र. 36 मधील मुद्दा क्रं. 45 व 46 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना नगरपरिषदेने 6.10 टक्के जादा दराने निविदा स्वीकारल्याने अनावश्यक जादा खर्च शासन निधीवर पडलेला आहे.

3)रॉयल्टी रक्कमेवर मंजूर निविदेचा जादा दर लावल्यामुळे व रॉयल्टी रक्कमेवर जी.एस.टी. कर कपात करण्यात आल्यामुळे नगरपरिषदेकडून मक्तेदारास खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

कामातील गौण खनिजाचे परिमाण cum	प्रति चौ.मी. प्रमाणे रॉयल्टी रक्कम रू.	निविदेचा जादा दर %	रॉयल्टी रक्कम x निविदा जादा दर रू.	रॉयल्टी रक्कम x 12% GST	एकूण जादा प्रदान रू.
128.55	18170	6.10	1108	2180	3288

4)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता मधील नियम 138 नुसार मोजमाप पुस्ताकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर लेखापाल व लेखापरीक्षक स्वाक्षरी करतील असे असतानाही नगरपरिषद इचलकरंजी यांनी मोजमाप पुस्तिकेत अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 चे परिशिष्ठ 24 नियम 12 अन्वये मोजमाप पुस्तकात नोंद केलेली मोजमापे कंत्राटदाराला मान्य असल्याबाबत त्याची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असता ती घेणेत आलेली नाही.

5)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास रक्कम रु. 109166/- (मुल्यांकन रू. 909715 * 12%) आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 109166/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

6) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra stamp Act (Amendment) (Maha. act No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत रु.500/- व त्यापुढील रक्कमेच्या प्रत्येक लाखास रु.100/- या प्रमाणे मुद्रांक घ्यावयाचे असून करारपत्र रू. 100/- वर केलेने रू. 400/- शासन भरणा करणे आवश्यक आहे.

वरील आक्षेपांची पूर्तता लेखापरीक्षणास सादर करण्यात यावी तोपर्यंत रक्कम रु. 112854/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 107, Hmm No : 117)

70 श्रीमंत घोरपडे नाटयगृह इमारतीमध्ये स्टेज व रंगकाम करणे

योजना	:	N P FUND	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	414858.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजीने सन 2020-21-22 मध्ये केलेल्या श्रीमंत घोरपडे नाटयगृह इमारतीमध्ये स्टेज व रंगकाम करणे कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. सदरबाबत अर्धसमास पत्र देणेत आले होते. त्यास उत्तर प्राप्त न झालेने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

कामाचे नाव	श्रीमंत घोरपडे नाटयगृह इमारतीमध्ये स्टेज व रंगकाम करणे.
लेखाशिर्षक	न.प.फंड
अंदाजपत्रकीय रक्कम रु.	834889/-
तांत्रिक मंजूरी आदेश	नगर अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, इचलकरंजी नगरपरिषद, जा.क्र.बांध/तां.मा/548/549/20149 दि. 19.9.2019
मक्तेदाराचे नाव	इसाक तराळ
कामाचा आदेश	मुख्याधिकारी, नगरपरिषद इचलकरंजी जा.क्र.न.प./बांध/156/2020 दि. 17.2.2020
काम सुरु दिनांक	17.02.2020

काम पूर्ण दिनांक	16.3.2020
कामाची मुदत	30 दिवस
मोजमाप पुस्तिका	**मो.मा. पुस्तिका क्र. 1034 पान क्र. 27 ते32**

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	
542/375	31.03.2021	806122	1ले व अंतीम देयक

नगरपरिषद इचलकरंजी यांनी उपरोक्त विकास कामावर केलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

1)उपरोक्त कामासाठी बांधकाम विभागाकडील SSR 2019-20 वापरण्यात आला आहे. SSR 2019-20 मधील 34.01 नुसार कामातील बाब क्र. 6 Providing and applying boiled linseed oil in one coat, to the new wood work, including knotting, preparing the surface, scaffolding etc. complete as directed या बाबीचा मूळ दर 22.00 आहे. मात्र अंदाजपत्रकीय तरतूद पाहता या बाबीसाठी रू. 3226.90 दर घेऊन दर पृथ:करण केलेने खालीलप्रमाणे प्रतिमीटर खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

बाब	मूळ दर	cess	5% SFA	Cess	Total	i.e.	तफावत
दिलेला दर	3226.90	-0.44	1.08	+.044	3227.98	3228.00	3204.90
देय दर	22	-0.44	1.08	+.044	23.08	23.10	

सदर बाबीचे 84.17 चौ. मीटर परिमाणासाठी रू. 3204.90 जादा दराने रक्कम रू. 269756/- जादा प्रदान झाले आहे.

2)नपा संचालनालयाचे स्थायी निर्देश क्र. 36 मधील निविदा मंजूरीखालील मुद्दा क्रं. 45 प्रमाणे नगरविकास विभागाकडुन शासन परिपत्रक क्रं. जीईएन/1093/2365/प्रक्र 126/93 नवी 14 दिनांक 20 ऑक्टोबर 1993 नुसार नपाच्या विविध कामासाठी निविदा मागविण्याच्या/ स्विकारण्याच्या संदर्भात काही मार्गदर्शक सूचना परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्राप्त निविदा अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जादा रकमेच्या असल्या तर त्या अंदापत्रकातील रकमेपेक्षा का जादा आहेत याचे बाबनिहाय परिक्षण करुन निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनेचे काटेकोर पालन करणे बाबत निर्देशित केले आहे तसेच स्थायी निर्देश क्र. 36 मधील मुद्दा क्रं. 45 व 46 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. नगरपरिषदेने सदर कामाची निविदा 5.00 टक्के जादा दराने स्वीकारल्याने रू. 38387/- अनावश्यक जादा खर्च झाला आहे.

3)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता मधील नियम 138 नुसार मोजमाप पुस्ताकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर लेखापाल व लेखापरीक्षक स्वाक्षरी करतील असे असतानाही नगरपरिषद इचलकरंजी यांनी मोजमाप पुस्तिकेत अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 चे परिशिष्ठ 24 नियम 12 अन्वये मोजमाप पुस्तकात नोंद केलेली मोजमापे कंत्राटदाराला मान्य असल्याबाबत त्याची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असता ती घेणेत आलेली नाही.

4)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने

सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास रक्कम रु. 145102/- (मुल्यांकन रू. 806122 * 18%) आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 145102/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

5)सदर कामाची प्रशासकीय मान्यता व चाचणी अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

वरील आक्षेपांच्या पुर्ततेस्तव रक्कम रु. 414858/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 108, Hmm No : 118)

71 प्रभाग क्रमांक 6 केडीसी गोडाऊन ते स्टाईल अप टेलर व केडीसी गोडाऊन ते दत्तनगर प्रतिनिधी बार रस्ता डांबरी करणे.

योजना	:	सर्वसाधारण रस्ता अनुदान	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 369257.00/-

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात सर्वसाधारण रस्ता अनुदान निधीतून प्रभाग क्रमांक 6 केडीसी गोडाऊन ते स्टाईल अप टेलर व केडीसी गोडाऊन ते दत्तनगर प्रतिनिधी बार रस्ता डांबरी करणे कामाचा तपशिल व अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

कामाचे नांव	1)प्र.क्र.6 केडीसी गोडाऊन ते स्टाईल अप टेलर रस्ता डांबरी करणे.
	2)प्र.क्र.6 केडीसी गोडाऊन ते दत्तनगर प्रतिनिधी बार रस्ता डांबरी करणे.
अंदाजपत्रकीय रककम	काम क्र. 1)871692/-
	काम क्र. 2)871692/-
निधीचे नाव	सर्वसाधारण रस्ता अनुदान
तांत्रिक मंजूरी	1)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/141 दि. 01.03.2019
	2))नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/140 दि. 01.03.2019
निविदा प्रक्रिया	ईटेंडर
निविदा मंजूर	काम क्र. 1 - 6.60 टक्के जादा दराने
	काम क्र. 2 - 6.60 टक्के जादा दराने

मक्तेदाराचे नांव	भगवान कांबुरे
कामाचा आदेश	1)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 6 दि. 17.02.2020
	2)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 5 दि. 17.02.2020
काम सुरु दिनांक	1) 17.02.2020
	2) 17.02.2020
काम पुर्ण दिनांक	1)19.03.2020
	2)19.03.2020
मोजमाप पुस्तिका	1)09/40,44,48
	2) 09/39,43,47

कामावरील एकूण खर्च	प्रमाणक क्रमांक	दिनांक	खर्च
काम क्र. 1)	3	23.4.2020	675832
	4	23.4.2020	141980
	2	28.10.2021	109241
काम क्र. 2)	1	23.4.2020	676758
	2	23.4.2020	146363
	3	28.10.2021	106100
		एकूण	1856274

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/2018/प्र.क्र. 127/इमा-2 मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रीयेअंतर्गत निविदा तपासणी, स्विकृती देयके अदा करणे व निविदा अंतिम झाल्यानंतर उत्तरदायित्वाबाबत सुधारित सूचनानुसार निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुपये 500 च्या मुद्रांकासह लिफाफा क्रमांक 1 मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार निविदाधारकाकडून प्रत्येकी रुपये 500/- प्रमाणे प्रतिकाम एकूण रुपये 1500/- प्रमाणे 2 कामांचे रू. 3000/- वसुल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

2)काम क्र. 1 चे अंदाजपत्रक पाहता 75mm MPM, 20mm OGC व Seal coat साठी प्रत्येकी 2030.00 चौ.मी. ची तरतूद करण्यात आली होती. मोजमाप पुस्तकानुसार प्रत्यक्षात काम 1006.35 चौ.मी. करण्यात आले आहे.

काम क्र. 2 चे बाबत नगरअभियंता, इचलकरंजी नगरपरिषद यांनी दि. 16.03.2020 रोजीच्या पत्रान्वये सदर कामात Construction of granular sub base Grade - I व Grade - II या बाबींची गरज असलेचे नमूद करून स्थायी समितीच्या निदर्शनास येणेसाठी प्रस्तावित केले आहे. मूळ अंदाजपत्रकीय रक्कमेमध्येच प्रस्तावित केलेल्या Grade - I व Grade - II या बाबींचे काम करणे शक्य होईल असे नमूद करण्यात आले आहे. मात्र मूळ अंदाजपत्रकातील रस्त्याची लांबी 145मी. आहे. मात्र प्रत्यक्षात मोजमाप पुस्तकानुसार करण्यात आलेल्या रस्त्याची लांबी फक्त 81 मी. म्हणजेच मूळ अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा तब्बल 64 मी. कमी काम केलेचे दिसून येते.

3)कामातील Grade - I व Grade - II या बाबींमध्ये रॉयल्टीची रक्कम खाली नमूद केलेनुसार कमी कपात करण्यात आली आहे. कमी कपात रॉयल्टी रक्कम रू. 62911/- शासन भरणा करून चलन लेखापरीक्षणास सादर करावे.

काम क्र.	केलेले काम घ.मी.	प्रमाण	रॉयल्टीसाठी घ्यावयाचे परिमाण	रॉयल्टीसाठी घेतलेले परिमाण	तफावत	कपात करणे आवश्यक र.रू.
1	Grade-I - 150.93	1.28	193.19	96.59	96.60	13653
	Grade-II - 75.45	1.28	96.58	33.80	62.78	8873
	MPM 75 - 1006.35	0.063	63.40	--	63.40	8961
2	Grade-I - 148.64	1.28	190.26	95.12	95.14	13447
	Grade-II - 74.31	1.28	95.12	33.29	61.83	8739
	MPM 75 - 1037.41	0.063	65.36	--	65.36	9238
					एकूण	62911

4)कामांमध्ये डांबराचा वापर करण्यात आला असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/2011/प्रक्र 464/ रस्ते दिनांक 21.11.11 मधील नियम 1-ड नुसार कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणेत आलेली नाही.

5)महाराष्ट्र शासन, बांधकाम विभागाकडील SSR 2020-21 मधील सेक्शन डी; iii) नुसार कामात वापरण्यात आलेल्या विविध साहित्यांच्या आवश्यक त्या सर्व चाचण्या करून घेणे मक्तेदारास बंधनकारक आहे. जर मक्तेदाराने चाचणी अहवाल सादर केला नाही. तर संबंधित अभियंत्यानी पत्राव्दारे मक्तेदारास चाचणी अहवाल सादर करणेस सुचित करावे व 10 दिवसाच्या विहित मुदतीत चाचणी अहवाल सादर केला नाही, तर चाचणी अहवालासाठी येणारा खर्च व खर्चाच्या पाचपट रक्कम दंड म्हणून मक्तेदाराकडून वसुल करावयाची आहे.

करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 9 / 18 नुसार कामासाठी वापरण्यात येणा-या साहित्याची तसेच केलेल्या कामाची प्रतवारी चांगली असलेबाबत योग्य त्या प्रयोगशाळेतून तपासणी करून ती चांगली असल्याची खात्री झाल्यानंतरच देयक आदा करावयाचे आहे.

नस्तीसोबत चाचणी अहवाल नाहीत किंवा पावती नाही. मक्तेदाराकडून चाचणी अहवालाची पावती प्राप्त करून घ्यावी अन्यथा प्रत्येक कामासाठी आदा केलेली रक्कम रू. 36750/- नुसार दोन कामांची रक्कम रू. 73500/- मक्तेदाराकडून वसुल करणेची कार्यवाही करावी.

6)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास खालीलप्रमाणे रक्कम रु. 222753/- आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 222753/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

कामाचा अ.क्र.	मुल्यांकन र.रू.	जीएसटी 12% र.रू.
1	927053	111246
2	929221	111507
	एकूण	222753

7)रॉयल्टी रक्कमेवर मंजूर निविदेचा जादा दर लावल्यामुळे व रॉयल्टी रक्कमेवर जी.एस.टी. कर कपात करण्यात आल्यामुळे नगरपरिषदेकडून मक्तेदारास खालीलप्रमाणे रक्कम रू. 7093/ जादा प्रदान झाले आहे.

काम अ. क्र.	रॉयल्टी रक्कम रू.	निविदेचा जादा दर %	रॉयल्टी रक्कम x निविदा जादा दर रू.	एकूण	एकूण रक्कम x 12% GST	एकूण जादा प्रदान रू.
1	18429	6.60	1216	19646	2357	3573
2	18149	6.60	1198	19347	2322	3520
					एकूण	7093

वरीलप्रमाणे रक्कम रू. 7093/- वसुलपात्र करण्यात यावी.

8)नपा संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रं. 36 मधील निविदा मंजूरीखालील मुद्दा क्रं. 45 प्रमाणे नगरविकास विभागाकडुन शासन परिपत्रक क्रं. जीईएन/1093/2365/प्रक्र 126/93 नवी 14 दिनांक 20 ऑक्टोबर 1993 नुसार नपाच्या विविध कामासाठी निविदा मागविण्याच्या/ स्विकारण्याच्या संदर्भात काही मार्गदर्शक सूचना परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्राप्त निविदा अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जादा रकमेच्या असल्या तर त्या अंदापत्रकातील रकमेपेक्षा का जादा आहेत याचे बाबनिहाय परिक्षण करुन निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनेचे काटेकोर पालन करणे बाबत निर्देशित केले आहे तसेच स्थायी निर्देश क्र. 36 मधील मुद्दा क्रं. 45 व 46 नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र नगरपरिषदेने दोन्ही कामांसाठी 6.60 टक्के जादा दराच्या निविदा स्वीकारल्याने अनावश्यक जादा खर्च रू. 115063/- शासन निधीवर पडलेला आहे.

9)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता मधील नियम 138 नुसार मोजमाप पुस्ताकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर लेखापाल व लेखापरीक्षक स्वाक्षरी करतील असे असतानाही नगरपरिषद इचलकरंजी यांनी मोजमाप पुस्तिकेत अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 चे परिशिष्ठ 24 नियम 12 अन्वये मोजमाप पुस्तकात नोंद केलेली मोजमापे कंत्राटदाराला मान्य असल्याबाबत त्याची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही

केलेली नाही.

वरीलप्रमाणे एकूण रक्कम रु. 369257/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 109, Hmm No : 119)

72 कोल्हापूर नाका ते छत्रपती शाहू महाराज पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळा पर्यंत मुख्य रस्त्यावर रिफलेक्टेड रोड स्टड (cat eyes) बसविणे

योजना	:	N P FUND	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 216903.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात न.प. निधीतून कोल्हापूर नाका ते छत्रपती शाहू महाराज पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळा पर्यंत मुख्य रस्त्यावर रिफलेक्टेड रोड स्टड (cat eyes) बसविणे कामाचा तपशिल व अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

कामाचे नाव	कोल्हापूर नाका ते छत्रपती शाहू महाराज पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळा पर्यंत मुख्य रस्त्यावर रिफलेक्टेड रोड स्टड (cat eyes) बसविणे
लेखाशिर्षक	न.प.फंड
अंदाजपत्रकीय रक्कम रु.	904997/- निविदा मंजूर - 1.99 टक्के जादा दराने
तांत्रिक मंजूरी आदेश	नगर अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, इचलकरंजी नगरपरिषद, जा.क्र.बांध/तां.मा/1050/2021 दि. 9.8.2021
मक्तेदाराचे नाव	पाटणी कन्स्ट्रक्शन
कामाचा आदेश	मुख्याधिकारी, नगरपरिषद इचलकरंजी जा.क्र.न.प./बांध/1845/2021-22 दि. 7.1.2022
काम सुरु दिनांक	7.1.2022
काम पूर्ण दिनांक	2.3.2022
कामाची मुदत	60 दिवस
मोजमाप पुस्तिका	**मो.मा. पुस्तिका क्र. 222 पान क्र. 33**

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	
452/565	29.03.2022	1119672	1ले व अंतीम देयक

नगरपरिषद इचलकरंजी यांनी उपरोक्त विकास कामावर केलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

1)अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार बाब क्र. 1 - Supplying and fixing of molded shank raised pavement markers/cats eye ..चे एसएसआर 2020-21 मधील 6.09/40 मधील तपशिल मध्ये नमूद केलेनुसार cats eye shall support load of 16000kg - tested in a accordance to ASTMD.

प्रत्यक्षात या कामाचा श्रीराम इन्स्टिटयूट फॉर इंडस्टीयल रिसर्च, बंगलूरू यांचेकडील टेस्ट सर्टीफिकेट नं. C2/0000041878 पाहता त्यामध्ये पुढील तपशिल नमूद आहे. The marker shall support a minimum load of 13635 kgf without breakage.

नस्तीसोबत शासकीय संस्थेचा चाचणी अहवाल जोडलेला नाही. काम पुर्ण झालेनंतर 6 महिन्यांनी कामाची प्रत योग्य असल्याची खात्री झालेनंतर मक्तेदारास त्याने जमा केलेली 10 टक्के सुरक्षा ठेव परत करावयाची आहे.मात्र करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 9 नुसार कामाची प्रत योग्य नसल्याचे आढळल्यास वरील सर्व रक्कम दंड म्हणून नगरपरिषदेने वसुल करावयाची आहे. त्यामुळे 16000 kgf लोड सपोर्ट करणा-या क्षमतेचा रिफलेक्टर न वापरता 13635 kgf लोड सपोर्ट करणा-या क्षमतेचा रिफलेक्टर वापरल्यामुळे साहित्याची प्रत तरतूदीनुसार नसल्याची म्हणजेच योग्य नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सुरक्षा ठेव रक्कम रू. 98000/- दंड म्हणून वसुल करण्यात यावी.

2)अंदाजपत्रकीय तरतूदीत नमूद केलेनुसार मक्तेदाराने रिफलेक्टर व रिफलेक्टर पॅनलच्या समाधानकारक field performance बाबत 2 वर्षांची वॉरंटी दयावयाची आहे. वॉरंटी सर्टीफिकेट लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

3)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास रक्कम रु. 1118903/- (मुल्यांकन रू. 990860 * 18%) आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखापरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 118903/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

4)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता मधील नियम 138 नुसार मोजमाप पुस्ताकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर लेखापाल व लेखापरीक्षक स्वाक्षरी करतील असे असतानाही नगरपरिषद इचलकरंजी यांनी मोजमाप पुस्तिकेत अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 चे परिशिष्ठ 24 नियम 12 अन्वये मोजमाप पुस्तकात नोंद केलेली मोजमापे कंत्राटदाराला मान्य असल्याबाबत त्याची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

वरीलप्रमाणे एकूण रक्कम रु. 216903/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 110, Hmm No : 120)

73 शेळके भवन व वसंत कॉलनी परिसरातीलHPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे आणि डॉराजेंद्रप्रसाद रोड ते जनता चौक ते रेनबो शाळा(डावी) बाजू पर्यंत HPOIL साईडपटटी मधील खुदाईचर डांबरी करणे कामांबाबत

योजना	:	न.प.निधी	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	516016.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात न.प. निधीतून HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे कामातील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र निर्गमित केले होते त्यास उत्तर सादर केलेले नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

कामाचे नांव	1)शेळके भवन व वसंत कॉलनी परिसरातील HPOIL चर खुदाई पॅचवर्क करणे
	2)डॉ.राजेंद्रप्रसाद रोड ते जनता चौक ते रेनबो शाळा (डावी) बाजू पर्यंत HPOIL साईडपटटी मधील खुदाईचर डांबरी करणे.
अंदाजपत्रकीय रककम	1)820344/-
	2) 995010/-
निधीचे नाव	न.प.निधी
ठराव क्र. 2	1)स्थायी समिती ठराव क्र. 2 दि. 25.6.2021
	2) 2/19.1.2021
तांत्रिक मंजूरी	1)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/944 दि. 1.7.2021
	2))771/11.2.2021
निविदा प्रक्रिया	ईटेंडर
मक्तेदाराचे नांव	पाटणी कन्स्ट्रक्शन

कामाचा आदेश	1)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 1975 दि. 12.01.2022
	2)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. 63/2021/5.10.2021
काम सुरु दिनांक	1)12.1.2022
	2) 25.11.2021
काम पुर्ण दिनांक	1)12.01.2022
	2)24.11.2021
मोजमाप पुस्तिका	1)215/15
	2) 149/44
कामावरील खर्च	1)प्र.क्र. 112/247 दि. 18.1.2022 782833/-
	प्र.क्र. 113/248 दि. 18.1.2022 107364/- एकूण - 890197/-
	2)प्र.क्र. 28/159 दि. 10.12.2021 207836/-
	प्र.क्र. 29/160 दि. 10.12.2021 995005/- एकूण - 1202841/-
एकूण खर्च	2093038/-

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/2018/प्र.क्र. 127/इमा-2 मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रीयेअंतर्गत निविदा तपासणी, स्विकृती देयके अदा करणे व निविदा अंतिम झाल्यानंतर उत्तरदायित्वाबाबत सुधारित सूचनानुसार निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुपये 500 च्या मुद्रांकासह लिफाफा क्रमांक 1 मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार निविदाधारकाकडून प्रत्येकी रुपये 500/- प्रमाणे प्रतिकाम एकूण रुपये 1500/- प्रमाणे 2 कामांचे रू. 3000/- वसुल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक

आहे.

2) कामाची बाबनिहाय अंदाजपत्रकीय तरतूद पाहता, बाब क्र. 1 - Excavation for roadway in earth soil साठी SSR 2020-21 I/P 2.10/27 या Manual means बाबीचा रू. 272/- मूळ दर घेऊन दर पृथ्थकरण केले आहे. मात्र SSR मध्ये नमूद केलेनुसार अधिक्षक अभियंता यांची मंजूरी घेतलेली नाही. ज्याठिकाणी यांत्रीक पध्दतीने खुदाई करणे शक्य नाही अशाच ठिकाणी मजूरांकरवी खुदाई करणेची आहे. कामाचे फोटो पाहता काम प्रशस्त रस्त्यावरती आहे व काही फोटोंमध्ये जेसीबीच्या सहाय्याने खुदाई केलेचे स्पष्ट दिसून येते. यांत्रीक खुदाई करून दर मात्र मानवी खुदाईचा घेतला आहे. SSR 2020-21 I/P 2.11/27 चा यांत्रीक खुदाईचा मूळ दर रू. 85/- न घेतल्यामुळे खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

बाब	मूळ दर	cess	5% SFA	Cess	Total	i.e.	तफावत
दिलेला दर	272	-5.44	13.33	+5.44	285.33	285.35	196.20
देय दर	85	-1.70	4.17	+1.7	89.17	89.15	

कामनिहाय जादा प्रदान पुढीलप्रमाणे

काम क्र.	बाब क्र. 1 - Excavation for roadway चे परिमाण (घ.मी.)	प्रति घ.मी. झालेले जादा प्रदान	जादा प्रदान
1	277.53	196.20	54451
2	198.12	196.20	38871
			93322

3)कामांमध्ये डांबराचा वापर करण्यात आला असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/2011/प्रक्र 464/ रस्ते दिनांक 21.11.11 मधील नियम 1-ड नुसार कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणेत आलेली नाही.

4)महाराष्ट्र शासन, बांधकाम विभागाकडील SSR 2020-21 मधील सेक्शन डी iii) नुसार कामात वापरण्यात आलेल्या विविध साहित्यांच्या आवश्यक त्या सर्व चाचण्या करून घेणे मक्तेदारास बंधनकारक आहे. जर मक्तेदाराने चाचणी अहवाल सादर केला नाही. तर संबंधित अभियंत्यानी पत्राव्दारे मक्तेदारास चाचणी अहवाल सादर करणेस सुचित करावे व 10 दिवसाच्या विहित मुदतीत चाचणी अहवाल सादर केला नाही, तर चाचणी अहवालासाठी येणारा खर्च व खर्चाच्या पाचपट रक्कम दंड म्हणून मक्तेदाराकडून वसुल करावयाची आहे.

करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 9 / 18 नुसार कामासाठी वापरण्यात येणा-या साहित्याची तसेच केलेल्या कामाची प्रतवारी चांगली असलेबाबत योग्य त्या प्रयोगशाळेतून तपासणी करून ती चांगली असल्याची खात्री झाल्यानंतरच देयक आदा करावयाचे आहे. करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 6(ब) नुसार सुरक्षा ठेवीची 9% रक्कम 6 महिन्यानंतर कामाची प्रत योग्य असेल तरच मक्तेदारास परत करावयाची आहे.

नस्तीसोबत चाचणी अहवाल नाहीत. कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र. 9 Lab Testing Charges नुसार साहित्याच्या चाचणी अहवालासाठी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे. चाचणी अहवाल सादर करण्यास मक्तेदाराने निष्काळजीपणा दाखवलेचे दिसून येते. त्यामुळे चाचणी अहवालाची तरतूद रक्कम व त्याच्या 5 पट रक्कम मक्तेदाराकडून वसुल करणेची कार्यवाही करावी.

काम क्र.	चाचणी अहवालासाठी तरतूद रू.	तरतूदीच्या 5पट दंडाची रक्कम रू.	एकूण वसुल करावयाची रक्कम रू.
1	46800	234000	280801

5)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास खालीलप्रमाणे रक्कम रु. 138893/- आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 138893/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

कामाचा अ.क्र.	मुल्यांकन र.रू.	जीएसटी 12% र.रू.
1	929907	11158
2	1064462	127735
	एकूण	138893

6))महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता मधील नियम 138 नुसार मोजमाप पुस्ताकामध्ये लाल शाईने प्रदानासाठी योग्य असे नमूद करून त्यावर लेखापाल व लेखापरीक्षक स्वाक्षरी करतील असे असतानाही नगरपरिषद इचलकरंजी यांनी मोजमाप पुस्तिकेत अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका 1984 चे परिशिष्ठ 24 नियम 12 अन्वये मोजमाप पुस्तकात नोंद केलेली मोजमापे कंत्राटदाराला मान्य असल्याबाबत त्याची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

7)काम क्र. 1 चे मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

वरील पुर्ततेअभावी रक्कम रुपये 516016/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 113, Hmm No : 122)

74 महिला व बालकल्याण विभागाने केलेल्या विविध विकास कामांबाबत

योजना	:	N P FUND	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	433938.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात न.प. निधीतून महिला व बालकल्याण विभागाने केलेल्या विविध विकासकामांचा तपशिल व अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

कामाचे नांव	1)प्र.8 मधील आंबेडकर सोसा. येथे बुध्दविहारची दुरूस्ती व कलर काम करणे.

	2)प्र.क्र.2 मधील आर के नगर ओपनस्पेस शहापूर करीता कंपाउंड बांधणे.
	3)रफिक अहमद किडवाई वि.म.क्र. 45 तांबे माळ शाळेचा खराब गिलावा काढून नविन गिलावा आणि रंगकाम करणे.
	4)नेताजी सुभाषचंद्र बोस / पं. जवाहरलाल नेहरू वि.मं. क्र. 24 चे गळती काढणेकामी टेरेस कोबा व वॉटरप्रुफ कोटींग करणे.
अंदाजपत्रकीय रककम	1)993830/-
	2)998200/-
	3)994780/-
	4)998730/-
ठराव	काम क्र.1), 3) व 4) मा.अध्यक्ष व मुख्याधिकारी यांची समिती ठराव दि. 26.10.2021
	काम क्र. 2)मा.अध्यक्ष व मुख्याधिकारी यांची समिती ठराव 18 दि. 9.2.2021
तांत्रिक मंजूरी	1)जा.क्र.बांधकाम/993 दि. 14.7.2021
	2)नगरअभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य), इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र.बांधकाम/631 दि. 27.11.2020
	3)जा.क्र.बांधकाम/1038 दि. 6.8.2021
	4)जा.क्र.बांधकाम/1037 दि. 6.8.2021
मक्तेदाराचे नांव	काम क्र. 1 - दगडू सत्याप्पा माने
	काम क्र. 2 -पाटणी कन्स्ट्रक्शन
	काम क्र. 3 व 4 - प्रिया चंद्रशेखर नाईक
कामाचा आदेश	1)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. दि. 1.11.2021(मुदत 60 दिवस)
	2)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. दि. 23.6.2021 (3 महिने)
	3)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. दि. 10.12.2021 (मुदत 60 दिवस)
	4)मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद जा.क्र. दि. 07.12.2019 (मुदत 60 दिवस)

काम क्र. 1)	काम सुरु दिनांक	1.11.2021	काम पुर्ण दिनांक	29.11.2021
काम क्र. 2)	काम सुरु दिनांक	23.6.2021	काम पुर्ण दिनांक	20.9.2021
काम क्र. 3)	काम सुरु दिनांक	10.12.2021	काम पुर्ण दिनांक	27.12.2021
काम क्र. 4)	काम सुरु दिनांक	7.12.2021	काम पुर्ण दिनांक	27.12.2021

मोजमाप पुस्तिका	काम क्र. 1)	MB no. 213 पृष्ठ क्र. 6,7	
	काम क्र. 2)	MB no. 100 पृष्ठ क्र. 22	
	काम क्र. 3)	MB no. 68 पृष्ठ क्र. 44	
	काम क्र. 4)	MB no. 68 पृष्ठ क्र. 45	

कामावरील एकूण खर्च	प्रमाणक क्रमांक	दिनांक	खर्च
काम क्र. 1)	806	31.3.2022	993744
काम क्र. 2)	444/543	28.3.2022	998900
काम क्र. 3)	620/605	31.3.2022	996176
काम क्र. 4)	721/802	31.3.2022	948369
		एकूण	3937189

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/2018/प्र.क्र. 127/इमा-2 मुंबई दिनांक 28 नोव्हेंबर 2018 अन्वये बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रीयेअंतर्गत निविदा तपासणी, स्विकृती देयके अदा करणे व निविदा अंतिम झाल्यानंतर उत्तरदायित्वाबाबत सुधारित सूचनानुसार निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रुपये 500 च्या मुद्रांकासह लिफाफा क्रमांक 1 मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार निविदाधारकाकडून प्रत्येकी रुपये 500/- प्रमाणे प्रतिकाम एकूण रुपये 1500/- प्रमाणे 4 कामांचे रू. 6000/- वसुल करून शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

2)काम क्र. 1 मधील बाब क्र. 4 - Providing rough cast cement plaster extremely in two coats .. आणि बाब क्र. 5 - Providing and applying two coats of exterior ... या कामांमधून खिडकी व दरवाजाचे परिमाण वजा करण्यात न आलेने खालीलप्रमाणे र. रू. 9830/- जादा प्रदान झाले आहे.

	परिमाण	दर	जादा प्रदान

बाब क्र. 4	खिडकीचे परिमाण 6.72	546.20	3670
बाब क्र. 4	दरवाज्याचे परिमाण 6.00	546.20	3277
बाब क्र. 5	खिडकीचे परिमाण 6.72	226.60	1523
बाब क्र. 5	दरवाज्याचे परिमाण 6.00	226.60	1360
			9830

3)करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 9 / 18 नुसार कामासाठी वापरण्यात येणा-या साहित्याची तसेच केलेल्या कामाची प्रतवारी चांगली असलेबाबत योग्य त्या प्रयोगशाळेतून तपासणी करून ती चांगली असल्याची खात्री झाल्यानंतरच देयक आदा करावयाचे आहे. करारपत्रातील अटी व शर्ती क्र. 6(ब) नुसार सुरक्षा ठेवीची 9% रक्कम 6 महिन्यानंतर कामाची प्रत योग्य असेल तरच मक्तेदारास परत करावयाची आहे.

नस्तीसोबत काम क्र. 2, 3 व 4 चे कामात वापरण्यात आलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाहीत.

काम क्र. 1 मधील बाब क्र. 23 लॅब चार्जेस पोटी रक्कम रू. 15350/- आदा करण्यात आली आहे. मात्र चाचणी अहवालाची पावती नाही.

4)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास खालीलप्रमाणे रक्कम रु. 418108/- आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 418108/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

कामाचा अ.क्र.	मुल्यांकन र.रू.	जीएसटी 12% र.रू.
1	879420	105530
2	883985	106078
3	881571	105788
4	839265	100712
	एकूण	418108

5)उपरोक्त काम क्र. 1 व काम क्र. 2 च्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास सादर करण्यात आल्या नाहीत.

6)महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. बीडीजी 2016/प्र.क्र.132/इमा.2 दि. 27.06.2016 नुसार कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावण्याच्या बाबीचा अंदाजपत्रक तसेच निविदा शर्तीमध्ये समाविष्ठ करून फलक लावणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. मात्र नस्तीसोबत माहितीफलकाचे फोटो जोडलेले नाहीत.

वरील बाबींची पुर्तता करेपावेताे रक्कम रुपये 433938/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 117, Hmm No : 194)

75 प्रभाग क्र. 15 रोहिदासनगर कब्रस्तान ते जाधव मळा रिंग रोड डांबरीकरण करणे

योजना	:	सर्वसाधारण रस्ता अनुदान	**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 468853.00/-

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात प्रभाग क्र. 15 रोहिदासनगर कब्रस्तान ते जाधव मळा रिंग रोड डांबरीकरण करणे या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. सदरबाबत अर्धसमास पत्र देणेत आले होते. त्यास उत्तर प्राप्त न झालेने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

कामाचे नाव	प्रभाग क्र. 15 रोहिदासनगर कब्रस्तान ते जाधव मळा रिंग रोड डांबरीकरण करणे.
लेखाशिर्षक	सर्वसाधारण रस्ता अनुदान
अंदाजपत्रकीय रक्कम रु .	988450/-
प्रशासकीय मंजूरी	जिल्हाधिकारी कोल्हापूर क्र.कार्या.11/नपा/प्र.मा/एसआर/
तांत्रिक मंजूरी आदेश	शहर अभियंता 781 दि.11.02.2021
निविदा मंजूर	ई-टेंडर. 6.01% जादा दराने
मक्तेदाराचे नाव	पाकिजा कन्स्ट्रक्शन्स
कामाचा आदेश	जा.क्र.न.प./बांध/09/2021 -2022 दि. 06.07.2021
काम सुरु दिनांक	06.07.2021
काम पूर्ण दिनांक	16.07.2021
कामाची मुदत	60 दिवस
मोजमाप पुस्तिका	**मो . मा . पुस्तिका क्र . 183 पान क्र. 22**

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	
11	04.03.2022	998450	पाकिजा कन्स्ट्रकश्नस्

नगरपरिषद इचलकरंजी यांनी उपरोक्त विकास कामावर केलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

1)Government polytechniq, Kolhapur या त्रयस्थ शासकीय संस्थेचा जा.क्र. GPKP/CED/ 2021/ 3315 नुसार

दि. 03.11.2021 रोजी सादर केलेला लेखापरीक्षण अहवाल पाहता बाब क्र.1- Pro/const. 75mm thick road surface .. बाबत नोंदविलेला शेरा पुढीलप्रमाणे आहे.

धिस आयटेम ऑफ द वर्क इज इक्जीकयुटेड फुल्ली फॉर द थ्री रोड लेन्थ ऑफ 90 मी., 95 मी,. अँड 41 मी. ॲज मेन्श्नड इन इस्टीमेट अँड फॉर 170 मी. लेन्थ इट इज इक्जीकयुटेड ओन्ली फॉर पॅचवर्क.

वरीलप्रमाणे त्रयस्थ शासकीय संस्थेच्या अहवालानुसार सदर बाबीचे 90.00m, 95.00m आणि 41.00m लांबीच्या तीन रोडसाठी अनुक्रमे 5.00m, 5.30m आणि 4.6m रुदीने अनुक्रमे 450.00m, 503.50m आणि 188.60m इतके काम झालेले आहे. म्हणजेच Pro/const. 75mm thick road surface hellip; चे एकूण काम 1142.10sqm काम झालेले आहे. आणि 170.00m लांबीच्या रोडचे फक्त पॅचवर्क करण्यात आले आहे. तसेच नस्तीसोबतच्या कामाच्या फोटोतही सदर रोडचे फक्त पॅचवर्क झालेचे स्पष्ट दिसून येते. मात्र देयकातील Pro/const. 75mm thick road surface hellip; बाबीचे परिमाण 1913.87 sqm घेतले आहे. सदर बाबीचे 1142.10sqm काम झालेले असताना 1913.87sqm परिमाण घेऊन देयक आदा केल्यामुळे 771.77 sqm परिमाणापोटी रू. 233.25 दराने रू. 180015/- आणि त्यावर 6.01टक्के जादा दराच्या निविदेपोटी रू. 10819/- असे रू. 190996/- जादा प्रदान करण्यात आले आहे.

बाब क्र. 1 साठी प्राकलनातील मेजरमेंट शीट नुसार तरतुद खालीलप्रमाणे आहे.

	No.	Length m	Breadth m	Height m	Quantity sqm
1	1	90	5.00	--	450.00
2	2	95	5.30	--	503.50
3	3	170	4.60	--	782.00
4	4	41	4.60	--	188.60
				एकूण	1924.10

बाब क्र. 2 - P/L/R of OGC 20mm --- Quantity same as above

बाब क्र. 3 - P/A tack coat on BT surface --- Quantity same as above

बाब क्र. 4 - P/L seal coat type A -- --- Quantity same as above

2) वरीलप्रमाणे नमुद केल्यानुसार ज्याअर्थी बाब क्र. 1 Pro/const. 75mm thick road surface बाबीचे काम 170.00m लांबीच्या रस्त्यासाठी करण्यात आलेले नाही, त्याअर्थी बाब क्र. 2, 3, व 4 या तिन्ही बाबींचे काम करणे शक्य नाही. त्यामुळे सदर बाबींची काम न करता खालीलप्रमाणे रक्कम रू. 169384/- आदा करण्यात आली आहे.

बाब क्र. व बाब	परिमाण चौ.मी.	घेतलेला दर	जादा प्रदान
बाब क्र. 2 - P/L 20mm OGC	782.00	140.40	109793
बाब क्र. 3 - P/A Tack coat on BT surface	782.00	11.95	9345

बाब क्र. 4 - Providing seal coat	782.00	51.80	40508
		एकूण	159646
	6.01% निविदेचा जादा दर		9738
	एकूण एकंदर		169384

3)महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण/2011/प्रक्र 467/रस्ते 1 दिनांक 21/11/2011 अन्वये 1 ड नुसार कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीबाबतच्या चलनाची मूळ प्रत देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. मात्र डांबर खरेदी पावत्या देयकासोबत जोडलेल्या नाहीत.

4)महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. बीडीजी 2016/प्र.क्र.132/इमा.2 दि. 27.06.2016 नुसार कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावण्याच्या बाबीचा अंदाजपत्रक तसेच निविदा शर्तीमध्ये समाविष्ठ करून फलक लावणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. मात्र नस्तीसोबत माहितीफलकाचा फोटो जोडलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra stamp Act (Amendment) (Maha. act No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत रु.500/- व त्यापुढील रक्कमेच्या प्रत्येक लाखास रु.100/- या प्रमाणे मुद्रांक घ्यावयाचे असून करारपत्र रू. 100/- वर केलेने रू. 400/- शासन भरणा करणे आवश्यक आहे.

6)रॉयल्टीवर जीएसटी देय नसताना रू. 170141/- रक्कमेवर 12 टक्के दराने देय केलेली रॉयल्टीची रक्कम रू. 2043/- वसुल करण्यात यावी.

7)सीजीएसटी ॲक्ट 2017 मधील कलम 76 नुसार व जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. टीडीएस-0918/प्र.क्र.590/187/1 दि. 13.12.2018 मधील 1.3 नुसार वस्तू व सेवा कर भरणा केल्याचे पृष्ठयार्थ् ठेकेदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच त्यांना 12 टक्के जीएसटीचा परतावा करणे आवश्यक आहे. त्यानुसार ठेकेदाराने जीएसटी रक्कम भरणा केलेबाबतचे जीएसटी आर-1 चलनाची पडताळणी केल्यानंतरच ठेकेदारास रक्कम देणे आवश्यक असता जीएसटी आर-1 न घेताच ठेकेदारास रक्कम रु. 106030/- (मुल्यांकन रू. 883592 * 12%) आदा केली आहे. जीएसटी आर-1 लेखपरीक्षणास सादर करावे तोपर्यंत रक्कम रू. 106030/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

8)कामाचे मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

वरील आक्षेपांची पूर्तता करेपर्यंत रक्कम रु. 468853/- अंतीम अमान्य करण्यात येत आहे.

DATCDDM7401 (Ref No : 118, Hmm No : 195)

76 म.सु.ज.न.अ.(राज्य) अंतर्गत शहरातील मुख्य गटर करणे कामातील अनियमितते बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	: 9ब	**अंतिम अमान्य**	:	31497418.00/-

नगरपरिषद, इचलकरंजी चे आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 चे लेखापरीक्षणामध्ये म.सु.ज.न.अ.(राज्य) अंतर्गत शहरातील शहरातील मुख्य गटर करणे कामातील अनियमितते बाबत

कामाचे नांव	शहरातील अंतर्गत मुख्य गटर करणे
लेखाशिर्षक	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राज्यस्तर
डीएसआर वर्ष	2018-19
अंदाजपत्रकीय रककम	रुपये 17,66,41,317/-
प्रशासकीय मंजूरी	शासन निर्णय क्र.-नगरो-2019/प्र.क्र.83/नवि-33 मंत्रालय,मुंबई दि.05 मार्च 2019
तांत्रिक मंजूरी	मे.मुख्य अभियंता,सां.बां.प्रादेशिक विभाग,पुणे यांचे कडील जा.क्र.मुअ(पुणे)/का-2/नियो/7764/2018 दि.19/12/2018
निविदा प्रक्रिया	ई टेंडर - 6.48 टक्के जादा दराने
मंजूर निविदा रक्कम रुपये	18,80,87,674/-
मक्तेदाराचे नांव	मे.एस.एफ.चौगुले
कामाचा आदेश	जाक्रं. बांधकाम 1556/2019 दिनांक 23/07/2019
काम सुरु दिनांक	23/07/2019
काम पुर्ण दिनांक	अपूर्ण
कामाची मुदत	18 महिने
कामावरील एकूण खर्च	116894017/- (सोबत परिशिष्ट)

या बाबत लेखापरीक्षणाचे आक्षेप पुढील प्रमाणे

1) बाब क्र.(3) 80mm Solling (दर 156.70) कामाचे दर पृथ्थकरण तपासले असता त्यामध्ये नैसर्गिक वाळू करिता 45 किमी चे अतिरिक्त लीड चार्जेस देण्यात आले आहेत हरित लवादाच्या निर्देशांनुसार वाळू उपसाकरणेवर बंदी असल्याने नैसर्गिक वाळू ऐवजी artificial, क्रश sand वापरणेस सूचना देण्यात आलेल्या आहेत त्यामुळे सदर बाबी करिता देण्यात आलेला दर लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही तसेच सार्वजनिक बांधकाम नियमावली नुसार 80mm Solling च्या कामामध्ये वाळूचा वापर केला जातो का याचा खुलासा करण्यात यावा . त्यामुळे सदर बाबींला दिलेले अतिरिक्त लीड रक्कम रु. 96.29/-, निविदा प्रक्रियेतील 6.48% जादा दर व 12% देण्यात आलेली GST रक्कम अशी एकूण मिळून 114.83/- रु.प्रति क्यू.मी. लेखापरीक्षणात मान्य करता येत नसून रक्कम रु.256116/-. अमान्य करण्यात येत आहेत.

देण्यात आलेला दर	5% ज्यादा दर निविदा	12% GST	एकूण दर CUM)	एकूण काम CUM)	रक्कम
96.29	6.24	12.30	114.83	2230.39	256116

2) बाब क्र. (4) M10 बाबीचे दर पृथ्थकरण तपासले असता त्यामढील दर WITH SCADA देण्यात आलेला असून सदर काम करण्यात आलेले नसताना मक्तेदारास जादा दराने अदायगी झालेली आहे ,तसेच दर पृथ्थकरण करताना नैसर्गिक वाळू करिता 45 किमी ला 301.72/-चे अतिरिक्त लीड देण्यात आलेले आहे हरित लवादाच्या निर्णयानुसार वाळू उपसाकरणेवर बंदी असल्याने वाळू ऐवजी artificial, क्रश sand वापरणे आवश्यक होते व त्याचेच लीड DSR नुसार 15 किमी चे 152.20/-रु. देणे आवश्यक होते मात्र मक्तेदारास 301.72/- अदा केलेने प्रति CUM 149.52/- चे अतिरिक्त प्रदान झाले आहेत तसेच दर पृथ्थकरण करताना सिमेंट या बाबीला 5 कि.मी.चे 27.65/- प्रति CUM अदा करणेत आलेले आहेत सदर बाब ही न.प.हद्दीत मिळत असलेने त्यास अतिरिक्त 5 कि.मी.चे लीड लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही. बांधकाम विभागाच्या अन्य कामामध्ये सिमेंट करीताचे अतिरिक्त लीड देण्यात येत नाही. तसेच सदर बाबींला देण्यात आलेला निविदा प्रक्रियेतील 6.48% जादा दर व 12% देण्यात आलेली GST रक्कम अशी एकत्रित रक्कम रु. 1291593/- लेखापरीक्षणात मान्य करता येनार नाही

देण्यात आलेला दर		देय दर	
DSR दर	4419.00	DSR दर	4419.00
LESS:-2%LABOUR CESS	88.38	वजा:- 6% WITH SCADA	265.14
LESS:-ROYALTY	66.43	एकूण	4153.86
अधिक:- 5% SFA	213.21	LESS:-2%LABOUR CESS	83.07
एकूण	4477.40	LESS:-ROYALTY	66.43
		एकूण	4004.36
		अधिक:- 5% SFA	200.21
अधिक :- लीड चार्जेस		अधिक :- लीड चार्जेस	
सिमेंट - 5 किमी	27.65	सिमेंट - 5 किमी	-
क्रश मेटल 15 किमी	304.42	क्रश मेटल 15 किमी	304.42
वाळू - 45 किमी	301.72	क्रश वाळू - 15 किमी	152.20
एकूण	5111.19	एकूण	4661.19
अधिक: 2%LABOUR CESS	88.38	अधिक:- 2% LABOUR सेस	83.07
एकूण दर	5199.55	एकूण	4744.26

दरातील फरक :- 5199.55-4744.26 = 455.26 प्रति CUM.

देण्यात आलेला b दर	6.48% ज्यादा दर निविदा	12% GST	एकूण दर (cum)	एकूण काम (cum)	रक्कम
455.26	29.50	58.17	542.96	2378.8	1291593

3) बाब क्र.(5) M20 बाबीचे दर पृथ्थकरण तपासले असता त्यामढील दर WITH SCADA देण्यात आलेला असून सदर काम WITH SCADA करण्यात आलेले नसतना मक्तेदारास जादा दराने अदायगी झालेली आहे ,तसेच दर पृथ्थकरण करताना नैसर्गिक वाळू करिता 45 किमी ला 272.83/-चे अतिरिक्त लीड देण्यात आलेले आहे हरित लवादाच्या निर्णयानुसार वाळू उपसाकरणेवर बंदी असल्याने वाळू ऐवजी artificial, क्रश sand वापरणे आवश्यक होते व त्याचेच लीड DSR नुसार 15 किमी चे 137.63/-रु. देणे आवश्यक होते मात्र मक्तेदारास 272.83/- अदा केलेने प्रति CUM 135.20/- चे अतिरिक्त प्रदान झाले आहेत तसेच दर पृथ्थकरण करताना सिमेंट या बाबीला 5 कि.मी.चे 43.98/- प्रति CUM अदा करणेत आलेले आहेत सदर बाब ही न.प.हद्दीत मिळत असलेने त्यास अतिरिक्त 5 कि.मी.चे लीड लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही. बांधकाम विभागाच्या अन्य कामामध्ये सिमेंट करीताचे अतिरिक्त लीड देण्यात येत नाही. तसेच सदर बाबींला देण्यात आलेला निविदा प्रक्रियेतील 6.48% जादा दर व 12% देण्यात आलेली GST रक्कम असी एकत्रित रक्कम रु. 4810649/- लेखापरीक्षणात मान्य करता येनार नाही.

देण्यात आलेला दर		देय दर	
DSR दर	5255.00	DSR दर	5255.00
LESS:-2%LABOUR CESS	105.10	वजा:- 6% WITH SCADA	315.30
LESS:-ROYALTY	60.07	एकूण	4939.70
अधिक:- 5% SFA	254.49	LESS:-2%LABOUR CESS	98.79
एकूण	5344.32	LESS:-ROYALTY	60.07
अधिक :- लीड चार्जेस		एकूण	4780.84
सिमेंट - 5 किमी	43.98	अधिक:- 5% SFA	239.04
क्रश मेटल 15 किमी	275.27	अधिक :- लीड चार्जेस	
वाळू - 45 किमी	272.83	सिमेंट - 5 किमी	-
एकूण	5936.40	क्रश मेटल 15 किमी	275.27
अधिक: 2%LABOUR CESS	105.10	क्रश वाळू - 15 किमी	137.63
		एकूण	5432.78

		अधिक:- 2% LABOUR सेस	98.79
एकूण दर	6041.50	एकूण	5531.57

दरातील फरक :- 6041.50-5531.57 = 509.93 प्रति CUM.

देण्यात आलेला दर	6.48% ज्यादा दर निविदा	12% GST	एकूण दर (cum)	एकूण काम (cum)	रक्कम
509.93	33.04	65.16	608.13	7910.56	4810649

4) बाब क्र.(6) TMT FE-500 चे दर पृथ्थकरणामध्ये दरामध्ये रक्कम रु.3261.37 हा 5% SFA जादा देण्यात आला आहे. शासन निर्णय पीडब्ल्युआर/डीएसआर/1091/6577 प्लॅनिंग 3 दिनांक 8/7/2003 अन्वये जादा टक्के सप्लाय ॲटमवर 5 टक्के शुगर एरिया ची रककम आकारणी करता येत नाही तसेच दर पृथ्थकरण करताना TMT FE-500 या बाबीला 5 कि.मी.चे 125.66/- प्रति MT अदा करणेत आलेले आहेत सदर बाब ही न.प.हद्दीत मिळत असलेने त्यास अतिरिक्त 5 कि.मी.चे लीड लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही. बांधकाम विभागाच्या अन्य कामामध्ये TMT FE-500 करीताचे अतिरिक्त लीड देण्यात येत नाही.निविदा प्रक्रियेतील 6.48% जादा दर व 12% देण्यात आलेली GST रक्कम अशी एकत्रित रक्कम रु.1279429/- दर लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही.

देण्यात आलेला दर	6.48% ज्यादा दर निविदा	12% GST	एकूण दर (cum)	एकूण काम (cum)	रक्कम
3387.03	219.48	432.78	4039.29	316.746	1279429

5) बाब क्र.(7) सिमेंट कॉन्क्रीट पाईप-900 mm चे दर पृथक्करण तपासले असता त्यामध्ये पाईप च्या दरामध्ये रक्कम रु. 337.11/- इतका 5% SFA जादा दर देण्यात आला आहे. शासन निर्णय पीडब्ल्यु आर / डीएसआर / 1091 / 6577 प्लॅनिंग 3 दिनांक 8/8/2003 अन्वये जादा टक्के सप्लाय ॲटमवर 5 टक्के शुगर एरिया ची रककम आकारणी करता येत नाही. तसेच दर पृथ्थकरण करताना नैसर्गिक वाळू करिता 45 किमी ला रु.9.89/-चे अतिरिक्त लीड देण्यात आलेले आहे हरित लवादाच्या निर्णयानुसार वाळू उपसाकरणेवर बंदी असल्याने वाळू ऐवजी artificial, क्रश sand वापरणे आवश्यक होतेत तरी दिलेले लीड मान्य करता येणार नाही. .निविदा प्रक्रियेतील 6.48% जादा दर व 12% देण्यात आलेली GST रक्कम अशी एकत्रित रक्कम रु.271756/- लेखापरीक्षणात मान्य करता येनार नाही.

देण्यात आलेला दर (337.11+9.89)	5% ज्यादा दर निविदा	12% GST	एकूण दर (प्रति RMT)	एकूण काम (RMT)	रक्कम
347	22.49	44.34	413.82	656.7	271756

6) बाब क्र.(8) सिमेंट कॉन्क्रीट पाईप-600 mm चे दर पृथक्करण तपासले असता त्यामध्ये पाईप च्या दरामध्ये रक्कम रु. 192.35/- इतका 5% SFA जादा दर देण्यात आला आहे. शासन निर्णय पीडब्ल्युआर / डीएसआर / 1091 / 6577 प्लॅनिंग 3 दिनांक 8/8/2003 अन्वये जादा टक्के सप्लाय ॲटमवर 5 टक्के शुगर एरिया ची रककम आकारणी करता येत नाही. तसेच दर पृथ्थकरण करताना नैसर्गिक वाळू करिता 45 किमी ला रु.7.06/-चे अतिरिक्त लीड देण्यात आलेले आहे हरित लवादाच्या निर्णयानुसार वाळू उपसाकरणेवर बंदी असल्याने वाळू ऐवजी artificial, क्रश sand वापरणे आवश्यक होतेत तरी दिलेले लीड मान्य करता येणार नाही. .निविदा

प्रक्रियेतील 6.48% जादा दर व 12% देण्यात आलेली GST रक्कम अशी एकत्रित रक्कम रु. 258975/- लेखापरीक्षणात मान्य करता येनार नाही.

देण्यात आलेला दर	6.48% ज्यादा दर निविदा	12% GST	एकूण दर (प्रति RMT)	एकूण काम (RMT)	रक्कम
199.41	12.92	25.48	237.81	1089	258975

7) बाब क्र.(7) सिमेंट कॉन्क्रीट पाईप-900 mm व बाब क्र.(8) सिमेंट कॉन्क्रीट पाईप-600 mm चे दर पृथ्थकरणामध्ये पाईप करिता 28 किमी चे अतिरिक्त लीड देण्यात आलेले असून सदर कामाच्या DPR ला लिड चार्ट जोडण्यात आलेला नसलेने सदर पाईप कुठून आणण्यात आल्या आहेत हे लेखापरीक्षणात समजू शकत नसलेने सदर बाबींना 28 किमी चे देण्यात आलेले लीड रक्कम रु. 268542/-लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही.

बाब	लीड 28 किमी साठी	एकूण काम RMT	रक्कम
900 mm	212.85	656.7	139779
600mm	118.24	1089	128763
		एकूण	268542

8) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रं. गौखनि/10/1009/ प्रक्र209 ख दिनांक 11/2/2010 ऐवजी महसुल व वनविभाग अधिसूचना दिनांक 11/5/2015 अन्वये प्रति घमी रुपये 141.34 प्रमाणे गौण खनिजाची रककम संबंधित मक्तेदार यांचेकडुन रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. उपलब्ध मोजमाप पुस्तीका व देयकानुसार नुसार स्वामित्वधनाची ची रक्कम 29,10,183/- झाली असून स्वामित्वधना ची कपात 12,29,579/- करण्यात आली असून उर्वरित रक्कम रु.16,80,604/- कपात करून भरणा करणे आवश्यक आहे. तसेच कपात केलेली रक्कम शासन खाती भरणा केल्याची पूर्तता दर्शवण्यात यावी. **(सोबत परिशिष्ट)**

9) मा.जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर यांचे पत्र क्रं.कार्या/6अ/आरआर/2441/2017 दिनांक 28/11/2017 अन्वये दिनांक 1/9/2015 पासुन कपात केलेल्या गौणखनीज रकमेवर पुर्वलक्षी प्रभावाने DMF 10 टक्के चार्जेस वसुल करुन शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे. उपलब्ध मोजमाप पुस्तीका व देयकानुसार नुसार DMF ची रक्कम 291028/- झाली असून DMF ची कपात 122958/- करण्यात आली असून उर्वरित रक्कम रु.168070/- कपात करून भरणा करणे आवश्यक आहे. तसेच कपात केलेली रक्कम शासन खाती भरणा केल्याची पूर्तता दर्शवण्यात यावी.

10) देयक क्र. 85/85 दिनांक 12.06.2020 ची तपासणी केली असता त्यामध्ये पुढील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

अ) बाब क्र.(8) 600mm पाईप बसवणे करिता उत्खनन करणेत आले नाही मात्र पाईप बसवण्यात आल्याच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नमूद करणेत येवून त्याची रक्कम अदा करणेत आलेली आहे. याबाबत खुलासा करण्यात यावा अथवा जादा काम 75 RMT लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येणार नसून सदर बाबीवर झालेला खर्च रक्कम 379606/-अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

600mm पाईप दर	6.48% ज्यादा दर	12% GST	एकूण दर (प्रति RMT)	देण्यात आलेले जादा परिमाण	रक्कम

	निविदा			RMT	
4244.10	275.01	542.30	5061.41	75	379606

ब) बाब क्र.(7) 900mm पाईप बसवणे करिता उत्खनन करणेत आले नाही मात्र पाईप बसवण्यात आल्याच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नमूद करणेत येवून त्याची रक्कम अदा करणेत आलेली आहे. याबाबत खुलासा सादर करण्यात यावा अन्यथा जादा काम 12.50 RMT लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येणार नसून सदर बाबीवर झालेला खर्च रक्कम 110925/-अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

601 ते 1000 चौ. फुटापर्यंतचे निवासी बांधकाम	प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या 50 टक्के दराने शास्ती आकारण्यात यावी.
1001 चौ. फुटापुढील निवासी बांधकाम	प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी. (सध्याच्या दराने).

नगरपरिषदेकडे अशा अवैध बांधकामाची, बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र/भोगवटा प्रमाणपत्र न घेतलेल्या बांधकामांची कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे सन 2020-21 व 2021-22 या लेखापरीक्षण कालावधीत नगरपरिषद हद्दीत जी अनधिकृत बांधकामे, बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र/भोगवटा प्रमाणपत्र न घेतलेली

बांधकामे याबाबत माहिती लेखापरिक्षणास सादर करणेत यावी, अनधिकृत बांधकामे, बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र/भोगवटा प्रमाणपत्र न घेतलेली बांधकामे असतील तर याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र 4 जानेवारी 2008 व महाराष्ट्र नगरपरिषद नगर पंचायती औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 189 अ (ड) तसेच महाराष्ट्र शासन, नगर zwj;विकास विभाग, शासन निर्णय क्र. एमसीओ-2018/प्र.क्र.73/नवि-14 दिनांक 27.09.2018 नुसार योग्य ती कार्यवाही करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी व यापुढे बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र/भोगवटा प्रमाणपत्र न घेतलेल्या बांधकामांवर नियमानुसार शास्ती आकारण्याची दक्षता घेण्यात यावी.

4) लेखापरीक्षण कालावधीत नव्याने करनिर्धारीत केलेल्या एकूण मिळकतीपैकी बांधकाम परवाना अथवा कायदेशीर बाबीची पुर्तता केलेल्या मिळकतीची संख्या याबाबत विहीत नमुन्यातील नोंदवहया ठेवलेल्या नाहीत. त्यामुळे नविन करनिर्धारण केलेल्या मिळकतीपैकी किती मिळकतीकरीता बांधकाम परवाना, बांधकाम पुर्णत्व दाखला घेतला आहे तसेच भोगवटा प्रमाणपत्र घेतले आहे याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध होवु शकली नाही. कर विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेल्या वार्षिक सर्व्हे नुसार कर आकारणीस पात्र असलेल्या इमारती आणि जमिनी यांची आकारणी सूची (नविन मालमत्ता) नुसार (सोबत विवरणपत्र) सन 2019-20 मध्ये एकूण 522 मालमत्ता व सन 2020-21 मध्ये एकूण मालमत्ता 460 वाढलेल्या दिसून येतात. संबंधीत मिळकतधारकांनी बांधकाम परवाना व बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र/भोगवटा प्रमाणपत्र घेतल्याबाबत तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. तरी संबंधीत मिळकतधारकांनी बांधकाम परवाना व बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र/भोगवटा प्रमाणपत्र घेतल्याबाबतची नगररचना विभागाशी पडताळणी करून परवाना व प्रमाणपत्र न घेणाऱ्या संबंधीत मिळकतधारकांवर नियमानुसार शास्ती आकारण्यात यावी.

DLFGBBM9201 (Ref No : 132, Hmm No : 55)

112 सन 2019-20 ची कराची अखेर शिल्लक व सन2020-21 ची सुरूवातीची शिल्लक यामधील तफावतीबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी सन 2020-21-22 च्या लेखापरीक्षणामध्ये कर विभागाकडील मागणी, वसूली व थकबाकी गोषवाराची तपासणी केली असता सन 2019-20 ची कराची अखेर शिल्लक व सन 2020-21 ची सुरूवातीची शिल्लक यामध्ये रक्कम रूपये 61200552/- ची तफावत दिसून येते. त्याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

अ.क्र.	कराचे नाव	अखेर शिल्लक सन 2019-20	सुरूवातीची शिल्लक सन 2020-21	तफावत
1.	संयूक्त कर	70874606	97116098	26241492
2.	वृक्ष कर	2388986	3437107	1048121
3.	विशेष स्वच्छता कर	467987	601444	133457

4.	ड्रेनेज कर	3296803	4588202	1291399
5.	पाणीपट्टी कर	44671426	59003264	14331838
6.	विशेष शिक्षण कर	6944190	9501263	2557073
7.	शिक्षण कर	18285240	30675558	12390318
8.	रोजगार हमी	3570838	6501432	2930594
9.	अग्नीशमन कर	923187	1199447	276260
10.	घनकचरा	13322893	13322893	0
एकूण		164746156	225946708	61200552

1) वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेली थकबाकी संबंधित कर विभाग प्रमुख यांनी सन 2019-20 च्या लेखापरीक्षणाला सादर केलेल्या (सदर सन 2019-20 चे थकबाकी गोषवाऱ्याचे विवरणपत्र सन 2019-20 च्या लेखापरीक्षण अहवाला मध्ये जोडण्यात आलेले आहे.) व चालु लेखापरीक्षणास दिलेल्या विवरणपत्रकानुसार असून प्रत्यक्ष येणे, वसुल व थकबाकी ही नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नमुना क्रमांक 27 कर मागणी नोंदवहीस दर्शविणे आवश्यक असता तसे दर्शविण्यात आलेले नाही. त्याकारणे सदर थकबाकी योग्य वा अचुक आहे असे म्हणता येणार नाही.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 472(1) विभागप्रमुखाची कार्ये नुसार संबंधित विभाग प्रमुख, या संहितेव्दारे विहित केलेले व आवश्यक असलेले अभिलेख, नोंदवह्या आणि नमुने अद्यावत व अचुक ठेवील. असे असताना संबंधीत कर मागणीच्या गोषवाऱ्यामधील कराची अखेर शिल्लक व सुरूवातीची शिल्लक यामध्ये तफावत असणे ही गंभीर स्वरुपाची अनियमितता आहे. संबंधीत बाब सन 2019-20 च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये परिच्छेद क्रमांक 101 ने सुध्दा निदर्शनास आणुन देण्यात आलेली आहे. तरी संबंधीत करविभाग प्रमुख यांनी सदर उणीवा मध्ये दुरूस्ती न केल्यामुळे व योग्य दक्षता न घेतल्यामुळे सदरचा फरक राहिल्याचे दिसून येते.

3) त्याचप्रमाणे महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 470(9) मध्ये नमुद प्रस्तुत नियमानुसार अथवा यासंबंधी केलेल्या इतर कोणत्याही नियमानुसार ठेवणे आवश्यक असलेले सर्व लेखे व नोंदपुस्तकांची वर्षातुन निदान दोन वेळा तपासणी करील. संबंधीत लेखापरीक्षक यांनी नियमानुसार तपासणी केली असती तर सदर बाब निदर्शनात आली असती परंतू तपासणी केल्याचे दिसून येत नाही.

4) सन 2019-20 व 2020-21 ची कर मागणी नोंदवही यांचा परस्परांशी ताळमेळ घेण्यात येऊन तपशील नोंदवून कुठलाही अपहार किंवा गंभीर अनियमितता नाही याबाबत लेखापरीक्षणास पुर्तता सादर करावी.

DLFGBBM9201 (Ref No : 134, Hmm No : 57)

113 एक्झमशन, कोर्ट, शासकीय व इतर इमारतींवर एकत्रित कर समायोजीत केलेमुळे झालेल्या नुकसानीबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 126880726.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2020-21-22 लेखापरिक्षणात कर विभागाकडील मिळकतीवरील एकत्रित कराची थकबाकी समायोजित केलेबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहे.

1) इचलकरंजी नगरपरिषदेचे लेखापरीक्षणामध्ये नगरपरिषदेचे प्रभाग क्रमांक 1 ते 26 मधील शासकीय मिळकतीवरील एकत्रित कराची थकबाकी सन 2020-21 मध्ये रक्कम रुपये 73976281/- व सन 2021-22 मध्ये रक्कम रुपये 52904445/- इतकी रक्कम कर विभागाकडील कर मागणी नोंदवही मधुन सोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील एक्झमशन, कोर्ट, शासकिय व इतर या शिर्षकाखाली दर्शविल्याप्रमाणे कमी करणेत आली असून संबंधित रक्कम कमी करणेबाबत नगरपरिषदेने कोणताही ठराव करणेत आलेचे दिसून येत नाही. (सोबत विवरणपत्र) तरी संबंधित रक्कम सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी न घेता कोणत्या प्राधीकारान्वये समायोजित करणेत आली याची माहिती समजून येत नाही. तसेच सदरच्या मिळकतीवरील कर वसुल केला नसलेस सदरचे कालावधीत वसुली करणेबाबत केलेल्या प्रयत्नांची/नोटीस निर्गमीत केली असलेस त्याबाबतच्या प्रती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. एकूण मागणी रक्कमेमधून एक्झमशन, कोर्ट, शासकिय व इतर आस्थापनाची वसूली वगळून निव्वळ मागणी दर्शवून त्याची वसूली केली आहे. निव्वळ मागणी कमी दाखविल्याने व त्याप्रमाणे वसूली केल्याने वसूलीची टक्केवारी वाढल्याचे दिसून येते. तथापि, नगरपरिषदेला कोणतेही अधिकार नसताना शासकीय व इतर आस्थापनाची चालु मागणी व थकबाकी वसूल न करता मागणीमधून वगळण्यात आल्याने नगरपरिषदेचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास येत आहे.

2) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 167 नुसार मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेस अधिन राहुन आणि राज्य शासन याबाबतीत जे नियम करील त्यांचे अधिन राहुन वसुल न होण्याजोगा कोणताही कर निर्लेखीत करणेची तरतुद असुन वरील समायोजीत केलेली रक्कम ही मा.जिल्हाधिकारी अथवा शासन मान्यता घेवुन निर्लेखीत केली असलेबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलबध झालेले नाहीत. सदरची वसुली वसुल करणेबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 149 ते 162 व 164 ते 172 मधील तरतुदीनुसार जर कार्यवाही करुन तदनंतरच ज्या रक्कमा वसुल होणार नाहीत अशाच रक्कमा कलम 167 नुसार निर्लेखीत करता येतात तथापि कलम 149 ते 162 व 164 ते 172 मधील तरतुदीनुसार कार्यवाही केलेचे दिसुन येत नाही.

3) वसूल केलेल्या रकमेमध्ये समायोजित केलेल्या रकमेचा समावेश असलेने वसूल केलेल्या रकमेची टक्केवारी ही प्रत्यक्षात वसूल केलेल्या रकमेपेक्षा जास्त दिसून येते त्यामुळे शासनाची फसवणूक केलेचे निष्पन्न होते.

4) सबब अशाप्रकारे नियमबाह्यरीत्या कराच्या रक्कमा निर्लेखीत केलेमुळे नगरपरिषदेचे नुकसान होत असलेचे सिध्द होत असलेमुळे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 96 मधील तरतुदीनुसार सदरच्या अनियमीततेबाबतच्या वसुलीबाबतची कारवाई करणेत यावी.

DLFGBBM9201 (Ref No : 135, Hmm No : 82)

114 मिळकत धारकांनी कर भरणाकरिता अदा केलेले धनादेश न वटल्यामुळे झालेल्या दंडामुळे नगरपालिकेस झालेल्या नुकसानीबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 77400.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात मिळकत धारकांनी कर भरणाकरिता अदा केलेले धनादेश न वटल्यामुळे बँकेकडून झालेल्या दंडामुळे नगरपालिकेस झालेल्या नुकसानीबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सन 2020-21 व 2021-22 मध्ये कर पोटी नागरिकांनी धनादेशाने रक्कमेचा भरणा केला आहे. विभागाकडे आलेल्या धनादेशापैकी अनुक्रमे 95 व 163 असे एकूण 258 धनादेश हे बाउन्स झालेले आहेत. त्यामुळे बँकेकडून प्रति धनादेश रक्कम रु. 300/- आकारण्यात येणारे ldquo;चेक बाउन्स चार्जेसrdquo; नगर पालिकेकडून वसूल केलेलं आहेत. त्यामुळे नगरपालिकेला 77400/- चा दंड झालेला दिसून येतो.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नुसार प्रकरण 7 मधील कलम 101 अन्वये नगरपालिकेला प्राप्त झालेला धनादेश यथोचितरित्या न वटल्यास, संबधित विभाग प्रमुख उचित प्रकरणांमध्ये, परक्रम्य संलेख अधिनियम, (Negotiable Instruments Act) 1881 (1881 चा कलम 26) अन्वये खटला सुरु करण्याची पावले उचलणे आवश्यक असता त्याप्रमाणे नगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) परक्रम्य संलेख अधिनियम, (Negotiable Instruments Act) 1881 मधील कलम 138 अन्वये चेक बाउन्स संबंधी चेक बाउन्स झाल्यावर चेक जेव्हा बँकेकडून परत मिळतो त्या दिवसापासून पुढे 30 दिवसांच्या आत संबधित चेक धारकास डिमांड नोटीस पाठवावी व 15 दिवसांची मुदत पैसे परत भरण्यासाठी द्यावेत. 15 दिवसांमध्ये संबधिताकडून काहीच प्रतिसाद न मिळाल्यास किंवा पैसे जमा न केल्यास संबधितास 15 दिवसांची मुदत संपल्यापासून पुढील 30 दिवसांच्या आतमध्ये संबधिता विरोधात कोर्टात आवश्यक कागदपत्रे जमा करून व स्टॅम्प ड्युटी भरून Before a magistrate केस दाखल करणे आवश्यक आहे. तथापि नगरपालिकेने मिळकत धारकांविरुद्ध कोणतीही कायदेशीर कार्यवाही केलेली नाही.

न.पा.चे दंडापोटी झालेले आर्थिक नुकसान सन 77400/- संबधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

DLFSVWM9501 (Ref No : 146, Hmm No : 102)

115 मालमत्ता धारकांकडे मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर थकीत असल्याबाबत व सन2020-21 व सन 2021-22 मधील कराची थकबाकीबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 77400.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात सादर केलेल्या कर विभागाकडील नगरपरिषदेचा मागणी, वसुली व थकबाकी चा एकत्रित वार्षिक गोषवाराबाबत व मालमत्ता धारकांकडे मालमता कर फार वर्षापासून थकीत असल्याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

1)कर विभागाकडील नगरपरिषदेचा मागणी, वसुली व थकबाकी चा एकत्रित वार्षिक गोषवारा बघितला असता असे दिसून येते की मिळकतधारकांकडे खालीलप्रमाणे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे.

अ.क्र.	सन	थकबाकी
1.	2020-21	205485662
2.	2021-22	154798308
	एकूण	360283970

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात मालमत्ता धारकांकडे मालमत्ता कर थकीत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र नगरपरिषद व नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965 चे कलम 150 नुसार बिल देणे, कलम 141 नुसार मागणीची नोटीस देणे, कलम 152 नुसार अधिपंज (वारंट) बजावून तसेच स्थायी निर्देश क्रमांक 5 मधील बाब क्र.(6) नुसार मालमत्ता कराचे निर्धारण करण्याकरिता नवीन घरांचे मोजमाप दरवर्षी करावे. तसेच जुन्या मालमत्तेबाबत नियमानुसार सुधारित करनिर्धारण करण्याकरिता नियमित स्वरुपात करून वसुली लवकरात लवकर करावी असे असताना नगरपरिषदेची मोठ्या प्रमाणात थकीत मागणी असल्याचे निदर्शनास येते. याबाबतची उदाहरणादाखल थकबाकीदार खालीलप्रमाणे-

क्र.	वॉर्डक्र.	मालमत्ता क्र.	2021-22अखेर थकबाकी
1	5	51000982	962292
2	5	51000997	1006178
3	9	95000332	835102
4	9	95000235	89640
5	9	95000326	138074
6	9	95000147	178129
7	18	18000294	176739
8	18	18000316	309854
9	18	18000460	846854
10	23	231000026	133137
11	23	231000090	1056331
12	23	231000110	784161
13	23	231000111	729757
14	23	231000348	981393

		एकूण	**8227641**

वरील नमूद मालमत्ता धारक हे उदाहरणादाखल असून सर्व वार्डचा आढावा घेवून त्याप्रमाणे वसुली करण्यात यावी.

2)वरीलप्रमाणे थकबाकी पाहता कराची वसूली योग्य प्रकारे होत नसल्याचे दिसून येते. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 342 नुसार दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीपासुन थकीत मागणीसंबंधात खाली विहीत केलेल्या मानांकनावर आधारीत तरतुद करणे आवश्यक आहे.

थकित कालावधीसाठी अदत्त करासंबंधी मागणी	अप्राप्त रक्कमेच्या टक्केवारीने तरतुद करणे
दोन वर्षाहुन अधिक पण तीन वर्षाहुन अधिक नसेल अशी थकीत मागणी	25 टक्के
तीन वर्षाहुन अधिक पण चार वर्षाहुन अधिक नसेल अशी थकीत मागणी	50 टक्के (म्हणजेच अतिरीक्त 25 टक्के)
चार वर्षाहुन अधिक पण पाच वर्षाहुन अधिक नसेल अशी थकीत मागणी	75 टक्के (म्हणजेच अतिरीक्त 25 टक्के)
पाच वर्षाहुन अधिक कालावधीची थकीत मागणी	100 टक्के (म्हणजेच अतिरीक्त 25 टक्के)

3) वरीलप्रमाणे थकीत मागणीसंबंधी करनिर्धारण करणे आवश्यक असुन सदरची थकबाकी वसुल करणेबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 149 ते 162 व 164 ते 172 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करुन त्यानुसार कर थकीत असणाऱ्या मिळकतधारकांचे मागणीसंबंधी पाठवण्यात आलेल्या नोटीसी तसेच त्यानुसार किती मिळकत धारकाकडुन थकबाकी वसुल केली आहे याबाबतची माzwj;हिती लेखापरीक्षणास उपलबध करणेत यावी.

DATPDDF9401 (Ref No : 149, Hmm No : 105)

116 अनधिकृत मिळकतीचां मिळकतकर दंडनीय दराने वसुल न केलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ब	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपालिका इचलकरंजी आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22चे लेखापरिक्षणात अनधिकृत मिळकतीचां मिळकतकर दंडनीय दराने वसुल न केलेबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

1) करनिर्धारीत केलेल्या एकूण मिळकतीची संख्या याबाबतची माहीती अदयावत ठेवलेली नाही.

2) लेखापरीक्षण कालावधीत नव्याने करनिर्धारीत केलेल्या एकुण मिळकतीपैकी बांधकाम परवाना अथवा कायदेशीर बाबीची पुर्तता केलेल्या मिळकतीची संख्या याबाबत विहीत नमुन्यातील नोंदवहया (लेखासंहिता 2011

अधिसूचना 13 मधील नमुना क्रमांक 38 मध्ये) ठेवलेल्या नाही. त्यामुळे नवीन करनिर्धारण केलेल्या मिळकतीपैकी किती मिळकतीकरीता बांधकाम परवाना,बांधकाम पुर्णत्व दाखला घेतला आहे तसेच भोगवटा प्रमाणपत्र घेतले आहे परंतु करविभागक्डील लेखे व नगररचना विभागाकडील लेखे यांच्यामध्ये तफावत दिसून येत आहे तसेच भोगवटा प्रमाणपत्र व बांधकाम परवाने न घेता अशी किती अनधिकृत बांधकामे करण्यात आलेली आहेत याबाबत लेखापारीक्षनास माहिती उपलब्ध झाली नाही.

3) कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम केलेस ते बांधकाम जोपर्यत अवैध बांधकाम महणुन राहील तोपर्यत दरवर्षी अशा इमारतीवर बसवण्यायोगय असलेल्या मालमत्तावर अधिनियम 1965 मधील नियम कलम 189(अ) नुसार कराच्या दुप्पट इतकी शास्ती भरणेस पात्र असले अशी तरतुद असुन अशा प्रकारे एकुण किती इमारतीवर दुप्पट दराने कर आकारणी केली आहे याबाबत लेखापरीक्षणास अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करणेत आले नाहीत.

4) महाराष्ट्र शासनराजपत्र 4 जानेवारी 2008 व महाराष्ट्र नगरपरिषद ,नगर पंचायती औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 189 अ (ड) नुसार कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम जोपर्यत अवैध म्हणुन राहील तोपर्यत दरवर्षी अशा इमारतीवर बसवण्याजोगा असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट दराने इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल अशी तरतुद असुन यामध्ये शास्तीची रक्कम / दर निर्धारणेबाबत आर्थिक वर्ष 2018 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 53 अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे.

5) नव्याने बांधकाम करतांना नियमबाहय/अनिधिकृत बांधकाम होत असेल तर संबधीत विभागाने असे बांधकाम तात्काळ थांबवुन त्यावर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहेत तसेच बांधकाम परवाना घेतलेल्या मिळकतींना पुर्णत्व दाखला विहीत समयमर्यादेत देणे आवश्यक असुन त्यानुसार कर आकारणी करतांना प्राप्त झालेल्या पुर्णत्व दाखले व भोगवटा प्रमाणपत्र सादर करणेत आलेले नाहीत.

DATPPTF9501 (Ref No : 150, Hmm No : 109)

कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

117 दप्तर सादर न केलेबाबत (भांडार विभाग)

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9क	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपालिका,इचलकरंजी चे सन 2020-2021-2022 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण दिनांक 09/11/2022 रोजी सुरू केले आहे.

प्रमाणक क्रमांक/दिनांक	रक्कम	तपशिल
174 /24/03/2021	4000000	शाळा व्यवस्थापन समिती, न.प.बालवाडी विभाग

वरील प्रमाणक, दस्तऐवज तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही. सदर बाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 (1) नुसार अर्धसमास पत्र क्र. 01, दि.09/11/2022, व अर्धसमास पत्र क्र. 61, दि.23/03/2023 रोजी दप्तर उपलब्ध करणेबाबत तसेच वारंवार तोंडी सुचना देवूनही अदयापपर्यंत दप्तर उपलब्ध करण्यात आले नाही.

उक्त अधिनियमाच्या कलम 6 अन्वये कायदेशीररीत्या तीला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करील किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारील ती दंडाधिका-यापुढे सिद्धपराध ठरविण्यात आल्यानंतर रुपये पंचविस हजार इतक्या दंडास पात्र ठरतील

DATABPM8101 (Ref No : 84, Hmm No : 204)

118 लेखापरीक्षणासाठी प्रमाणके उपलब्ध न झालेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9क	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपालिका,इचलकरंजी चे सन 2020-2021-2022 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण दिनांक 09/11/2022 रोजी सुरू केले असून लेखापरीक्षणकामी रेखांकनासाठी आवश्यक प्रमाणके मागवण्यात आली होती,परंतू अद्याप खालील प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

अ.क्र	योजनेचे नाव	प्र.क्र/दिनांक	रक्कम	तपशील
1	न.पा फंड	148/23/3/2021	9773/-	मा.प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

2		149/23/3/2021	9909/-	मा.प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर
3		150/23/3/2021	52104/-	मा.प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर
4		151/23/3/2021	23623-	कै.सखुबाई आ.ढवळे वारस रेखा आ.ढवळे
5		164/24/3/2021	573300/-	सुरेश लक्ष्मण जाधव
6		177/24/3/2021	1671043/-	मार्च 2020 सुटटीचा पगार
7		409/31/3/2021	21059/-	आर.एस. चौधरी
8		434/31/3/2021	471607/-	बसगोंडा म.हल्याळ
9		550/31/3/2021	150000/-	महादेव हं. साळोंखे
17		582/31/3/2021	343980/-	रेखा अशोक जरग सीएचवी
18		584/31/3/2021	466060/-	दर्शन जोशी
19		595/31/3/2021	128453/-	श्zwj;शिकांत धोत्रे
20		596/31/3/2021	102582/-	श्zwj;शिकांत धोत्रे
21		597/31/3/2021	1035422/-	हणमंत स चव्हाण
22		599/31/3/2021	47064/-	ए.व्ही.साळुंखे व आर व्ही परीट
23		600/31/3/2021	31608/-	दिलीप पोवार व इतर 3
24		601/31/3/2021	5580/-	अस्लम साहेबजी शीलेदार
25	न.पा फंड	602/31/3/2021	6552/-	बाळकृष्णzwj; बंडू औंधकर
26	न.पा फंड	603/31/3/2021	15032/-	गौरा शाम रजपूते
27	न.पा फंड	604/31/3/2021	14325/-	संपत शंकर तबिरे
28	न.पा फंड	605/31/3/2021	5985/-	मंगल भा. गायकवाड
29	न.पा फंड	606/31/3/2021	6912/-	दिलीप खानु हराळे व इतर 9

30	न.पा फंड	607/31/3/2021	40464/-	किरण रामचंद हजारे
31	न.पा फंड	608/31/3/2021	5411749/-	महागाई भत्ता फरक 6zwj; महिने
32	न.पा फंड	609/31/3/2021	952199/-	ओमेगा टेक्नोलॉजीस
33	न.पा फंड	622/31/3/2021	416936/-	ओमेगा टेक्नोलॉजीस
34	न.पा फंड	625/31/3/2021	638518/-	इसाक तराळ
35	14वा वित्त्zwj; आयोग	206/11/2/2021	34350/-	मिलिंद प्रकाश नवनाळे
36	14वा वित्त्zwj; आयोग	224/26/3/2021	890000/-	कारोना भत्ता (कर्मचारी)
37	14वा वित्त्zwj; आयोग	319(1)/31/3/21	34350/-	मिलिंद प्रकाश नवनाळे
38	14वा वित्त्zwj; आयोग	320/31/3/2021	310278/-	संतोष भूपाल माने
39	14वा वित्त्zwj; आयोग	321/31/3/2021	4200000/-	कचरा संकलन 496वर वर्ग
40	12 वा वित्त्zwj; आयोग (इवि.कामे)	6/29/1/2021	200000/-	आशिर्वाद कॅटरर्स प्रोप्रा.शैलेंद्र गजरे
41	12 वा वित्त्zwj; आयोग(घनकचरा)	1/11/12/2021	2144930/-	इनपा खाते 3011 वर जमा असे.
42	वैशिष्टयपूर्ण काम	1/20/10/2020	5587011/-	इनपा खाते 161 वर वर्ग असे.
43	न.पा फंड	89/24/12/2021	1520789/-	EESLएफि zwj;शियंशी zwj; सर्विसेस
44	न.पा फंड	163/31/12/2021	38400/-	सलमा महमंद मुजावर
45	न.पा फंड	133/17/3/2022	71826/-	दिनकर देवाप्पा कांबळे
46	न.पा फंड	139/17/3/2022	23535/-	वैभव अशोक सोनुले
47	न.पा फंड	431/28/3/2022	147624/-	हणमंत स चव्हाण
48	न.पा फंड	432/28/3/2022	75000/-	हणमंत स चव्हाण

अ.क्र	योजनेचे नाव	प्र.क्र/दिनांक	रक्कम	तपशील
1	नगरोत्थान अनुदान (जिल्हास्तर)	54/23.10.2020	442887	विक्रांत ओमप्रकाश यादव

2	2020-21	61/19.11.2020	616478	प्रिया नाईक
3		63/19.11.2020	59565	दीपक शिंगाडे
4		64/19.11.2020	9500	प्रशांत बेलवले
5		65/19.11.2020	9500	प्रशांत बेलवले
6		66/19.11.2020	9900	प्रशांत बेलवले
7		67/19.11.2020	9500	प्रशांत बेलवले
8		68/01.12.2020	48550	ओम कन्स्ट्रकशन
9		69/06.01.2021	40700	प्रवीण टेके
10		70/06.01.2021	925270	पाटणी कन्स्ट्रकशन
11		71/06.01.2021	605990	रविंद्र कागवाडे
12		73/19.01.2021	222826	सृष्टी कन्स्ट्रकशन
13		91/30.03.2021	482526	सुधीर लाटकर
14		92/30.03.2021	11824	शंभुराजे कन्स्ट्रकशन
15		93/30.03.2021	152418	मिलिंद नवनाळे
16		94/30.03.2021	152091	रविंद्र कागवाडे
17		95/30.03.2021	98125	सुरेन्द्र बोने
18		96/30.03.2021	158515	रविंद्र कागवाडे
19		97/30.03.2021	148123	रविंद्र कागवाडे
20		98/30.03.2021	61975	शंभुराजे कन्स्ट्रकशन
21		99/30.03.2021	71389	बाळाप्पा तेजी
22		100/30.03.2021	43626	अभिषेक तेजी
23		120/31.03.2021	96162	मनीष मेटे
24		124/31.03.2021	300852	अरुण देशिंगे

	एकूण		4778292	

DATABPM8101 (Ref No : 93, Hmm No : 38)

भाग दोन

सर्वसाधारण अनियमितता

कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

119 महिला व बालकल्याण विभागाकडील ओपनजीम साहित्य बसविणे कामातील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगर परिषद इचलकरंजी च्या आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 च्या लेखापरीक्षणा दरम्यान महिला व बालकल्याण विभागाकडील ओपनजीम साहित्य बसविणे कामातील अनियमिततांचा तपशील खालीलप्रमाणे:

खर्च प्रमाणकांचा तपशील:

अ.क्र.	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	कामाचा तपशील	मक्तेदाराचे नाव
1	532	31.03.2021	251270	प्रभाग क्र. 16 सोलगे मळा शिवमंदिर मागे नप ओपनस्पेस मध्ये ओपनजीम साहित्य बसविणे	सिटी स्पोर्टस
2	39	08.03.2021	297600	प्रभाग क्र.30 श्रीपादनगर येथील डॉ. कुडचे दवाखाना च्या मागील बाजूस ज्ञानेश्वर उद्यानामध्ये ओपनजीम साहित्य बसविणे	आर.एस.चौधरी
3	530	31.03.2021	252805	प्रभाग क्र. 03 सोलगे मळा मध्ये ओपनजीम साहित्य बसविणे	सिटी स्पोर्टस
		एकूण	801675		

उपरोक्त नमूद ओपनजीम साहित्य बसविणे प्रक्रियेतील अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे:

1) सदरची ओपनजीम साहित्य खरेदी नगरपरिषदेमार्फत दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन उध्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-2016/प्र.क्र.215/ उद्योग-4 दिनांक 24/08/2017 नुसार खरेदीदार विभागास गव्हर्नमेंट ndash; ई मार्केटप्लेस (GEM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांमधून खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तथापि सदरची खरेदी ही आर्थिक वर्ष 2020-21-22 करिता दरपत्रकाच्या पद्धतीने केली आहे. तसेच संबंधित वस्तू व सेवा या GEM पोर्टलवर उपलब्ध नसलेबाबत खरेदी समितीने प्रमाणपत्र दिलेले नाही. सबब सदरची खरेदी प्रक्रिया विहीत शासन निर्णयानुसार करण्यात आलेली नाही.

2) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं. स-2014/प्र.क्र.82/ भाग 3/उद्योग 4 दि 01/12/2016 परिच्छेद क्र.3.2.3 अन्वये 3 लाखांवरील खरेदी करिताची ई-निविदा प्रक्रिया टाळण्यासाठी मोठे आदेश लहान-लहान आदेशांमध्ये विभागणी करण्यावर बंधने घालण्यात आले आहेत. या योजनेतील लेखापरिक्षणास प्राप्त एकूण 3 देयकांची रक्कम रुपये 801675/- एवढी होत आहे. सदर योजनेमध्ये ई-टेंडर प्रक्रिया टाळण्यासाठी एकाच प्रकारच्या मोठ्या कामाच्या आदेशाची लहान-लहान आदेशात विभागणी करण्यात

आल्याचे दिसून येते.

3) उपरोक्त खर्च तपशील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देयकांमधून रक्कम एक टक्का आयकर व 2 टक्के GST TDS कपात करण्यात आला आहे, परंतु सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

4) सदर साहित्याचे उपयोगिता प्रमाणपत्र / विनियोग दाखला लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

5) उपरोक्त नमूद प्रत्येक कामाकरिता निविदा फी रक्कम 300 रुपयेवर 18 टक्के प्रमाणे 54 रु. इतका GST आकारण्यात आला आहे. परंतु सदर नमूद 6 कामांकरिता निविदा फी GST ची एकूण रक्कम रु. 624/- GST ची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही..

6) महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 व महाराष्ट्र मुद्रांक (सुधारीत) अधिनियम 2015 च्या अनुसूची 1 मधील कलम 63 खंड अ नुसार 10 लाख रुपयां पर्यतच्या कामासाठी 500/- रुपये व त्यावरील प्रत्येक 1 लाख रुपयांकरीता 100/- रुपये प्रमाणे करारपत्र करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणे प्रत्येक कामासाठी रक्कम रुपये 500/- किंमतीच्या मुद्रांकावर करारपत्र करणे आवश्यक असता केवळ 100/- रुपयाच्या मुद्रांकावर करारनामा करणेत आला आहे. उपरोक्त नमूद 3 कामांसाठी प्रत्येकी रुपये 400/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 1200/- मक्तेदारांकडूनवसूल करुन शासन खाती भरणा केलेची चलने लेखापरीक्षणास सादर करावीत.

7) महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4 दिनांक 01/12/2016 मधील परिशिष्ट 8 नुसार 5 लाख रुपयापर्यंतच्या कामासाठी निविदा शुल्क 1400 रू. घेणे आवश्यक असताना 300/- रू निविदा शुल्क घेण्यात आले आहे. उर्वरित रक्क्म 1100/- रूपये संबंधित सर्व दरपत्रकधारकांकडून वसूल करणेत यावेत.

8) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. 10 भा.खं.स.- 2014/प्र.क्र.82/भाग 3/उद्योग 4 दि. 01/12/2016 मधील मुद्दा क्र. 2.9.4 अन्वये खरेदी करताना खरेदी समिती स्थापन करून त्यांनी वस्तूच्या किंमतीचा वाजवीपणा ठरविणेबाबत परिच्छेद क्र. 3.1.2.2 नुसार बाजारपेठेतील दरांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असून त्यानुसार विहित नमुना परिशिष्ठ 1 मधील विहित नमुन्यात बाजारभावानुसार सदरचे दरपत्रकाद्वारे प्राप्त दर योग्य असलेबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना सदर योजनेसाठी त्यानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

9) नस्तीस जोडलेल्या जाहिरातीचे अवलोकन केले असता जाहिरातीत कामाचा तपशील नमूद नाही. तसेच कामाचा कालावधी, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा फी इत्यादी तपशील नमूद करणेत आलेला नाही. त्यामुळे अधिक तुलनात्मक दराच्या निविदा प्राप्त न झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

10) सदर कामांच्या काम पुर्णत्वाचे फोटो नस्तीस नमूद नाहीत.

11) सदर कामांची मुल्यांकन नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

वरील उणीवांसह खरेदी प्रक्रिया राबविल्यामुळे सदरचा खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATASKM9501 (Ref No : 6, Hmm No : 139)

120 5 टक्के दिव्यांग निधी खर्चामधील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी आर्थिक वर्ष सन 2020-2021 व 2020-21-22चे लेखापरिक्षणात 5 टक्के दिव्यांग निधी वाटपाबाबत खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

अ.क्र.	सन	रक्कम	लाभार्थि संख्या
1	2020-2021	18437000	347 लाभार्थि सन 2019-2020 मधील प्रलंबित यादीतील लाभार्थिना 20-21 मध्ये लाभ 1322 लाभार्थि सन 20-21 मधील
2	2021-2022	4906800	1692 लाभार्थिना रु 2900/- प्रति लाभार्थि प्रमाणे अदा

1) सन 2020-21-22 कडील 5 टक्के दिव्यांग निधी वाटपाबाबतच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सन 2020-21 मध्ये सन 2019-20 मधील प्रलंबीत 347 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. दिव्यांग निधीची तरतूद असतानाही प्रती वर्षी मान्य लाभार्थ्यांना लाभ दिला नसल्याने त्यांना लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

2) सन 2020-21 मध्ये एकदाच दिव्यांग व्यक्तींचे प्रस्ताव मागवण्यात आलेले आहेत. सन 2021-22 करीता प्रस्ताव मागवण्यात आलेले नाहीत. प्राप्त प्रस्तावांचे/दिव्यांग नोंदणी अर्जांवर दिनांक नमूद नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव विहित कालावधीतील असलेबाबतची सत्यता पडताळता येत नाही.

3) सार्व.आरोग्य विभाग शा.नि.क्र.3 अप्रवि-20/8/प्र.क्र.४६/आरोग्य 06 दि.14 सप्टेबर 2018 अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना नुसार प्रस्तावासोबत असलेले दिव्यांगाचे दिव्यांग प्रमाणपत्र हे विहित नमुन्यातील नाहीत. उदा.मारुती शिवगोंडा पाटील,तुलसी हरीप्रकाश सोनी,आशिष विठ्ठल पवार,गीता व्यंकटेश दोरनाळ,अनिल श्रीपाल पाटील,राजेश वसंत पाटील,ऋतुजा राजकुमार गेजगे,तुकाराम अनंत गवळी,रजिया चांद्सो शेख,शाहनवाज उस्मान धारवाडे,लता रामदास नगरकर,सुधीर शांताराम बुगड,संतोष बाळकृष्ण सुतार,राहुल दत्तात्रय चव्हाण,शामसुंदर रामचंद्र केसरवाणी इत्यादी.

4) विभागाकडील अनुशेष नोंदवहीमध्ये नमूद केलेनुसार सन 2021-2022 मध्ये केलेली तरतूद 5280728 असून झालेला खर्च 4906800 असून अनुशेष रक्कम रुपये 373928 शिल्लक राहिला आहे.

5) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण/2013/मुमंस/31/प्रक्र 88 नवि 20 दिनांक 4/10/2013 नुसार अपंग प्रमाणपत्र सादर करणाऱ्या अपंगाची नोंदणी नगरपालिका स्तरावरुन करण्यासाठी नोंद रजिस्टरमध्ये नोंद घेण्याबाबत शासनाकडुन सूचना असूनही सुचनांचे पालन झालेचे आढळून आले नाही. तरी सदरच्या नोंदी घेवून लेखापरिक्षणास पुर्तता दाखवावी.

DATGSDM8201 (Ref No : 30, Hmm No : 60)

121 शिक्षण मंडळाकडील सेवा पुस्तकातील उणीवा बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखा परीक्षणात शिक्षण मंडळाकडील सेवा पुस्तकातील खालीलप्रमाणे नोंदी अपूर्ण आहेत.

1) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.साप्रवि/हिंदी भाषा/1092/प्र.क्र.29 व साप्रवि/हिंदी भाषा/1076/28 दि. 10/6/1976 व शा.नि. क्र. 1092/ 1570/प्र.क्र.143/9210 दि. 1/1/93 अन्वये सेवेतील सर्व अधिकारी कर्मचारी यांना एतदर्थ मंडळाची हिंदी व मराठी भाषा उत्तीर्ण झाले बाबतची नोंद सेवा पुस्तकात घेणे आवश्यक आहे. अशा नोंदी सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.वेपूर 1309/प्र.क्र.69 सेवा-9 दि. 29/4/2009 नियम 14 नुसार 6 व्या वेतन आयोगाच्या दि. 1/1/2006 ते 31/3/2009 अखेर वेतन फरकाची रक्कम 5 समान हप्त्यात भविष्य निर्वाह निधी खातेवर जमा केले बाबतची नोंद सेवा पुस्तकामध्ये घेणे आवश्यक आहे. परंतू अशा नोंदी सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

3) म.ना.से. नियम 1981 मधील नियम 38 अन्वये सेवा पुस्तकामध्ये सर्व घटनांची व जन्म तारखेची नोंद करताना जन्मतारीख कागदोपत्री पुराव्यावरुन पडताळून पाहावी आणि आधारभूत कागदपत्राचे स्वरुप नमूद करुन तशा अर्थाचे प्रमाणपत्र देणेबाबत नमूद केले आहे, अशी कार्यवाही केले नसल्याबाबत लेखापरीक्षणात आढळून आले आहे.

4) सेवा पुस्तकात रकाना क्र.8 मध्ये कर्मचाऱ्याची प्रत्येक वर्षी स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे, परंतू त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

5) नियम क्र. 36 ते 45 नुसार सेवा पुस्तकाची सेवा पट कर्मचाऱ्याची सेवा अखंडता इ. बाबी अभिलेखे पडताळणी केले बाबतची नोंद सेवा पुस्तकात शेवटी घेतलेली नाही.

6) सेवा पुस्तकात रजा मंजुरीचे आदेश क्रमांक व दिनांक नमूद नाही, रजा मंजूरीबाबत सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही.

7) आस्थापनेवरील सर्व कर्मचारी/अधिकारी यांची जात पडताळणी बाबत महाराष्ट्र शासन परिपत्रक सामाजिक न्याय व सांस्कृतिक विभाग क्र.cbc/10/2004/प्र.क्र.570/मावक/5 दि. 5 मार्च 2005 मधील सुचनेनुसार जात पडताळणी केले बाबतची नोंद सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

8) आस्थापनेवरील सर्व कर्मचारी / अधिकारी यांची चारित्रय़ पडताळणी बाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रमांक .बीसीए/1093/14999/प्र.क्र.59/16 अ दि. 9/3/1994 मधील सूचनेनुसार कर्मचाऱ्यांचे चारित्रय व पूर्व चारित्रय पोलीस तपासामध्ये चांगले असणे आवश्यक आहे, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम 40 नुसार कर्मचाऱ्यांचे चारित्रय पडताळणी झाल्याबाबतच्या नोंदी सेवापुस्तकांमध्ये घेणे अनिवार्य आहे. अशा नोंदी आढळून आल्या नाहीत.

9) शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर 2019/प्र.क्र.1/सेवा-9/ दि. 30 जानेवारी, 2019 चे नियम 6 नुसार विकल्प व वचन पत्र सेवापुस्तकात आढळून आले नाहीत.

10) सेवा पुस्तकात शासन परिपत्रक क्र.वेपुर-2019/प्र.क्र.8/सेवा-9 दिनांक 20 फेब्रुवारी 2019 नुसार वेतन निश्चिती

बाबतचे विवरणपत्र आढळून आले नाही.

11) शासन निर्णय क्र.टी-आर-8/1163/2026/ दि. 23/10/1963 शा.नि.वित्त विभाग दि. 10/06/2015 अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यास आपले स्वग्राम घोषीत करणे आवश्यक आहे. तशा नोंदी सेवापुस्तकात आढळून आल्या नाहीत.

12) शासन निर्णय वित्त विभाग क्र. सेनिवे 1007/62/ सेवा -4 दि. 4/1/2008 नुसार सेवा निवृत्तीस प्रकरणा सोबत स्थायित्व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. कोणत्याही कर्मचाऱ्यास त्याच्या शासकीय सेवेतील एकापदावर स्थायित्व मिळणे आवश्यक आहे . शासन निर्णय साप्रवि दिनांक 11/09/2014 व 11/09/2017 नुसार कर्मचाऱ्यांना स्थायित्व प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करुन तशा नोंदी सेवापुस्तकात आढळून आलेल्या नाहीत.

13) सेवा निवृत्ती नंतर मिळणारे लाभ वेळेवर मिळण्यासाठी नामनिर्देशने आवश्यक आहेत. 1) निवृत्ती वेतन 2) सेवा उपदान 3) भविष्य निर्वाह निधी 4) गटविमा योजना 5) NPS राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना इ. सर्व कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकात सदर नामनिर्देशने भरुन सक्षम प्राधिकारी-यांची स्वाक्षरी नाही.

14) रजा लेखा अपुर्ण आहे. 15) वेळोवेळी वेतन आयोगानुसार कर्मचाऱ्यांचे विकल्प, विहित वचन / बंधपत्र घेण्यात आले नाहीत. उदा. 6 वा वेतन आयोग, 7 वा वेतन आयोग तशा नोंदी सेवापुस्तकात नाहीत. 16) जात प्रमाणपत्र वैधता नोंद आढळून आली नाही . उपरोक्त 1 ते 16 बाबी पूर्ण करुन अनुपालन सादर करावे.

DATNDPM7201 (Ref No : 7, Hmm No : 21)

122 शिक्षण विभागाकडील अनुदान निर्धारणा बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखा परीक्षणात शिक्षण विभागाकडील महाराष्ट्र शासन,ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.अनिनी/2013/ प्र.क्र.77 /वित्त-2/दि.2/12/2013 नुसार प्रत्येक आर्थिक वर्षात दि.10 एप्रिल ते 15 जुलै या कालावधीत अनुदान निर्धारण करणे आवश्यक आहे. नगर पालिका शिक्षण मंडळाचे अनुदान निर्धारण करणे बाबत त्वरीत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATNDPM7201 (Ref No : 8, Hmm No : 26)

123 शिक्षण मंडळाकडील शिक्षकांच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील कपाती न केले बाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखा परीक्षणात शिक्षण विभागाकडील

शिक्षकांची खालील प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही.

1) शासन निर्णय वित्त विभाग दिनांक 7 जुलै 2007 नुसार 1 नोव्हेंबर 2005 व त्यानंतर नियुक्त होणा-या शासकीय कर्मचा-यांसाठी नवीन परिभाषीत अशंदायी निवृत्ती वेतन योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. शासन परीपत्रक क्रं.अनियो-1007/स.क्रं.1152/प्र.क्रं.181/आस्था-19 दि.12.9.2007 अन्वये योग्य त्या फेरफारासह नगरपरिषद शिक्षण मंडळ यांनी प्रत्येक महिन्यास अशा कर्मचा-यांच्या वेतनातून अशंदानाची रक्कम कपात करावयाची आहे व अशंदानाची समतुल्य रक्कम 8342 इतर ठेवी, 120 संकीर्ण ठेवी (00) (04) परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना स्तर 1 (8342-508-1) या शीर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

2) उपरोक्त शासन परिपत्रकाप्रमाणे अशी रक्कम नगरपालिकेच्या हिश्श्यासह विहीत लेखा शीर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

3) अशा प्रकारे रक्कम संबंधीत लेखा शीर्षाखाली जमा न केल्याने त्यावर मिळणा-या व्याजापासून कर्मचारी वंचित राहिले आहेत.

4) दिनांक 7 जुलै 2007 नुसार शासकीय विभाग/कार्यालयातील आहंरण व संवितरण अधिकारी प्रत्येक कर्मचा-याकंडून त्यांच्या/ तीच्या नियुक्तीनंतर लगेच ,निवृत्तीवेतन लेखा क्रंमाक प्राप्त करण्या अर्ज विहीत नमुना नं.1 मध्ये तीन प्रतीत प्राप्त करील व त्या तीनही प्रती राज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांचेकडे थेट पाठवेल. त्यानुसार राज्य अभिलेख देखभाल अभिकरण प्रत्येक कर्मचा-यास निवृत्ती वेतन लेखा क्रमांक देईल. शिक्षण मंडळकडील नगर परिषदेने अशा प्रकारचा निवृत्ती वेतन क्रमांक त्याप्रमाणे कार्यावाही केलेली नाही. उपरोक्त बाबींची पूर्तता करुन अनुपालन सादर करावे.

DATNDPM7201 (Ref No : 53, Hmm No : 22)

124 शिक्षण मंडळाकडील निवृत्त वेतन प्रदानाच्या नोंदवहया न ठेवले बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगर परिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखा परीक्षणात शिक्षण विभागाकडील सेवानिवृत्त शिक्षकांची प्रकरणांची तपासणी केली असता खालील प्रमाणे नियत निवृत वेतनधारक व कुटुंब निवृत्त वेतनधारक संख्या आहे.

सन	निवृत्त वेतनधारक संख्या	कुटुंब निवृत्तधारक संख्या	एकूण संख्या
2020-2021	339	128	467
2021-2022	329	133	462

लेखापरीक्षण कालावधीत शिक्षण उपसंचालक कार्यालयकडून 80% व नगर पालिका 20% अनुदान प्राप्त असून खालील प्रमाणे नियत निवृत वेतनधारक व कुटुंब निवृत्त वेतनधारक खर्च करणेत आलेला आहे.

सन	निवृत्त वेतनधारक खर्च रक्कम रुपये	कुटुंब निवृत्त वेतन खर्च रक्कम रुपये	एकूण र.रु.
2020-2021	96975427	26006607	122982034
2021-2022	103406396	25051438	128457834
		एकूण	251439868

याबाबत निवृत्त वेतन लेखे ठेवण्यात आलेली नाहीत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता सुधारीत लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.466 (5) नुसार तसेच परिशिष्ट 4 मधील अ.क्र. क ते न या तरतूदीनुसार निवृत्ती वेतन अदा करणे व निवृत्ती वेतनाचे लेखे ठेवणेत आलेले नाही.

2) मासीक निवृत्ती वेतनाचे देयक महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 2011 परिशिष्ट 4 ट मध्ये नमूद केल्याप्रमाणे नमुना 93 मध्ये तयार करणेत आलेले नाही. तथापी शिक्षण विभागातील निवृत्तीवेतनाचे लेखे तपासले असता नमुना 93 मध्ये निवृत्तीवेतनाची देयके तयार केली जात नसून पेन्शन पत्रकावरुन रक्कमा आहरि केल्या जातात. शिक्षण विभागातील सर्व निवृत्तीवेतन धारकांचे त्या त्या महिन्याचे पेन्शन पत्रक तयार करुन त्यावर एकूण रक्कम अंकी व अक्षरी लिहीली जाते व त्यावरुन रक्कम अदा करण्यात येते व आहरीत करण्यात येते. सदरची ही पध्दत चुकीची असून विहीत नमुन्यात देयक तयार करुन त्यावरुन रक्कम आहरीत करण्यात यावी.

3) महाराष्ट्र नगरपालिका सुधारीत लेखासंहिता 2011 मधील निवृत्ती वेतन विषयक देयकाच्या प्रदानावर लक्ष ठेवण्याच्यादृष्टीने नमुना 91 मध्ये निवृत्ती वेतन नोंदवही ठेवणे आलेली नाही.

4) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 परिशिष्ट 4त नुसार प्रत्येक निवृत्तीवेतन धारकांचे हयातीचे दाखले दरवर्षी 1 एप्रिल व 1 ऑक्टोबर रोजी निवृत्ती वेतनधारकाकडून प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. हयातीचे दाखले या विभागाकडून विहीत नमुन्यात घेण्यात आले नाहीत, तथापि त्याच्या नोंदी नमुना 97 मध्ये नोंदवही ठेवली नसल्याने अप्राप्त हयातीच्या दाखल्याच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे हयातीचा दाखला न दिलेल्या निवृत्ती वेतनधारकास निवृत्तीवेतन अदा करण्यात आले आहे किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र नगरपालिका सुधारीत लेखासंहिता 2011 मधील निवृत्ती वेतन प्रदान आदेश नोंदवही नमुना 92 मध्ये ठेवून त्यामध्ये शिक्षण मंडळाने सुरुवाती पासून ज्यांना ज्यांना निवृत्ती वेतन मंजूर केले आहे. त्यांच्या अनुक्रमांकानुसार आजतागायत मंजूर केलेल्या प्रदान आदेशाच्या अनुक्रमे नोंद घेणेत आलेली नाही. अशीनोंद घेवून एकूण निवृत्ती वेतनधारक किती आहेत हयात किती व प्रत्यक्षात किती निवृत्ती वेतन धारकांना कोणत्या दराने निवृत्ती वेतन अदा केले जाते याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही.

6) महाराष्ट्र नगरपालिका सुधारीत लेखासंहिता 2011 मधील नमुना 94 नुसार जिचे निवृत्तीवेतन तिच्या विवाहानंतर किंवा पुर्नविवाहानंत बंद होईल अशा महिला निवृत्तवेतनधारकांचे सहामाही घोषणापत्र (डिसेंबर व जून) यांच्या निवृत्तीवेतन देयकासह जोडणेत आलेली नाही.

7) महाराष्ट्र नगरपालिका सुधारीत लेखासंहिता 2011 मधील नमुना 96 मध्ये उपदान नोंदवही ठेवणेत आलेली नाही. त्याचप्रमाणे निवृत्ती वेतन अंशराशीकरणासाठी त्याच नमुन्यात वेगळी नोंदवही ठेवणेत आलेले नाही.

8) महाराष्ट्र नगरपालिका सुधारीत लेखासंहिता 2011 मधील निवृत्तीवेतन लेखापरीक्षा नमुना 97 मध्ये नोंदवही ठेवणेत आलेले नाही.

9) निवृत्ती वेतनधारकांचे निवृत्ती वेतन प्रतिमाह बँक जमा करण्यात येते तसेच स्क्रोल प्रमाणे बँकेत संबधीतांच्या खात्यावर जमा व खर्च अखर्चित रक्कम याबाबतचा ताळमेळ घेतलेला नाही.

10) सेवा निवृत्त कर्मचा-याची सेवापुस्तके शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडुन पडताळनी करुन तशी नोंद घेणे आवश्यक आहे. उपरोक्त 1 ते 10 बाबींची पूर्तता करुन तो पर्यत लेखा परीक्षण कालावधीत निवृत्त वेतनधारक व कुटुंब निवृत्त वेतनधारक यांचेवर खर्च र.रु.251439868 /- अंतिम अमान्य करणेत येत आहे.

DATNDPM7201 (Ref No : 54, Hmm No : 23)

125 शिक्षण मंडळाकडील इ.5वी विद्यार्थी व विदयार्थ्यानां सायकल पुरविणे बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	800.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	1491700.00/-

नगर परिषद इचलकरंजी सन 2020-2021 ते 2021-2022 चे लेखापरिक्षणात शिक्षण मंडळाकडील न.पा.फंडातून इयत्ता 5वी विदयार्थीनी व विद्यार्थ्याना सायकल पुरविणेबाबत माहिती खालीलप्रमाणे.

कामाचे नांव	इ.5वी विद्यार्थी व विदयार्थ्यानां सायकल पुरविणे.
लेखाशिर्षक	न.पा.निधी
अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 6000000/-
प्रशासकीय मंजूरी	उपलब्ध नस्ती सोबत उपलब्ध नाही.
कौन्सील ठराव	क्रं.39 दिनांक 29/6/2019
पुरवठादार	नॅशनल ट्रेडर्स इचलकरंजी
लाभार्थ्यी संख्या	1008

खालील प्रमाणकाने खर्च करणेत आला आहे.

प्र. क्रं.	दिनांक	रक्कम	तपशील
18	9/2/2021	1491700	शाळा व्यवस्थापन समितीकडे वर्ग

वरील रक्कम रुपये 1491700/- शाळा व्यवस्थापन समितीकडे वर्ग करण्यात आली आहे. याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

1) उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भाखसं-2014/प्र.क्र.82/भागIII /उदयोग-4 दि.1.12.2016 नुसार रुपये 5000/- पेक्षा जास्त परंतु 3,00,000/-पर्यंतच्या साहित्याची खरेदी दरपत्रके मागवून आणि रुपये 3,00,000/-पुढील साहित्य खरेदी करण्यासाठी ई निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे शासकीय

कार्यालयांना बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं 2016/प्र.क्र.215/उदयोग-4 दि.2.8.2017 केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई मार्केट प्लेस (Gem) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्वीकृत केलेली आहे. त्यानुसार GEM Portal चे दर जादा असल्याने स्थानिक दरानुसार कोटेशन मागविण्यात आली आहे. तथापि लेखापरीक्षणास नस्ती सोबत GEM Portal एकच दरपत्रकाची निविदा जोडली आहे. जादा निवीदा नस्तीसोबत जोडल्या असत्या तर स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला असता त्यामुळे सदरचे दर योग्य़ असले बाबतची खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक अधिनियम 1965 मधील कलम 93(6) नुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिरातीव्दारे नोटीस दिली पाहिजे व त्याव्दारे अशा संविदेसाठी निविदा मागविणे आवश्यक होते. त्यामुळे. शिक्षण विभागाने अशा पध्दतीने जाहिरातीतून निविदा न मागविता सदरच्या खर्चाची विभागणी करुन नियमबाहय पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी केली आहे.

4) शासन निर्णय नियोजन विभाग क्र.डीसीटी 2316/प्र.क्र.133/का.1417 दिनांक 5/12/2016 प्रमाणे वस्तु खरेदी न करता रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर न पाठविता संस्थेच्या खातेवर पाठविण्यात आली आहे.

5) सदर कामाचे निविदा स्विकृतीनंतर मक्तेदाराकडुन करारनामा घेताना मुंबई अधिनियम 1958 व वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार पहिल्या 10 लाखार्यंत रक्कम रुपये 500/- व पुढील प्रत्येक लाखाकरिता रुपये 100/- याप्रमाणे वसुल करणे आवश्यक असता ते वसुल करण्यात आले नाही. तरी वरील कामामध्ये रुपये 100/- चा करारनामा करण्यात आला असल्यामुळे संबंधिताकडुन रक्कम रुपये 800/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा. नि. क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-।॥/उद्योग-4 दि.01/12/2016 मधील परि. 2.13 नुसार प्रशासकीय मंजूरीचे आदेश व त्यामधील खरेदीची आवश्यकता व वस्तुच्या विनियोगा बाबतचे प्रमाण्पत्र नस्तीस उपलब्ध झाले नाही.

7) सदर योजनेत प्रति विद्यार्थ्यास AVON-जेन्ट्स सायकल खरेदीस रुपय 5950/- व AVON-लेडीज सायकल खरेदीस रुपय 5900/- असा दर निश्चित केला आहे. तथापि दर निश्चित करताना महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा. नि. क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-।॥/उद्योग-4 दि.01/12/2016 मधील परि.3.1.2.2 नुसार वस्तुच्या किंमतीच्या वाजवीपणा बद्दल सर्वेक्षण करुन विहित नमुना परि. 1 मध्ये प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना अशा प्रकारची कार्यवाही या विभागाकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदरचा हा दर कशाच्या आधारे निश्चित केला हे समजून येत नाही.

8) कौन्सील ठराव क्रं क्रं.39 दिनांक 29/6/2019 हा नस्तीस उपलब्ध झाले नसलेने सदर ठरावातील अटी व शर्ती ,मंजूर अनुदान, अंदाजपत्रक इत्यादि तपशीलाचे लेखापरिक्षण करण्यात आले नाही. तसेच तांत्रिक मंजूरी नस्तीस उपलब्ध झाले नाही.

9) पात्र लाभार्थि यादी नस्तीस उपलब्ध झाली नाही. सदरचा खर्च करणेसाठी स्थायी समितीची मंजूरी, त्यातील अटी व शर्ती अनुदान इत्यादिचा तपशील नस्तीस उपलब्ध झाला नाही.
10) सायकल पुरवठादाराकडून TDS 2% कपात केलेचे चलन उपलब्ध़ झाले नाही.

11) सायकल खरेदी ही शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला करुन विद्यार्थ्याना लाभ देण्यात आलेला नाही. तसेच 3 किलो मीटर व त्यापेक्षा जास्त अंतराहून येणारे विदयार्थ्यी व विदयार्थ्यीनीना सायकल वाटप केले आहे. तथापी 3

किलो मीटर पेक्षा जादा अंतर असलेबाबतचे दाखले नस्तीसोबत उपलब्ध झाले नाही.

12) सदर वस्तूंचे त्रयस्थ पक्षाकडून टेस्ट रिपोर्ट घेण्यात आलेले नाही. सदर योजनेमध्ये खर्च झालेल्या रकमेचे विनियोग दाखले घेण्यात आलेले नाही. तसेच निविदा फॉर्म फी व बयाना रक्कम निविदा धारकाने भरल्याच्या पावत्या देयकास उपलबद्ध झालेले नाही. उपरोक्त बाबींची पूर्तता होईतोपर्यत खर्च रक्कम रुपये 1491700/- लेखापरिक्षणात अंतिम अमान्य करणेत येत आहे.

DATNDPM7201 (Ref No : 142, Hmm No : 53)

126 शिक्षण मंडळाकडील इ.1ली ते 7वी विदयार्थीनी, विदयार्थ्यानां गणवेश पुरविले बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	2000000.00/-

नगर परिषद इचलकरंजी सन 2020-2021 ते 2021-2022 चे लेखापरिक्षणात शिक्षण मंडळाकडील न.पा.फंडातून इयत्ता 1ली ते 7वी विदयार्थीनी व विद्यार्थ्याना गणवेश पुरविण्यात आले आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

1) ठराव क्रं.38 दिनांक 29/06/ 2019

2) खर्च रुपये- 2000000/-

3) पुरवठा दर प्रति विद्यार्थ्यास 2 गणवेश प्रति नग 300 प्रमाणे 600/-

26	31/3/2021	2000000	शाळा व्यवस्थापन समितीकडे वर्ग
	एकूण	2000000	

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

1) उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भाखसं-2014/प्र.क्र.82/भागIII /उदयोग-4 दि.1.12.2016 नुसार रुपये 5000/- पेक्षा जास्त परंतु 3,00,000/-पर्यंतच्या साहित्याची खरेदी दरपत्रके मागवून आणि रुपये 3,00,000/-पुढील साहित्य खरेदी करण्यासाठी ई निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे शासकीय कार्यालयांना बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखसं 2016/प्र.क्र.215/उदयोग-4 दि.2.8.2017 केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई मार्केट प्लेस (Gem) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक अधिनियम 1965 मधील कलम 93(6) नुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिरातीव्दारे नोटीस दिली पाहिजे व त्याव्दारे अशा संविदेसाठी निविदा मागविणे आवश्यक होते. त्यामुळे. शिक्षण विभागाने अशा पध्दतीने जाहिरातीतून निविदा न मागविता सदरच्या खर्चाची विभागणी करुन नियमबाहय पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी केली आहे.

4) शासन निर्णय नियोजन विभाग क्र.डीसीटी 2316/प्र.क्र.133/का.1417 दिनांक 5/12/2016 प्रमाणे वस्तु खरेदी न

करता रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर न पाठविता संस्थेच्या खातेवर पाठविण्यात आली आहे. याबाबत खुलासा करावा.

5) सदर योजनेत प्रति विद्यार्थ्यास 2 गणवेश व एका गणवेशाची किंमत रुपय 300/- अशा रितीने प्रत्येक विद्यार्थ्यामागे रुपये 600/- असा गणवेशाचा दर निश्चित केला आहे तथापि दर निश्चित करताना महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा. नि. क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-।॥/उद्योग-4 दि.01/12/2016 मधील परि.3.1.2.2 नुसार वस्तुच्या किंमतीच्या वाजवी पणाबद्दल सर्वेक्षण करुन विहित नमुना परि. 1 मध्ये प्रमाणपत्र देणे आवश्यक असताना अशा प्रकारची कार्यवाही या विभागाकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदरचा हा दर कशाच्या आधारे निश्चित केला हे समजून येत नाही.

6) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा. नि. क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-।॥/उद्योग-4 दि.01/12/2016 मधील परि. 2.13 नुसार प्रशासकीय मंजूरीचे आदेश व त्यामधील खरेदीची आवश्यकता व वस्तुच्या विनियोगाबाबतचे प्रमाण्पत्र नस्तीस उपलब्ध झाले नाही.

7) तांत्रिक मंजूरी नस्तीस उपलब्ध झाले नाही. कौन्सील ठराव क्रं. दिनांक / /20 हे नस्तीस उपलब्ध झाले नसलेने सदर ठरावातील अटी व शर्ती ,मंजूर अनुदान, अंदाजपत्रक इत्यादि तपशीलाचे लेखापरिक्षण करण्यात आले नाही.

8) लाभार्थि यादी नस्तीस उपलब्ध झाली नाही. नपाच्या 47 शाळेकडून विद्यार्थ्यासाठी मागणीपत्रक नस्तीस जोडले आहे. परंतु प्रत्यक्षात विद्यार्थ्याना गणवेश वाटप करण्यात आले आहे याचा बोध होत नाही.

9) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा. नि. क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-।॥/उद्योग-4 दि.01/12/2016 मधील परि. 2.13 नुसार प्रशासकीय मंजूरीचे आदेश व त्यामधील खरेदीची आवश्यकता व वस्तुच्या विनियोगाबाबतचे प्रमाण्पत्र नस्तीस उपलब्ध झाले नाही.

10) महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक अधिनियम 1965 मधील कलम 93(6) नुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिरातीव्दारे नोटीस दिली पाहिजे व त्याव्दारे अशा संविदेसाठी निविदा मागविणे आवश्यक होते. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला असता. शिक्षण विभागाने अशा पध्दतीने जाहिरातीतून निविदा न मागविता सदरच्या खर्चाची विभागणी करुन स्वत:च्या अधिकारात नियमबाहय पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी केली आहे.

11) ई-टेंडर प्रक्रिया टाळण्यासाठी कामाची लहान लहान आदेशात विभागणी करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार वस्तूंची आधारभूत किंमत ठरविणे,तांत्रीक समिती गठित करणे,वस्तूंची आवश्यकता व विनीयोगाबाबतचे प्रमाणपत्र इ.चे अभिलेखे देयकास संलग्न नाहीत.अखर्चित रक्कम नपा निधीत जमा करणेत यावे.

12) शासन निर्णयानुसार निवीदा शुल्क, TDS कपाती चलने इ.उपलब्ध झाली नाही गणवेश खरेदीच्या नोंदी साठा नोंदवहीत घेण्यात आलेबाबत खात्री करता आली नाही. गणवेश खरेदीचा चाचणी अहवाल घेण्यात आले नाही. उपरोक्त बाबींची पूर्तता होईतोपर्यत खर्च रक्कम रुपये 2000000/- लेखापरिक्षणात अंतिम अमान्य करणेत येत आहे.

DATNDPM7201 (Ref No : 143, Hmm No : 81)

127 14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील सर्व वाणिज्य क्षेत्रातील21 ठिकाणचे रस्ते, चौक यांचे रात्रपाळीत सफाईसाठी सेवा पुरविणे कामातील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी च्या आर्थिक वर्ष 2020-2021 व सन 2021-2022 च्या लेखापरीक्षणात आरोग्य विभागाकडील लेखापरीक्षणामध्ये 14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील सर्व वाणिज्य क्षेत्रातील 21 ठिकाणचे रस्ते, चौक यांचे रात्रपाळीत सफाईसाठी सेवा पुरविणे कामी खर्च करण्यात आला आहे.

उपरोक्त कामाकरिता राबविलेल्या निविदा प्रक्रियेचा तपशील खालीलप्रमाणे :

कामाचे नाव	14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील सर्व वाणिज्य क्षेत्रातील 21 ठिकाणचे रस्ते, चौक यांचे रात्रपाळीत सफाईसाठी सेवा पुरविणे.
निधी	14 वा वित्त आयोग
अंदाजपत्रकीय रक्कम	4434679/-
प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग:	उपलब्ध नाही
अभिप्राय :	अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
तांत्रिक मान्यता- 14 वा वित्त आयोग:	उपलब्ध नाही
निविदा खर्च मान्यता ठराव	न.प.कौ.ठ.नं.232, दि.30.01.2020
दर मान्यता ठराव क्र.	न.प इचलकरंजी मा.स्थायी समिती ठराव क्र.256, दिनांक 18.02.2019 (4% कमी दराने)
निविदा प्रकार	ई-निविदा
प्राप्त न्युनतम दर	अंदाजपत्रकीय रकमेच्या 4% कमी दराने
कामाची मुदत	12 महिने
मक्तेदाराचे नाव	मनिष महादेव मेटे

सदर निविदेस दिलेल्या पहिल्या मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे :

निधी	14 वा वित्त आयोग
प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग: (दि.09.03.2021 ते दि. 08.03.2022	मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.कार्या.11/नपा/प्र.मा./एस.आर/14ब/2021,

करिता)	दि.30.06.2021 र.रु. 4434679/-
नगरपरिषद मुदतवाढ ठराव (दि.09.03.2021 ते दि. 08.03.2022 करिता)	न.प.कौ.ठ.नं.284, दि.15.03.2021

सदर कामाकरिता झालेल्या खर्च प्रमाणकांचा तपशील खालीलप्रमाणे:

अ.क्र.	निधीचे नाव	देयक कालावधी	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम
1	14 वा वित्त आयोग	जाने.2020 ते मार्च 2020 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	13	21.05.2020	115590
2	14 वा वित्त आयोग	01.04.2020 ते 30.04.2020	14	21.05.2020	316904
3	14 वा वित्त आयोग	01.05.2020 ते 31.05.2020	33	15.06.2020	316904
4	14 वा वित्त आयोग	01.06.2020 ते 30.06.2020	43	05.08.2020	316904
5	14 वा वित्त आयोग	01.07.2020 ते 31.07.2020	62	17.08.2020	173786
6	14 वा वित्त आयोग	एप्रिल 2020 ते जून 2020 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	79	21.08.2020	115596
7	14 वा वित्त आयोग	01.08.2020 ते 31.08.2020	81	15.09.2020	316904
8	14 वा वित्त आयोग	जुलै 2020 ते ऑगस्ट 2020 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	107	12.10.2020	77064
9	14 वा वित्त आयोग	01.09.2020 ते 30.09.2020	111	23.10.2020	316904
10	14 वा वित्त आयोग	सप्टें.2020 ते ऑक्टो. 2020 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	139	19.11.2020	77064
11	14 वा वित्त आयोग	01.10.2020 ते 31.10.2020	142	19.11.2020	316904

12	14 वा वित्त आयोग	01.11.2020 ते 30.11.2020	162	19.01.2021	316904
13	14 वा वित्त आयोग	01.12.2020 ते 31.12.2020	171	04.02.2021	316904
14	14 वा वित्त आयोग	नोव्हेंबर 2020 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	172	04.02.2021	38532
15	14 वा वित्त आयोग	डिसें.2020 ते जाने 2021 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	221	23.03.2021	77064
16	14 वा वित्त आयोग	01.01.2021 ते 31.01.2021	223	23.03.2021	316904
17	14 वा वित्त आयोग	01.02.2021 ते 28.02.2021	311	31.03.2021	316904
17	14 वा वित्त आयोग	01.02.2021 ते 28.02.2021	311	31.03.2021	316904
18	14 वा वित्त आयोग	फेब्रु.2021 ते मार्च 2021 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	122	30.06.2021	77064
19	14 वा वित्त आयोग	01.03.2021 ते 31.03.2021	172	15.09.2021	316904
20	14 वा वित्त आयोग	01.04.2021 ते 30.04.2021	173	15.09.2021	316904
21	14 वा वित्त आयोग	01.05.2021 ते 31.05.2021	174	15.09.2021	316904
22	14 वा वित्त आयोग	01.06.2021 ते 30.06.2021	175	15.09.2021	316904
23	14 वा वित्त आयोग	01.07.2021 ते 31.07.2021	176	15.09.2021	316904
24	14 वा वित्त आयोग	01.08.2021 ते 31.08.2021	177	15.09.2021	316904
25	14 वा वित्त आयोग	एप्रिल 2021 ते ऑगस्ट 2021 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	211	27.10.2021	192665

26	14 वा वित्त आयोग	01.09.2021 ते 30.09.2021	212	27.10.2021	316904
27	14 वा वित्त आयोग	01.10.2021 ते 31.10.2021	233	26.11.2021	316904
28	14 वा वित्त आयोग	सप्टेंबर 2021 ते ऑक्टोबर 2021 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	234	26.11.2021	77066
29	14 वा वित्त आयोग	01.11.2021 ते 30.11.2021	340	18.01.2022	316904
30	14 वा वित्त आयोग	01.12.2021 ते 31.12.2021	341	18.01.2022	316904
31	14 वा वित्त आयोग	01.01.2022 ते 31.01.2022	404	14.03.2022	316904
32	14 वा वित्त आयोग	नोव्हेंबर 2021 ते जानेवारी 2022 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	405	14.03.2022	115599
33	14 वा वित्त आयोग	फेब्रुवारी 2022 च्या कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	409	28.03.2022	38533
34	14 वा वित्त आयोग	01.03.2022 ते 08.03.2022	410	28.03.2022	84508
35	14 वा वित्त आयोग	01.02.2022 ते 28.02.2022	411	28.03.2022	316904
	एकूण खर्च				8548923

सदर खर्च प्रक्रियेतील लेखापरीक्षणास आढळलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे :

1) सदर कामाच्या उपरोक्त खर्च प्रमाणक तपशीलात नमूद केलेप्रमाणे देयकांमधून कर्मचारी PF करिता रक्कम अदा करण्यात आली आहे, परंतु सदर PF रक्कम संबंधित कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खाती भरणा केल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

2) मक्तेदार शिवाजी सिद्धू धुमाळ यांचे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तीचे विनियमन) अधिनियम 2018- नमुना "ग" (नियम 9) नुसार सादर केलेल्या नोंदणी प्रमाणपत्रामध्ये कामगार संख्या पुरुष -5 व स्त्री 0 अशी एकूण 5 कामगार संख्या असलेचे नमूद आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता सदर कामासाठी एकूण 26 कर्मचारी संख्या मक्तेदाराकडे असणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. सदर बाबत योग्य तो तपशिल आवश्यक त्या अभिलेख्यासह लेखापरीक्षणास सादर करावा.

3) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता सदर कामासाठी एकूण 25 कर्मचारी व एक सुपरवायझर

अशी एकूण 26 कर्मचारी संख्या आवश्यक असल्याचे नमूद आहे. परंतु सदर कर्मचारी संख्या कोणत्या आधारे निश्चित करण्यात आली हे समजून येत नाही. कर्मचारी संख्या कोणत्या आधारे ठरविण्यात आली याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

4) उपरोक्त नमूद कामाकरिता नगरपरिषदेमार्फत दैनिक महानकार्य व दैनिक महासत्ता मध्ये दिनांक 25.12.2018 रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत आली आहे. परंतु नस्तीस जोडलेल्या जाहिरातीचे अवलोकन केले असता जाहिरातीत कामाचा तपशील नमूद नाही. तसेच कामाचा कालावधी, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा फी इत्यादी तपशील नमूद करणेत आलेला नाही.

5) सदर कामाच्या देयकांमधून एक टक्के आयकर रक्कमा कपात करण्यात आले आहेत. परंतु सदर कपातीच्या रक्कमांची शासन खाती भरणा केलेची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

6) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता सुपरवायझर वेतन (PF सह) करिता रक्कम रुपये 197779/- निश्चित करण्यात आली आहे, परंतु सदर वेतनाचे किमान वेतन नियमानुसार वेतननिश्चिती विवरण नस्तीस उपलब्ध झाले नाही.

7) वॉर्डमधील दैनिक कचरा सफाई अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे प्रमाणकाद्वारे अदा रक्कम योग्य असल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

8) कामाचा करारनामा अट क्र. 8 नुसार कामावर हजर असणा-या कर्मचा-यांची नगरपरिषदेचे स्वच्छता निरीक्षक यांचेकडून दररोज हजेरी घेण्यात येईल, असे नमूद असताना कर्मचा-यांची दैनंदिन हजेरीपत्रके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

9) नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची शासकीय विमा रक्कम भरलेबाबतची चलनाची प्रत घेऊन त्यानंतरच नगरपरिषदेने मक्तेदारास मासिक देयके अदा करणे आवश्यक होते. तथापि अशी चलने न घेता नगरपरिषदेमार्फत प्रमाणकांद्वारे मक्तेदारास मासिक देयके अदा करण्यात आली आहेत.

DATASKM9501 (Ref No : 23, Hmm No : 133)

128 इचलकरंजी शहरातील वॉर्ड क्र 5 मधील विकली मार्केट व दैनंदिन व आठवडा बाजाराचे ठिकाणी साफसफाई कामी सेवा पुरविणे कामातील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी च्या आर्थिक वर्ष 2020-2021 व सन 2021-2022 च्या लेखापरीक्षणात आरोग्य विभागाकडील लेखापरीक्षणामध्ये इचलकरंजी शहरातील वॉर्ड क्र. 5 मधील विकली मार्केट व दैनंदिन व आठवडा बाजाराचे ठिकाणी साफसफाई कामी सेवा पुरविणे या कामाच्या मूळ निविदा प्रक्रियेचा तपशील खालीलप्रमाणे :

कामाचे नाव	इचलकरंजी शहरातील वॉर्ड क्र. 5 मधील विकली मार्केट व दैनंदिन व आठवडा बाजाराचे ठिकाणी साफसफाई कामी सेवा पुरविणे

निधी	14 वा वित्त आयोग
अंदाजपत्रकीय रक्कम	1376400/-
प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग:	मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश (14 वा वित्त आयोग)- क्र.कार्या.11/नपा/प्र.मा./एस.आर/58/क/2020 दि.14/02/2020 र.रु. 1376400/-
अभिप्राय :	अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
तांत्रिक मान्यता- 14 वा वित्त आयोग:	उपलब्ध नाही
खर्च मान्यता ठराव	न.प.कौ.ठ.नं.231/ दि.30.01.2020
निविदा प्रकार	ई-निविदा
प्राप्त न्युनतम दर	1376400/-
दर मान्यता ठराव क्र.	न.प इचलकरंजी मे.स्थायी समिती ठराव क्र.180, दिनांक 24/03/2020
कामाचा आदेश	दि. 31/03/2020
कामाची मुदत	12 महिने
मक्तेदाराचे नाव	गणेश बबन चोळके

सदर निविदेस दिनांक 15.06.2021 ते दिनांक 31.03.2022 करिता दिलेल्या मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे :

निधी	14 वा वित्त आयोग
प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग: (दि.15.06.2021 ते दि.31.03.2022 करिता)	मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.कार्या 11/नपा/प्र.मा./एसआर/17-ब/2021 दि.20/09/2021 र.रु. 3629570/-
मुदतवाढ खर्च मान्यता ठराव	उपलब्ध नाही

सदर कामाकरिता झालेल्या खर्च प्रमाणकांचा तपशील खालीलप्रमाणे:

अ.क्र.	निधीचे नाव	देयक कालावधी	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम
1	14 वा वित्त आयोग	14.06.2020 ते 30.06.2020	49	05.08.2020	55444

2	14 वा वित्त आयोग	01.08.2020 ते 31.08.2020	114	23.10.2020	69616
3	14 वा वित्त आयोग	01.09.2020 ते 30.09.2020	146	19.11.2020	107794
4	14 वा वित्त आयोग	01.10.2020 ते 31.10.2020	147	19.11.2020	102697
5	14 वा वित्त आयोग	01.11.2020 ते 30.11.2020	164	19.11.2020	95697
6	14 वा वित्त आयोग	01.12.2020 ते 31.12.2020	173	04.02.2021	98947
7	14 वा वित्त आयोग	01.01.2021 ते 31.01.2021	305	31.03.2021	104947
8	14 वा वित्त आयोग	01.02.2021 ते 28.02.2021	92	07.05.2021	94556
9	14 वा वित्त आयोग	01.03.2021 ते 31.03.2021	93	07.05.2021	100447
10	14 वा वित्त आयोग	01.04.2021 ते 30.04.2021	146	30.07.2021	83562
11	14 वा वित्त आयोग	01.05.2021 ते 31.05.2021	147	30.07.2021	60161
12	14 वा वित्त आयोग	01.06.2021 ते 30.06.2021	208	27.10.2021	103294
13	14 वा वित्त आयोग	01.07.2021 ते 21.07.2021	209	27.10.2021	69763
14	14 वा वित्त आयोग	22.07.2021 ते 31.07.2021	334	18.01.2022	35184
15	14 वा वित्त आयोग	01.09.2021 ते 30.09.2021	335	18.01.2022	99408
16	14 वा वित्त आयोग	01.08.2021 ते 31.08.2021	336	18.01.2022	107197
17	14 वा वित्त आयोग	01.10.2021 ते 31.10.2021	19	18.05.2022	108697
18	14 वा वित्त आयोग	01.11.2021 ते 30.11.2021	20	18.05.2022	104042
19	14 वा वित्त आयोग	01.12.2021 ते 31.12.2021	21	18.05.2022	104197
20	14 वा वित्त आयोग	01.01.2022 ते 31.01.2022	22	18.05.2022	99711
21	14 वा वित्त आयोग	जून 2020 ते मार्च 2021 कर्मचारी EPF करिता रक्कम अदा	23	18.05.2022	125304
	एकूण खर्च				1930665

सदर खर्च प्रक्रियेतील लेखापरीक्षणास आढळलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे :

1) उपरोक्त नमूद कामाच्या नस्तीस जोडलेल्या जाहिरातीचे अवलोकन केले असता जाहिरातीत कामाचा तपशील

नमूद नाही. तसेच कामाचा कालावधी, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा फी इत्यादी तपशील नमूद करणेत आलेला नाही.

2) मक्तेदार मनिष महादेव मेटे यांचे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तीचे विनियमन) अधिनियम 2018- नमुना "ग" (नियम 9) नुसार सादर केलेल्या नोंदणी प्रमाणपत्रामध्ये कामगार संख्या पुरुष-5 व स्त्री -0 अशी एकूण 5 कामगार संख्या असलेचे नमूद आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता सदर कामासाठी एकूण 12 कर्मचारी संख्या मक्तेदाराकडे असणे आवश्यक आहे. सदर बाबत योग्य तो तपशिल आवश्यक त्या अभिलेख्यासह लेखापरीक्षणास सादर करावा.

3) सदर कामाच्या उपरोक्त खर्च प्रमाणक तपशीलात नमूद केलेप्रमाणे देयकांमधून कर्मचारी PF करिता रक्कम अदा करण्यात आली आहे, परंतु सदर PF रक्कम संबंधित कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खाती भरणा केल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

4) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता दैनंदिन मार्केट साफसफाई कामी 02 कर्मचारी व मंगळवार आणि शुक्रवार या दिवशी आठवडी बाजार साफसफाई कामी 10 कर्मचारी एक सुपरवायझर अशी एकूण 12 कर्मचारी संख्या आवश्यक असल्याचे नमूद आहे. परंतु सदर कर्मचारी संख्या कोणत्या आधारे निश्चित करण्यात आली हे समजून येत नाही. कर्मचारी संख्या कोणत्या आधारे ठरविण्यात आली याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

5) सदर कामाच्या देयकांमधून एक टक्के आयकर रक्कमा कपात करण्यात आले आहेत. परंतु सदर कपातीच्या रक्कमांची शासन खाती भरणा केलेची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

6) वॉर्डमधील दैनिक कचरा सफाई अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे प्रमाणकाद्वारे अदा रक्कम योग्य असल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

8) कामाचा करारनामा अट क्र. 8 नुसार कामावर हजर असणा-या कर्मचा-यांची नगरपरिषदेचे स्वच्छता निरीक्षक यांचेकडून दररोज हजेरी घेण्यात येईल, असे नमूद असताना कर्मचा-यांची दैनंदिन हजेरीपत्रके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

9) नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची शासकीय विमा रक्कम भरलेबाबतची चलनाची प्रत घेऊन त्यानंतरच नगरपरिषदेने मक्तेदारास मासिक देयके अदा करणे आवश्यक होते. तथापि अशी चलने न घेता नगरपरिषदेमार्फत प्रमाणकांद्वारे मक्तेदारास मासिक देयके अदा करण्यात आली आहेत.

DATASKM9501 (Ref No : 24, Hmm No : 134)

129 14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड क्र10 मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न.प. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे कामातील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी च्या आर्थिक वर्ष 2020-2021 व सन 2021-2022 च्या लेखापरीक्षणात आरोग्य विभागाकडील लेखापरीक्षणामध्ये 14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड क्र.10 मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न .प. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे कामी खर्च करण्यात आला आहे.

उपरोक्त कामाकरिता राबविलेल्या निविदा प्रक्रियेचा तपशील खालीलप्रमाणे :

कामाचे नाव	14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड क्र.10 मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा न .प. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे.
निधी	14 वा वित्त आयोग
अंदाजपत्रकीय रक्कम	6395640/-
प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग: (दि.01.09.2019 ते दि. 31.08.2020 करिता)	मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश (14 वा वित्त आयोग)- क्र.कार्या.11/नपा/ आर.आर/375/इ/19, दि.11.09.2019 र.रु. 6395640/-
अभिप्राय :	अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
तांत्रिक मान्यता- 14 वा वित्त आयोग:	उपलब्ध नाही
मूळ निविदा खर्च मान्यता ठराव (सन 2018-19)	न.प.कौ.ठ.नं.06, दि.31.05.2018
दर मान्यता ठराव क्र.	न.प इचलकरंजी मा.स्थायी समिती ठराव क्र.108, दिनांक 18.08.2018 र.रु. 6395640/-
मुदतवाढ खर्च मान्यता ठराव (01.09.2019 ते 31.08.2020)	न.प.कौ.ठ.नं.94, दि.02.08.2019
निविदा प्रकार	ई-निविदा
प्राप्त न्युनतम दर	6395640/-
कामाचा आदेश	दि. 31.08.2019
कामाची मुदत	12 महिने
मक्तेदाराचे नाव	संतोष भुपाल मोने

सदर निविदेस दिलेल्या पहिल्या मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे :

निधी	14 वा वित्त आयोग

प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग: (दि.01.09.2020 ते दि. 31.08.2021 करिता)	मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.कार्या.11/नपा/ आर.आर/670/इ/2021, दि.04.01.2021 र.रु. 6395640/-
नगरपरिषद मुदतवाढ ठराव (दि.01.11.2020 ते दि. 31.10.2021 करिता)	न.प.कौ.ठ.नं.74, दि.16.09.2020
कामाचा आदेश	दि. 06.01.2021
कामाची मुदत	दि.01.09.2020 ते दि. 31.08.2021

सदर निविदेस दिलेल्या दुस-या मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे :

निधी	14 वा वित्त आयोग
प्रशासकीय मान्यता- 14 वा वित्त आयोग: (दि.01.09.2021 ते दि. 31.03.2022 करिता)	मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.कार्या.11/नपा/प्र.मा./एस.आर/18 ब/2021, दि.20.09.2021 र. रु. 15177486
नगरपरिषद मुदतवाढ ठराव (दि.01.11.2020 ते दि. 31.10.2021 करिता)	न.प.कौ.ठ.नं.87, दि.06.08.2021
कामाचा आदेश	दि. 22.12.2021
कामाची मुदत	दि.01.09.2021 ते दि. 31.03.2022

सदर कामाकरिता झालेल्या खर्च प्रमाणकांचा तपशील खालीलप्रमाणे:

अ.क्र.	निधीचे नाव	देयक कालावधी	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम
1	14 वा वित्त आयोग	01.04.2020 ते 30.04.2020	06	21.05.2020	436770
2	14 वा वित्त आयोग	01.05.2020 ते 31.05.2020	35	15.06.2020	451351
3	14 वा वित्त आयोग	01.06.2020 ते 30.06.2020	42	05.08.2020	436827
4	14 वा वित्त आयोग	01.07.2020 ते 31.07.2020	77	20.08.2020	451327
5	14 वा वित्त आयोग	01.08.2020 ते 31.08.2020	87	15.09.2020	451380

6	14 वा वित्त आयोग	01.12.2020 ते 31.12.2020	196	11.02.2021	455978
7	14 वा वित्त आयोग	01.11.2020 ते 30.11.2020	197	11.02.2021	441263
8	14 वा वित्त आयोग	01.10.2020 ते 31.10.2020	198	11.02.2021	455922
9	14 वा वित्त आयोग	01.09.2020 ते 30.09.2020	200	11.02.2021	441213
10	14 वा वित्त आयोग	01.03.2021 ते 31.03.2021	237	31.03.2021	456026
11	14 वा वित्त आयोग	01.02.2021 ते 28.02.2021	292	31.03.2021	411979
12	14 वा वित्त आयोग	01.01.2021 ते 31.01.2021	294	31.03.2021	455852
13	14 वा वित्त आयोग	01.05.2021 ते 31.05.2021	113	30.06.2021	456144
14	14 वा वित्त आयोग	---	143	30.07.2021	131264
15	14 वा वित्त आयोग	01.06.2021 ते 30.06.2021	154	12.08.2021	441460
16	14 वा वित्त आयोग	01.07.2021 ते 31.07.2021	197	27.10.2021	456152
17	14 वा वित्त आयोग	01.08.2021 ते 31.08.2021	198	27.10.2021	456239
18	14 वा वित्त आयोग	01.12.2021 ते 31.12.2021	355	10.02.2022	456144
19	14 वा वित्त आयोग	01.11.2021 ते 30.11.2021	356	10.02.2022	441193
20	14 वा वित्त आयोग	01.10.2021 ते 31.10.2021	357	10.02.2022	455966

20	14 वा वित्त आयोग	01.09.2021 ते 30.09.2021	358	10.02.2022	441466
21	14 वा वित्त आयोग	01.01.2022 ते 31.01.2022	399	14.03.2022	455902
22	14 वा वित्त आयोग	01.02.2022 ते 28.02.2022	413	28.03.2022	411777
23	14 वा वित्त आयोग	01.03.2022 ते 31.03.2022	12	18.05.2022	451493
	एकूण खर्च				8467014

सदर खर्च प्रक्रियेतील लेखापरीक्षणास आढळलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे :

1) सदर कामाच्या उपरोक्त खर्च प्रमाणक तपशीलात नमूद केलेप्रमाणे देयकांमधून कर्मचारी PF करिता रक्कम अदा करण्यात आली आहे, परंतु सदर PF रक्कम संबंधित कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खाती भरणा केल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

2) नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची शासकीय विमा रक्कम भरलेबाबतची चलनाची प्रत घेऊन त्यानंतरच नगरपरिषदेने मक्तेदारास मासिक देयके अदा करणे आवश्यक होते. तथापि अशी चलने न घेता नगरपरिषदेमार्फत प्रमाणकांद्वारे मक्तेदारास मासिक देयके अदा करण्यात आली आहेत.

3) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता एका सफाई कर्मचा-याची एक दिवसाची सफाई क्षमता 50,000 चौरस फूट रस्ता व 800 रनिंग मीटर गटर्स सफाई करणे अशी असल्याचे नमूद आहे. परंतु हे प्रमाण कोणत्या आधारे घेण्यात आले, याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सदर कामासाठी घेण्यात आलेले 41 कर्मचारी व एक सुपरवायझर असे एकूण 42 कर्मचारी संख्या कोणत्या आधारे निश्चित करण्यात आली हे समजून येत नाही.

4) उपरोक्त नमूद कामाकरिता नगरपरिषदेमार्फत दैनिक पुढारी व दैनिक सकाळ मध्ये दिनांक 07.07.2018 रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत आली आहे. परंतु नस्तीस जोडलेल्या जाहिरातीचे अवलोकन केले असता जाहिरातीत कामाचा तपशील नमूद नाही. तसेच कामाचा कालावधी, अंदाजपत्रकीय रक्कम, निविदा फी इत्यादी तपशील नमूद करणेत आलेला नाही.

5) सदर कामाच्या देयकांमधून एक टक्के आयकर रक्कमा कपात करण्यात आले आहेत. परंतु सदर कपातीच्या रक्कमांची शासन खाती भरणा केलेची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

6) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता सुपरवायझर वेतन (PF सह) करिता रक्कम रुपये 197779/- निश्चित करण्यात आली आहे, परंतु सदर वेतनाचे किमान वेतन नियमानुसार वेतननिश्चिती विवरण नस्तीस उपलब्ध झाले नाही.

7) सदर कामाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता वॉर्ड क्र.10 मधील एकूण रस्ते क्षेत्र हे 1623953 चौरस फूट व एकूण व गटर्स लांबी ही 29265 रनिंग मीटर असल्याचे नमूद आहे. परंतु वॉर्ड क्र.10 मधील सदरचे रस्ते व गटर्सचे प्रमाण हे योग्य असल्याचे नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाने प्रमाणित केलेले नाही.

8) वॉर्डमधील दैनिक कचरा सफाई अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे प्रमाणकाद्वारे अदा रक्कम योग्य असल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

9) प्रमाणकांमधून रक्कम अदा करताना चौरस फूट मध्ये सफाई केलेल्या रस्त्याची मोजमापे दर्शविण्यात आली आहेत. परंतु सफाई केलेले क्षेत्राची लांबी रुंदी न मोजता चौरस फूट मध्ये क्षेत्र कसे काढण्यात आले, याबद्दलचे तपशीलवार मोजमाप अभिलेखे किंवा मोजमाप नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

10) कामाचा करारनामा अट क्र. 9 नुसार कामावर हजर असणा-या कर्मचा-यांची नगरपरिषदेचे स्वच्छता निरीक्षक यांचेकडून दररोज हजेरी घेण्यात येईल, असे नमूद असताना कर्मचा-यांची दैनंदिन हजेरीपत्रके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

DATASKM9501 (Ref No : 25, Hmm No : 135)

130 घनकच-यावरील प्रक्रिया करणेबाबत (प्रलंबित बिल)

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात आरोग्य विभागाकडील घनकच-या वरील प्रक्रिया करणेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	अदा केले
356/488	28/03/2022	628388/-	रमेश मर्दा

1)उपरोक्त नमूद प्रमाणकान्वये रमेश मर्दा यांचे घनकच-यावरील प्रक्रिया करणे याचे प्रलंबित बिल देण्यात आले आहे.परंतु सदर खर्चाबाबतचे मूळ प्रमाणक,आवश्यक नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.त्यामुळे अदा करण्यात आलेल्या बिलात अंतर्भूत खर्चाचा नेमका तपशील जसे घनकच-यावर प्रक्रिया करून तयार करण्यात आलेली खत निर्मिती अथवा तत्सम प्रक्रिया याबबत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

2) घनकच-यावरील प्रक्रिया करणेबाबतची रमेश मर्दा यांची बिले हि आर्थिक वर्ष 2019-20 पासून असल्याची नोंद आहे त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

अ.क्र.	आर्थिक वर्ष	दिनांक	रक्कम
1	2019-20	21/11/2019	628388
2	2019-20	24/01/2020	840400
3	2020-21	नमूद नाही	850000
4	2020-21	नमूद नाही	612000

सदर बिले प्रलंबित असल्याचे नमूद आहे परंतु सदर बिले लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत त्यामुळे सदर

बिलांच्या अदाई बाबत खात्री होत नाही.

DATPDDF9401 (Ref No : 40, Hmm No : 180)

131 वाहन विभागाकडील अभिलेख्यामधील अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात वाहन विभागाकडील वाहनांचे अभिलेखे, इंधन व दुरुस्ती खर्च सदरबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1) वाहन विभागाकडून में. कौ. ठ. नं. 11 दिनांक 30/06/2021 नुसार लिलाव करणेत आलेल्या वाहनांची, लॉगबुक तथा हिस्ट्रीशीट लेखापरीक्षणास उपलब्ध नसलेने सदर वाहने लिलावयोग्य असले बाबतची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

2) ह्युंडाई असेंट MH09 AU28, शववाहिका MH09 A7037, मैला सक्शन MH09 BC1646,

मैला सक्शन MH09 BC1648, फायर फायटर MH09 BC1804 इत्यादी वाहने विभागाकडे बंद स्वरूपात आहेत तथापि सदर वाहनाचा विमा उतरविणेत आलेला आहे. बंद वाहनांचा विमा उतरवण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

3) वाहनाचे लॉगबुक तपासले असता काही ठिकाणी प्रवास दर्शविला आहे पण वाहन निर्गमण व आगमनाची वेळ, प्रवासाचा तपशीलवार उद्देश, प्राधिकृत करणारे अधिकारी यांचे प्रमाणिकरण दिसून येत नाही.

4) वर्षभरात केलेल्या डिझेलच्या पावत्या उपलब्ध झाल्या नसल्याने किती डिझेल पुरवठा केला गेला याचा बोध होत नाही दर महिन्याच्या अखेरीस झालेल्या प्रवास व डिझेलचा गोषवारा काढण्यात आलेला नाही. इंधन खर्चाबाबतचे मासिक वार्षिक गोषवारे काढलेले नाहीत.

5) न.प.इचलकरंजीकडे असणाऱ्या गाड्याचे लॉगबुक अपूर्ण असून त्यामध्ये दुरुस्ती बाबत नोंदी घेणेत आलेल्या नाहीत. गाड्यांचे इतिहासपत्र(History Sheet) विहित नमुन्यात गाडीनिहाय ठेवलेले नाही त्यामुळे संबंधित गाडीवरील दुरुस्ती खर्चाबाबत सत्यता पडताळता येत नाही.

DATGSDM8201 (Ref No : 35, Hmm No : 170)

132 वाहन विभागाकडील कर्मचारी इतर विभागात कार्यरत असलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी सन 2020-21-22 चे लेखापरिक्षणात वाहन विभागाकडील कार्यरत कर्मचा-यांचे हजेरी पत्रक तपासणी केली असता सदरबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

अ.क्र.	कर्मचा-यांचे नाव	पदनाम	इतर विभाग
1	श्री. दिनेश वसंत नगरकर	वाहनचालक	हेड ऑफिस
2	श्री. सचिन कृष्णांत भुत्ते	वाहनचालक	नाटयगृह
3	श्री. नामदेव यल्लाप्पा वडर	फायरमन	नाटयगृह
4	श्री. सचिन महादेव खोंद्रे	फायरमन	हेड ऑफिस
5	श्री. आरिफ हनिफ नदाफ	फायरमन	बांधकाम विभाग
6	श्री. आकाश अशोक माने	फायरमन	नपापु

पुढील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वाहन विभागकडील हजेरीपत्रक तपासले असता वरील प्रमाणे कर्मचारी हे वाहन विभागाकडे कार्यरत नसल्याचे दिसून येते ते कोणत्या विभागात कार्यरत आहेत हे समजून येत नाही.

2) वाहन विभागाकडील माहितीनुसार सदर कर्मचारी हे नप च्या इतर विभागाकडे कार्यरत असल्याचे दिसून येते त्याबाबत मुख्याधिकारी यांचे आदेश लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

3) वाहन विभागाकडे वाहने / वाहनचालक भाडयाने घेणेबाबत सन 2020-21 मध्ये रक्कम रु. 1608213/- आणि सन 2021-22 मध्ये 1100909/- इतका खर्च झालेला आहे. वाहन विभागाकडील 2 वाहनचालक इतर विभागाकडे कार्यरत आहेत. त्यामुळे भाडयाने घेतलेल्या 2 वाहनचालक पदावर झालेला खर्च लेखापरिक्षणास मान्य करता येत नाही.

4) मैला सक्शन वाहन क्र. MH-09-BC-1646 वाहनचालक उपलब्ध नसलेने दि. 26/09/2018 पासून बंद ठेवणेत आलेले आहे. गाडी बंद ठेवून उपरोक्त नमुद वाहनचालक इतर विभागात पाठविणेचे प्रयोजन स्पष्ट करावे.

DATGSDM8201 (Ref No : 36, Hmm No : 171)

133 बंद असलेल्या वाहनामधील इंधनाबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2020-21 चे लेखापरिक्षणामध्ये वाहन विभागाकडील लॉगबगुक हिस्ट्रीशीट तपासणी केली असता खालीलप्रमाणे नमुद वाहने बंद स्थितीत आढळून आली. सदरबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

अ. क्र	वाहन क्रमांक	कधीपासून बंद आहे	शिल्लक इंधन		दर	रक्कम
			पेट्रोल	डिझेल		

1	MH-09-AU-28	13/01/2021	-	5	90	450
2	MH-09-AG-231	10/02/2022	13	-	102	1326
3	MH-09AU-7037	24/06/2021	-	28	90	2520
4	MH-09-BC-1648	23/05/2021	-	79	90	7110
5	MH-09-BC-1646	26/09/2018	-	27	90	2430
6	MH-09-BC-1804	07/01/2020	-	57	90	5130
		एकूण	13	196		18966

वरिल वाहनांचे लॉगबुकची तपासणी केली असता नमुद प्रमाणे वाहन बंद स्थितीत असून त्याबाबत मुख्याधिकारी यांचे आदेश नस्तीसोबत सादर केलेले नाहीत. वाहन मेकॅनिकल यांचे वाहनांच्या बंद स्थितीबाबतचे अहवाल नस्तीसोबत सादर केलेले नाहीत तसेच बंद असलेल्या वाहनांमध्ये वरिल प्रमाणे 13 लिटर पेट्रोल व 196 लिटर डिझेल असे एकूण 206 लिटर इंधन शिल्लक असल्याचे दिसून येते त्याबाबत मेकॅनिकल यांनी काहीच कार्यवाही केलेचे दिसून येत नाही तरी शिल्लक इंधनाचे 18966/- संबंधित मेकॅनिकल यांच्याकडून वसुल करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

DATGSDM8201 (Ref No : 38, Hmm No : 173)

134 बंद स्थितीत असलेल्या वाहनाचा विमा काढलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरिक्षणामध्ये वाहन विभागाकडील बंद स्थितीत असलेल्या वाहनाचा विमा काढलेबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

अ.क्र	वाहन क्रमांक	कधीपासून बंद आहे	विमा काढलेली रक्कम
1	MH 09 AU 28	13/01/2021	8878
2	MH 09 BC1804	07/01/2020	14932
3	MH 09 BC 1646	26/09/2018	15791
			39601

वरिल वाहनांचे लॉगबुकची तपासणी केली असता नमुद प्रमाणे वाहन बंद स्थितीत असून त्याबाबत मुख्याधिकारी यांचे आदेश नस्तीसोबत सादर केलेले नाहीत. वाहन मेकॅनिकल यांचे वाहनांच्या बंद स्थितीबाबतचे अहवाल नस्तीसोबत सादर केलेले नाहीत तसेच बंद असलेल्या वाहनांमध्ये वरिल विमा काढणेत आलेला आहे तरी विम्याची रक्कम रू. 76162/- लेखापरिक्षणास मान्य करता येणार नाही तरी रक्कम रू. 39601/- संबंधिताकडून वसुल

करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

DATGSDM8201 (Ref No : 39, Hmm No : 174)

135 वॉर्ड क्र.22 मधील रस्ते व गटर साफसफाई करणे बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	: 00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	: 9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात आरोग्य विभागाकडील वॉर्ड क्र.22 मधील रस्ते व गटर साफसफाई करून गोळा होणारा कचरा ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. सूचनेप्रमाणे वाहतूक करण्यात आलेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

आर्थिक वर्ष	**एकूण खर्च**	**मक्तेदाराचे नाव**
2020-21	4343966/-	**श्री. राहुल रोहिदास गायकवाड**
2021-22	3995125/-	
एकूण	83,39,091/-	

1)सदर कामाची निविदा प्रक्रिया हि आर्थिक वर्ष 2018-19 मध्ये राबवण्यात आलेली आहे.प्रत्येकवेळी मुदतवाढ देऊन सन 2018-19 मध्ये राबवण्यात आलेली निविदा प्रक्रिया तशीच पुढे चालू ठेवण्यात आली आहे.देण्यात आलेल्या मुदत वाढी बाबतचे ठराव व कार्यादेश पुढीलप्रमाणे -

मूळ ठराव	स्था.स.सभा क्र.06 स्था.स.ठ.क्र.108 दि.18.08.2018
वर्क ऑर्डर	जा.क्र.इनप/329/2018 इ.न.प.इचलकरंजी दि.31.08.2018
मुदतवाढ 01.09.2019 ते 31.08.2020 अखेर	कौ.स.क्र.03 (विशेष सभा) कौ.ठ.क्र.94 दि.02.08.2019
मुदतवाढ ठराव (01.09.2020 ते 31.08.2021 करिता)	कौ.स.क्र.01 सर्वसाधारण सभा कौ.ठ.क्र.74 दि.16.09.2020
वर्क ऑर्डर(01.09.2020 ते 31.08.2021 करिता)	जा.क्र.इनप/व.शि/485/2021 इ.न.प.इचलकरंजी दि.06.01.2021
मुदतवाढ ठराव (01.09.2021 ते 12.06.2022 करिता)	कौ.स.क्र.02(सर्वसाधारण सभा)कौ.स.ठ.क्र.87 दि.06.08.2021

न.प. फंडासाठी 13.06.2022 ते 31.08.2022	
वर्क ऑर्डर(01.09.2021 ते 12.06.2022 करिता) न.प. फंडासाठी 13.06.2022 ते 31.08.2022	जा.क्र.इनप/596/1/2021 इ.न.प.इचलकरंजी दि.22.12.2021

परंतु महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग - III/उद्योग-4 दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील प्रकरण क्र. 3.3.2 (अ) अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश फक्त एकदाच देता येईल आणि त्याचे मूल्य आणि संख्या सुरवातीच्या आदेशाच्या 50 टक्के किंवा रुपये दहा कोटी यापैकी जे कमी असेल त्यापर्यंतची खरेदी करता येईल. त्या प्रमाणे खर्च करण्यात आलेला नाही.

2)आर्थिक वर्ष 2020-21 मध्ये करण्यात आलेल्या खर्चापैकी पुढे नमूद केलेले खर्चाचे मूळ प्रमाणक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

प्रमाणाक व दिनांक	देयक कालावधी	रक्कम	तपशील
185/11.02.2021	1.12.2020-30.12.2020	370534	राहुल रोहिदास गायकवाड
186/11.02.2021	1.11.2020-30.11.2020	358572	
187/11.02.2021	1.10.2020-31.10.2020	370692	
188/11.02.2021	1.09.2020-30.09.2020	358439	
235/31.03.2021	1.03.2021-31.03.2021	370816	
238/31.03.2021	1.01.2021-31.03.2021	370567	
239/31.03.2021	1.02.2021-28.02.2021	334870	
	एकूण	2534490	

3) कामाच्या करार पत्रातील अटी व शर्ती नुसार कामावर हजार असणाऱ्या कर्मचाऱ्यांची दररोज हजेरी घेण्यात येईल परंतु अशा प्रकारचे कर्मचा-यांचे हजेरीपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

4)इकडील अटी मध्ये नमूद केल्याप्रमाणे अट क्र.-3 नुसार नेमून दिलेल्या वॉर्डमधील रस्ते व गटारी सफाई केलेबाबत वॉर्डनिहाय प्रत्येक महिन्याचे रजिस्टर ठेवणेचे आहे सदर रजिस्टरमध्ये वॉर्डमधील 30 कुटुंबातील प्रमुख व्यक्तीची आठवड्यातून एकदा सही ग्राहक समाधान अहवालावर घेवून सदरचे रजिस्टर स्वच्छता निरीक्षक यांचे मार्फत कार्यालयाकडे जमा करणेचे आहे व सदर रजिस्टर जमा केले नंतर कामाचे बिल अदा करणेचे आहे.परंतु लेखापरीक्षणास असे रजिस्टर उपलब्ध झाले नाही. तसेच आर्थिक वर्ष 2020-21 मध्ये देयक कालावधी 01/06/2020-30/06/2020 व्यतिरिक्त संपूर्ण वर्षाचे ग्राहक समाधान अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

5)उपलब्ध नस्तीवरून प्रत्येक महिनाच्या दैनंदिन स्वच्छता अहवालाचे लेखापरीक्षण केले असता रस्त्याचे एकूण क्षेत्र व गटारींची एकूण लांबी पैकी दरदिवशी काहीभाग सफाई न करता राखण्यात आल्याचे दिसून आले. कामासाठी आवश्यक कर्मचारी पुरवठा करून ही पूर्ण क्षमतेने दरदिवशी 100 टक्के पूर्ण काम न केल्याचे दिसून येते याबाबत खुलासा करावा.

6) सदर रस्ता व गटर सफाई करिता नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची मक्तेदाराने शासकीय विमा रक्कम भरलेबाबत चलनाची प्रत घेवून त्यांचे मासिक देयके अदा करणे आवश्यक असता अशी चलने न घेता देयके अदा करण्यात आली आहेत.

7) सदर वार्ड मधील एकूण रस्ते न गटर यांची मापे अनुक्रमे 823857 चौ.फुट व 26090 रनिंग मीटर असल्याचे नमूद केले आहे.परंतु सदर वार्ड मधील हे रस्त्याचे व गटरचे प्रमाण योग्य असलेबाबत खात्री होत नाही तसेच न.प.च्या बांधकाम विभागाकडील सदर घेतलेल्या प्रमाणाबद्दल प्रमाणित केलेचे लेखेही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

8) सदर कामांसाठी एक सफाई कर्मचारी एका दिवसात 50000 चौ.फुट रस्ता व 800 रनिंग मीटर गटर सफाई करेल असे प्रमाण घेवून एकूण 29 कर्मचारी घेण्यात आले आहेत परंतु हे घेतलेले प्रमाण काय आधारे घेण्यात आले याबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.त्यामुळे सदर कामासाठी घेण्यात आलेल्या कर्मचारी संख्याही योग्य आहे किंवा कसे याबाबत खात्री होत नाही.

9) सदर कामाच्या देयकांमधून 2 टक्के आयकर रक्कमा कपात करण्यात आले आहेत. परंतु सदर कपातीच्या रक्कमांची शासन खाती भरणा के लेची **चलने** लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

10) सदरकामाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता सुपरवायझर वेतन 197779/-(PF सहित) निश्चित करण्यात आलेली आहे परंतु सदरची रक्कम काय आधारे ठरवण्यात आली किंवा किमान वेतन नियमानुसार आहे किंवा याबाबत अभिलेखे जोडण्यात आलेले नाहीत.

DATPDDF9401 (Ref No : 41, Hmm No : 181)

136 आरोग्य विभागाकडील कोरोना भत्ता अदाईबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात आरोग्य विभागाकडील कोरोना भत्ता अदाईबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

नोव्हेंबर 2020 पासून कोविड-19 काळात केलेल्या कामापोटी कोरोना भत्ता अदा करण्यात आलेला आहे. त्यामध्ये नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र,इतर ऑफिस कर्मचारी,अंगणवाडी सेविका यांचा समावेश आहे.सदर खर्चाचे उदाहरणादाखल प्रमाणके पुढीलप्रमाणे :-

क्र.	प्रमाणक क्र. व दिनांक	रक्कम	तपशील
1	149/17.12.2020	4419000	कोरोना भत्ता (आरोग्य)
2	150/17.12.2020	120700	KEM,IGM
3	151/17.12.2020	1125000	इतर ऑफिस

4	152/17.12.2020	21000	कोरोना भत्ता
5	224/26.03.2021	890000	कोरोना भत्ता
6	225/26.03.2021	483000	कोरोना भत्ता
7	99/1/02.06.2021	537000	अंगणवाडी सेविका मानधन
एकूण		7595700	--

1)उपरोक्त नमूद प्रमाणकांपैकी अनु.क्र.5 ,6 व 7 क्रमांकाचे मुळ प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2) सदर खर्चाबाबतचे फेब्रुवारी 21 ते ऑक्टोबर 21 अखेरचे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे मानधन भत्ता देयकाची नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली आहे. इतर ऑफिस कर्मचारी, अंगणवाडी सेविका मानधन अदा केल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.तसेच त्यांची प्रत्यक्षात संख्या, भत्ता अदा केल्यानंतरची पोहोच घेतलेबाबत लेखे उपलब्ध झाले नाहीत.

3)महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र-टीएफसी-8015/प्र.क्र.-106/न.वि-04 दिनांक 14/09/2020 मधील क्र. 07 अन्वये कोविड-19 च्या अनुषंगाने नागरी भागात काम करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावरील संबंधित कर्मचारी, न.प.सफाई कर्मचारी, कोविड-19 च्या अनुषंगाने सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका,मदतनीस, आशा कार्यकर्त्या असे काम करत असल्यास त्यांना नियमित वेतन मानधनाव्यतिरिक्त रक्कम रुपये **1000** /- प्रोत्साहनपर रक्कम देण्यात यावी असे निर्देश आहेत. परंतु फेब्रुवारी 21 ते ऑक्टोबर 21 अखेरचे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे मानधन भत्ता देयकाची नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामापोटी दरमहा कोरोना भत्ता 3000/- प्रमाणे अदा करण्यात आलेला आहे.

DATPDDF9401 (Ref No : 43, Hmm No : 183)

137 न.प.स्थापन केलेल्या कोव्हिड केअर सेंटर व संस्थात्मक अलगीकरण केंद्र येथे नाष्टा व आहार पुरवणे बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात इचलकरंजी नगरपरिषदेने स्थापन केलेल्या संस्थात्मक अलगीकरण कक्ष व कोव्हिड केअर सेंटर मध्ये ठेवण्यात आलेल्या नागरिकांना भोजन,नाष्टा, चहा व सकस आहार पुरवणेत आलेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

बाब	तपशील
फंड	14 वा वित्त आयोग
अंदाजपत्रकीय रक्कम	4800000/- + 1200000/-

ठराव	कौ.स.क्र.1 सर्वसाधारण सभा, कौ.ठ.क्र.09 दि.16/09/2020 अ.क्र.09 (4800000/-) व अ.क्र.11(1200000/-) अन्वये. कौ.स.क्र.1 सर्वसाधारण सभा, कौ.ठ.क्र.48 दि.30/06/2021 (इस्टीमेटपेक्षा 10 टक्के जास्त)अ.क्र.01 अन्वये
जाहीर निविदा व आदेश	जाहीर ई निविदा सूचना क्र.07 सन-2020-21 दि 01.07.2020
जाहिरात	दै.महासत्ता,राष्ट्रगीत
निविदाधारक	आशीर्वाद केटरर्स
वर्क ऑर्डर	जा.क्र/आरोग्य /765/2020 इ.न.प.इचलकरंजी दि.22/07/2020
करण्यात आलेला खर्च	1965184/-

2) 1)

क्र.	प्रमाणक क्र. व दिनांक	रक्कम	तपशील
1	165/29.01.2021	282225	आशीर्वाद केटरर्स

वर नमूद खर्चाचे मूळ प्रमाणक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

2)सदर कामासाठी आशीर्वाद केटरर्स यांना चहा,नाष्टा, सकस आहार व जेवण पुरवणे कामी मक्ता देण्यात आलेला आहे. उपलब्ध नस्ती वरून सदरचे काम दिनांक 11/07/2020 ते 20/08/2021 अखेर करण्यात आल्याचे दिसून येते. दि.24/10/2020 पासून अलगीकरण कक्ष व कोव्हिड सेंटर मध्ये ठेवणेत येणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी झालेने व कोरोनाची थोडीफार व्याप्ती कमी झालेने काम थांबवणेत आले होते.परंतु त्यानंतर परत नेमक्या कोणत्या तारखेपासून सदरचे जेवण, नाष्टा पुरवठ्याचे काम सुरु करण्यात आले याबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

3) उपलब्ध नस्ती वरून अलगीकरण कक्ष व कोव्हिड केअर सेंटर यांची एकूण संख्या ही 09 होती.पैकी अग्रसेन भवन कडील कोरोना रुग्णांबाबत यादी तसेच इतर अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. तसेच इतर अलगीकरण कक्ष व कोव्हिड केअर सेंटर कडील रुग्णांची दाखल केलेली तारीख, त्यांना सोडण्यात आलेली तारीख ,रुग्ण संख्या याबाबत परिपूर्ण लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.त्यामुळे सदर खर्चाच्या देयकात अदा करण्यात आलेल्या रुग्ण व कर्मचारी यांच्या संख्येबाबत सांशकता निर्माण होते.

4)सदर कामातील देयक कालावधी व उणीवा याबाबत उदाहरणादाखल नोंदी पुढीलप्रमाणे-

क्र.	देयक कालावधी	आढळून आलेल्या उणीवा
1	23/07/2020-12/08/2020	तारखांच्या नोंदी व्यवस्थित घेण्यात आलेल्या आहेत.
2	13/08/2020-12/09/2020	अग्रसेन भवन कडील नियुक्त अधिकारी अथवा कर्मचारी बद्दल माहिती उपलब्ध झाली नाही.

3	13/09/2020-24/10/2020	सेंटर कडे दाखल झालेल्यांची नेमकी माहिती उपलब्ध झाली नाही.
4	17/04/2021-30/04/2021	परिपूर्ण लेखे उपलब्ध नाहीत तसेच जोडण्यात आलेली यादी प्रमाणित केलेली नाही.
5	01/05/2021-15/05/2021	परिपूर्ण लेखे उपलब्ध नाहीत तसेच जोडण्यात आलेली यादी प्रमाणित केलेली नाही.
6	01/08/2021-20/08/2021	गणेश विसर्जन व अनंत चतुर्दशी पुरवठा करण्यात आलेल्या जेवण नाष्टा व जेवण बाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

वर नमूद केलेल्या नोंदी या उदाहरणादाखल असून संपूर्ण आर्थिक वर्ष 2020-21-22 चा आढावा घेवून त्याबाबत अनुपालन सादर करावे.

DATPDDF9401 (Ref No : 44, Hmm No : 184)

138 वॉर्ड क्र. 18 मधील रस्ते व गटर साफसफाई करणे बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात आरोग्य विभागाकडील वॉर्ड क्र.18 मधील रस्ते व गटर साफसफाई करून गोळा होणारा कचरा ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. सूचनेप्रमाणे वाहतूक करण्यात आलेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

आर्थिक वर्ष	**एकूण खर्च**	**मक्तेदाराचे नाव**
2020-21	2633844/-	**श्री. राहुल रोहिदास गायकवाड**
2021-22	1771470/-	
एकूण	4405314/-	

1) सदर कामाची निविदा प्रक्रिया हि आर्थिक वर्ष 2018-19 मध्ये राबवण्यात आलेली आहे.प्रत्येकवेळी मुदतवाढ देऊन सन 2018-19 मध्ये राबवण्यात आलेली निविदा प्रक्रिया तशीच पुढे चालू ठेवण्यात आली आहे. परंतु महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग -III/उद्योग-4 दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील प्रकरण क्र. 3.3.2 (अ) अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश फक्त एकदाच देता येईल आणि त्याचे मूल्य आणि संख्या सुरवातीच्या आदेशाच्या 50 टक्के किंवा रुपये दहा कोटी यापैकी जे कमी असेल त्यापर्यंतची खरेदी करता येईल. त्या प्रमाणे खर्च करण्यात आलेला नाही.

2) आर्थिक वर्ष 2020-21 मध्ये करण्यात आलेल्या खर्चापैकी पुढे नमूद केलेले खर्चाचे मूळ प्रमाणक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

प्रमाणाक व दिनांक	देयक कालावधी	रक्कम	तपशील
183/11.02.2021	1.12.2020-30.12.2020	225066	राहुल रोहिदास गायकवाड
184/11.02.2021	1.11.2020-30.11.2020	217719	
236/31.03.2021	1.03.2021-31.03.2021	225075	
293/31.03.2021	1.01.2021-31.03.2021	224966	
240/31.03.2021	1.02.2021-28.02.2021	203222	
	एकूण	1096048	

3) कामाच्या करार पत्रातील अटी व शर्ती नुसार कामावर हजार असणाऱ्या कर्मचाऱ्यांची दररोज हजेरी घेण्यात येईल परंतु अशा प्रकारचे कर्मचा-यांचे हजेरीपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

4) इकडील अटी मध्ये नमूद केल्याप्रमाणे अट क्र.-3 नुसार नेमून दिलेल्या वॉर्डमधील रस्ते व गटारी सफाई केलेबाबत वॉर्डनिहाय प्रत्येक महिन्याचे रजिस्टर ठेवणेचे आहे सदर रजिस्टरमध्ये वॉर्डमधील 30 कुटुंबातील प्रमुख व्यक्तीची आठवड्यातून एकदा सही ग्राहक समाधान अहवालावर घेवून सदरचे रजिस्टर स्वच्छता निरीक्षक यांचे मार्फत कार्यालयाकडे जमा करणेचे आहे व सदर रजिस्टर जमा केले नंतर कामाचे बिल अदा करणेचे आहे.परंतु लेखापरीक्षणास असे रजिस्टर उपलब्ध झाले नाही. तसेच आर्थिक वर्ष 2020-21 मध्ये देयक कालावधी 01/10/2020-31/03/2021अखेर चे ग्राहक समाधान अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

5) उपलब्ध नस्तीवरून प्रत्येक महिनाच्या दैनंदिन स्वच्छता अहवालाचे लेखापरीक्षण केले असता रस्त्याचे एकूण क्षेत्र व गटारींची एकूण लांबी पैकी दरदिवशी काहीभाग सफाई न करता राखण्यात आल्याचे दिसून आले. कामासाठी आवश्यक कर्मचारी पुरवठा करून ही पूर्ण क्षमतेने दरदिवशी 100 टक्के पूर्ण काम न केल्याचे दिसून येते याबाबत खुलासा करावा.उदाहरणादाखल नोंदी पुढीलप्रमाणे-

प्रमाणक क्र.व दिनांक	रक्कम	तपशील
117/30.06.2021	217779	राहुल रोहिदास गायकवाड
118/30.06.2021	225104	
153/12.08.2021	217826	
203/27.10.2021	225111	
204/27.10.2021	225042	
364/10.02.2022	217884	
365/10.02.2022	224976	
366/10.02.2022	217748	

एकूण	1771470	

आर्थिक वर्ष 2021-22 मधील वर नमूद प्रमाणकांपैकी प्रमाणक क्र.117,118,153,203 व 204 मध्ये दैनंदिन स्वच्छता अहवालांची तपासणी केली असता रस्त्याच्या एकूण क्षेत्र सफाई मधील 4117 चौ.फूट,2375 चौ.फूट,2988 चौ.फूट अशी वारंवार ठराविक क्षेत्राची सफाई करण्यात आली नाही.तरी सदर क्षेत्र सातत्याने का सफाई करणेचे राहिले आहे याबाबत करण्यात यावा.

6)वर नमूद प्रमाणक क्र.364,365 व 366 सोबत दैनंदिन स्वच्छता अहवाल जोडण्यात आलेले नाहीत.त्यामुळे रस्त्यांचे एकूण क्षेत्र व गटारींची एकूण लांबीपैकी करण्यात आलेली सफाई ही नेमक्या किती क्षेत्राची केली याबाबत खात्री होत नाही. त्यामुळे अदा करण्यात आलेले सदरचा खर्च योग्य आहे किंवा कसे याबाबत खुलासा करण्यात यावा.

7) सदर रस्ता व गटर सफाई करिता नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची मक्तेदाराने शासकीय विमा रक्कम भरलेबाबत चलनाची प्रत घेवून त्यांचे मासिक देयके अदा करणे आवश्यक असता अशी चलने न घेता देयके अदा करण्यात आली आहेत.

8) सदर वार्ड मधील एकूण रस्ते न गटर यांची मापे अनुक्रमे 1218660चौ.फुट व 12530 रनिंग मीटर असल्याचे नमूद केले आहे.परंतु सदर वार्ड मधील हे रस्त्याचे व गटरचे प्रमाण योग्य असलेबाबत खात्री होत नाही तसेच न.प.च्या बांधकाम विभागाकडील सदर घेतलेल्या प्रमाणाबद्दल प्रमाणित केलेचे लेखेही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

9) सदर कामांसाठी एक सफाई कर्मचारी एका दिवसात 50000 चौ.फुट रस्ता व 800 रनिंग मीटर गटर सफाई करेल असे प्रमाण घेवून एकूण 29 कर्मचारी घेण्यात आले आहेत परंतु हे घेतलेले प्रमाण काय आधारे घेण्यात आले याबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.त्यामुळे सदर कामासाठी घेण्यात आलेल्या कर्मचारी संख्याही योग्य आहे किंवा कसे याबाबत खात्री होत नाही.

10) सदर कामाच्या देयकांमधून 2 टक्के आयकर रक्कमा कपात करण्यात आले आहेत. परंतु सदर कपातीच्या रक्कमांची शासन खाती भरणा के लेची **चलने** लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

11)सदरकामाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता सुपरवायझर वेतन 197779/-(PF सहित) निश्चित करण्यात आलेली आहे परंतु सदरची रक्कम काय आधारे ठरवण्यात आली किंवा किमान वेतन नियमानुसार आहे किंवा याबाबत अभिलेखे जोडण्यात आलेले नाहीत.

DATPDDF9401 (Ref No : 45, Hmm No : 185)

139 आरोग्य विभागाकडील कचरा संकलन करणे व कंटेनर पर्यंत वाहतूक करणेसाठीच्य60 ढकलगाड्या दुरुस्ती करून देणेबाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात आरोग्य विभागाकडील कचरा संकलन करणे व कंटेनर पर्यंत वाहतूक कारानेसाठीच्या 60 ढकलगाड्या दुरुस्ती करून देणेबाबत

लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

प्रमाणक व दिनांक	रक्कम	तपशील
159/308/20.01.2022	346920	श्री.बाळाप्पा तेजी

उपरोक्त प्रमाणकान्वये न.प.निधीतून कचरा संकलन व वाहतूक करणे साठीच्या ढकलगाड्या दुरुस्ती करण्यात आलेल्या आहेत.

क्र	बाब	तपशील
	निधीचे नाव	न.प.निधी
1	अंदाजपत्रकीय रक्कम	294000/-
2	ठराव	कौ.स.क्र.-04 सर्वसाधारण सभा कौ.ठ.क्र.-215 दि.26.02.2021
3	जाहीर निविदा व आदेश	क्र.04/20-21 जा.क्र/आरोग्य/847/20-21 न.प.इचलकरंजी दि.19.03.2021
4	जाहिरात	दै.महासत्ता /राष्ट्रगीत
5	निविदाधारक	श्री.बाळाप्पा तेजी
6	वर्क ऑर्डर	जा.क्र.इ.न.प/863/2021 न.प.इचलकरंजी दि.31.03.2021

1)सदर कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षणात वरील नमूद मूळ प्रमाणक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. तसेच अंदाजपत्रकीय रक्कम हि जीएसटी वगळून आहे किंवा कसे याबाबत कोणतीही नोंद नमूद नाही. त्यामुळे प्रत्यक्षात करण्यात आलेला खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा अधिक आहे.

2)सदर कामाचे मक्तेदार श्री. बाळाप्पा तेजी यांच्या मक्तेदार रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटची तपासणी केली असता त्या रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटची मुदत ही दि.31/03/2020 अखेर नमूद आहे. सदरचे सर्टिफिकेट अद्ययावत करण्यात आलेबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

3) वॉर्डनुसार नादुरुस्त असणाऱ्या गाड्यांची माहिती व यादी पुढीलप्रमाणे-

क्र.	वॉर्ड क्र.	गाडा संख्या
1	1	04

2	2	06 (गाडा क्र.3,4,5,6 स्क्रॅप झाल्याची नोंद आहे.)
3	5	5
4	7	3
5	8	7 (1 ते 2) व (1 ते 5) अशी नोंद आहे पैकी (1 ते 5) मधील गाडा क्र. 2,3,4,5 स्क्रॅप झाल्याची नोंद आहे
6	11	13
7	15	16
8	18	6
9	19	9
एकूण		69

वर नमूद केलेप्रमाणे एकूण 69 गाड्या नादुरुस्त असल्याची नोंद आहे त्यापैकी 60 ढकलगाड्या दुरुस्त केलेल्या आहेत. वॉर्डनुसार नेमक्या कोणत्या व किती गाड्या दुरुस्त केल्या याबाबत तपशीलवार अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तसेच स्क्रॅप झाल्याची नोंद केलेल्या गाड्यांची दुरुस्ती केली किंवा त्यांचे निर्लेखन केले याबाबत लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. वॉर्ड क्र.8 मध्ये नोंदवण्यात आलेल्या गाडा क्र.मध्ये गाडा क्र.1 व 2 दुबार नोंदवण्यात आले आहे त्याबाबत स्पष्टता होत नाही.

4)सदर गाड्या दुरुस्ती करून घेतलेनंतर ताब्यात घेतलेबाबत सदर विभागप्रमुख यांची पोहोच अथवा गाड्या दुरुस्त करून मिळालेबाबत नोंद उपलब्ध झाली नाही.

5)मक्तेदार सोबत करण्यात आलेल्या करारपत्र मधील नियम व अटी मधील अट क्र. 5 अन्वये काम मुदतीत पूर्ण करणेबाबत असून सदर कामाची मुदत हि 90 दिवस होती. विलंब दिवस दंड रक्कम रुपये 100/- प्रति दिवस असा आहे. सदर कामाची वर्क ऑर्डर हि 31.03.2021 असून काम पूर्ण हे दि.22.11.2021 (बिल.क्र.84 दि. 22.11.2021)रोजी झाले आहे.तरी विलंब दिवस 145 चा दंड रक्कम रुपये 14500/- वसूलपात्र करून घ्यावे.

6)सदर नस्तीसोबत जोडण्यात आलेले छायाचित्रे हि कृष्णधवल असून प्रिंट काढणेत आलेली आहेत.सदरच्या छायाचित्रांवरून वॉर्डनुसार त्याच वॉर्डमधील ढकलगाड्या असल्याची खात्री होत नाही.

DATPDDF9401 (Ref No : 48, Hmm No : 108)

140 आरोग्य विभागाने वाहने भाडेतत्वावर घेतलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरिक्षणामध्ये आरोग्य विभागाने 9 वाहने घरफाळा पाणीपट्टी वसुली कामी तद्नंतर कोरोना उपाययोजना, कोवीड सेंटर, स्थापित केलेले कोवीड

केअर सेंटरसाठी वाहने भाडेतत्वावर घेतली असून त्यावर खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

सन	रक्कम	तपशील
2020-21	1608213	राहुल ज्ञा. रसाळ यांना अदा
2021-22	1100909	राहुल ज्ञा. रसाळ यांना अदा
एकूण	2709122	

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) मा. आयुक्त तथा नगरपरिषद संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्रं. 36 दिनांक 29/12/2005 मधील बाब क्रं. 09 नगरपरिषदेने निविदा मागविण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेवून तांत्रीक मंजूरी घेतल्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे मलम 72 अन्वये प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.परंतु तांत्रिक प्रशासकीय मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्रं. 466 परिशिष्ठ 3 मधील खंड 19 मधील तरतूदीनुसार रुपये 5.00 लाख ते 50 लाख पर्यंत अंदाजपत्रकीय खर्चाकरिता कोणतेही राज्यस्तरीय दैनिक प्रकाशन मध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना वरील कामामध्ये 10.00 लाखापेक्षा जादा असून शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

3) अट क्रं.1 नुसार करारपत्रामध्ये नमूद केलेले लेखे, लॉगबुक, कपातीची चलने नस्तीसोबत सादर केलेले नाहीत.GST प्रमाणपत्र नस्तीसोबत नाहीत. कर वसुलीचे काम ऑटो रिक्षाद्वारे सुद्धा करता आले असते. यावरून नगरपरिषदेने वाहने भाड्याने घेताना वित्तीय औचत्याचा सुत्रांचा वापर केलेचे दिसून येत नाही.

4) नगरपरिषदेने वाहने भाडयाने घेतली आहेत त्या गाडयांचे शासकीय टॅक्स व आरटीओकडील सर्व कागदपत्रे नस्तीसोबत जोडण्यात आलेली नाहीत.

5) नगरपरिषदेने स्थापन केलेल्या कोवीड केअर सेंटर व अलगीकरण कक्षासाठी गाडयांची नोंद करुन दिल्या जातील त्या गाडयांना इकडुन लॉगबुक दिले जातील त्यामध्ये संबंधित वाहन चालकाने लॉगबुक भरुन त्यावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे तशी कार्यवाही केलेली नाही.

6) वाहनचालकाचे ड्रायव्हिंग लायसेन्स लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) वाहन चालकाने आपले वाहन नगरपरिषदेकडील कोणत्या प्रभागात काम केले याची लॉगबुकात नोंद करणेची आहे. तद्रंतर दैनंदिनीत वाहन अधिक्षक व संबंधित अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. देयकासोबत कोणतीही कागदपत्रे जोडली नसल्याने देयक अदा केले आहे.

8) संबंधित ठेकेदाराने जीएसटी नंबर सादर केल्याखेरीज तसेच इतर शासकीय कर कपाती व ईपीएफ भरावयाचे चलने लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

उपरोक्त अनियमिततेमुळे दोन्ही वर्षाची खर्च रक्कम रु. 2709122/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

DATGSDM8201 (Ref No : 51, Hmm No : 211)

141 डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पीटलमध्ये मक्ता पध्दतीने वैदयकिय अधिकारी सेवा पुरविणे

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

कामाचे नाव	डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पीटलमध्ये मक्ता पध्दतीने zwj; वैदयकिय अधिकारी सेवा पुरविणे
लेखा शि र्षक	न.पा. फंड
अंदाजपत्रकीय रक्कम	353680/- कौ.ठ.क्र.10, 16/09/2020
प्रशासकिय मान्यता	तपासणीस उपलब्ध झाली नाही.
तांत्रिक मान्यता	तपासणीस उपलब्ध झाली नाही.
ठराव	स्थायी समिती ठराव क्र. 180,दि.24/03/2020
निविदा मंजुर दर	ई-निविदा अंदाजपत्रकीय दराच्या 2.10 टक्केने कमी ठराव क्र.74, दि.09/02/2021 (फेब्रुवारी-21 ते ऑक्टोंबर-21) मुदतवाढ- 73,दि.03/11/2021 (नोव्हेंबर-21 ते मार्च-22)
मक्तेदाराचे नाव	शंभुराजे कन्स्ट्रक्शन्स
कामाचा आदेश	मुख्याधिकारी, इचलकरंजी यांचे आदेश क्र. जा.क्र.मागासवर्गीयवाग/18/2021,दि.16/02/2021
काम सुरू दिनांक	16/02/2021
काम पुर्ण दिनांक	31/03/2022

1) एप्रिल-20 ते जानेवारी-21 या कालावधीतील निविदेची कागदपत्रे लेखापरिक्षणास प्राप्त झाली नाहीत.

2) स्थायी निर्देश क्र. 36 मधील नियम 33 नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. 1 लाख ते 1 कोटी या दरम्याने असेल तर निविदा सुचनांना जास्तीत जास्त प्रसिध्दी देणेसाठी अ प्रमाणे राज्य स्तरीय दैनिक व ब प्रमाणे 20000 प्रती खप असलेले जिल्हास्तरीय दैनिक मध्ये जाहीरात देणे आवश्यक असताना तशी जाहीरात नगरपरिषदेने दिलेली नाही. त्यामुळे व्यापक प्रसिध्दी मिळाली नसल्यामुळे निविदाधारकांनी कमी निविदा भरल्याचे दिसून येते.
दि.24/10/2020 तेदि. 09/11/2020 या कालावधीत पहिली zwj; निविदा मागविली असता 1 निविदा प्राप्त झाल्यामुळे ती फेटाळली. 1 ली मुदतवाढ दि.10/11/2020 ते 20/11/2020 या कालवधीत सुध्दा 2 निविदा प्राप्त झाल्या त्यामुळे ती फेटाळली. 2 री मुदतवाढ दि.20/11/2020 ते 01/12/2020 या कालवधीत सुध्दा 2 निविदा प्राप्त झाल्या त्यातील एका zwj; निविदाधाकाची कागदपत्रे कमी असल्यामुळे ती नामंजुर करून शंभुराजे कन्स्ट्रक्शन्स

ची निविदा मंजुर केली आहे.

3) मंजूर केलेल्या कामाचे मक्तेदाराकडुन करारनामा करुन घेताना मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 34 व शासन परिपत्रक क्रं. ZPA/2009/वित्त 9/दिनांक 20/11/2009 च्या तरतूदीनुसार रुपये 10 लाखापर्यंत रुपये 500/- चा मुद्रांक घेणे व पुढील 1 लाखास रुपये 100/- चा मुद्रांक घेणे आवश्यक आहे.

4) वैदयकिय अधिकारी यांचे हजेरीपत्रक तपासणीस उपलब्ध झाले नाही.

DATABPM8101 (Ref No : 101, Hmm No : 209)

142 नगरपालिका हददीतील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे याबाबीवरील खर्चातील अनियमितता.

योजना	:	Nagar Parishad nidhi	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी सन 2020-21 व 2021-22 चे लेखापरीक्षणात नगरपालिका हददीतील कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे या बाबीवरील खर्चाची तपासणी केली असता अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

प्रशासकीय मान्यता	10 दिनांक 15/06/2019
तांत्रिक मान्यता	घेतलेली नाही
अंदाजपत्रकीय रक्कम	4000000/-रुपये (2285 कुत्रे x 1750/- रुपये)
निविदा प्रसिध्दी	ई-निविदा
जाहिरात	दै.महाराष्ट्र दि.19-07-2019
निविदा शुल्क	1180/- रुपये
बयाना शुल्क	40000/- रुपये
निविदाधारक	1.वेटस फॉर ॲनिमल्स दर रुपये 1950/-
	2.सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन दर रुपये 1700/-
	3.हेल्पिंग ऑर्गनायझेशन फॉर पिपल एनव्हायर्नमेंट अँड ट्रस्ट दर रुपये 2030/-
मक्तेदार	सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन दर रुपये 1700/-
करारनामा मुद्रांक	3500/- रुपये
कार्यारंभ आदेश	598/1 दिनांक 16/09/2019

खर्च रक्कम रुपये	631/715 दिनांक 31/03/2022 र.रु.1057400/-

1.सदर कामासाठी तांत्रिक मान्यता घेतल्याबाबत तांत्रिक मान्यतेचे आदेश नस्तीसोबत आढळून आले नाहीत. तांत्रिक मान्यता आदेश उपलब्ध करावेत.

2.सदर कामासाठी उपरोक्त नमूद तपशिलाप्रमाणे 3 निविदाधारकांनी निविदा भरल्या असुन निविदा अटी तील अ 4 ड नुसार निविदा धारकांची जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नस्तीसोबत तीनही निविदाधारकांचे जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र आढळून आले नाहीत.

3.निविदाधारकाकडे सदर कामासाठी आवश्यक साधनसामुग्री व उपलब्ध मनुष्यबळ इत्यादि तपशिल दर्शविणारी माहिती आढळुन आली नाही.

4.सदर कामासाठी प्रती कुत्र्याचे निर्बिजीकरण करणे कामी रुपये 1700/- दर निश्चित करुन कामाचा आदेश देण्यापुर्वी दरपृथ्थकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे देण्यात आलेला दर योग्य असल्याची खात्री होत नाही. सदर बाबत निर्बिजीकरणासाठी इंडियन व्हेटरनरी कौन्सिल/महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभागामार्फत निर्धारीत केलेले दर विचारात घेवुन त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

5.करारनामा अट क्रमांक 9 नुसार मक्तेदार संस्थेने कामाचा दैनंदिन अहवाल, सदर कामासाठी नेमलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत आरोग्य विभागाकडे देणे बंधनकारक होते तथापि तसे दैनंदिन अहवाल संबंधित मक्तेदार संस्थेने दिलेबाबतचे अहवाल नस्तीसोबत तपासणी कामी आढळून आलेले नाहीत.

6.करारनामा अट क्रमांक 12 नुसार नसबंदी शस्त्रक्रिया करतेवेळी काढलेल्या अवयवांचे फॉरमॅलिन या द्रावकामध्ये जतन करणे बंधनकारक असुन तसे जतन केल्याबाबत नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक यांनी शहानिशा करणे आवश्यक असता तसे स्वच्छता निरीक्षकांचे अहवाल नस्तीसोबत तपासणीकामी उपलब्ध झालेले नाहीत.

7.करारनामा अट क्रमांक 13 नुसार मक्तेदार संस्थेने प्रती महिना अखेरीस 500 ते 1000 कुत्र्यांचे नसबंदी व लसीकरण करण्याचे उददीष्ट दिले असुन प्रतीमहिना किती कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण झाले याबाबतची मोजमाप नोंदवही नस्तीसोबत उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे मक्तेदार संस्थेस दिलेले उददीष्ट साध्य झाले किंवा कसे हे समजून येत नाही.

8) करारनामा अट क्रमांक 17 नुसार नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी ताब्यात घेतलेली कुत्री ही शस्त्रक्रिया व लसीकरण केलेनंतर ज्या भागातून ताब्यात घेतली आहेत त्याच भागात परत सोडणे मक्तेदार संस्थेवर बंधनकारक असुन मक्तेदार संस्थेने शस्त्रक्रियेसाठी ताब्यात घेतलेली कुत्री त्या त्या भागात सोडलेबबाबतचा अहवाल नस्तीसोबत आढळून आला नाही.

9.सदर देयकानुसार एकुण 622 कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यात आलेल्या कुत्र्यांचे नसबंदी व लसीकरण झाल्याचे देयकावरुन दिसून येते परंतू संबंधित नसबंदी करण्यात आलेल्या कुत्र्यांचे पुढील प्रजनन थांबले किंवा नाही याचा पाठपुरावा करुन सदर योजनेचे उपयोगिता कितपत सिध्द झाले याबाबत स्पष्टता दिसून येत नाही.

10.नसबंदी करण्यात आलेल्या कुत्र्यांची शस्त्रक्रिया ही रुल्स ऑफ ॲनिमल वेलफेअर बोर्ड व ॲनिमल बर्थ कंट्रोल ॲक्ट 2001 व प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदयानुसार झालेचे प्राधिकृत सक्षम अधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

143 शौचालय व मुतारी साफसफाई करणेकामी पाण्याचे टँकर पुरविणे

योजना	:	Nagar Parishad nidhi	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 2800.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद हददीतील शौचालय व मुतारी साफसफाई करणेकामी पाण्याचे टँकर पुरविणे या बाबीवर आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 या कालावधीत नगरपरिषद निधीतून एकुण रक्कम रुपये 3241891/- खर्च नोंद असुन त्याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

प्रशासकीय मान्यता	कौ.ठ.क्रमांक 164 दिनांक 19/09/2017
तांत्रिक मान्यता	पाणी पुरवठा व स्वच्छता निरीक्षक यांचा दाखला
अंदाजपत्रकीय रक्कम	2733664/-
निविदा प्रसिध्दी	ई-निविदा
निविदाधारक	1.भगवान कांबुरे-15% जादा (चर्चा तडजोड अंती 5% जादा दराने मंजूर)
	2.शिवाजी धुमाळ-22% जादा
	3.अल्का कांबळे-18% जादा
मक्तेदार	भगवान कांबुरे चर्चा तडजोड अंती 5% जादा दराने मंजूर
करारनामा मुद्रांक	मुदतवाढ घेवुन नव्याने करारनामा केलेला नाही.
कार्यारंभ आदेश	27/07/2018
काम पुर्ण दिनांक	
खर्च	

प्र.क्र.	दिनांक	रक्कम रुपये	कालावधी	मक्तेदार
194/142	16/10/2020	1118235	दि.21/03/2019 ते 31/07/2019	भगवान कांबुरे
119/230	15/03/2022	1061828	दि.01/08/2019 ते 31/03/2020	भगवान कांबुरे
163/275	17/03/2022	1061828	दि.01/08/2019 ते 31/03/2020	भगवान कांबुरे
		3241891		

1)सन 2017-18 मध्ये मक्तेदार नेमण्यात आलेला आहे. त्याचीच मंजूर निविदेला सन 2020-21 व 2021-22 साठी

मुदतवाढ देण्यात आलेली आहे. परंतू संबंधित मक्तेराची नव्याने नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव पात्रता प्रमाणपत्र पॅन कार्ड इत्यादि कागदपत्रे नव्याने सादर करुन विहित मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करता मक्तेदाराला मुदत वाढ दिलेली आहे. 2800/- मुंद्रांकाची वसुली करुन भरणा करणे आवश्यक आहे.

2)सदर कामासाठी वापरलेल्या टँकर ची योग्य क्षमतेबाबत असल्याबाबत परिवहन विभागाकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक होते. तथापि तसे प्रमाणपत्र सोबत आढळून आले नाही.

3)मक्तेदाराने सादर केलेल्या तांत्रिक लिफाफयामधील लिस्ट ऑफ मशिनरीबाबतच्या कागदपत्रांची तपासणी केली असता सदर कामासाठी आवश्यक असणारी 9000 लिटर क्षमतेचे वॉटर टँकर उपलब्ध नाही. असे असताना मक्तेदाराची निविदा फेटाळणे आवश्यक होते. तसेच श्री.शिवाजी धुमाळ यांचेकडे उपलब्ध असणा-या मशिनरी यादिमध्ये वॉटर टँकर नाही तसेच विठठल जाधव यांनी त्यांचेकडे उपलब्ध असणा-या मशिनरी ची यादि सादर केलेली नाही. अशी तांत्रिक दृष्टया सक्षम नसताना निविदा धारकांची निविदा फेटाळून नव्याने निविदा मागविणे आवश्यक होते. परंतू विभाग प्रमुखांनी शासन निर्णय दिनांक 01/12/2016 चे उल्लंघन करुन निविदा मंजूर केलेली आहे. त्यामुळे नगरपरिषदेचे सकृतदर्शनी नुकसान झाले आहे.

4)ठेकेदाराचा महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम 1948 नुसार आस्थापनेच्या नुतनीकरणाचा दाखला घेतलेला नाही.

5)ठेकेदाराचा जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र तसेच पॅन कार्ड ची प्रत नस्तीसोबत उपलब्ध नाही.

6)सदर निविदा श्री.कांबुरे यांची 15% जादा दराची निविदा प्राप्त झाली तडजोडीअंती ती 5% जादा दराने निविदा समितीने मंजूर केली आहे. कौन्सील ठराव क्रमांक 263 दिनांक 30/12/2017 अन्वये नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती, दायित्व व जादा दरांच्या निविदेमुळे नगरपरिषदेचे नुकसान विचारात घेता सदरच्या जादा दराच्या निविदा नामंजूर करण्यात याव्यात असा ठराव झालेला आहे. परंतू विभाग प्रमुख व मुख्याधिकारी यांनी पत्र क्रमांक नगरपरिषद कार्यालय/आरोग्य/ /2018 दिनांक 09/06/2018 अन्वये मक्तेदार श्री.भगवान शिवाप्पा कांबुरे यांना करारकरणेसाठी कळवुन तसेच पत्र क्रमांक इनप/225/1/2018 दिनांक 27/07/2018 नुसार त्यांना सदर कामाचा आदेश देण्यात आलेला आहे. सदर बाब ही गंभीर स्वरुपाची असुन सदर निविदा कौन्सिल ठरावान्वये नामंजूर करुन सुध्दा ठेका दिलेला आहे.

7)विहित नमुन्यातील मोजमाप पुस्तक ठेवुन दैनंदिन कामावर सक्षम प्राधिकारी यांची स्वाक्षरी घेतलेली नाही.

DATDJSM7401 (Ref No : 124, Hmm No : 187)

144 फॉगिंग मशिनसाठी इंधन खरेदिबाबत.

योजना	:	NAGAR PARISHAD DIDHI	**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इंचलकरंजी आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 या कालावधीत नगरपरिषद निधीअंतर्गत फॉगिंग मशिनसाठी पेट्रोल व डीझेल खरेदिसाठी रक्कम रुपये 1126619/- खर्च नोंद आहे. त्याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

सदर खर्चाबाबतची प्रमाणके व आवश्यक नोंदवहया यांची तपासणी केली असता एकुण 10 फॉगिंग मशिनसाठी पेट्रोल व डिझेल खरेदि वरील खर्च नोंद आहे. सदर 10 मशिनचे लॉगबुक व हिस्ट्रीसीट ठेवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सर्व मशिन सुस्थितीत असल्याबाबत व वापरण्यात आलेले पेट्रोल व डिझेलचा वापर योग्य झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही. लॉगबुक व हिस्ट्रीसीट आधारे खर्चाबाबतची सत्यता पटवावी. तोपर्यंत सदर बाबीवर झालेल्या खर्चाची रक्कम रुपये 1126691/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATDJSM7401 (Ref No : 126, Hmm No : 189)

145 जंतुनाशके, द्रव्ये व औषधे खरेदितील अनियमितता

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	0	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी सन 2020-21 व 2021-22 मध्ये आरोग्य विभागाअंतर्गत जंतुनाशके, द्रव्ये व औषधे खरेदिवर खर्च नोंद आहे.

प्र.क्र.	दिनांक	रक्कम रुपये	पुरवठादार	तपशिल
140	16/10/20	546675	श्रीराम ॲग्रो एजन्सी	ब्लॅक बेल्ट फिनेल 1500 लिटर
106	15/03/22	1093350	श्रीराम ॲग्रो एजन्सी	ब्लॅक बेल्ट फिनेल 3000 लिटर
613	31/03/22	607500	श्रीराम ॲग्रो एजन्सी	ब्लॅक बेल्ट फिनेल 1500 लिटर
141	16/10/20	360250	श्रीराम ॲग्रो एजन्सी	फलायगॉन किटकनाशक 250 लिटर
107	12/11/20	720500	श्रीराम ॲग्रो एजन्सी	फलायगॉन किटकनाशक 500 लिटर
104	12/11/20	297000	डॉल्फीन सेल्स कार्पो	लार्विटेक्स 50 लिटर
612	31/03/22	645000	श्रीराम ॲग्रो एजन्सी	लार्विटेक्स 100 लिटर
105	12/11/20	1121635	--//--	मॅलाऑल 11500 कि.ग्रॅ.
106	12/11/20	2242730	--//--	मॅलाऑल 23000 कि.ग्रॅ.
95	29/10/21	1320000	डॉल्फीन सेल्स कार्पो	ओडोट्रीट पावडर 10000 कि.ग्रॅ.
107	15/03/22	1247040	रमेश ॲग्रो केम	ओडोट्रीट पावडर 10000 कि.ग्रॅ.
96	29/10/21	295000	श्रीराम ॲग्रो एजन्सी	जरमिनील लिक्वीड 500 लिटर
97	29/10/21	43500	श्रीराम ॲग्रो एजन्सी	सायथ्रीऑन किटकनाशक 50 लिटर

169	20/01/21	1014000	डॉल्फीन सेल्स कार्पो	निमटेक्स हर्बल लार्विसाईडस 600 लि.
610	31/03/22	1559250	श्रीराम ॲग्रो एजन्सी	निमटेक्स हर्बल लार्विसाईडस 1000 लि.
105	15/03/22	649415	श्री ॲग्रो अँड इंजि.	ई एम सोल्युशन दुर्गंधीनाशक 1000 लिटर्स
108	15/03/22	1014000	डॉल्फीन सेल्स कार्पो	निमटेक्स हर्बल लार्विसाईडस 1200 लि.
614	31/03/22	400000	रमेश ॲग्रो केम	पायरीसीन ऑईल आळीनाशक 250 लि
611	31/03/22	115632	एस.जी.पाटील	किंगफोग 1.25% युएलव्ही 48 लि
	एकुण	15292477		

1)आयुक्त तथा नगरपरिषद संचालनालय यांचे स्थायी निर्देश दिनांक 29/12/2005 मधील बाब क्रमांक 09 नुसार नगरपरिषदेने निविदा मागविण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी घेतल्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 72 अन्वये प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. परंतू तांत्रिक, प्रशासकीय मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2)प्रमाणक क्रमांक 611 दिनांक 31/03/2022 नुसार किंगफोग 1.25% युएलव्ही हे किटक नाशक पुरवठादार श्री.एस.जी.पाटील यांचेकडून खरेदि केलेबाबत त्यांना रक्कम रुपये 115632/- अदा करण्यात आले आहे. त्याबाबतच्या त्रुटी पुढीप्रमाणे आहेत.

प्रशासकीय मान्यता	कौन्सिल ठराव क्रमांक 46 दिनांक 22/02/2019
अंदाजपत्रकीय रक्कम	97152/-
निविदा धारक	1.माऊली शेती सेवा केंद्र
	2.श्री ॲग्रो अँड इंजिनिअरींग सोल्युशन्स
	3.एस.जी.पाटील
मक्तेदार	एस.जी.पाटील

सदर निविदाधारकांची निविदेसोबत असलेली कागदपत्रे तपासली असता वरील तीनही निविदाधारकाचे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना(नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम 2018 नमुना ग शॉप ॲक्ट मध्ये श्री ॲग्रो इंजिनिअरींग सोल्युशन्स यांचे व्यवसायाचे स्वरुप हे इंडस्ट्रीयल मटेरीअल सप्लायर्स असे आहे. तसेच माऊली शेती सेवा केंद्र यांच्या नोंदणी प्रमाणपत्रानुसार त्यांच्या व्यवसायाचे स्वरुप हे शेतीची औषधे विक्री असे असताना 3 पात्र निविदा धारक नसताना पार पडलेली निविदा प्रक्रीया ही सदोष आहे.

2)सदर जंतुनाशके व किटकनाशके औषधे उत्कृष्ठ दर्जाचे असल्याबाबत दि इंडियन इन्स्टीटयुट ऑफ मेडीकल सायन्य यांचा तपासणी अहवाल नस्तीसोबत आढळून आला नाही.

3)वरीलपैकी एकाही जंतूनाशकाची साठानोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे त्याचा वापर कुठे व कसा केला याच्या नोंदी लेखापरीक्षणात तपासणी करता आली नाही. त्यामुळे सदर खरेदिचा वापर योग्य प्रकारे

झाला किंवा कसे हे समजू शकत नाही.

4)नगरपरिषद सुधारित लेखासंहिता दिनांक 23 जानेवारी 2013 मधील प्रकरण 17 वस्तुसूची अंतर्गत नियम 250 प्रमाणे वस्तुंची नोंदवही ही कायम अभिलेख अनुन ती प्राधिकृत अधिका-याच्या वैयक्तिक पर्यवेक्षणाखाली ठेवण्यात आली पाहीजे. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5)स्टोअर विभागाकडे वस्तूसूची प्राप्त करण्याच्या कार्यपध्दतीबाबत नियम क्रमांक 256 प्रमाणे वस्तुची मागणी प्राप्त झालेनंतर त्या वस्तु स्विकारुन भांडार अधिकारी यांनी पडताळणी करुन मोजमाप करुन व आवश्यकतेप्रमाणे माल वितरीत करेल व वितरण चलनास भांडार अधिका-याकडून पोचपावती देण्यात येईल. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6)माल पुरविण्याची चलने इत्यादिची नस्ती संग्रही ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

7)लेखासंहिता नियम क्रमांक 254 प्रमाणे साहित्य प्राप्त टिपणी 3 प्रतीत तयार करुन एक प्रत मागणी पत्र केलेल्या/मालाची मागणी केलेल्या विभागाकडे पाठविले पाहीजे. साहित्य प्राप्त टिपणीदवारे नमुना क्रमांक 21 मध्ये ठेवण्यात आलेल्या वस्तुसूची नोंदवहीमध्ये साहित्य प्राप्त झाल्याची नोंद करण्यात येईल.

8)सुधारित लेखासंहितेतील नियम क्रमांक 256 प्रमाणे वस्तुसूची पुरवठादाराकडून प्राप्त झालेली देयके, नियम 257 प्रमाणे देयकाची छाननी, नियम 258 ते 264 प्रमाणे साहित्य देणे व नियम क्रमांक 265 प्रमाणे साहित्य परत करणे इत्यादि बाबीची नियमाप्रमाणे पुर्तता करणे आवश्यक आहे.

9)उपरोक्त खर्च तपशिल तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देयकांमधून आयकर व जीएसटी बाबतचे टीडीएस कपात करण्यात आला आहे. परंतू सदर कपातीची रक्कम शासन खाती भरणा केली असल्याची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

10)प्रमाणक क्रमांक 105 दिनांक 15-03-2022 खर्च रक्कम रुपये 649415/- श्री ॲग्रो अँड इंजिनिअरींग सर्विसेस तसेच प्रमाणक क्रमांक 108 दिनांक 15-03-2022 खर्च रक्कम रुपये 1014000/- डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन यांचे कडून खरेदि करण्यात आलेली जंतूनाशके व औषधे बाबतचे मुळ प्रमाणक, निविदा नस्त्या, पुरवठा चलने इत्यादि अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाहीत. त्यामुळे झालेल्या खर्चाची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

उपरोक्त बाबींच्या पुर्ततेअभावी खर्चाची रक्कम रुपये 15292477/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATDJSM7401 (Ref No : 127, Hmm No : 190)

146 भांडार व स्थिर मालमत्तेची पडताळणी न केले बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात भांडार व स्थिर मालमत्तेची पडताळणी न केले बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

1)महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहीता 2011 चे नियम 380 नुसार भांडाराची आणि उपभोग्य वस्तुंची प्रत्यक्ष पडताळणी, लेखांकन वर्षाच्या शेवटच्या दिवशी आणी नगरपंचायत निर्णय घेईल अशा कालांतराने वर्षातून किमान एकदा करण्यात येईल. या प्रयोजनासाठी माल कागदपत्र प्रमाणित करेल अशा पदनिर्देशीत केलेल्या लेखापरीक्षण विभागाच्या कर्मचा-याच्या उपस्थित भांडार अधिका-याकडून पडताळणी करण्यात येईल. प्रत्यक्ष पडताळणी केलेल्या भांडाराचा भांडार नोंदीनूसार असलेल्या शिल्लकेशी मेळ घालण्यात येईल. प्रत्यक्ष पडताळणी केलेल्या अखेरील शिल्लक मालाच्या मूल्याच्या वित्तीय विवरणपत्रामध्ये समावेश करण्यात येईल. तथापी नगरपरिषदेने अशी कार्यवही केल्याचे दिसुन आले नाही.

2) महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहीता 2011 चे नियम 381 नुसार प्राधिकृत अधिकारी, वर्षभरात किमान एकदा स्थिर मत्तांची पडताळणी करील. स्थिर मत्ता नोंदवहीमधील कोणत्याही उणीवांचा मेळ घालण्यात येईल आणी नगरपरिषदेला तसे कळविण्यात येईल. पडताळणी कागदपत्रांमध्ये नोंदी केलेल्या तपशीलांचा संबंधीत स्थिर मत्ता नोंदवहीशी मेळ घालण्यात येईल आणि दिसून आलेल्या उणीवांच्या बाबतीत सुधारात्मक पावले उचलण्यात येतील. तथापी नगरपरिषदेने अशी कार्यवही केल्याचे दिसुन आले नाही.

DATPDDF9401 (Ref No : 46, Hmm No : 106)

147 भांडार विभागाकडील स्थिर मत्ता नोंदवही व साठा नोंदवहीतील नोंदींच्या अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21-22 चे लेखापरिक्षणात भांडार विभागाकडील साठा नोंदवहीतील नोंदींच्या अनियमिततेबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे-

1) नगरपरिषद इचलकरंजी कडील भांडार विभागाकडील आर्थिक वर्ष 2020-21-22 करिता असलेल्या साठा नोंदवही क्र. 1 व साठा नोंदवहीक्र. 3 चे लेखापरीक्षण केले असता सदर दोन्ही साठा नोंदवहीतील नोंदी या पेन्सीलने घेण्यात आलेल्या आहेत. सदर बाब हि गंभीर असून साठा नोंदवहीतील सर्व नोंदी या पेनाने घेऊन संबंधित विभाग प्रमुखांनी त्या नोंदीची पडताळणी योग्य असलेबाबत प्रमाणित करणे आवश्यक आहे. परंतु त्याबाबत न.प. इचलकरंजी यांनी कार्यवाही केलेली नाही.

2) आर्थिक वर्ष 2020-21-22 साठी साठा नोंदवहीतील तपशिलांच्या नोंदीबाबत सुरवातीची शिल्लक,अखेरची शिल्लक तसेच वापरण्यात आलेल्या नगांच्या परिपूर्ण नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे संबंधित तपशिलांच्या वापराबाबतचा योग्य ताळमेळ घेण्यात आला नाही. याबाबत साठा नोंदवही क्र.1 व 3 मधील उदाहरणे पुढीलप्रमाणे-

साठा नोंदवही क्र व तपशील क्र.	तपशीलाचे नाव	आढळून आलेली अनियमितता
1 /2	रोट फाईल	2020-21 मधील शिलकेबाबत 2021-22 ला नोंदी नमूद नाहीत

1/4	लेस फाईल	2020-21 ला शिल्लक 26 नग असताना 2021-22 ला सुरवातीची शिल्लक 00 घेण्यात आलेली आहे.
1/44	शाईचे पॅड(मोठे)	शिल्लक,नवीन खरेदीची नोंद नसताना 2021-22 मध्ये 3 नग वापरण्यात आलेले आहेत.
1/69	लखोटे	2021-22 करिता सुरवातीची शिल्लक-00,दि.17/03/2022 रोजी 5000 नवीन खरेदी करण्यात आलेली आहे.परंतु दि.11/03/2022 व 16/03/2022 रोजी अनुक्रमे कोर्ट विभागासाठी 600 व बारनिशी विभागासाठी 900 नगांचा वापर केल्याची नोंद आहे.
2/15 (लेखा वि)	आगाऊ दिलेल्या रक्कम ठेवीचे रजिस्टर	2021-22 सुरवातीची शिल्लक 07 असताना नवीन खरेदीची नोंद नसतानाही 2021-22 11 नगांचा वापर करण्यात आलेला आहे.
2/1(इस्टेट वि)	जमीन व इमारत यांचे भाडे मागणी पत्रक	2020-21 करिता सुरवातीची शिल्लक,अखेरची शिल्लक,नवीन खरेदीची नोंद नाही परंतु 18 नग वापर. 2021-22 करिता सुरवातीची शिल्लक नमूद नाही परंतु दि.14/09/2021 रोजी 20 नग खरेदीची नोंद असून अखेरची शिल्लक नमूद नाही.
2/6 ते 10 (इस्टेट वि)	जलतरण प्रवेश अर्ज व ओळखपत्र	2019-20,20-21,21-22 करिता नोंदी अपूर्ण त्यामुळे ताळमेळ घेता आला नाही.
2/2(नगररचना वि)	काम सुरु करण्याचा दाखला /बांधकाम परवाना अर्ज	2020-21 मध्ये दाखला क्र. 2901-3000चा वापर करण्यात आलेला आहे. 2021-22 मध्ये दाखला क्र.3101 पासून वापर करण्यास सुरवात आहे परंतु दाखला क्र. 3001-3100 बाबत कोणतेही नोंद नमूद नाही.
2/17(असेसमेंट वि)	महा.म्युनि चे कलम 119/1 नोटीस	2021-22करिता खरेदीची नोंद असताना जमा,वापर,शिलकेबाबत नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.
2/22व 23 (टॅक्सवि)	घरफाळा मागणी व डिमांड बुके	2021-22करिता खरेदीची नोंद असताना जमा,वापर,शिलकेबाबत नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

3)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 12 नियम 191 अन्वये नगरपरिषदने स्थिर मत्तांच्या संबंधातील व्यवहारांची नोंद करण्याकरिता नमुना 17 मध्ये जंगम मालमत्ता यांच्या संबंधात स्वतंत्र स्थिर मत्ता नोंदवही ठेवली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 12 नियम 192 अन्वये प्रत्येक स्थिर मत्ता किंवा त्याचप्रकारच्या स्थिर मत्तांचे गट नोंदवहीतील स्वतंत्र पृष्ठावर नोंदवणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील प्रकरण 12 नियम 204 अन्वये प्राधिकृत अधिकारी यांनी

वर्षभरात किमान एकदा स्थिर मत्तांच्या नोंदवही नुसार स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी करून प्रत्यक्ष मोजणी अखेर आढळून आलेल्या मत्ता अचूक असल्याचे आढळून आल्यास तसे तो प्रमाणित करणे आवश्यक आहे तसेच तसेच यामध्ये कोणतीही त्रुटी आढळून आली तर उचित कार्यवाहीकरिता स्थायी समितीला कळविले पाहिजे परंतु याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

उपरोक्त नोंदी या उदाहरणादाखल असून संपूर्ण आर्थिक वर्ष 2020-21-22 आढावा घेवून सर्व तपशिलांच्या परिपूर्ण नोंदी घेणे आवश्यक आहे.

DATPDDF9401 (Ref No : 47, Hmm No : 107)

148 भांडार विभागातून केलेल्या छपाई खर्चाबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपालिका,इचलकरंजी चे सन 2020-2021-2022 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण दिनांक 09/11/2022 रोजी सुरू केले आहे.भांडार विभागाचे लेखापरिक्षण केले असता छपाई साठी खालील प्रमाणे खर्च केला आहे.

वर्ष	एकूण खर्च रक्कम	शेरा
2020-21	7682898	छपाइ /कागद खरेदी
2021-22	7159085	छपाइ /कागद खरेदी

याबाबत खलील प्रमाणे अ भि प्राय आहेत.

1) सदर छपाईसाठी सन 2018-19 मधील ई टेंडर zwj; प्रक्रिये राबविली आहे. त्यातील मंजूर ठेकेदाराला सन 2020-21 आणि 2021-22 ला मा. कौ न्सिल ठराव क्र.71, दि.16/09/2020 नुसार सन 2020-21 साठी व ठराव क्र. 141, दि.29/09/2021 ने सन 2021-22 साठी मुदतवाढ दिलेली आहे. परंतु महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग ndash;III/उद्योग-4 दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील प्रकरण क्र. 3.3.2 (अ) अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश फक्त एकदाच देता येईल आणि त्याचे मूल्य आणि संख्या सुरवातीच्या आदेशाच्या 50 टक्के किंवा रुपये दहा कोटी यापैकी जे कमी असेल त्यापर्यंतची खरेदी करता येईल. असे असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) मंजूर केलेल्या कामाचे मक्तेदाराकडुन करारनामा करुन घेताना मुद्रांक अधिनियम 1958 मधील कलम 34 व शासन परिपत्रक क्रं. ZPA/2009/वित्त 9/दिनांक 20/11/2009 च्या तरतूदीनुसार रुपये 10 लाखापर्यंत रुपये 500/- चा मुद्रांक घेणे व पुढील 1 लाखास रुपये 100/- चा मुद्रांक घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन 2020-21 साठी रू.7682898/- व सन 2021-22 साठी रू. 7159085/- इतकी खरेदी केलेली आहे.

रक्कम रू. 14800/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात रू.1000/- वर

करारनामा केलेला आहे. तरी सदर उर्वरित रक्कम रू.13800/- मक्तेदाराकडून वसुल करून शासन निधीत भरणा करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

3) सदर देयकांची तपासणी केली असता मक्तेदाराला अदा झालेल्या उपप्रमाणकावर सदर रक्कम अदा केलेबाबत पेड अँड कॅन्सलचे शिक्के मारणे आवश्यकता असताना तशा नोंदी उपप्रमाणकावर घेण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे देयक दुबार अदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 72 अन्वये प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक आहे. सदर खर्चाबाबत प्रशासकीय मान्यता नस्तीसोबत तपासाणीस उपलब्ध झाली नाही.

5) नस्तीची तपासणी केली असता स्थायी निर्देश क्र. 36 मधील नियम 33 नुसार अंदाजपत्रकीय तपासणी रक्कम रू. 1 लाख ते 1 कोटी या दरम्याने असेल तर निविदा सुचनांना जास्तीत जास्त प्रसिध्दी देणेसाठी अ प्रमाणे राज्य स्तरीय दैनिक व ब प्रमाणे 20000 प्रती खप असलेले जिल्हास्तरीय दैनिक मध्ये जाहीरात देणे आवश्यक असताना तशी जाहीरात नगरपरिषदेने दिलेली नाही.

DATABPM8101 (Ref No : 85, Hmm No : 202)

149 सेवा पुस्तकातील सर्वसाधारण उणिवांबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपरिषदेकडील सन 2020-2021 ते 2021-2022 कालावधीतील लेखापरीक्षणावेळी खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक वेपूर 1309/प्र.क्र.69 सेवा-9 दिनांक 29/04/2009 नियम 14 नुसार 6 व्या वेतन आयोगाच्या दिनांक 01/01/2006 ते 31/03/2009 अखेर वेतन फरकाची रक्कम 5 समान हप्त्यामध्ये भविष्य निर्वाह निधी खातेवर जमा केलेबाबतची नोंद सेवापुस्तकामध्ये घेणे आवश्यक आहे. परंतु अशा नोंदी सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

2) महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 मधील नियम 38 अन्वये सेवा पुस्तकामध्ये जन्मतारखेची नोंद करताना जन्मतारीख कागदोपत्री पुराव्यावरुन पडताळून पाहावी आणि आधारभूत कागदपत्राचे स्वरुप नमूद करुन तशा अर्थाचे प्रमाणपत्र देणेबाबत नमुद केले आहे. परंतु अशा नोंदी सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

अ.क्र	कर्मचाऱ्याचे नाव	पदनाम	शेरा
1	श्री. रा.कृ.भोसले	वॉचमन	जन्मतारखेच्या नोंदीवर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही
2	श्री. मं.ग.घोडके	वॉचमन	

3)सेवा पुस्तकात रजा मंजूरीचे आदेश क्रमांक व दिनांक नमूद नाही, रजा मंजूरीबाबत सक्षम अधिकाऱ्यांची

स्वाक्षरी नाही. उदा. श्री. शिवाजी शामराव घडवीर, वॉचमन, यांचा 01/07/2014 पासून अर्जित रजा लेखा व 01/01/2011 पासून अर्धवेतनी रजा लेखा अपूर्ण आहे. श्री. बंडू पुंडलिक काजवे, वॉचमन यांचा 01/01/2015 अर्धवेतनी रजा लेखा अपूर्ण आहे. श्रीम. सुजाता सुरेश दाभोळे, लिपिक, पाणी पुरवठा विभाग व श्री. संदीप वामन जोशी, लिपिक यांचा अर्धवेतनी रजा लेखा अपूर्ण आहे.

4) आस्थापनेवरील सर्व कर्मचारी यांची जात पडताळणी बाबत महाराष्ट्र शासन परिपत्रक सामाजिक न्याय व सांस्कृतिक विभाग क्रमांक सीबीसी/10/2004/प्र.क्र.570/मावक/5 दिनांक 05/03/2005 मधील सुचनेनुसार जात पडताळणी केलेबाबतची नोंद सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

अ.क्र	कर्मचाऱ्याचे नाव	पदनाम	शेरा
1	अ.बा.कांबळे	असिसंट मेकॅनिक	जात पडताळणी केलेबाबतची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

5) आस्थापनेवरील सर्व कर्मचारी यांची चारित्र्य पडताळणी बाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रमांक बीसीए/1093/14999/प्र.क्र.59/16 अ दिनांक 09/03/1994 मधील सूचनेनुसार कर्मचाऱ्यांचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य पोलीस तपासामध्ये चांगले असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम 40 नुसार कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी झाल्याबाबतच्या नोंदी सेवापुस्तकामध्ये घेणे अनिवार्य आहे. अशा नोंदी लेखापरीक्षणावेळी आढळून आल्या नाहीत, अशा कर्मचाऱ्यांचा आढावा घेवून नोंदी पूर्ण करुन अनुपालन सादर करावे.

6)शासन निर्णय क्रमांक टी-आर-8/1163/2026 दिनांक 23/10/1963 व शासन निर्णय वित्त विभाग दिनांक 10/06/2015 अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यास आपले स्वग्राम घोषीत करणे आवश्यक आहे. तशा नोंदी सेवापुस्तकात आढळून आल्या नाहीत.

अ.क्र	**कर्मचाऱ्याचे नाव**	**पदनाम**	**शेरा**
1	अ.बा.कांबळे	असिसंट मेकॅनिक	चारित्र्य पडताळणीची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आलेली नाही.
2	रा.भै.यादव	लिपिक, जकात विभाग	

7) जात वैधता प्रमाणपत्र नोंद आढळून आली नाही. उदा. श्री. अ.बा.कांबळे, असि. मेकॅनिक, श्री. आप्पासो विश्वनाथ गेजगे, सफाई कामगार

8) प्रत्येक वर्षी वेतनवाढीच्या नोंदीवर कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी घेणेत आलेली नाही. महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 मधील नियम 36 ते 45 नुसार सेवा पुस्तकाची सेवापट कर्मचाऱ्यांची सेवा अखंडता इ. बाबी अभिलेख पडताळणी केलेबाबतचा नोंद सेवा पुस्तकात शेवटी दिलेली नाही.

9) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक साप्रवि/हिंदी भाषा/1092/प्र.क्र.29 व साप्रवि/मराठी भाषा/1076/28 दिनांक 10/06/1976 व शासन निर्णय क्रमांक 1092/1570/प्र.क्र.143/9210 दिनांक 01/01/1993 अन्वये सेवेतील सर्व कर्मचारी यांना एतदर्थ मंडळाची हिंदी व मराठी भाषा उत्तीर्ण झालेबाबतची नोंद सेवा पुस्तकात घेणे आवश्यक आहे. अशा नोंदी सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

अ.क्र	**कर्मचाऱ्याचे नाव**	**पदनाम**	**शेरा**

1	श्री. सदाशिव बाबुराव शिंदे	लिपिक, कर विभाग	एतदर्थ मंडळाची हिंदी व मराठी भाषा उत्तीर्ण झालेबाबतची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

DATJZMM9301 (Ref No : 55, Hmm No : 12)

150 गुंतवणूक नोंदवहीबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपालिका,इचलकरंजी चे सन 2020-2021-2022 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण दिनांक 09/11/2022 रोजी सुरू केले आहे.

गुंतवणूक नोंदवहीची तपासणी केली असता खालील प्रमाणे अ भिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 मधील नियम क्र.62, 215, 443 नुसार नमुना नं. 19 मध्ये ठेवणे आवश्यक असताना गुंतवणूक नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-111/उदयोग-4, दि.01/12/2016 मधील नियम 3.2.3 नुसार गुंतवणूक करताना सरकारी बँकेकडून व्याजदराबाबतची दरपत्रके मागवून गुंतवणूक करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करता नगरपरिषदेने गुंतवणूक केली आहे.

3) खालील निधीची रकमा शिल्लक असताना नगरपरिषदेने गुंतवणूक केली नसल्याने नगरपरिषदेचे नुकसान झाले आहे.

अ.क्र	निधीचे नाव	मार्च-22 अखेर शिल्लक रक्कम
1	कमी खर्चाची स्वच्छता योजना	738807/-
2	नाविन्यपूर्ण योजना	75490/-
3	नव्याने वाढीव हदद (कबनुर)	1452927/-
4	12 वा वित्त आयोग(इतर विकास काम)	92352/-
5	तिर्थक्षेत्र विकास अनूदान	211036/-
6	वॉटर एनर्जी ऑडिट	105468/-
7		

4) नैसर्गिक आपत्ती अनुदान निधीची रक्कम रू. 79300/- दि.06/10/2021 रोजी गुंतवणूक केली असल्याचे दिसून

येते पंरतू त्या रकमेची गुंतवणूक नोंदवहीला नोंद घेण्यात आलेली नाही तसेच रक्कम त्या रकमेची ठेव पावती तपासणीस उपलब्ध झाली नाही.

5) खालील प्रमाणे निधींच्या कॅशबुकची तपासणी केली असता कॅशबुक मधील गुंतवणूकीची नोंद आणि गुंतवणूक नोंदवहीची तपासणी केली असता कॅशबुकमध्ये गुंतवणूक केलेली रक्कम गुंतवणूक नोंदवहीपेक्षा जादा दिसून येते तसेच सदर रकमांच्या ठेव पावती तपासणीस उपलब्ध झाली नाहीत.

अ.क्र.	निधीचे नाव	कॅशबुक मधील गुंतवणूकीची नोंद	गुंतवणूक नोंदवहीमधील नोंद	फरक
1	महासुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर)	9798301	6381702	3416599
2	अमृत अभियान zwj; हरितपटटा	3417086	3259100	157986
3	युआयडीएसएमटी	56725956	56416805	309151
4	एसडब्लुएम प्रोजेक्ट	3975382	936338	3039044
5	अनुजाती नवबौध्द घटक	18407073	18150306	256767
6	युआयडीएसएमटी ड्रेनेज	601513518	-	601513518
7	14 वावित्त ओयोग (आयडीबीआय)	72283045	63147683	9135362
8	जिल्हास्तर नगरोत्थान	11414689	7435502	3979187

6) खालील प्रमाणे निधींच्या कॅशबुक मधील गुंतवणूकीची नोंद आणि गुंतवणूक नोंदवहीची तपासणी केली असता गुंतवण्क नोंदवहीमधील नोंदीच्या रकमा कॅशबुकमध्ये गुंतवणूक नोंद केलेल्या रकमेपेक्षा जादा नोंद जादा दिसून येत.

अ.क्र.	निधीचे नाव	कॅशबुक मधील गुंतवणूकीची नोंद	गुंतवणूक नोंदवहीमधील नोंद	फरक
1	अमृत अभियान	162908743	175542135	12633392
2	14 वा वित्त ओयोग (ॲक्सिस)	6456249	6810082	353833

7) 14 वा वित्त्zwj; आयोग निधीच्या ॲक्सिस बँकेच्या 4890004/- (6810052-1920048), आयडीबीआय

10684088/- (72283045-61598957),जिल्हास्तर नगरोत्थान च्या 5895928/- (11414689-5518761), नैसर्गिक आपत्ती अनुदान च्या 79300/-, प्रिमियम शुल्क टीपी रू.37766521/-, पाणी पुरवठा घसारा निधी (बँक गॅरंटी) रू.1501000/-, पाणी पुरवठा घसारा निधी रू.2660859/- चया ठेव पावती तपासणीस उपलब्ध झाल्या नाहीत.

DATABPM8101 (Ref No : 86, Hmm No : 201)

151 ठेव रकमेतून टीडीएस कपात केलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	193160.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजीने सन 2020-21-22 या कालावधीत zwj; विविध बँकेकडे केलेल्या विविध योजनांच्या ठेव रक्कम व त्यावरील व्याज यामधून टीडीएस कपात केलेबाबत खालील प्रमाणे दिसून येत आहे सदर टीडीएस कपात करणेचे नसताना ती केलेने नगरपरिषदेचे नुकसान झाले आहे. तरी कपात रकमेबाबत संबंधित बँकेशी पत्रव्यवहराअंती कमी जमा रकमा जमा होणे आवश्यक आहे तरी त्या रकमा जमा घेवून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

योजनेचे नाव	पावती क्रमांक	दिनांक	पावती रक्कम	मुदतीनंतर जमा होणारी रक्कम	प्रत्यक्ष जमा रक्कम	कमी जमा रक्कम
15 वा वित्त	37809	04/01/2021	12500000	13138616	13126834	11782
आयोग	37833	05/01/2021	12500000	13138616	13126964	11652
	37842	06/01/2021	12500000	13138616	13127092	11524
रमाई	28336		47430	50683	50372	311
आवास	19297		43819	46825	46553	272
योजना	14046		7716713	8246040	8194696	51344
	14047		7707460	8236153	8184873	51280
	14048		7683941	8211020	8159895	51125
	26335		100190	106806	106204	602
	23186		179435	191287	190217	1070
	20298		135499	144448	143638	810
	20553		5190	5533	5503	30

	20739		78470	83614	83167	447
	28975		79402	63478	63093	385
	27520		99648	106023	105497	526
						193160

DATABPM8101 (Ref No : 89, Hmm No : 41)

152 घसारा नोंदवही बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपालिका,इचलकरंजीने घसारा नोंदवही ठेवण्यात आलेली नाही त्याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1)महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 मधील नियम क्र. 198 नुसार परिशिष्ट 2 अन्वये नगरपरिषदेच्या स्थिर मालमत्तेवर घसारा रकमेची तरतूद करण्यासाठी घसारा रकमेचे दर नमूद केले आहेत. त्यानुसार नगरपरिषदेच्या इमारत,वाहने,यंत्रसामुग्री,फर्निचर या बाबीचा घसारा परिगणीत करुन तेवढी रककम घसारा निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

परिशिष्ट 2 नुसार नगरपरिषदेच्या स्थिर मत्तांवर घसारा रकमेची तरतूद करण्याकरिता स्वीकृत करावयाच्या घसारा रकमेचे दर पुढीलप्रमाणे-

अ.क्र.	मत्तांची वर्गवारी	वर्गवारीमध्ये समावेश असलेल्या मत्तांचे प्रकार	घसारा रकमेचा दर
1	जमीन	जमीन	0
2	इमारत	इमारती	6.66%
3	पायाभूत सुविधा मत्ता (इतर स्थिर मत्तांमध्ये समावेश)	मार्ग व पूल, जलनि:स्सारण व मलनि:स्सारण,जलप्रवाह	6.66%
4	संयंत्र आणि यंत्रसामग्री	संयंत्र आणि यंत्रसामग्री	10%
5	वीज संचमांडणी	जनरेटर संयंत्र, सार्वजनिक प्रकाश योजना	15%
6(क)	वाहने	वाणिज्यिक वाहने(बस,डंपर इ.)	20%
6(ख)	वाहने	इतर वाहने	15%

7	कार्यालय सामग्री, संगणक आणि परिबद्ध क्षेत्रे	--	20%
8	फर्निचर आणि जोडण्या	फर्निचर,खिळण्या,जोडण्या आणि विद्युत उपकरणे	15%
9	अमूर्त मत्ता	संगणक आज्ञावली अनुज्ञप्ती इ.	20%

तथापि आर्थिक वर्ष 2020-21-22 मध्ये घसारा निधीची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तरी वरील प्रमाणे घसारा नोंदवही ठेवून नगरपरिषदेच्या मत्तांची घसारा तरतूद करून अनुपालन सादर करण्यात यावे.

DATABPM8101 (Ref No : 90, Hmm No : 40)

153 अनुदान नोंदवही (नमुना नं. 26) बाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

अनुदान नोंदवहीबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 62 नुसार, नमूना 26 मध्ये ठेवणे आवश्यक असताना नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्याबाबत खालील प्रमाणे अ भि प्राय देण्यात येत आहेत.

1. अनुदान नोंदवहीमध्ये नोंदविलेले अनुदानाच्या आदेश तपासणीसाठी लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत

2.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 2011 नियम 315 नुसार प्रत्येक अनुदानाची zwj; तप शि लाची स्वतंत्र पृष्ठभागावर नोंद घेण्यात येईल. नोंदवहीतील प्रत्येक अनुदानासाठी पहिल्या पानावर, प्राप्त झालेल्या अनुदानाच्या शर्तीच्या आणि अनुदानाअंतर्गत प्राप्त रकमेची नोंद असेल तसेच पुढील पृष्ठभागावर अनुदान रकमेपैकी किती रक्कम खर्च करण्यात आली असेल याची नोंद परंतू सदर नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

3.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 2011 नियम 450 नुसार मंजुर करण्यात आलेली आणि त्या दिनांकास पुर्णपणे वापरण्यात न आलेली अनुदानाची रक्कम सुनिश्चीत करण्यात येईल आ णि सुचीबध्द करण्यात येईल अनदानाच्या अटी दिनांकापर्यत वापर करण्यात आल्याचा तपशील आणि इतर महत्वाची वैशिष्ट्रे यांची नोंदी न.नं.26 मध्ये नोदविण्यात येतील प्राप्त झालेल्या अनुदानाची आणि अदयाप वापरण्यात न आलेली निव्वळ रक्कम याची अधिका-याकडून यादीची पडताळणी करण्यात आल्यानंतर आणि त्यास मान्यता देण्यात आल्यानंतर नगरपरिषदेच्या दायित्वामध्ये करण्यात येइल.

4. मिळालेले अनुदान खर्च निहाय नोंदविलेले नाही त्यामुळे zwj; विशिष्ट कामासाठी मिळेलेले अनूदान त्या कामावर किती खर्च झाले तसेच किती शिल्लक आहे याची तपशील कळत नाही.

DATABPM8101 (Ref No : 91, Hmm No : 39)

154 14 वा वित्त आयोग मधील दंडाची रक्कम नगरपरिषद फंडवर वर्ग केलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजीने 14 व्या वित्त्zwj; आयोग निधीतून प्र.क्र. 98 दि. 01/10/2020 र.रू.8696920/- रस्ते व गटरी साफसफाईर् च्या देयकातील दंड व वाहन भाडे मधील वसुली रक्कम नगरपरिषद फंडामध्ये वर्ग केली आहे. सदरची रक्कम शासन निधीमधील असून ती शासन निधीमध्ये ठेवूनच खर्च करणे आवश्यक असताना ती नगरपरिषद फंडामध्ये वर्ग करून खर्च आहे. ही गंभीर अनिमितता आहे. तसेच रक्कम वर्ग केल्याने मिळणरया गुंतवणूकीवरचे व्याजाचे नुकसान

(1 नोव्हेबंर 2020 ते लेखापरिक्षणा कालावधीपर्यंत 5 टक्के) झाले आहे. तरी सदर रक्कम 14 वा व्या zwj;वित्त आयोग निधीमध्ये वर्ग करुन पुर्तता सादर करावी.

DATABPM8101 (Ref No : 92, Hmm No : 38)

155 अखर्चित रक्कम शासनास परत करणेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी खालील प्रमाणे अखर्चित रक्कम दिसून येते.

शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.संकीर्ण-1998/प्र.क्र.30/नवि-04 दि.28.03.2022 अन्वये सन 2017-18 ते 2020-21 या आर्थिक वर्षामध्ये वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने कामे पूर्ण करून निधी खर्च करण्यास दि.31/03/2023 अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी या व्यतीरीक्त योजनांची अखर्चित निधी शासनास जमा करण्यात यावी. तसेच अखर्चित रक्कम शासन खाती भरणा केल्याची पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

अ.क्रं.	निधीचे नांव	दि.31/3/2022 अखेर अखर्चित रककम
1	अनु.जाती व नवबौध्द घटक स्वच्छता वैयक्तीक शौचालय व नळजोडणी योजना	3240056
2	यु.आय.डी.एस.एस.एम.टी.योजना	621999354
3	तिर्थक्षेत्र विकास योजना	211036
4	नव्याने विस्तारलेल्या वाढीव हदद(कबनुर) नागरी	1452927
5	सुजय निर्मल योजना	3456361
6	विशेष रस्ता अनुदान	1098758

7	कमी खर्चाची स्वच्छता योजना	748972
8	नाविन्यपुर्ण योजना अनुदान	75490
9	13 वा वित्त आयाग	18132907
10	वैशिष्ठयपुर्ण काम अनुदान	2354936
11	पायाभुत zwj; सुविधा विशेष अनुदान	2214430
12	नागरी सुधारणा प्रोत्साहन	184942
13	अल्पसंख्यांक आयोग	1158736
14	वॉटर एनर्जी ऑडिट	105468
	एकूण	656434373

वरीलप्रमाणे एकूण रू. 656434373/- इतकी रक्कम अखर्चित असल्याचे दिसून येते.तरी सदर अखर्चित रक्कम शासनास पुरत करून पुर्तत लेखापरिक्षणास सादर करावी.

DATABPM8101 (Ref No : 97, Hmm No : 44)

156 माहे जुन 2022 अखेर रोख नोंद वही व बँक पासबुक अखेर शिल्लक रक्कम यांच्यातील तफावतीबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपालिका,इचलकरंजी चे सन 2020-2021-2022 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण दिनांक 09/11/2022 रोजी सुरू केले असून सोबत जोडलेल्या विवरणपत्र क्र. 2 प्रमाणे नगररिषद निधी व योजनांची रोकनिधीवरची दि. 28/06/2022 अखेरची शिल्लक व बँक पासबुकची अखेरची शिल्लक यांची तपासणी केली असता तफावत आढळून आली .

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 2011 मधिल नियम 54 प्रमाणे प्रत्येक महिना अखेरीस, बँक नोंदवहीमधील नोंदीची बँक विवरणपत्रामधील नोंदीशी तुलना करून नमुना क्रमांक 5 मध्ये बँक मेळ विवरपत्र तयार करणे आवश्यक असताना बँक ताळमेळ तयार करण्यात आलेला नाही.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 2011 मधिल नियम 398 प्रत्येक महिन्याच्या शेवटी, बँक विवरणपत्रानुसार शिल्लक रक्कम आणि बँक पुस्तकानुसार शिल्लक रक्कम यांच्यामध्ये तफावत असेल, तर बँकेकडून बँक स्क्रोल मधील नोंदी प्राप्त करून त्याची बँक पुस्तकातील नोंदीशी तपासणी करण्यात येईल. या बाबीशी तपासणी

करताना, रोखपाल, केवळ रकमेच्या नोंदीबरोबर धनादेश क्रमांक, नोंद क्रमांककिंवा अदात्याचे किंवा प्रदात्याचे नाव इत्यांदींच्या नोंदीशी दैनदिन तपासणी करणे आवश्यक असताना तशी तपासणी करण्यात आलेली नाही.

3)सोबत जोडलेल्या न.प. फंड वयोजना निधीच्या विवरणपत्रानुसारबँक खाते शिल्लक व कॅशबुक मधील अखेरच्या शिल्लकमध्ये तफावत आढळून येते .

DATABPM8101 (Ref No : 158, Hmm No : 205)

157 बँक ताळमेळबाबत. मार्च- 2022 अखेर

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

इचलकरंजी नगरपालिका,इचलकरंजी चे सन 2020-2021-2022 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण दिनांक 09/11/2022 रोजी सुरू केले असून सोबत जोडलेल्या विवरणपत्रा क्र. 1 प्रमाणे नगररिषद निधी व योजनांची रोकनिधीवरची अखेरची शिल्लक व बँक पासबुकची अखेरची शिल्लक यांची तपासणी केली असता तफावत आढळून आली .

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 2011 मधिल नियम 54 प्रमाणे प्रत्येक महिना अखेरीस, बँक नोंदवहीमधील नोंदीची बँक विवरणपत्रामधील नोंदीशी तुलना करून नमुना क्रमांक 5 मध्ये बँक मेळ विवरपत्र तयार करणे आवश्यक असताना बँक ताळमेळ तयार करण्यात आलेला नाही.

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 2011 मधिल नियम 398 प्रत्येक महिन्याच्या शेवटी, बँक विवरणपत्रानुसार शिल्लक रक्कम आणि बँक पुस्तकानुसार शिल्लक रक्कम यांच्यामध्ये तफावत असेल, तर बँकेकडून बँक स्क्रोल्स मधील नोंदी प्राप्त करून त्याची बँक पुस्तकातील नोंदीशी तपासणी करण्यात येईल. या बाबीशी तपासणी करताना, रोखपाल, केवळ रकमेच्या नोंदीबरोबर धनादेश क्रमांक, नोंद क्रमांककिंवा अदात्याचे किंवा प्रदात्याचे नाव इत्यांदींच्या नोंदीशी दैनदिन तपासणी करणे आवश्यक असताना तशी तपासणी करण्यात आलेली नाही.

3)न.प. फंडनिधीच्या खालील प्रमाणे निधीच्या बँक खात्याची तपासणी केली असता किर्दमधील अखेरच्या शिलकी पेक्षा बँक पासबुक मधील रक्कम कमी असल्याने तफावत zwj; आढळून येते . तरी संबधित रकमेचा योग्य समर्पक खुलासा करावा अन्यथा सदर रक्कम संबंधिताकडून वसूल करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

अ.क्र.	बँकेचे नाव	खाते क्रमांक	रोकडनिधीप्रमाणे अखेरची शिल्लक	पासबुकप्रमाणे शिल्लक	तफावत
1	सेंट्रल बॅक ए व बी झोन	3703	113251	53364	59887
2	आयडीबीआय वेतन	161	25187654	24592183	595471
3	आयडीबीआय	8870	22894317	10945833	11948484

	रस्ता खुदाई				
4	आयडीबीआय जनगणना	963	1306570	128147	1178423
5	आयडीबीआय प्रिमियीम शल्क	8323	16297546	2567175	13730371
6	एचडीएफसी काळा ओढा	18513	43159	17489	25670

3)) न.प. फंडनिधीच्या खालील प्रमाणे बँकेची पासबुक लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही

अ.क्र.	बँकेचे नाव	खाते क्रमांक
1	बँक ऑफ बडोदा	6197
2	बँक ऑफ बडादा प्रशमन शुल्क	16480
3	देना बँक नागरी स्वच्छता	2586
4	आयडीबीआय zwj; डिपॉझिट	444

5) अर्बन बँक खाते क्र. 4000 वर नगरपरिषदेचे रू.604279/- दिसत आहेत परंतू सदरची बँक zwj; अवसानात निघाल्यामुळे नगरपरिषदेची सदरची रक्कम नाहक गुंतून पडली आहे. रक्कम परत मिळवणेसंदर्भात नगपरिषदेने कार्य पाठपुरावा केला याबाबतची कागदपत्रे लेखारिक्षणात उपलब्ध झाली नाहीत.

DATABPM8101 (Ref No : 159, Hmm No : 20)

158 इचलकरंजी नगरपालिका, अधिकारी व कर्मचारी यांचे लोकहितास्तव सेवा पेनर्विलोकन करणेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

नगरपालिका इचलकरंजी आर्थिक वर्ष सन 2020-21 ते 2021-22 लेखापरीक्षण कालावधीत नगरपालिकेकडे

कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 नियम 10 व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरसी 1085/1029/43/15 दिनांक 12/05/1986 व नगर परिषद संचालनालय zwj; परिपत्रक क्रमांक संकीर्ण 10-2000/प्र.क्र.88/8 दिनांक 19/10/2000 नुसर नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी यांचे वयाच्या 50-55 व्या वर्ष पलीकडे किंवा अर्हताकरी सेवेची 30 वर्षे पूर्ण झाल्यावर त्यांची नगर परिषदेतील सेवा पुढे ठेवण्यासाठी व पात्रता आजमवण्यासाठी त्यांची गोपनीय अहवाल/सचोटी व शारीरिक क्षमता विहित केलेल्या निकषाच्या आधारे त्यांचे प्रकरण पुनर्विलोकन करुन सुयोग्[zwnj;य व कार्यक्षम अधिकारी व कर्मचारी यांना मुदतपूर्व सेवानिवृत्त करावे असे आदेश आहेत, असे असता सन 2020-21 व 2021-22 कालावधीत वरीलप्रमाणे निकषात येणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांच्याबाबत योग्य ती कार्यवाही केलेली नाही. सबब यापुढे व ज्यांची सेवा 30 वर्षे व वय 50 ते 55 वर्षे असलेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या यादीसह वरीलप्रमाणे आदेशात नमुद केलेप्रमाणे पूर्तता लेखापरीक्षणास सादर करावी, अन्यथा त्यांच्या वेतन व भत्ते वरील रक्कम अंतिम अमान्य राहील.

DATSRCM7001 (Ref No : 193, Hmm No : 46)

159 अग्रिम वसुलीच्या अनियमिततेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपालिका इचलकरंजीकडे आर्थिक वर्षे सन 2020-21 ते 2021-22 कालावधीत कर्मचाऱ्यांना दिलेल्या भविष्य निर्वाह निधी अग्रीम रक्कमा बाबतची वसुली ही मंजूर प्राधिकारी निर्देश देईल तितक्या समान मासिक हप्त्यामध्ये वसुल करणे आवश्यक आहे. परंतु महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 14 (1) नुसार किमान 12 हप्त्यात व 24 पेक्षा अधिक होणार नाहीत. तसेच नियम 13 चा पोटनियम (2) नुसार अग्रीमांची रक्कम वर्गणीदाराच्या तीन महिन्याच्या वेतनापेक्षा अधिक असलेस अशा विशेष प्रकरणात 36 पेक्षा अधिक हप्ते होणार नाहीत असे असता खालीलप्रमाणे 45 समान हप्ते दिले आहेत. याबाबत पूर्तता सादर करावी.

अ.क्र	प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	कर्मचारी नाव	तपशील
1	137	29/12/2020	45000/-	श्री. रजनीकांत रामचंद्र पेटकर, कर विभाग	1000*45 हप्ते

DATSRCM7001 (Ref No : 194, Hmm No : 46)

160 भविष्य निर्वाह निधी विभागाकडील नोंदवह्या विहित नमुन्यात न ठेवलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपालिका इचलकरंजीकडील सन 2020-21 ते 2021-22 कालावधीतील भविष्य निर्वाह निधी विभागाकडील लेखापरीक्षणावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. नगरपालिका इचलकरंजीडील कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे लेखे महाराष्ट्र नगरपरिषद/नगरपालिका लेखासंहिता 2011 अधिसूचना 13 अन्वये विहित केलेल्या नमुन्यात न ठेवता इतर नमुन्यात ठेवण्यात आलेले आहेत. सदर बाब नियमबाह्य असून सदर लेखे खालीप्रमाणे विहित नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे.

अ.क्र	नोंदवही तपशील	न.पा.कडून ठेवण्यात आलेली नोंदवही नमुना	लेखासंहितेप्रमाणे ठेवणे आवश्यक असलेला नोंदवही नमुना
1	निवृत्ती वेतन नोंदवही	-	नमुना नंबर 91
2	निवृत्ती वेतन प्रदान आदेश नोंदवही	नमुना नंबर 102	नमुना नंबर 92
3	निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही	नमुना नंबर 18	नमुना नंबर 95
4	उपदान नोंदवही	नमुना नंबर 155	नमुना नंबर 96
5	निवृत्ती वेतन लेखापरीक्षा नोंदवही	नमुना नंबर 153	नमुना नंबर 97

उपरोक्त प्रमाणे लेखासंहितेनुसार नोंदवही ठेवण्यात आलेली नसताना आवश्यक माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. तरी पूर्तता करुन कार्यवाही लेखापरीक्षणास सादर करावी.

DATSRCM7001 (Ref No : 195, Hmm No : 47)

161 निवृत्ती वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना महागाई भत्ता आदाईबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपालिका इचलकरंजीकडील कुटुंब निवृत्ती वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तो सेवेत असताना त्यास त्याच्या मर्जीनुसार एक महागाई भत्ता दिला जातो परंतु तो कर्मचारी सेवानिवृत्ती झालेनंतर त्याला दोन्ही निवृत्तीवेतनावरील महागाई भत्ता शासन परिपत्र वित्त विभाग से.नि.वे 1090/103/सेवा-4/दिनांक 29/01/1991 नुसार देय असताना नगरपालिका इचलकरंजीकडे तो संबंधितास अदा करण्यात येत नाही. त्यामुळे सदर निवृत्ती वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या महागाई भत्त्यास मुकावे लागत असल्याचे दिसून येते. सबबत संबंधित कर्मचाऱ्यास योग्य ती कार्यवाही करुन सुधारीत दराने महागाई भत्ता अदा करणे आवश्यक आहे.

DATSRCM7001 (Ref No : 196, Hmm No : 47)

162 बांधकाम परवानगी प्रीमियम शुल्क व बांधकाम परवाना कामगार उपकर शासन खाती न भरणा केलेबाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

1) सन 2020-2021 ते 2021-2022 लेखापरीक्षणात जमा खर्चाचे वार्षिक विवरण पत्रकावरुन नगररचना विभागाकडील प्राप्त बांधकाम परवानाधारकांकडून खालीलप्रमाणे बांधकाम परवाना प्रीमियम शुल्क वसूल करण्यात आले असून युनिफाईड डेव्हलपमेंट कंट्रोल प्रमोशन रेग्युलेशन फॉर महाराष्ट्र स्टेट मधील मुद्दा क्रमांक 2.2.14 अनुसार वसूल करण्यात आलेल्या बांधकाम परवाना प्रीमियम शुल्क मधील 50 % रक्कम हि शासनाच्या लेखाशीर्षाखाली भरण्यात येवून उर्वरित रक्कम हि सेपरेट खात्यावर ठेवण्यात येवून अशी जमा झालेली रक्कम हि नागरी पायाभूत सुविधा साठी वापरण्यात येणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यावाही करण्यात आलेली नसल्याने सदर रक्कम रुपये 12381980/- नाहक खात्यावर पडून राहिली आहे.

सन	**एकूण जमा रक्कम**
2020-2021	4387351/-
2021-2022	7994629/-
एकूण	**12381980**

2)इचलकरंजी नगरपरिषदे कडील सन 2020-2021 ते 2021-2022 लेखापरीक्षणात नगररचना विभागाकडील प्राप्त बांधकाम परवानाधारकांकडून जमा करण्यात आलेला बांधकाम उपकर शासन खाती भरणे आवश्यक असताना सदर रक्कम नगरपरिषदेच्या एकत्रित खात्यावर पडून असल्याचे दिसून येते.

सन	**एकूण जमा रक्कम**
2020-2021	5220540/-
2021-2022	3815790/-
एकूण	**9036330/-**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 45 अन्वये ज्या बांधकामांना काम सुरु करण्यास परवानगी दिली आहे अशा बांधकामांवर महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र.बी.सी.ए.2009/प्र.क्र.108/ कामगार-7अ/दि.17 जून 2010 मधील 3(2) नुसार बांधकामाचे अंदाजित मुल्य ठरविण्या बाबत निर्देश देण्यात आले आहेत. नगररचना विभागामार्फत देण्यात आलेल्या बांधकाम परवान्यापोटी 1% कामगार कल्याण उपकर र.रु. 9036330/- शासन खाती भरणा करुन चलन लेखा परीक्षणासा सादर करावे.

DATGGAM9401 (Ref No : 58, Hmm No : 123)

163 अनधिकृत बांधकामावरील शास्तीबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरीषरदेमधील शासकीय जमीनीवर एकुण किती मिळकतीवर अतिक्रमण केले आहे याबाबतचे अभिलेख व अनधिकृत बांधकाम नोंदवही लेखापरिक्षणास सादर करण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद दिनांक 1/4/2008 नंतर अनधिकृत /अवैध बांधकामाबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार दिनांक 1/4/2008 अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 189 मध्ये अवैध व अनधिकृत बांधकाम असलेल्या इमारतीवर शास्ती बसविणेबाबत 189(अ) अशी सुधारणा समाविष्ठ केली आहे. या 189(अ) कलमानुसार कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम/पुर्ण बांधकाम करील अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत त्यांच्याविरुध्द दावा दाखल करता येईल अशा कोणत्याही कारवाईला बाधा न आणता ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणुन राहिल तो पर्यंत दरवर्षी अशा इमारतीवर बसविण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणस उपलब्ध झाले नाही. अनाधिकृत बांधकाम असतील तर याबाबत योग्य ती कार्यवाही करणेत यावी. नव्याने बांधकाम करतांना नियमबाहय/अनिधिकृत बांधकाम होत असेल तर संबधीत विभागाने असे बांधकाम तात्काळ थांबवुन त्यावर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहेत महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती अधिनियम 1965 अन्वये नमुद योग्य ती कार्यवाही करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

DATGGAM9401 (Ref No : 59, Hmm No : 124)

164 इमारत बांधकाम परवाना नोंदवही विहित नमुन्यात ठेवली नसल्याबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपरिषद कडील नगररचना विभागाकडून महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहीता 2013 मधील नियम क्रमांक 63 नुसार नमुना क्रमांक 38 मध्ये इमारत परवानगी नोंदवही ठेवणे आवश्यक असताना त्या नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. सन 2020-21 मध्ये 242 व सन 2021-22 मध्ये 151 बांधकाम परवाने देण्यात आलेले आहे. सदर बांधकाम परवाने देताना वरील नमुना क्रमांक 38 मध्ये सदर बांधकाम ज्या ठिकाणी करण्यात येणार आहे त्या अनुषंगाने प्रभाग क्रमांक, घर क्रमांक , मालकाचे नाव, बांधकामाचे स्वरूप , अर्जाचा दिनांक , परवान्याचा दिनांक, बांधकाम पूर्ण झालेला दिनांक , भोगवटयाचा दिनांक , कर विभागाला माहिती दिल्याचा दिनांक , करनिर्धारणाची दिनांक व रक्कम या सर्व तपशिलांची नोंद करणे आवश्यक असताना संपूर्ण नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. सबब सदर इमारतीला परवाना देण्यापासून ते सदर इमारत बांधून पूर्ण झाल्यानंतर त्याचे करनिर्धारण होईपर्यंतची एकत्रित तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

DATGGAM9401 (Ref No : 60, Hmm No : 125)

165 परिपूर्ण अभिलेखे उपलब्ध नसतानाही बांधकाम परवाने देण्यात आलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2020-2021 ते 2021-2022 मध्ये http:// mahavastu. maharashtra. gov.in/ या पोर्टलद्वारे निर्गमित केलेले एकूण 393 बांधकाम परवाने देणेत आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे बाबींची पूर्तता करावी. दिनांक 01.4.2020 ते 31.03.2021 या कालावधीत एकुण 242 बांधकामाना परवानगी देणेत आली आहे. तसेच दि.01.04.2021 ते 31.03.2022 या कालावधीत एकूण 159 बांधकामाना परवानगी देणेत आली आहे असे एकूण दोन्ही वर्षात 393 बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदर बांधकाम परवाना देताना ऑनलाईन पोर्टलवरद्वारे प्राप्त करण्यात आलेले कागदपत्र उदाहरण दाखल तपासले असतां खालीलप्रमाणे त्रुटी दिसून आल्या.

अ.क्र.	प्रपोसल नंबर	नाव	त्रुटी
1.	61877	पुजा शेट्ये.	मागील वर्षीच्या घरफाळा भरलेली पावती दोन्ही व्यक्तिनी एकच जोडलेली दिसून येते.
2.	61887	आयुब मुजावर.	
3.	61901	संदीप जवारे.	2018-19 ची भरणा पावती जोडण्यात आलेली आहे. सबब 2019-20 मध्ये भरणा केलेली पावती दिसून येत नाही.
4.	61912	जुगुनु पीरजादा.	
5.	61949	सौ.राजश्री माने.	2018-19 ची पावती उत्तम देशिंगे यांच्या नावाची
6.	61905	सुकुमार काळे.	2019-20 ची पावती रघुनाथ संकपाळ यांच्या नावाने.
7.	103194	बालमुकुंद मनवाडे.	2018-19 ची भरणा पावती जोडण्यात आलेली आहे. सबब 2019-20 व 2020-21 मध्ये भरणा केलेली पावती दिसून येत नाही.

बांधकाम परवाने देताना संबंधित व्यक्तींनी चालू आर्थिक वर्षापर्यंत सर्व घरफाळा व इतर मालमत्ताकर भरले असल्याची खात्री करून तदनंतर बांधकाम परवाने देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही न करता बांधकाम परवाना देण्यात आल्याने नगरपरिषदेला तेवढ्या उत्पन्नाला मुकावे लागत आहे किंवा उत्पन्न प्राप्त होण्यास उशीर होवून करचुकवेगिरीचे प्रमाण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरीलप्रमाणे इतर अर्जाची तपासणी करून सदर व्यक्तींनी चालू आर्थिक वर्षापर्यंत सर्वांनी मालमत्ता कर भरल्याची पावती जमा करून खात्री करून लेखापरीक्षणास सादर करावेत.

DATGGAM9401 (Ref No : 61, Hmm No : 127)

166 अधिसंख्य पदे निर्माण करणेमधील अनिमयतीतेबाबत व जात पडताळणी प्रमाणपत्र नसलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2020-21 व 2021-22 सालचे आस्थापना विभागाकडील सेवापुस्तकांची तपासणी केली असता खालील कर्मचारी यांची अनुसुचीत जमाती प्रवर्गातुन नियुक्ती असूनही अद्याप जात वैधता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याने जात वैधता केल्याची खात्री करता येत नाही.

अ.क्र.	नाव	पद	नियुक्ती प्रवर्ग	नियुक्ती दिनांक
1.	सुनीलदत्त संगेवार.	वैद्यकीय अधिकारी वर्ग -2	अनुसूचित जमाती	19.12.1997

माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी दिनांक 06 जुलै 2017 रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अमलबजावणी करण्या संदर्भात असणारा सामान्य प्रशासन विभागकडील शासन निर्णय क्र.बी सी सी 2018//प्रक्र.308/16ब दिनांक 21 डिसेंबर 2019 च्या शासन निर्णय परीच्छेद क्रमांक 4.1 नुसार अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणास्तव सदर शासन निर्णयाद्वारे अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात येणारया अधिकारी व कर्मचारी संख्येइतकी असे अधिकारी व कर्मचारी सध्या ज्या पदावर कार्यरत असतील त्या पदाचे अधिसंख्य पद निर्माण करून त्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून तसेच प्रशासनाची होणारी अडचण दूर करण्यासाठी सर्व सबंधित प्रशासकीय विभागांनी तात्पुरत्या स्वरूपात 11 महिन्याकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनाकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक द्यावी. अधिसंख्य पदावर वर्ग झाल्यानंतर रिक्त होणारी अनुसूचित जमातीच्या प्रवर्गाची पदे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांकडून सेवाप्रवेश नियमानुसार विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून भरण्याची कार्यवाही करण्याचे आदेश असूनही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच परिच्छेद 4.3 प्रमाणे अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव परिशिष्ठ ndash; इ प्रमाणे वित्त विभागास सादर करण्यातआलेला नाही. सदरच्या अनियमीततेबाबत खुलासा सादर करणेत यावा.

DATGGAM9401 (Ref No : 64, Hmm No : 130)

167 सेवा पुस्तकातील उणीवा बाबत.

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	:	0.00/-
निधी	:	नगर परिषद स्व- निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	:	0.00/-

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2020-21 व 2021-22 चे वित्तीय वर्षातील कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तकाची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणीवा दिसून आल्या आहेत. यावर खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.साप्रवि/हिंदी भाषा/1092/प्र.क्र.29 व साप्रवि/हिंदी भाषा/1076/28 दि. 10/6/1976 व शा.नि.क्र.1092/1570/प्र.क्र.143/9210 दि. 1/1/93 अन्वये सेवेतील सर्व अधिकारी कर्मचारी यांना एतदर्थ मंडळाची हिंदी व मराठी भाषा उत्तीर्ण झाले बाबतची नोंद सेवा पुस्तकात घेणे आवश्यक आहे.

उदाहारांदाखल खालील कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

अ.क्र.	कर्मचारी नाव	पदाचे नाव
1.	श्री.खेमचंद लालबेग.	लिपिक टंकलेखक (आरोग्य विभाग)
2.	श्री अविनाश मोरे.	लिपिक टंकलेखक (आरोग्य विभाग)
3.	श्री. सर्जेराव पाटील.	बहुउद्देशीय सेवा कर्मचारी
4.	श्री संजय बत्ते.	सांख्यिकी सहाय्यक

2) सेवा पुस्तकात रकाना क्र.8 मध्ये वेतन वाढीवर कर्मचाऱ्याची प्रत्येक वर्षी स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे, परंतू त्यानुसार कार्यवाही केलेली नाही. उदाहरण दाखल खालीलप्रमाणे.

अ.क्र.	कर्मचारी नाव	पदाचे नाव
1.	श्री. सुनील श्रीपती कांबळे.	सफाई कामगार (आरोग्य विभाग)
2.	श्री. सदाशिव लाखे.	सफाई कामगार (आरोग्य विभाग)
3.	सुवर्णा कांबळे.	सफाई कामगार (आरोग्य विभाग)
4.	श्री.श्रीकांत पाटील.	सुपरवायझर (इस्टेट विभाग)

3)नियम क्र. 36 ते 45 नुसार सेवा पुस्तकाची सेवा पट कर्मचाऱ्याची सेवा अखंडता इ. बाबी अभिलेख पडताळणी केले बाबतची नोंद सेवा पुस्तकात शेवटी दिलेली नाही.

अ.क्र.	कर्मचारी नाव	पदाचे नाव
1.	श्री.प्रदीप रा. खोंद्रे.	हेल्पर (वाहन विभाग)
2.	सुवर्णा कांबळे.	सफाई कामगार (आरोग्य विभाग)
3.	श्री.रमेश सि.बन्ने.	लिपिक (इस्टेट विभाग)

4)सेवा पुस्तकात रजा मंजुरीचे आदेश क्रमांक व दिनांक नमूद नाही, रजा मंजूरीबाबत सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही. तसेच रजा लेखा अपूर्ण असल्याचे दिसून येते. उदाहरणदाखल खालीलप्रमाणे

अ.क्र.	कर्मचारी नाव	पदाचे नाव
1.	श्री. प्रकाश भोरे.	सफाई कामगार (आरोग्य विभाग)
2.	श्री. अशोक वायदंडे.	सफाई कामगार (आरोग्य विभाग)
3.	सुजाता दाभोळ.	लिपिक (पाणीपुरवठा विभाग)

4.	संदीप जोशी.	लिपिक (पाणीपुरवठा विभाग)

5)आस्थापनेवरील सर्व कर्मचारी/अधिकारी यांची जात पडताळणी बाबत महाराष्ट्र शासन परिपत्रक सामाजिक न्याय व सांस्कृतिक विभाग क्र.cbc/10/2004/प्र.क्र.570/मावक/5 दि. 5 मार्च 2005 मधील सुचनेनुसार जात पडताळणी केले बाबतची नोंद सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

6)आस्थापनेवरील सर्व कर्मचारी / अधिकारी यांची चारित्रय पउताळणी बाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रमांक.बीसीए/1093/14999/प्र.क्र.59/16 अ दि. 9/3/1994 मधील सूचनेनुसार कर्मचाऱ्यांचे चारित्रय व पूर्व चारित्रय पोलीस तपासामध्ये चांगले असणे आवश्यक आहे, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम 40 नुसार कर्मचाऱ्यांचे चारित्रय पडताळणी झाल्याबाबतच्या नोंदी सेवापुस्तकांमध्ये घेणे अनिवार्य आहे. अशा नोंदी आढळून आल्या नाहीत, अशा कर्मचाऱ्यांचा आढावा घेवून नोंदी पुर्ण करुन अनुपालन सादर करावे. उदाहरण दाखल खालीलप्रमाणे.

अ.क्र.	कर्मचारी नाव	पदाचे नाव
1.	श्री.अ.बा.कांबळे.	असिस्टंट मेकनिक (वाहन विभाग)
2.	श्री.शिवाजी घडवीर.	वॉचमन (इस्टेट विभाग)
3.	मारुती डांगे.	हेल्पर (इस्टेट विभाग)
4.	भारत कोपार्डे.	शिपाई (करविभाग)

7)शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर 2019/प्र.क्र.1/सेवा-9/ दि. 30 जानेवारी, 2019 चे नियम 6 नुसार विकल्प व वचन पत्र सेवापुस्तकात आढळून आले नाहीत.

8)सेवा पुस्तकात शासन परिपत्रक क्र.वेपुर-2019/प्र.क्र.8/सेवा-9 दिनांक 20 फेब्रुवारी 2019 नुसार वेतननिश्चितीबाबतचे विवरणपत्र आढळून आले नाही.

9)शासन निर्णय क्र.टी-आर-8/1163/2026/ दि. 23/10/1963 शा.नि.वित्त विभाग दि. 10/06/2015 अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यांस आपले स्वग्राम घोषीत करणे आवश्यक आहे, तशा नोंदी सेवापुस्तकात आढळून आल्या नाहीत.

अ.क्र.	कर्मचारी नाव	पदाचे नाव
1.	सिकंदर नदाफ.	लिपिक टंकलेखक.
2.	अनिता कोपार्डे.	बालवाडी शिक्षिका.
3.	संजय भोईटे.	स्वच्छता निरीक्षक.
4.	सुभाष देशपांडे.	शाखा अभियंता.

उपरोक्त बाबींची पूर्तता करुन अनुपालन सादर करावे.

168 नगरपरिषद मालकीच्या निवासस्थानांची नोंदवही उपलब्ध न झालेमुळे घरभाडे भत्ता अदाई बाबत खात्री करता येत नसलेबाबत व मुद्रांक शुल्क कपात न केलेबाबत

योजना	:		**लेखाशीर्ष**	:	00	**वसुलपात्र**	: 26784.00/-
निधी	:	नगर परिषद स्व-निधी व शासन निधी	**कलम**	:	9ड	**अंतिम अमान्य**	: 0.00/-

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 62,191 नुसार नमुना नं. 16 स्थावर मालमत्तांची नोंदवही मध्ये नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यान्वये निवासस्थान नोंदवही ठेवणे आवश्यक्त होते. परंतु अशी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच वरील नोंदवह्या महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 204 नुसार प्राधिकृत अधिकारी यांनी वर्षातून एकदा स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी करुन प्रमाणित करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. तथापि निवासस्थानांच्या सद्यस्थितीबाबत पडताळणी करता आली नाही.

2)नगरपरीषद इचलकरंजी कडील आर्थिक वर्ष 2020-21 व 2021-22 मधील आस्थापना विभागाकडील पगार पत्रकांची तपासणी केली असता घरभाडे भत्ता अदा करण्यात आल्याचे दिसून येते. वास्तविक जे कर्मचारी शासकीय क्वार्टर्स मध्ये रहातात त्यांना घरभाडे भत्ता अदा करण्यात येत नाही. सदर बाबत इस्टेट विभागाकडून सन 2020-21 व 2021-22 मध्ये एकूण किती शासकीय क्वार्टर्स नगरपरिषदेच्या मालकीची आहेत पैकी किती चालू स्थिती मध्ये होती व किती क्वार्टर्स कर्मचारी यांना देण्यात आलेली होती याची माहिती वारंवार मागूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नसल्यामुळे जे कर्मचारी शासकीय क्वार्टर्स मध्ये वास्तव्य करत नाहीत अशा कर्मचारी यांनाच घरभाडे भत्ता अदा करण्यात आला किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता येत नाही.

